# नाट्य केकावली

९३ वे
अखिल भारतीय
मराठी
नाट्य संमेलन
बारामती
२०१२



९३ वे
अखिल भारतीय
मराठी
नाट्य संमेलन
बारामती

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,
९३ व्या नाट्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा...

# SWASTIK CONSTRUCTION

**CIVIL MECHANICAL, ELECTRICAL ENGINEERS AND CONTRACTORS**

1148, E,SYKES EXTENSION, KOLHAPUR, - 416 001 (MAHARASHTRA)
PHONE : (0231) 2529199, 2527199, FAX : (0231) 2528199
EMAIL : swastikkop@rediffmail.com

# आशिर्वाद



**मा. ना. शरदचंद्रजी पवार**

केंद्रीय कृषीमंत्री, भारत सरकार

# उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष



**मा.ना.पृथ्वीराज चव्हाण**

मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य

# मार्गदर्शक



**मा. ना. अजितदादा पवार**

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

# प्रमुख उपस्थिती



मा.ना.संजय देवतळे
(सांस्कृतीक मंत्री, महाराष्ट्र राज्य)

# प्रमुख उपस्थिती



मा.ना.फौजीया खान
(राज्यमंत्री, सांस्कृतीक कार्य, महाराष्ट्र राज्य)

# प्रेरणा



**मा. सौ. सुप्रियाताई सुळे**
खासदार, भारत सरकार

|| नियोजित संमेलनाध्यक्ष ||



डॉ.मोहन आगाशे

## ।। मावळते संमेलनाध्यक्ष ।।



श्री. श्रीकांत मोघे

।। निमंत्रक ।।



श्री.किरण गुजर

शरद पवार
(केंद्रीय कृषी मंत्री, भारत सरकार)

# शुभसंदेश

बारामती येथे ९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन आयोजित करण्यात येत असल्याचे वाचून आनंद वाटला.

महाराष्ट्राच्या नाट्यरसिकांना नाट्यसंमेलनाचे आयोजन म्हणजे एक सांस्कृतीक पर्वणी आहे. सामाजिक प्रश्नांवर नाटकाची मांडणी, आशय आणि त्याचे प्रकटीकरण या दोन्ही दृष्टीने मराठी नाट्य रंगभूमी आता प्रगल्भ झाली आहे. मराठी माणूस नाटक ही एक चळवळ मानतो. सामाजिक परिवर्तनासाठी लोकांना जागरूक करण्याचे काम हे माध्यम करीत आहे. मराठी नाट्यसृष्टी ही नितनूतन असून सतत नवीन क्षितीजांचा वेध घेतला आणि नवी आव्हाने यशवी पणे झेलली.

नवीन उद्‌भवणाऱ्या सामाजिक प्रश्नांची नोंद नाट्यसृष्टी घेत राहिल. प्रेक्षकांची अभिरूची घडवीत राहिल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. नाट्यसंमेलनाच्या यशसवी आयोजनास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

शरद पवार

पृथ्वीराज चव्हाण
(मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)

# शुभसंदेश

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेच्या शाखेमार्फत ९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन बारामती येथे आयोजित केल्याचे समजून अतिशय आनंद झाला. बारामती येथे भरणारे हे संमेलन तिथल्या आदरतिथ्याने सर्वांच्या स्मरणात राहील असा मला विश्वास वाटतो.

महाराष्ट्र ही अनेक दिग्गज कलावंतांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. नाटक, चित्रपट, संगीत, शिल्प, नृत्य अशा साऱ्याच कलांची जननी आहे. दादासाहेब फाळक्यांपासून ते विष्णूदास भाव्यांपर्यंत आणि बाबुराव पेंटरपासून बालगंधर्वांपर्यंत अनेक दिग्गजांनी या मराठी मातीचा गंध जगभर पसरवला आहे. दीडशेहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेली आपली मराठी रंगभूमी आज देशातील एक अग्रणी रंगभूमी म्हणून ओळखली जाते. एकीकडून भास-भवभूती, कालिदास दुसरीकडून शेक्सपिअर, एब्सेन, बेकेट आणि तिसरीकडून लोककलांच्या रसरशीत परंपरांकडून जीवनरस घेत मराठी नाटक आजच्या या वळणावर येऊन उभे राहीले आहे.

नाट्य महोत्सवाबरोबरच राज्य शासन व्यावसायिक नाट्य महोत्सव, बालनाट्य महोत्सव, दशावतारी नाटय महोत्सव , लावणी महोत्सव, तमाशा महोत्सवही आयोजित करीत असतो. एकूणच कला क्षेत्राला प्रोत्साहन मिळावे यासाठी शासन अनेक योजना राबवित असते. वृद्ध कलावंतांना मानधन असो, विविध कला महोत्सवाचे आयोजन असो की कलेच्या क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार असोत, अशा उपक्रमांत शासन कुठेही मागे नाही.

या संमेलनास आणि त्यानिमीत्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

पृथ्वीराज चव्हाण

पृथ्वीराज चव्हाण

## अजित पवार
(उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)

# शुभसंदेश

रंगदेवतेच्या सेवेसाठी ९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन आयोजित करण्याचा मान बारामती शहराला दिल्याबद्दल तसेच माझी स्वागताध्यक्षपदी निवड केल्याबद्दल अखिल भारतीय नाट्य परिषदेचे मन:पूर्वक आभार.

मा. शरद पवार साहेब मुख्यमंत्री असताना बारामतीत १९९५ साली राजा गोसावीच्या अध्यक्षतेखाली नाट्यसंमेलन भरले होते. त्यानंतर १७ वर्षेविंगेत उभे राहून खुणावणाऱ्या आयोजकपदाची भूमिका यशस्वीपणे वटवण्यासाठी पुन्हा एकदा बारामतीचा रंगमंच सज्ज झाला आहे.

यानिमित्ताने अभिनयाच्या विविध छटांची उधळण करणाऱ्या नाट्यकर्मींची मांदियाळी बारामतीत जमणार आहे. बारामतीकरांना या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने कलेची आणि कलेची साधकांची सेवा करण्याची संधी लाभणार आहे.

नाट्यसृष्टीचा हा उत्सव अजरामर करण्याचा बारामतीकरांचा मानस आहे. अभिनयाच्या विविध रंगात न्हाऊन निघण्यास आतुर झालेल्या नाट्यप्रेमींच्या स्वागतासाठी बारामती नगरी सज्ज झाली आहे. नाट्य रसिकांनी बारामतीकरांच्या आदरातिथ्याचा लाभ घ्यावा अशी यानिमित्ताने आग्रहाची विनंती.

नाट्यसंमेलनानिमित्त प्रकाशीत होत असलेल्या स्मरणिकेस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

बारामतीत होणारे ९३ वे नाट्यसंमेलन मराठी नाट्यसृष्टीच्या सुवर्णकाळाची नांदी ठरो हिच शुभेच्छा !

अजित पवार

९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन बारामती २०१२

सुप्रिया सुळे
(खासदार, भारत सरकार)

# शुभसंदेश

अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन माझ्या प्रिय बारामती नगरीत साकार होते आहे याचा मला अतिव आनंद होतो आहे. बारामतीचे नाट्यरसिक आणि कलारसिक यांच्या दृष्टीने हे संमेलन म्हणजे एक अपूर्व आनंदयोग आहे. संमेलनाच्या दिवसात ही नगरी आपल्य अस्सल आणि अभिजात रसिकतेचा प्रत्यय कलावंताना देईल यात शंक नाही.

मराठी रंगभूमी आणि मराठी नाटक हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्राणप्रिय ठेवा आहे. नाटक हा कलाकार महाराष्ट्रात सर्वप्रिय तर आहेच पण तो सामाजिक अभिसरणाचे , शिक्षणाचे, वैचारिक क्रांतीचे एक मोलाचे माध्यमही आहे. मराठी नाटक ही एक संपन्न आणि सकस अशी परंपरा आहे, तशीच ती लोकभावना व्यक्त करणारी एक चळवळ आहे. म्हणूनच मराठी रंगभूमीला भारतीय आणि विश्वरंगभूमीवर मानाचे स्थान आहे ! मी लहानपनापासून मराठी नाटकाची निष्ठावंत प्रेक्षक राहात आले आहे आणि अनेक नाटकांनी मला अप्रतिम आनंद दिला आहे. तसे पाहता आमचे सारे घरच नाटकवेडे आहे.

मला मराठी रंगभूमीचा अभिमान आहे आणि आजच्या प्रमाणे उद्याही ही रंगभूमी सर्वोत्तम विकासाच्या दिशेने वाटचाल करेल असा मला विश्वास वाटतो.

बारामतीतील नाट्यसंमेलन शंभर टक्के आगळे-वेगळे असणार आणि ते प्रचंड यशस्वी होणार यात शंकाच नाही. या नाट्यसंमेलनाला माझ्या लाखलाख शुभकामना.

सुप्रिया सुळे

संजय देवतळे
(सांस्कृतीक मंत्री, महाराष्ट्र राज्य)

# शुभसंदेश

९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन ऐतिहासिक महत्व लाभलेल्या बारामती नगरीत आयोजित करण्यात आले आहे ही सर्व नाट्यकर्मींसाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

मराठी भाषेचे सौदर्य असलेल्या आर्या वृत्ताचे जनक कविवर्य मोरोपंत तसेच ज्येष्ठ करी श्रीधर यांच्या वास्तव्याचा स्पर्श या नगरीला झाला आहे. साहित्य, संस्कृति तसेच कृषी व अन्य सामाजिक क्षेत्रात बारामती हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शहर आहे. अशा या बारामतीमध्ये जेष्ठ रंगकर्मी डॉ.मोहन आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली भरणाऱ्या रंगकर्मींच्या या महामेळाव्यास मी सांस्कृतीक कार्य विभागाच्या वतीने शुभेच्छा देतो.

शतकाहून अधिक वर्षाची परंपरा लाभलेली मराठी रंगभूमी ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. नाटक हा मराठी माणसाचा श्वास आणि ध्यास आहे. मराठी रंगकर्मींनी देशाच्या नव्हे तर जागतिक स्तरावर आपल्या कलागुणांच्या बळावर एक वैशिष्ठ्यपूर्ण ओळख व स्थान निर्माण केलेले आहे. यापुढेही मराठी रंगभूमी अशाच अनेक गुणी कलाकारांच्या योगदानाने अधिकअधिक समृद्ध होईल असा मला विश्वास वाटतो. त्यासाठी अशा प्रकारची संम्मेलने निश्चितच प्रेरक ठरतील. या सदिच्छेसह मी पुनश्च एकदा सर्व रंगकर्मींना ९३ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या शुभेच्छा देतो.

संजय देवतळे

फौजीया खान
(राज्यमंत्री,सांस्कृतीक कार्य.)

# शुभसंदेश

९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन बारामती येथे होत आहे हे समजून आनंद झाला. या नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने आपण स्मरणिका प्रकाशित करीत आहात त्यासाठी माझ्या शुभेच्छा !

प्रत्येक मराठी माणसाची नाटक पहाणे ही आवड आहे. मराठी साहित्य संमेलन आणि नाट्य संमेलन ही दोन्ही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहेत. त्याचबरोबर अशा संमेलनाच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि लोकला टिकविण्याचे जोपासण्याचे महत्वपूर्ण काम केले जात आहे. राज्यातील साहित्य, कला, नाटक, चित्रपट या क्षेत्राला बळ देण्याची राज्यशासनाची भूमिका राहिली आहे.

या स्मरणिकेच्या माध्यमातून नाट्य रसिकांना नाट्यकलेचा इतिहास समजून घेण्यास मदत होईल अशी अपेक्षा करते.

फौजिया खान

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई
## नियामक मंडळ पदाधिकारी



**श्री.हेमंत टकले**
अध्यक्ष



**श्री.विनय आपटे**
उपाध्यक्ष



**श्रीमती वंदना गुप्ते**
कोषाध्यक्ष



**श्री.जयंत जातेगांवकर**
सहकार्यवाहक



**श्रीमती स्मिता तळवळकर**
प्रमुख कार्यवाह



**श्री.दिलीप ठाणेकर**
सहकार्यवाह

७३ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन बारामती २०१२

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई
## नियामक मंडळ, सदस्य


श्री.मोहन जोशी


श्री.दीपक करंजीकर


श्री.शशिकांत मोरे


श्री.संजय देसाई


श्री.योगेश सोमण


श्री.विलास गुर्जर


श्री.सुरेश पुरी


श्री.विजय वांकर


श्री.अरविंद चित्रे


डॉ.बाळ भालेराव


श्री.संतोष कोचरेकर


श्री.अविनाश किन्हीकर


श्री.उदय सामंत


श्री.प्रकाश बीद


श्रीमती शितल शुक्ल


श्री.अशोक पाटोळे


श्री.दिवाकर दळवी


श्री.विश्वनाथ कामत


श्री.जयंत सावरकर


श्री.प्रकाश कुशे


श्री.प्रमोद पवार


श्री.सुरेश गायधनी


श्री.शशिकांत जोशी


श्री.उदय धुरत


श्री.रत्नाकांत जगताप


श्री.गुरुनाथ दळवी


श्री.श्रीपाद जोशी


श्री.प्रशांत जोशी


श्री.[illegible]रीष पांडे


श्री.मंगेश कांबळी


श्री.शिरीषकुमार जानोरकर


श्री.शिवाजी शिंदे


श्री.सुनिल महाजन


श्री.प्रकाश यादव


श्री.आनंद कुलकर्णी


श्री.देवेंद्र यादव

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## बारामती शाखा पदाधिकारी


हरेश गुजराथी


संजय दोशी


रामचंद्र गोंजारी


प्रशांत कुलकर्णी


अशोक भोसले


जाकिर तांबोळी


दिपक गुजर


जितेंद्र गुजर


विनोद रावळ


डॉ.चंद्रशेखर मुरुमकर


प्रदिप परकाळे


गणेश देव


अमर महाडीक


संजय जाधव


ॲड.सुनिल जगताप


राजेंद्र कुंभार


संजय मोरे


दिपक मुळे


सचिन आगवणे


मल्लीकार्जुन हिरेमठ

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## बारामती शाखा पदाधिकारी


वरुण गुजर


मुकुंद पाठक


संजय खडके


ॲड.अक्षय महाडीक


प्रतिक गुजर


सचिन होळकर


श्रीकांत गालिंदे


हनुमंत घाडगे


डॉ.सुजित अडसुळ


ॲड.विजय लोणकर


करण गुजर


मयुर शिंदे


केदार विभुते


आशुतोष सातपुते


रवि सोनवणे


जितेंद्र रावळ


वासिम शिकीलकर


करण रावळ


सोहेल शेख

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## बारामती शाखा पदाधिकारी


सौ. हेमलता गुजर


सौ.ज्योती गुजराथी


सौ.जयश्री दोशी


सौ.लता गोंजारी


सौ.सुनिता कुलकर्णी


सौ.सुप्रिया भोसले


सौ. झरीना तांबोळी


सौ. लता गुजर


सौ. अनुराधा गुजर


सौ. शोभा रावळ


सौ.सुषमा मुरुमकर


सौ. संज्योत परकाळे


सौ. शिला देव


ॲड. प्रिया गुजर


सौ. सुचेता जाधव


सौ. अनुपमा जगताप


सौ. इंदूमती कुंभार


सौ. निशा मोरे


सौ. शितल मुळे


सौ. सुनिता आगवणे

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## बारामती शाखा पदाधिकारी


सौ. गिता हिरेमठ


सौ.पल्लवी गुजर


सौ. प्रतिमा पाठक


सौ. योजना देवळे


ॲड. केतकी देवळे


प्राची गुजर


प्रज्ञा मोरे


सौ.अरुणा घाडगे


डॉ.सौ.स्मिता अडसुळ


प्रिती गुजर


अंकिता खत्री

बारामतीच्या सांस्कृतीक पालखीचे आम्ही वारकरी.....
आम्ही वारकरी कलेची पताका सदा खांद्यावरी.....
..... करु बारामती ही नाट्यपंढरी !

**अखिल भारतीय मराठी नाटय परिषद ९३ वे नाटय संमेलन २०१२, बारामती**

# व्यवस्थापन समिती (मध्यवर्ती संयोजन)

## सुकाणू समिती

श्री. हेमंत टकले
श्रीमती स्मिता तळवलकर
श्री. दिलीप ठाणेकर
श्री. विनय आपटे
श्रीमती वंदना गुप्ते
श्री. जयंत जातेगांवकर

## उद्घाटन व समारोप स्टेज व्यवस्था

श्री. संजय देसाई
श्री. रत्नकांत जगताप
श्री. नागेष खोरजूवेकर
श्री. प्रकाष ब्रीद
श्रीमती षीतल षुक्ल
श्री. सचिन गुंजोटीकर
श्री. शिवाजी षिंदे
श्री. मेघा भागवत
श्रीमती षषिकला सुखदेव

## परिसंवाद

श्री.प्रमोद पवार

## समेलनाध्यक्ष

श्री. सुनिल महाजन
श्री. शशिकांत जोशी
श्री. विलास गुर्जर

## ध्वनी / प्रकाश व्यवस्था

श्री. रत्नकांत जगताप
श्री. हेमंत कुलकर्णी

## निवास व्यवस्था / वाहन व्यवस्था

श्रीमती स्मिता तळवलकर
श्री. जयंत जातेगांवकर
श्री. शिरीश जानोरकर
श्री. आनंद कुलकर्णी

## पत्रकार व्यवस्था

श्री. अरूण घाडीगांवकर
श्री. शशिकांत मोरे
श्री. उदय धुरत

## प्रवास व्यवस्था

श्री. शिवाजी षिंदे
श्री. सतिष लोटके
श्री. सुनिल कदम
श्री. मनोज डाफळे

## आर्थिक व्यवहार

श्री. दिगंबर आगाषे
श्री. सचिन गुंजोटीकर

**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ९३ वे नाट्य संमेलन २०१२, बारामती**

# व्यवस्थापन समिती (मध्यवर्ती संयोजन)

**रंगमंच १**

श्री. श्रीपाद जोशी

**रंगमंच २**

श्री. प्रमोद पवार

**रंगमंच ३**

श्री. सतिष लोटके    श्री. प्रकाश यादव

**रंगमंच ४**

श्री. प्रकाश कुषे

**मध्यवर्ती स्वागत कक्ष**

श्रीमती गीता सोमण    श्री.सुरेश गायधनी    ॲड.देवेंद्र यादव

**कलावंत व्यवस्था**

श्री.जयंत सावरकर    श्रीमती गीता सोमण    श्री.प्रफुल्ल कारेकर

**विषय नियामक समिती**

श्री.दिवाकर दळवी

**मध्यवर्ती कार्यालय मुंबई**

श्री. सुनिल कदम    श्री. सचिन गुंजोटीकर    श्री. नागेष खोरजूवेकर
श्री. मनोज डाफळे    श्री. राहुल पवार    श्रीमती षषिकला सुखदेव

## अखिल भारतीय मराठी नाटय परिषद ९३ वे नाटय संमेलन २०१२, बारामती

# स्वागत समिती

| | | |
|---|---|---|
| १. मा. अजितदादा पवार | – | स्वागताध्यक्ष |
| २. मा.किरण गुजर | – | निमंत्रक |
| ३. मा. राजेंद्रदादा पवार | – | चेअरमन बारामती ॲग्रो |
| ४. मा. सौ. सुनेत्राताई पवार | – | अध्यक्षा बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क |
| ५. मा. सौ. नंदाताई पवार | – | विश्वस्त, शारादाबाई पवार शैक्षणिक संकुल |
| ६. मा. सौ. प्रतिभाताई नेवसे | – | सभापती पंचायत समिती बारामती |
| ७. मा. सौ. जयश्रीताई सातव | – | अध्यक्षा बारामती नगरपरिषद |
| ८. मा. विनोदकुमार गुजर | – | उपाध्यक्ष विदया प्रतिष्ठान बारामती |
| ९. मा. बाळासोा तावरे | – | चेअरमन माळेगाव सह. साखर कारखाना |
| १०. मा. राजवर्धन शिंदे | – | चेअरमन श्री. सोमेश्वर सह. साखर कारखाना |
| ११. मा. शहाजीराव काकडे | – | मा. चेअरमन श्री. सोमेश्वर सह. साखर कारखाना |
| १२. मा. अमरसिंह घोलप | – | चेअरमन श्री. छत्रपती सह. साखर कारखाना |
| १३. मा. अनिल जगताप | – | चेअरमन बारामती तालुका दुध संघ |
| १४. मा. अंकुश रसाळ | – | चेअरमन खरेदी विक्री संघ बारामती |
| १५. मा. संपत जगताप | – | चेअरमन कृषी उत्पन्न बाजार समिती बारामती |
| १६. मा. श्रीकांत सिकची | – | चेअरमन बारामती सह. बँक |
| १७. मा. संभाजी होळकर | – | अध्यक्ष बारामती तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १८. मा.इम्तियाज शिकीलकर | – | अध्यक्ष बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १९. मा.राजेंद्र बनकर | – | उपनगराध्यक्ष बारामती नगरपरिषद |
| २०. मा.विजयसिंह देशमुख | – | उपविभागीय अधिकारी |
| २१. मा. नागनाथ इरवाडकर | – | अधीक्षक अभियंता महावितरण |
| २२. मा. रविंद्र परदेशी | – | अतिरीक्त पोलिस अधिक्षक |
| २३. मा. राहूल काळभोर | – | गटविकास अधिकारी बारामती |
| २४. मा. सचिन इथापे | – | तहसिलदार बारामती |
| २५. मा. रवी पवार | – | मुख्याधिकारी बारामती नगर पालिका |
| २६. मा. श्रीकांत बागुल | – | उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग बारामती |
| २७. मा. राजेंद्र धोडपकर | – | सहा. कार्यकारी अभियंता पाटबंधारे उपविभाग बारामती |
| २८. मा. नामदेव मिटटेवाड | – | उपविभागीय पोलिस अधिकारी बारामती |
| २९. मा. योगेश जगताप | – | उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस |
| ३०. मा. भाउसाहेब करे | – | सभापती बांधकाम व आरोग्य विभाग |
| ३१. मा. शांतिशेठ शहा | – | अध्यक्ष अनेकांत एज्युकेशन सोसायटी |

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ९३ वे नाट्य संमेलन २०१२, बारामती

# स्थानिक संयोजन समिती

### • निवास समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| राम गोंजारी | मयुर शिंदे | सौ. निशा मोरे | अरविंद जगताप |
| संजय खडके | वरूण गुजर | शब्बीर बारामतीवाला | अनिल सातव |
| रवी सोनवणे | सौ. सुषमा मुरुमकर | संतोष गालींदे | प्रफुल्ल तावरे |

### • स्टेज समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| प्रशांत कुलकर्णी | जाकीर तांबोळी | प्रज्ञा मोरे | प्रल्हाद जाधव |
| दिपक गुजर | सचिन आगवणे | प्रिती गुजर | रविराज तावरे |
| अशोक भोसले | करण गुजर | इंद्रजीत धुमाळ | अजित जमदाडे |

### • वाहतूक समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| दिपक गुजर | ॲड. विजय लोणकर | अशोक भोसले | अमोल नेवसे |
| संजय मोरे | आशुतोष सातपुते | रमाकांत गायकवाड | किरण तावरे |
| सचिन होळकर | हनुमंत घाडगे | गणेश शिंदे | जाधव सो |

### • सुरक्षा व्यवस्था समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| राजेंद्र कुंभार | अभय सावंत | ॲड. प्राची गुजर | बापू बागल |
| दिपक मुळे | प्रशांत कुलकर्णी | कैलास पिंगळे | सुभाष सोमाणी |
| प्रतिक गुजर | श्रीकांत गालिंदे | श्याम इंगळे | श्री. चव्हाण सो |

### • परीसंवाद समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | ॲड. विजय लोणकर | मयुर शिंदे | शिरीष कुलकर्णी |
| संजय जाधव | करण रावळ | माधव जोशी | |
| सौ. सुचेता जाधव | सौ. सुनिता आगवणे | वनीता बनकर | |

### • प्रदर्शन समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| गणेश देव | अनुराधा गुजर | मुकुंद पाठक | सौ. यास्मिन बागवान |
| संजय मोरे | करण रावळ | प्रा. विजय खुडे | अर्चना जाधव |
| इंदुमती कुंभार | प्रतिक गुजर | सौ. प्रणिती काळे | |

### • प्रसिद्धी समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| ॲड.अमर महाडीक | राजेंद्र कुंभार | संजय मोरे | हनुमंत भापकर |
| मलिकार्जुन हिरेमठ | राम गोंजारी | सलिम शेख | रविंद्र रणसिंग |
| ॲड.अक्षय महाडीक | केदार विभुते | अनिल पोटरे | |

### • भोजन समिती •

| | | | |
|---|---|---|---|
| हरेष गुजराथी | हनुमंत घाडगे | सौ. हेमलता गुजर | विठठ्ल देवकाते |
| प्रदीप परकाळे | जितेंद्र रावळ | सौ. गिता हिरेमठ | पराग साळवी |
| | सौ. अरूणा घाडगे | पौर्णिमा तावरे | संतीष ह. तावरे |

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ९३ वे नाट्य संमेलन २०१२, बारामती

# स्थानिक संयोजन समिती

## शोभायात्रा समिती

| | | | |
|---|---|---|---|
| संजय जाधव | मलिकार्जुन हिरेमठ | दिपक गुजर | प्रदिप परकाळे |
| राजेंद्र कुंभार | जाकिर तांबोळी | हनुमंत घाडगे | |

## वैद्यकीय समिती

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. हर्षवर्धन व्होरा | डॉ. सुहासीनी सोनवले | डॉ. सुजित अडसुळ | डॉ. सौ. गिता कुलकर्णी |
| डॉ. अमोल भंडारी | सौ. खंडागळे संज्योत | डॉ. सौ. सुष्मा हिंगणे | |

## बैठक व्यवस्था समिती

| | | | |
|---|---|---|---|
| अशोक भोसले | संजय खडके | वरुण गुजर | सौ. निशा मोरे |
| राम गोंजारी | मयूर शिंदे | सौ. सुषमा मुरुमकर | |

## वीज पुरवठा समिती

| | | | |
|---|---|---|---|
| संजय खडके | सचिन होळकर | रवि सोनवणे | अभय सावंत |
| बापू शिंदे | सचिन आगवणे | किशोर पाटील सो. | जितेंद्र रावळ |

## सांस्कृतीक कार्यक्रम समिती

| | | | |
|---|---|---|---|
| जितेंद्र गुजर | सौ. शिला देव | प्रज्ञा मोरे | रविंद्र सबनिस |
| प्रदीप परकाळे | सौ. लता गुजर | मंगलताई सराफ | आबासोा परकाळे |
| सौ. योजना देवळे | अंकीता खत्री | प्रतिभा दाते | |

## स्वच्छता समिती

| | | | |
|---|---|---|---|
| प्रदीप परकाळे | श्री गालिंदे | करण रावळ | राहूल वाघोलिकर |
| दिपक मुळे | वरूण गुजर | रवी सोनवणे | |
| अशोक भोसले | झाकीर तांबोळी | सुभाष नारखेडे | |

## स्मरणिका समिती

| | | | |
|---|---|---|---|
| संजय जाधव | राजेंद्र कुंभार | ॲड. प्रिया महाडीक | ॲड. अमर महाडीक |
| डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | विनोद रावळ | श्री. वाय. बी. सावंत | गणेश देव |

## कार्यालयीन कामकाज

| | | | |
|---|---|---|---|
| ॲड. सुनिल जगताप | मुकुंद पाठक | ॲड. प्राची गुजर | सौ. लता गोंजारी |
| ॲड.अक्षय महाडीक | केदार विभुत | सौ. सुनिता कुलकर्णी | |

## मध्यवर्ती समन्वय समिती

| | | |
|---|---|---|
| विनोद रावळ | प्रशांत कुलकर्णी | ॲड. अमर महाडीक |

९३ वे
अखिल भारतीय
मराठी
नाट्य संमेलन
बारामती
२०१२



# स्वागताध्यक्षांचे मनोगत

दिनांक २२ डिसेंबर २०१२
मोरोपंत नगरी, बारामती

**मा.अजितदादा पवार**

रंगदेवता आणि नाट्यरसिकांना माझे विनम्र अभिवादन.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या बारामती शाखेतर्फे आयोजीत ९३ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त उपस्थित संमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशेजी, मावळते संमेलनाध्यक्ष श्रीकांत मोघेजी, ज्येष्ठ रंगकर्मी आणि या नाट्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष, संमेलनाचे उद्‌घाटक आदरणीय पवार साहेब, उद्‌घाटन सोहळ्याचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे, खासदार सुप्रिया सुळे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष हेमंत टकले, उपाध्यक्ष विनय आपटे, प्रमुख कार्यवाह स्मिता तळवलकर, सहकार्यवाह जयंत जातेगावकर, दिलीप ठाणेकर, कोषाध्यक्ष वंदना गुप्ते, संमेलनाचे निमंत्रक किरण गुजर, इतर मान्यवर, ज्यांच्यामुळे मराठी नाट्य चळवळीला स्वत:चं वेगळ अस्तित्व निर्माण करता आलं ते नाट्यकर्मी आणि ज्यांच्यामुळे ही नाट्यचळवळ अनेक अडचणींना सामोरेजात अस्तित्व टिकवून राहिली त्या नाट्य रसिकांचे बारामतीकरांच्या वतीने मी हार्दिक स्वागत करतो.

यापूर्वी १९९५ साली बारामतीकरांना नाट्य संमेलन आयोजीत करण्याचा मान मिळाला होता. आज १७ वर्षांनंतर पुन्हा एकदा या संमेलनाच्या आयोजनाचा मान मिळवुन दिल्याबद्दल स्वागताध्यक्ष आणि एक नाट्यप्रेमी बारामतीकर म्हणून मी सुरवातीलाच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे आभार मानतो.

या नाट्यसोहळ्याच्या निमित्तानं बारामतीमध्ये आलेल्या सर्व मान्यवरांचं सर्व नाट्यकर्मींच आणि नाट्य रसिकांच मन:पूर्वक स्वागत करतो़ आधे अधुरे ने ज्यांच्या नाट्य कारकिर्दीस सुरवात झाली. ज्यांच्या घाशीराम कोतवाल ने भारतीय नाट्यसृष्टीत इतिहास घडविला, अशा डॉ. मोहन आगाशे यांची नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मी सर्व नाट्य रसिकांच्या वतीनं त्यांचं अभिनंदन करतो.

ब्रम्ह कमंडलूच्या तीरी, द्वादशमती नामनगरी
आद्यंत ग्रंथ निर्धारी, तेथेच झाला जाणिजे

अशा शब्दांत शिवलिलामृतकार श्रीधर स्वामींनी नाट्य परमेश्वर शिवाला वंदन केले आहे. श्रीधर स्वामींच्या लेखणीतून सुरू झालेल्या भक्ती प्रवाहाचे रूपांतर आर्यापती मोरोपंतांनी भक्तीसागर केले. मराठी भाषेतील पंतकाव्यापैकी तीन चतुर्थांश पंतकाव्याची जन्मभूमी बारामती आहे.

बारामतीत,
म्हणवूनी तीने बारामती असे नाव
तीत बसे तो मोरोपंत भवाब्धीत
जीचं नव नाव

बारामतीमध्ये मती देखील आहे आणि राम देखिल आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठी भाषिक नाट्यप्रेमींच्या सहस्त्रमती आज बारामतीत एक मती झाल्या आहेत. बारामतीच्या नाट्यकलेचा याठिकाणी मला विशेष उल्लेख करावा वाटतो. सुरवातीच्या काळात नाट्यसाधना आणि गेली ३३ वर्ष नटराज च्या माध्यमातून इथली नाट्यचळवळ कार्यरत आहे. राज्य नाट्य स्पर्धेत कराड केंद्रावर सलग पाच वर्षेप्रथम क्रमांक मिळविण्याचा मान बारामतीला मिळाला आहे. गेली २९ वर्षेराज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचं आयोजन बारामतीत होत आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठी स्वस्त नाटक योजना बारामतीमध्येच सुरू आहे. शारदोत्सव, शारदा व्याख्यानमाला, परिवर्तन व्याख्यानमाला यांच्या माध्यमातून बारामतीकरांची सांस्कृतिक भूक भागवली जात आहे.

बारामतीत घडणाऱ्या कुठल्याही गोष्टीबद्दल राज्यातील लोकांमध्ये कमालीची उत्सुकता असते. त्यामुळच हे नाट्य संमेलन केवळ दोन दिवसांपुरतं मर्यादीत न ठेवता त्याला सोहळ्याचं रूप दिलं गेलं पाहिजे, अशी इथल्या नाट्यरसिकांची आग्रही मागणी होती़ मराठी सांस्कृतिक विश्वाला संपन्न करण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे देखील हे जन्मशताब्दी वर्ष आहे. १२ डिसेंबरला पवार साहेबांचा देखिल वाढदिवस असतो़ त्यामुळं १२/१२/१२ हा शतकातुन एकदाच येणारा योग साधून १२ डिसेंबरलाच या संमेलनाच्या पहिल्या अंकाची सुरवात करण्यात आली. एकांकिका महोत्सव, भारूड, नाट्यसंगीत, दिर्घांक, संगीत नाटक, नाट्य कार्यशाळा, बालनाट्य, प्रदर्शन यांच्या माध्यमातून या पहिल्या अंकाचा आनंद नाट्यरसिकांनी लुटला आहे.

या उद्‌घाटन सोहळ्याच्या रूपानं या संमेलनाचा दुसरा अंक आज नाट्य रसिकांपुढं सादर होत आहे.

९३ व्या नाट्य संमेलनाचं यजमानपद मिळाल्यापासून बारामतीकरांच्या आनंदाला जितंक उधाण आलं, तितकीच उत्सुकता राज्यभरातील

नाट्य नाट्यप्रेमींना लागून राहीली होती. त्यामुळच, यजमानपद जाहिर झाल्यापासून ज्याच्याकडे सर्वांच लक्ष लागून राहीलं होतं, तो उत्सुकतेचा पडदा आज वर गेला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा अनमोल खजिना असणाऱ्या नाट्यचळवळीच्या एका नवीन पर्वाची सुरुवात यानिमित्तानं होत आहे. मराठी चळवळीला पुन्हा एकदा गतवैभव मिळवून देण्याची सुरुवात बारामतीच्या या नाट्यसंमेलनाच्या निमित्तानं व्हावी, अशी आमची इच्छा आहे. ही इच्छा नाट्यकर्मी निश्चितच पूर्ण करतील, असा आम्हा सर्व नाट्यप्रमींना विश्वास आहे.

१८४७ मध्ये विष्णूदास भावे यांच्या सीतास्वयंवर या पहिल्या नाटकाच्या प्रयोगानं मराठी नाट्यसृष्टीला जन्माला घातलं. तत्कालीन समाजाच्या चाली–रिती, रुढी पंरपरा, पौराणिकतेचा प्रभाव यांच्या माध्यमातुन करमणूक आणि प्रबोधनाचा मार्ग चोखाळत नाट्य परंपरेनं आपला प्रवास सुरु केला. आण्णासाहेब किर्लोस्कर, विनायक किर्तने, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, नाट्याचार्य कृष्णाजी खाडीलकर, राम गणेश गडकरी, बालगंधर्व, मामा वरेरकर, प्र. के. अत्रे, म.गो. रांगणेकर, वि.वा. शिरावडकर, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, सई परांजपे, विजया मेहता, केशवराव भोसले, काशीनाथ घाणेकर, प्रभाकर पणशीकर, श्रीराम लागू, डॉ. मोहन आगाशे, दिलीप प्रभावळकर, मच्छिंद्र कांबळी, नाना पाटेकर, लालन सारंग, श्रीकांत मोघे, सुलभा देशपांडे, भक्ती बर्वे, यांसारख्या अनेक विभूतींनी नाट्यसंपदेच्या प्रगल्भतेत आणि वैभवात भर घातली.

हे सर्वजण मराठी नाट्यसृष्टीच्या सुवर्णकाळाचे केवळ साक्षीदारच नव्हते तर कर्ते–करविते होते. त्या सुवर्णकाळाबद्दल मी इथं फारसं बोलत नाही, कारण गौरवशाली इतिहासाला कवटाळताना वर्तमान आणि भविष्याचा विसर पडून चालणार नाही.

प्रायोगिकता आणि व्यावसायिकता या दोन वेगवेगळ्या वाटांवरुन मार्गक्रमण करणाऱ्या या नाट्याच्या प्रवासाची निश्चित दिशा ठरविण्याची वेळ आली आहे. विविधांगी मार्गाने झालेल्या १६९ वर्षांचा हा प्रवास आज एका निर्णायक वळणावर येऊन पोहचला आहे. केवळ करमणूक करणाऱ्या विनोदी नाटकांच्या जीवावर मराठी नाट्यसृष्टी आपलं अस्तित्व टिकवून धरु शकेल का ? या प्रश्नानं नाट्य चळवळीला बेचैन करुन सोडलं आहे. प्रायोगिकतेवर व्यावसायिकता हावी होत असल्यामुळं गल्लाभरु नाटकांच्या संख्येत वाढ होत असल्याचं चित्र आहे.

चित्रपट, टेलिव्हिजन, इंटरनेट यांसारख्या माध्यमांशी स्पर्धा करताना नाटकांची दमछाक होत आहे. नाटक म्हणजे सुखवस्तू वर्गाच्या करमणूकीचे साधन, असा सर्वसामान्य माणसाचा समज झाला आहे. त्यामुळं नाटकाचा प्रेक्षक वर्ग हा मर्यादीत राहिला आहे. नाटकांमधून आपल्या कारकीर्दीला सुरुवात करणारे अनेक कलाकार टी.व्ही. वाहिन्या तसेच चित्रपटांकडे वळले आहेत. त्यामुळं निर्मात्यांना त्यांच्या तारखा मिळविण्याची कसरत करावी लागत आहे. नाट्यनिर्मीतीसाठी लागणारा खर्च देखील वाढला आहे. त्यामुळं मराठी पुस्तकांच्या किमतीप्रमाणेच मराठी नाटकांचे तिकिटांचे दर सामान्य मानसाला परवडण्यापलीकडं गेले आहेत. मराठी बॅकस्टेज आर्टिस्ट मिळत नसल्यामुळ इतर राज्यातील बॅकस्टेज आर्टिस्टवर अवलंबून रहावं लागत आहे. शासन नाटकांना अनुदान देत असलं तरी नाटकांनी किती दिवस अनुदानावर तग धरुन रहायचं हा प्रश्न देखील अनुत्तरीतच आहे. केवळ प्रेक्षकांच्या पाठिंब्यावरच आपल्याला टिकुन रहायचं आहे, हे लक्षात घेऊन प्रेक्षकांच्या अपेक्षांना खरे उतरण्याची कसरत मराठी नाटकाला करावी लागणार आहे.

ज्या गोष्टींना समाजातल्या तळातील घटकांचा पाठिंबा असतो, त्या गोष्टींना आपल्या अस्तित्वाची फिकर करण्याची गरज पडत नाही. हिच गोष्ट मराठी नाटकांच्या बाबतीत लागू होत आहे. मराठी नाटकांनी स्वत:ला केवळ ठराविक वर्गापुरतेच मर्यादीत ठेवल्यामुळं सामान्यांच्या चर्चेतुन मराठी नाटक हद्दपार झाल्याचं चित्र आहे. जोपर्यंत सामान्य माणसापर्यंत मराठी नाटक पोहचणार नाही, तोपर्यंत मराठी नाटकांच्या भवितव्याबद्दल ठराविक वर्गच चर्चा करत राहिल. पूर्वी अगदी छोट्या छोट्या शहरांमध्ये नाटकांचे प्रयोग व्हायचे अलिकडे मात्र मुंबई–पुणे–नाशिक या त्रिकोणातच मराठी नाटकं फिरत असल्याचं आपल्याला पहायला मिळतं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य माणसापासून फारकत घेणं मराठी नाटकांना परवडण्यासारखं नाही.

नाट्यनिर्मात्यांनी देखील ग्रामीण भागातील नवनवीन कलाकारांना संधी देवून, राज्यभर नाटकांचे दौरे करुन हा परीघ वाढविण्याची गरज आहे. सामान्य माणसापर्यंत नाटक पाहेचले तरच मराठी नाटकांना गतवैभव मिळू शकणार आहे. ग्रामीण भागात मराठी नाटकांचे बीज नव्यानं रुजविण्याची वेळ आलेली आहे.

देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात मराठी रंगभूमीचं नाव आदरानं घेतलं जातं. प्रयोगशीलता आणि मराठी नाटक यांचं अतुट नातं आहे. हे नातं आणखी दृढ करण्याची वेळ आलेली आहे. प्रयोगशीलतेतूनच नवनिर्मिती होत असते. त्यामुळं निर्माते आणि कलावंत यांनी रंगभूमीला बाळसं येण्यासाठी प्रयोगशीलता जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मराठी रंगभूमीच्या विकासात बालरंगभूमी आणि विद्यार्थी रंगभूमी महत्वाचे योगदान दऊ शकतात, असं माझं प्रामाणिक मत आहे. अलिकडच्या काळात मराठी वाचन संस्कृती कमी होत चालली आहे, असं म्हटलं जातं. याच्या पाठीमागच्या कारणांचा शोध घेताना दर्जेदार बाल साहित्याच्या निर्मितीचा अभाव हे प्रमुख कारण आपल्या लक्षात येतं. बालपणपासूनच वाचनाची आवड लागली तर आयुष्यभर ती आवड जोपासली जाते. नाटकांची देखील अशिच अवस्था आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच बालनाट्य आपल्याला दिसतात. सुलभा देशपांडेंच्या दुर्गा झाली गौरी नं अनेक बालकलाकारांना संधी दिली. त्या बालकलाकारांमधूनच अनेक नवीन कलाकार या रंगभूमीला लाभले.

विद्यार्थ्यांमध्ये नाटकांची आवड निर्माण करायची असेल तर बालनाट्यांच्या माध्यमातून बालकांमध्ये लहानपणापासूनच नाटकांची आवड निर्माण

करण्यासाचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला पाहिले. विद्यार्थ्यांमध्ये नाटकाची आवड निर्माण व्हावी म्हणून शालेय स्तरावर देखील जिल्हास्तरीय नाट्यसंमेलनाचे आयोजन होण्याची गरज आहे. बालरंगभूमीची ताकद लक्षात घेऊन नाट्यप्रेमी पिढ्या घडविण्यासाठी निर्मात्यांनी पुढाकार घेणं आवश्यक आहे.

रत्नागिरीला झालेल्या नाट्यसंमेलनात मी नाट्य परिषदेला ५ कोटी रूपये निधी देण्याचं जाहिर केलं होत. या ५ कोटी रूपयांचा विनियोग कसा करायचा याचा आराखडा नाट्यपरिषद आजपर्यंत शासनाला सादर करू शकलेली नाही, हे फारच खेदजनक आहे. काही कलाकारांना नाट्य संमेलनाचं निमंत्रण देखील पाठविण्यात आलेलं नाही, अशी देखील माहीती मिळाली आहे. नाट्यपरिषदेतील सुंदोपसुंदीमुळे नाट्यचळवळीची हानी होत आहे, याच भान परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी राखणे आवश्यक आहे. शासन रंगभूमीला ताकद देण्याचं काम करत असतांना नाट्य परिषदेची ही उदासीनता खेदजनक आहे.

रंगभूमीला उभारी देण्यासाठी नाट्य संमेलनाचं आयोजन होत असताना नामांकित नाट्यसंस्थांनी, नाट्यकर्मींनी प्रयोग ठेवू नयेत, असं आवाहन या निमित्तानं करण्यात आलं होतं. अशा संमेलनाच्या माध्यमातून प्रेक्षकांना कलाकारांच दर्शन व्हावं, त्यांच्याशी संवाद साधता यावा ही त्यापाठीमागची भावना होती. ज्या नाटयकर्मींनी या सोहळ्याला उपस्थिती लावली त्यांचे आभार मानलेच पाहिजेत, पण ज्या प्रेक्षकांच्या जीवावर आपण नाव कमावतो, त्या प्रेक्षकांपासूनच फारकत घेणाऱ्या नाट्यकर्मींना मात्र यापुढे, नाट्य संमेलन म्हणजे आपल्या घरचा कार्यक्रम आहे. याची जाणीव ठेवुन या कलाकारांनी उपस्थित राहण्याचं भान राखावं असं आवाहन मी यानिमित्ताने करतो. अशा कलाकारांबाबत काय धोरण घ्यायचं हे नाट्य परिषदेनं एकदा ठरवलं तर बर होईल.

नाटकांच्या तारखा हा अलिकडं फारच कळीचा मुद्दा बनला आहे. तारखांच्या माध्यमातुन काही निर्माते इतरांची अडवणूक करत असल्याच्या तक्रारी वारंवार ऐकायला मिळत आहेत. व्यावसायिकतेला नैतीकतेची जोड देऊन रंगभूमीची सेवा करण्याचं व्रत घेतल्याशिवाय या अपप्रवृत्तीला आळा बसणार नाही. या अपप्रवृत्तींना वेळीच आळा घालण्याची गरज आहे. यासाठी प्रसंगी अशांचे परवाने रद्द करण्याचे कडक पाऊल उचलण्याची गरज आहे.

नाटकांच्या माध्यमातून नाव कमवून टि.व्ही. किंवा चित्रपटांमध्ये बऱ्याच कलाकरांनी नाव आणि पैसा कमावला आहे. परंतु पडद्यामागं राबणारे तंत्रज्ञ आणि कलाकार यांच्या व्यथा आणि वेदना मात्र नेहमीच दुर्लक्षीतच राहिल्या आहेत. शासकीय कोट्यातून अनेक कलावंतांना एकापेक्षा अधिक घरं मिळालेली असतांना अनेक बॅकस्टेज कलाकार मात्र झोपडपट्ट्यामध्ये राहत आहेत. याठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री देखिल उपस्थित आहेत. बॅकस्टेज कलाकारांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा, अशी विंनती मी यानिमित्ताने करत आहे.

नाट्य हे राजकारण्यांच्या नसानसात भिनलेलं असतं. अनेक राजकीय नाट्याचे साक्षीदार होण्याचं किंवा प्रत्यक्ष त्यात सहभागी होण्याचं भाग्य राजकारण्यांना मिळत असते. एका अर्थानं ते ही नाट्यकर्मीच असतात. बऱ्याचदा राजकीय नाट्याची संहिता ही तत्कालीन परिस्थितीवर अवलंबून असते. धक्कातंत्राभोवती अशा संहिता प्रामुख्यानं फिरत असतात. कधी ही नाटकं एकपात्री असतात तर कधी बहुपात्री. त्यामुळं नाट्य संमेलनामध्ये राजकारण्यांच्या उपस्थितीची गरज काय, असा सवाल विचारणाऱ्यांनी या गोष्टीचा विचार केला तर राजकारण्यांच्या उपस्थितीला होणारा विरोध निश्चितच कमी होईल, यात शंका नाही. उलटपक्षी मी असं म्हणेन की, राजकारण्यांकडुनच अनेक नाट्य लेखकांना प्रेरणा मिळून नवनव्या सामाजिक प्रश्नांवरील नाटकांच्या निर्मितीस चालना मिळू शकेल.

संमेलन काळातील या नगरीतील आपलं वास्तव्य सुखकर होईल, यासाठी प्रत्येक बारामतीकर प्रयत्नशील आहे. आमच्या आदरातिथ्याचा आपण सर्वांनी लाभ घ्यावा, कुठं काही उणीव असल्यास निसंकोचपणे आम्हाला सांगावी, ती दुर करण्याचा आम्ही सर्वतोपरी निश्चितच प्रयत्न करू.

साहित्य संमेलन किंवा नाट्य संमेलनचा अध्यक्ष म्हणजे शोभेची बाहुली असते, अशी टीका काहीजण करत असतात. ही टीका किती निरर्थक आहे , हे आपल्या कार्याच्या माध्यमातुन सिध्द करण्याची संधी आगाशे साहेबांना मिळाली आहे. पुढील वर्षभरात नाट्यचळवळीला प्रेरणा आणि चालना देण्याची भूमिका त्यांना पार पाडायची आहे. मराठी रंगभूमीला वेगळी दिशा देण्याचं काम या वर्षभरात त्यांच्याकडून व्हावं ही रसिकांची अपेक्षा सार्थ ठरविण्यात ते यशस्वी ठरतील अशी मला अपेक्षा आहे.

मराठी नाटकांच्या आठवणीने अश्रूंची फुले वाहण्याची संधी आपल्याला मिळू नये अशी नाट्य प्रेमींची इच्छा आहे. जिथं गवतालाही भाले फुटायचे त्या मराठी रंगभूमीला गिधाडांच्या हवाली करून तिची उत्तरक्रिया करायची वेळ येऊ नये अशी प्रत्येक नाट्यरसिकाची प्रमाणिक इच्छा आहे. यदाकदाचीत असं झालचं तर नाट्यसृष्टीच्या या वस्त्रहरणाची जबाबदारी झटकण्याची प्रत्येकानं तो मी नव्हेच म्हणत बसायचं का, याचा विचार करण्याची हिच खरी वेळ आहे. अभिजात कलाविष्काराचा हा प्रकार चिरंतन ठेवण्यासाठी झोपी गेलेल्यांना जागं करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

आपल्या सर्वांच्या उपस्थितीनं बारामती नगरी धन्य झाली आहे. नाट्यकर्मींच्या उपस्थितीनं ज्याप्रमाणं इथल्या उत्साही वातावरणात नवचैतन्याची बहार आली आहे, त्याचप्रमाणं मराठी नाट्यसृष्टीला देखील बहार यावा, अशी नाट्यप्रेमींची इच्छा आहे. ही इच्छा पूर्ण करण्याची उर्मी यानिमित्तानं आपणा सर्वांना मिळो अशी रंगदेवते चरणी प्रार्थना करतो. महाराष्ट्राचं हे सांस्कृतिक वैभव चिरंतन राहो, अशी सदिच्छा व्यक्त करून आपली रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र



# अध्यक्षिय मनोगत

मा.डॉ.मोहन आगाशे

दिनांक २२ डिसेंबर २०१२
मोरोपंत नगरी,बारामती

नाट्यरसिकांना व रंगकर्मींना माझा नमस्कार !

९३ व्या नाट्यसंमेलन अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर मला अनेक जणांचे अध्यक्षिय भाषण मिळावे याकरीता फोन आले परंतू भाषण हे उत्स्फुर्त असतं, लिखान करुन आणलेलं भाषण म्हणजे लेखण झालं आणि मी काही लेखक नाही. मी नेहमीची परंपरा मोडून उत्स्फुर्त भाषण करायचं ठरवलं होतं. आणि मुळात मी अभिनय करणारा कलाकार आहे. त्यामुळे लेखक जे लिहून देईल आणि दिग्दर्शक ज्या पद्धतीने सांगेल तेवढं आणि तसंच बोलणं मला जमतं. त्यामुळे मी ठरवलं होतं की ऐनवेळी इतर वक्त्यांचं मनोगत ऐकुन मला जे सुचेल ते बोलायचं.

नाट्यचळवळ वाढविण्यासाठी मराठी भाषेतील चांगली नाटके इतर भाषेत पोहोचवली पाहिजेत, त्याचप्रमाणे प्रत्येक शहारात ३०० ते ४०० आसन क्षमता असलेली नाट्यगृहे उभारली गेली पाहीजेत.

नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद हे निवडणूक न घेताच दिले गेले पाहिजे. यासाठी नाट्य परिषदेने त्यांच्या घटनेमध्ये बदल करणे आवश्यक आहे. परिषदेचे पदाधिकारी यासाठी प्रयत्न करतील. अशी अपेक्षा आहे. अध्यक्षांना कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलविले जाते. त्यामुळे अध्यक्षांची निवड कर्तृत्ववान व्यक्तींमधून झाली पाहीजे. निवडणूकांमधून काही समाजातील प्रत्येक व्यक्ती हा नाटक करत असतोच फरक एवढाच आहे की, रंगकर्मी सांगून नाटक करतात. तर इतर लोक स्वतःच्या फायद्यासाठी नाटक करतात. मराठी नाटक सातासमुद्रापलिकडे गेले आहे. मात्र, नाट्यचळवळ अधिक सक्षम करण्यासाठी नाटक आणि इतर सर्व कलांना शैक्षणिक जीवनात प्राधान्य दिले पाहीजे.

मराठी रंगभूमी जिवंत असून ती रसरशीत आहे. महाराष्ट्राची जगातील ओळख मराठी नाटकामुळे होते. मराठी माणसाला नाटकामुळेच जगण्याचे प्रयोजन मिळाले आहे असे मला वाटते. संमेलनअध्यक्षपदी माझी निवड झाली. खरे तर निवडणूकीने निवड कशासाठी करायची आणि आमंत्रित कोणाला करायचे ? याचा विचार झाला पाहिजे. माझ्यामते अध्यक्षपदासाठी संबंधित रंगकर्मीला निमंत्रीत करण्याची गरज आहे. त्यासाठी निवडणूक नको. वाटल्यास त्यासाठी नाट्य परिषदेने घटनेत दुरुस्ती करावी. नाटक, संगीत, शिल्प आदि कला माणसाला एकत्र आणणाऱ्या बाबी आहेत. जीवन जगण्यासाठी पैसा आवश्यक असला , तरी जीवन जगायचे कशासाठी, या प्रश्नाचे उत्तर कला देतात. शिक्षणात झालेल्या क्रांतीमुळे समाजाचे विघटन करणाऱ्या अनेक बाबी घडत आहेत. त्यामध्ये उठसूट संघटना वाढू लागल्या आहेत, मात्र सर्व विघटन करणाऱ्या बाबी बाजुला ठेवुन सर्वांना एकत्र आणणारी कला म्हणजे नाटक होय.त्यामुळे नाटक क्षेत्राला अधिकाधिक महत्व प्राप्त होणे गरजेचे आहे.

त्यामुळेच, उपजिविकेसाठी डॉक्टरीपेशेवर अवलंबून राहीलो. तरी अर्थपुर्ण जगण्यासाठी मला नाटक उपयोगी पडले. मी नाटकात हौशी म्हणून काम करीत होतो. कालांतराने यातही मला पैसा मिळू लागला. डॉक्टरकीचे काम मग हौशी झाले. शाळेमध्ये नाटक, संगीत, खेळ अशा, एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हीटीज् ना विद्यार्थी लहान असेपर्यंत महत्व दिले जाते. मात्र नंतर केवळ उपजिवीकेसाठी असणाऱ्या अभ्यासालाच प्राधान्य दिले जाते. व्यक्तीच्या अंगी कला असेल तर समाजात त्याला मानाचे स्थान मिळते. त्यामुळे पालकांनी मुलांना उपजिविकेसाठी व सामाजिक सेवा करण्यासाठी अशा दोन प्रकारचे शिक्षण द्यावे. ज्या गोष्टी आयुष्यामध्ये उपयोगी पडतात नंतर आत्मसात करण्याची पद्धतच आपल्याकडे रुढ झालेली आहे. त्यामुळे शालेय जीवनात कला क्षेत्रात चांगले काम केल्यास होणारे कौतुक, नंतर दहावी अथवा बारावीच्या तणावात बदलते. परिणामी उपजत कलागुण असणारे कलाकार या क्षेत्रापासून बाजुला होत असल्याची खंत वाटते.

खरे तर पैशापेक्षा वेळेची गुंतवणूक आवश्यक असते. गुंतवणूक कलांमधूनच होऊ शकते कोणतीही एक कला बाल वयातच विद्यार्थ्यांच्या अंगी रुलजी तर त्यामुळे उद्याचे भावी कलाकार घडतील. मी स्वतः विविध कामांसाठी मंत्रालयात जात होतो. मात्र तेथील अधिकारी मला भेटण्यासाठी वेळ देत नव्हते. जेव्हा मी घाशीराम कोतवाल हे नाटक केले. त्यानंतर तेच अधिकारी स्वतःहून मला भेटायला बोलवत होते.नाटक ही मराठी माणसाची गरज आहे. हौशी आणि व्यावसायीक असे दोन गट असले, तरी रंगभूमी एकच आहे. अगदी अमेरिकेतही तीन मराठी माणसे जमली तरी ती तोंडाला रंग लावून नाटकासाठी तयार होतात. वाढत्या शहरीकरणामुळे नाटकांसाठी थिएटर मिळणे अवघड बनले आहे. त्यासाठी कमी आसनक्षमतेची थिएटर ठिकठिकाणी बनविण्याची गरज आहे. रंगभूमीची नाळ ही वास्तवाशी जोडलेली असते. त्याचा विसर पडता कामा नये.

आज बारामतीत होत असलेल्या ९३ व्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद मला लाभले, आज या ठिकाणी आदरणीय पवार साहेब,मुख्यमंत्री चव्हाण साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत अनेक चांगल्या गोष्टी चर्चा होऊन त्या अनुषंघाने निर्णय घेण्याचे परिषदेच्या वतीने जाहीर करण्यात आले. परंतू येणाऱ्या दोन तीन महिन्यांमध्ये परिषदेच्या निवडणूका लागत आहेत. सद्याच्या कर्तृत्ववान कार्यकारीणी प्रमाणेच पुढील कार्यकारीणी निवडून येईल व आज घेण्यात आलेल्या निर्णयांचा येणारी कार्यकारीणी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून विचार करेल अशी अपेक्षा बाळगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



मा.शरदचंद्रजी पवार

# उद्घाटकांचे मनोगत

**दिनांक २२ डिसेंबर २०१२**
**मोरोपंत नगरी,बारामती**

आज जवळपास १६ वर्षांनंतर नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने आपण बारामतीत एकत्र आलो आहोत. आपल्या राज्याच्या आगळ्या वेगळ्या कला संस्कृतिच प्रतिक म्हणजे मराठी रंगभूमी. लोककलामधून विकसित होत गेलेल्या रंगभूमीचा इतिहास विलक्षण आहे. अण्णासाहेब किर्लोस्करानी शतकापूर्वी हा झेंडा रोवला. बालगंधर्व, मा.दिनानाथ, केशवराव भोसले सारख्या असंख्य दिग्गजांनी नाटक आणि संगीत राज्याच्या कानाकोपऱ्यात लाखो रसिकांच्या मनापर्यंत पोहोचविले. बोलपटाच्या रेट्यामध्ये रंगभूमीचा पडता काळही येऊन गेला, पण फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा उभारी घेऊन नाटक कला विविध अंगाने फुलतच राहिली. मराठी माणसाने तर नाटकावर एवढा प्रेमाचा, आपुलकीचा वर्षाव केला की, नाटक हे मराठी माणसाच वेड आहे इथपर्यंत मजल गेली. अगदी शालेय जीवनापासून मी नाटक पाहत आलो आहे. प्रत्येकाच्या धकाधकीच्या आयुष्यात नाटक पाहणे हा एक फार चांगला विरंगुळा आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते कै. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात नाट्यसंमेलन बारामतीत होत आहे ही खूपच समाधान देणारी गोष्ट आहे. चव्हाण साहेबांचे साहित्याशी, कलेशी, संस्कृतिशी फार जवळचे नाते होते. ते स्वत: एक उत्तम साहित्यिक होते, रसिक होते. एखाद्या राज्याचा सर्वांगिण विकास म्हणजे काय याचे स्पष्ट चित्र त्यांनी साकारले होते. येथे धरणं बांधली पाहिजे, दवाखाने काढले पाहिजे, चांगले रस्ते बांधले पाहिजे, विज्ञानाच्या सहाय्याने शेतीत बदल झाला पाहिजे, उद्योगधंदे उभारले गेले पाहिजे. या सर्व गोष्टी तर आवश्यक आहेतच, पण तेवढेच महत्त्वाचे सांस्कृतिक क्षेत्र आहे हे भान विसरत कामा नये. म्हणून नाटकाला करमुक्त करण्याचा त्यांचा निर्णय खूप महत्त्वाचा ठरतो. कलावंतांना राज्यकर्तेआपले आहेत, आपल्यासाठी पाठबळ देणारे आहेत. अशाप्रकारच्या विश्वासाची गरज असते. प्रसंगी सादर होणाऱ्या नाट्यप्रयोगामधून टिका-टिप्पणी केली जात असेल, काही वेळा विडंबन होऊ शकेल, पण अनेक संघर्षाला नाट्यरूप देणाऱ्या कलाकृतीही निर्माण झालेल्या आहेत. नाटकातल्या विनोदाने भल्याभल्यांना आनंद मिळवून दिला आहे तर अनेक नाटकातून इतिहासाचे व्यापक दर्शक घडविले आहे. संगीत नाटकांनी तर एक वेगळीच मानाची परंपरा आपल्यासमोर मांडली. केवल व्यावसायिकच नव्हे तर हौशी, प्रायोगिक इत्यादी चळवळींना सर्वदूर नाटकाचे खेळ मांडले जातात. अगदी पथनाट्यापासून तर नाटकगृहात भव्य रंगपटावरील प्रयोगापर्यंत मराठी रंगभूमीने प्रत्येक दशकात वेगळा अवतार धारण केल्याचे सहज लक्षात येते. जागतिक रंगभूमीवर दबदबा निर्माण करणारे, नाटककार, कलाकार, संगीतकार, नैपथ्यकार असंख्य रंगकर्मींची नावे येथे सांगता येतील. पिढीगणित विषय बदलत गेले असतील, संहितांच्या व्याख्या बदलल्या असतील, पण एक गोष्ट मात्र नक्की की, सातत्याने काहीतरी नव्याचा शोध घेणे अव्याहतपणे चालू आहे. आजकालच्या काळात नाटकाला माध्यमांच्या फार मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. तरी सुद्धा इतर माध्यमामध्ये यशस्वी व्हावयाचे असेल तर रंगभूमीच्या पाठ्यशाळेतून तयार होणे ही महत्त्वाचे ठरू लागले आहे. एक नाट्य उपासक अनंत वामन बर्वेयांनी १९०५ साली पाहिले नाट्यसंमेलन भरविले. त्या नाट्यसंमेलनाच यजमान पद राजापूरकर संगीत मंडळींनी स्विकारल होतं. या कंपनीचे मालक होते बाबाजी राणे. संत तुकाराम नाटकात ते तुकारामाची भूमिका करायचे. या बाबाजींनी स्वत:च्या पैशातून कल्याणला संत तुकाराम नावाचं नाट्यगृह बांधलं, किती धाडसाच काम होऊन गेले शतकापूर्वी. रंगभूमीची ताकद इतकी जबरदस्त आहे की, परावलंबी न होता थिएटर सुद्धा उभे राहू शकते. अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद ही तमाम रंगकर्मीची मातृ संस्था झाली आहे. पण आज काही दुरावे, काही अंतर पडल्यासारखे वाटते. सर्वच रंगकर्मींनी एकजुट होण्याची नितांत आवश्यकता आहे.

सिनेमा बोलू लागल्यावर वीसेक वर्ष नाटकाच्या वाट्याला वनवास आला होता. नेमका त्याचवेळी एक अफाट सदबुद्धीचे सद्गृहस्थ नाटकाच्या मदतीस आले. नाटक हे मराठी माणसाच्या मर्मबंधात आहे याची त्यांना जाणीव होती. हे सद्गृहस्थ म्हणजे साहित्य संघाचे डॉ. अ.ना.भालेराव. प्रत्येक रंगकर्मीन, प्रत्येक मराठी रसिकान त्यांच्या ऋणात रहावं असा हा कर्तृत्ववान माणूस. नाटक ही एक सुंदर निस्वार्थी फसवणूक आहे. आयुष्यात रंग, रस, गंध भरण्यासाठी आपण पैसे भरून स्वत:ला फसवून घ्यायला नाट्यगृहात जातो अशी सोपी व्याख्या एका मोठ्या नाटककाराने केली आहे. हा अनुभव रसिक वारंवार घेत असतात. नाटक केवळ रंगमंचावर होत नसते. प्रेक्षक सुद्धा सहजपणे त्या नाटकात सामिल होतात. नाटक अधिक रंगवत राहतो म्हणूनच नट-नट्यांनी आपला प्रत्येक प्रयोग हा आधीच्या प्रयोगापेक्षा अधिक ताजा, अधिक टवटवीत कसा होईल याची काळजी घ्यायला हवी. एवढच सांगावसं वाटतं की, प्रकृतीला झेपतील, सोसतील एवढेच प्रयोग त्यांनी करावे. मराठी नाटकाचा इतिहास बघितला तर पटकन लक्षात येणारी बाब म्हणजे काही काळासाठी ठराविक पद्धतीची, ठराविक साच्याचीच नाटक तयार होतात. सतत विनोदी नाटकांनाच धंदा करता येतो अशा पद्धतीच वातावरण तयार होऊ लागतं. गंभीर समस्या प्रधान नाटकांना प्रेक्षक प्रतिसाद देणार नाहीत अशी शंका वाटायला लागते. आजही अशा विषयावर नाटक लिहिणारे जबरदस्त ताकदीचे नाटककार आहेत. नाव घ्यायचे झाले तर सतिश आळेकरांपासून म्हणजे तेंडूलकर, दळवी पर्वानंतरचे म्हणून महेश एलकुचवारांसारख्या दिग्गज आहेत. त्यांच्या

संहितांच सोनं करणारे दिग्दर्शक आहेत, तर भूमिकांसाठी तोलामोलाची कलाकार मंडळी आहेत. करमणूक म्हणून तर नाटक केलेच पाहिजे, पण त्याही पलीकडे समाजाच्या अनेक गंभीर प्रश्नाकडे कलावंतांनी आपल्या प्रेक्षकांना वळविले पाहिजे असं मला मनापासून वाअते. मराठी भाषेबरोबर मराठी साहित्य आणि मराठी नाटकही राहणार आहे. पण आता कलाकारांनी आपलं आकाश अधिक मोकळं करण्याची आवश्यकता आहे. जगभराच्या रंगभूमीवर अनेक स्थित्यंतरे होत आहेत. नव्या तंत्राचा वापर करून नवे नाटक क्षितिजावर येत आहे. आपण आत्मस्तुतीन संतुष्ट राहणे हिताचे नाही. आज देशात सुद्धा अनेक प्रांतामध्ये नवा आविष्कार दर्शन देतो आहे. परिषदेने भविष्याचा वेध घेणाऱ्या रचनेकडे वळायला हवे. सुदैवाने अनेक नामवंत संमेलनाला अध्यक्ष म्हणून आजवर मिळाले आहेत. पण माझ्या मनात नेहमी एक भावना डोकावत आहे. ब्रिटिशांच्या राजवटीच्या काही खुणा आपण आजही जपतो. त्याचीच एक चालत आलेली परंपरा म्हणजे मुंबईला शेरिफ नेमणे कार्यक्रम असतो. खूप वर्षापूर्वी हे पद फार मानाचे मानले जाई. पण कालांतराने ही शोभेची वस्तु झाली आहे. आपण सर्वांनीच संमेलनाचे अध्यक्ष फक्त मिरविण्यापुरते राहु नये याबाबतीत बदल घडवून आणला पाहिजे. संमेलनाच्या अध्यक्षांनाही काही रंगभूमीसाठी नव्या संकल्पना असतात. त्या पोथीसारख्या बासनात गुंडाळल्या तर त्या फक्त सोवळ्या होतील म्हणूनच ही सूचना.

नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी केवळ भूमिका साकारणारे कलावंतच नाहीत तर नाटककार, निर्माते आणि अगदी समीक्षक सुद्धा निवडले जातात ही नाटकासाठी फार मोठी जमेची बाजू आहे. मला आज परत एकदा १९९५ साली ह्याच बारामतीत भरलेल्या ७५ व्या नाट्यसंमेलनाची आठवण आहे. मावळते अध्यक्ष यांच्या एका वर्षाच्या कारकिर्दीचा लेखाजोखा छापील स्वरूपात सादर केला होता. त्या वर्षभरात त्यांनी जवळ–जवळ ८६ उपक्रमात हजेरी लावली. योगदान दिल. वर्षभर ते फिरत राहिले आणि नाट्यचळवळीला दिशा देऊ शकले. असे काम सतत सुरू राहिले पाहिजे आणि त्यासाठी नाट्य परिषदेने नियोजनबद्ध कार्यक्रम तयार करण्याची आवश्यकता आहे.

पुरुषोत्तम दारव्हेकरांनी खूप पूर्वी सांगितलेली ती गोष्ट सर्व रंगकर्मींच्या मनात साठवायला हवी. नाटक हा आमचा धर्मच आहे. या धर्मात जातीभेद नाहीत. कारण नाटकवाला हीच एक स्वतंत्र जात आहे. नाटकात सारे घटक येथे समान आहेत, सारख्याच महत्त्वाचे आहेत. नाटक हाच आमचा वसा आहे. एकदा हाती घेतल्यावर तो कधीही टाकता येत नाही असा वसा मराठी मनावर हक्काचे कब्जा मिळणाऱ्या पु.ल. देशपांडेंची आता मला आठवण होत आहे. ते नाट्यसंमेलनाचे अध्यक्षही झाले होते. पण हिरक महोत्सवी नाट्यसंमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. त्यांनी सांगितले होते नाट्यकलेची आवड असणाऱ्या भिन्नवृत्तीच्या लोकांचा हा मेळावा आहे. दहा माणस एकत्र येऊन जिथं आनंद घेतात. सहानुभूतीत अश्रूही ढाळतात. क्वचित प्रसंगी आपली नाराजीही व्यक्त करतात अशा ठिकाणी माणसाला जायला हवं. त्या गर्दीत एक होऊ राहायला माणसानं थोडफार एकटंही रहावं आणि अधून मधून गर्दीतला एक होऊन जावं. अशानं नकळत स्नेहाचा धागा जमत असतो. आपल्याला जे आवडेल ते आपल्याबरोबर इतर चार जणांना आवडतय हे पाहिल की आनंद चौपट होतो. माणसांनी आनंदाचा एकत्र येऊन गुणाकार करावा आणि दु:खाचा भागाकार करून त्याची बाकी शुन्य करून टाकावी.

या संमेलनाच्या निमित्ताने मला मुद्दाम सांगायचे आहे ते केवळ कलावंत म्हणूनच कारकीर्द न करता आपल्यामधील अनेकांनी रंगभूमीसाठी मिशनरी स्वरूपाचे काम उभे केले आहे. आपल्या दीर्घकारकिर्दीचा आढावा मांडताना काही मुलभूत प्रश्नाकडे लक्षही वेधून घेतले आहे. त्यांच्या दृष्टीने नाटक हा सुद्धा गंभीरपणे अभ्यास करण्याचा, शिकण्याचा विषय आहे. सहज सांगायचे तर डॉ. लागूंच लमाण असेल किंवा नुकतेच आलेल्या विजया मेहतांच झिम्मा असेल अशा कलावंतांनी कधीच आपल्या डोळ्यावर झापडं लावलेली नाहीत. जात्याचं असलेल्या कलानिर्मितीला बुद्धिमत्तेची जोड मिळाल्यास एक अलौकिक आकार निर्माण होतो. याचं प्रत्यंतर मिळतं. सांगायचा भाग म्हणजे असा की, नाटक करणं म्हणजे केवळ अभिनय करणं नाही. केवळ संगीत देणं नाही, केवळ रंगमंच साकारणं नाही तर त्यासाठी काहीतरी नवीन करता आले पाहिजे. गोष्ट आली पाहिजे आणि तिची प्रभावीपणे मांडणी करताना जगभर चाललेल्या प्रयोगामधून ऊर्जा घेऊन काहीतरी नवे घडवत राहिले पाहिजे.

सुदैवाने आज आपल्या महाराष्ट्रात अनेक विद्यापीठात पदवी आणि पदव्युत्तर स्तराचे नाट्यशिक्षण घेण्याची व्यवस्था झाली आहे. खूप तरूण मुलं आणि मुली नाटकाकडे केवळ हौस–मौज म्हणून नव्हे तर एक प्रामाणिक व्यवसाय म्हणून येण्यास उत्सुक आहेत. या सर्व विद्यापीठांनी कुठेतरी संवाद साधला पाहिजे, नव्हे त्यांच्या एकत्रित प्रयत्नातून दिल्लीच्या एन.एस.डी. सारखी संस्था महाराष्ट्रात निर्माण करण्याची आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

मित्र हो, दरवर्षी नाट्यसंमेलन भरते, खरेतर आपण गावाकडे जत्रा भरते असं म्हणतो, त्याअर्थाने संमेलनाला जत्रा म्हटल्याने कोणतेही उणेपण येत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. वर्षातून एकदाच येणाऱ्या दिवाळीला जसे आपण सण मानतो, एकमेकांना भेटतो, नवीन काय चाललं आहे याची चर्चा करतो. काही मनाजोगते करतो, पण एकत्र येणे गप्पागोष्टी करणे, जेवणे हे सर्व आपल्या त्या मैत्रीच्या वाढीला आवश्यक असते. म्हणून आपल्या ह्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्याचे एक बारामतीकर आणि नाटकाचा चाहता म्हणून समाधान आहे. ९३ व्या नाट्यसंमेलनाचे उद्घाटन करताना मावळते अध्यक्ष श्रीकांत मोघे आणि संमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशे आणि आपणा सर्वांना शुभेच्छा देतो.

# बारामतीच्या नाटय सेवेतील तीन पिढयांचा हिरकमहोत्सवी प्रवास

– मिलिंद संगई



कै. बबनराव नेमचंद गुजर



श्री.किरण बबनराव गुजर



ॲड.प्रिया गुजर महाडीक

बबन गुजर– बारामती मधील नाटय रसिकांच्या मनावर आठवणीतील नाव १९५२ ते १९७३ फक्त २१ वर्षाची बारामतीककरांची नाटय सेवा नाटय कलेची आवड असणारे एक तरूण बाबुराव पेंढारकर यांच्या नाटक कंपनीमध्ये काम करतो तो काळ १९४८ चा झुंजारराव या नाटकाचा रंगपट कपडेपट सभाळून स्वतचा चरितार्थ त्यांनी चालविविला अभिनेते राजा गोसावी यांच्या मैत्रीने भानुविलास चित्रपट गृहाचे मालक बापट यांच्या सहकार्याने चित्रपट गृहातही नोकरी केली.

१९५२ पासून त्यांनी बारामती मध्ये बारामतीकर नाटय रसिकांसाठी बारामती रंगभूमी या नावाने व्यावसायीक नाटय प्रयोगाचे आयोजन करण्यास सुरूवात केली १९६१ मध्ये किरण रंगभूमी बारामती संस्थेची स्थापना करून ही नाटयकलेची सेवा अविरतपणे बबन गुजर यांनी सुरू ठेवली यामध्ये त्यांना त्यांची पत्नी कृष्णाबाई यांनी पुर्ण साथ दिली प्रतिकुल परिस्थती मध्ये देखील नाटकांचा प्रयोग हा झालाच पाहिले या ध्येयाने बारामतीकरांची मराठी नाटकाची भूक भागविण्याचा प्रयत्न अखेरच्या श्वासापर्यंत केला.

शाम टॉकीज या चित्रपटगृहामध्ये डोअरकीपर म्हणून काम करणाऱ्या बबन गुजर यांनी २० वर्षात सुमारे २५० नाटकांचे प्रयोग बारामती मध्ये केले सुंदर मी होणार सीमेवरून परत जा, बेबंदशाही, स्वयंसिध्दा, राहिले दूर घर माझे तुका म्हणे मी वेगळा, शाबस बिरबल शाब्बास, एकादी तरी स्मित रेषा, जादूगार रघुविर महेशकुमार आणि पार्टी, उमादेवी नाईट, विच्छा माझी पुरी करा, आम्ही गोकुळच्या गौळणी, कथा अकलेच्या कांदयाची, पतंगा परीस जीवन, माझे सोळाव वरीस धोक्याच.

या व अशा अनेक नााटय प्रयोगांचे आयोजन शाम टॉकीज, अनेकांत खुले नाटय गृह सिनेमा रोड वरील खुले नाटयगृह, दाणेबाजार, दुर्गा चित्र मंदीर या ठिकाणी त्यांनी केले बाबुराव पेंढारकर, बाबुराव गोखले, राजा गोसावी, निळू फुले लीला गांधी, सुहासिनी देशपांडे, रजनी भट, स्वरुपकुमार, महेशकुमार, अनंत माने अरूण सरनाईक, सुर्यकांत, चंद्रकांत, रजनी मुथा (फुले) या व अनेक मान्यवर रंगकर्मी, निर्माते, दिग्दर्शक यांचेशी मैत्रीचे संबंध निर्माण केले.

१९७३ बबनराव गुजर यांचे आकस्मीक निधन झाले त्यांचा मुलगा किरण गुजर यांना वडीलांच्या बारामतीकरांच्या नाटयसेवेचा वारसा पुढे चालविण्याचे मार्गदर्शन त्यांच्या आईनी केले वयाच्या केवळ १४ व्या वर्षापासुन व वडील गेल्या नंतर केवळ सहा महिन्यातच बारामीमध्ये नाटय प्रयोगाच्या आयोजनास सुरूवात झाली नर्तकी, इष्काची इंगळी डसली, काचेचा चंद्र, ही श्रीची इच्छा, हमीदाबाईची कोठी, डार्लींग डार्लींग, बोल राधा बोल, गोकुळचा चोर, नाथ हा माझा, सागरा प्राण तळमळला, मी माझ्या मुलांचा, महेशकुमार, मिनलसिंह, मेलडी मेकर्स या व अशा अनेक सुमारे १०० प्रयोगाचे १९८५ पर्यंत व्यावसायीक दृष्टीने आयोजन बारामतीमध्ये त्यांनी केले.

महाविद्यालयातील जिवणामध्ये व एकांकि स्पर्धा मधून किरण यांनी गुडबाय डॉक्टर, फोन करण्यापुर्वी अभयारण्यातील ससा, गुण्या गोविंदानं, या नाटकातून भूमिका केल्या, माधव वझे यांच्याकडुन अभिनय दिग्दर्शनाचे धडे घेतले प्रभाकर भावे यांच्या कडुन रंगभूषेचे प्रशिक्षण घेतले आहे नेपथ्य रंगभूषा हे किरण गुजर यांचे आवडीचे विषय आहेत आजही अनेक नाटकावेळी ते रंगभूषा, व सेटचे डिझाईन करून नेपथ्य करीत असतात राज्य नाटय स्पर्धेतून त्यांना नेपथ्यासाठी पारितोषिके मिळाली आहेत.

किरण गुजर यांना नाटय सेवेतील कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने १९९५ मध्ये राष्ट्रीय एकात्मता व बंधूत्व संवर्धन पुरस्कार देवून गौरव केला आहे नाटय चित्रपट कला अकादमिचा पुरस्कार कलागौरव प्रतिष्ठान नाटयगौरव पुरस्कार व संवाद पुणे या नाटय संस्थेचा सन्मानीत करण्यात आलेले आहे.

१९७९ मध्ये किरण गुजर यांनी नटराज नाटय कला मंडळ या हौशी नाटय संस्थेची निर्मिती केली आज

सलग ३३ वर्ष नटराजच्या माध्यमातून हौशी कलावंतांना नाटकामध्ये संधी देवून नटराजने ४० नाटकांची नाटय निर्मिती केली आहे महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाटय स्पर्धेमध्ये सलग ५ वर्षेप्रथम क्रमांक कऱ्हाड केंद्रावर मिळण्याचा मान महाराष्ट्रामध्ये केवळ नटराज संस्थेने मिळविला आहे वसंत नाटय महोत्सव दिल्ली, आर्चाय अत्रे जन्मशताब्दी महोत्सव नाशिक या ठिकाणी नटराजच्या नाटय प्रयोगांचे आयोजन झालेले आहे.

१९८७ मध्ये अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची बारामती शाखा किरण गुजर यांनी स्थापन केली. मा.शरदराव पवार यांच्या वाढदिवसानिमित्त

१९८७ पासून नटराज करंडक या एकांकिका स्पर्धा गेली २९ वर्ष या अविरतपणे सुरू आहेत.बारामतीकरांना स्वस्त दरात मराठी नाटक पहाण्यास मिळावे म्हणून स्वस्त नाटक योजना सुरु केली आहे किरण गुजर यांची बारामतीकरांच्या नाटय सेवेला ४० वर्ष पुर्ण होत आहेत.

नाटयसेवेमध्ये गुजर कुटूंबियांची तिसरी पिढी कार्यरत झाली आहे ॲड प्रिया गुजर (महाडीक) हीने राज्य नाटय स्पर्धेतील नाटकांमध्ये भाग घेवून विविध पारितोषिके मिळविली आहेत ''फक्त माणूस म्हण'' या नाटकासाठी त्यांना अभिनयाचे सर्वोकृष्ट पारितोषीक रौप्यपदकही मिळालेले आहे समलैंगीकांच्या ज्वलंत विषयांवर प्रकाश टाकणारे नाटक भा.द.वि.कलम ३७७ या नाटकाचे लेखन त्यांनी केले व या नाटकांचे हिंदी रूपांतर दतर तिनसो सतहत्तर हे करून मराठी व हिंदी रंगभूमीवर या नाटकांचे दिग्दर्शन व भूमिका करून पारीतोषिकेही मिळविली आहेत.

एकंदरीत १९५२ ते २०१२ अशी सलग ६० वर्षाची बारामतीकर नाटय रसिकांची सेवा करण्याचे काम बारामती मध्ये गुजर कुटूंबीय करीत आहेत या मध्यमातून महाराष्ट्रातील मराठी कलावंतांचा मोठा स्नेह परिवार त्यांनी संग्रहीत केला आहे.

बारामतीकरांच्या नाटय सेवेच्या हिरकमहोत्सवी ६१ व्या वर्षात पदार्पन करतांना ९३ व्या नाटय संमेलनामध्ये किरण गुजर यांना योगदान देता आले आहे व नाटय रसिकांच्या सेवेचे व्रत अखंड सुरू राहणार असल्याने यामध्येच गुजर कुटूंबियांचा सन्मान आहे अशी त्यांची भावना आहे.

ज्यावेळेला आपली ऐपत नव्हती त्यावेळी देखील बारामतीमध्ये कलावंतांची सर्व सेवा केली आहे आता परमेश्वर कृपेने आपले व्यवस्थीत आहे रंगकलेची सेवा करीत असताना एवढेच पहा कि बारामती मधून कोणताही कलावंत उपाशी जाता कामा नये.– श्रीमती कृष्णाबाई गुजरअनेक मराठी कलावंतांना उतार वयात अनेक बिकट प्रसंगांना सामोरे जावे लागले त्यांच्यासाठी बारामतीमध्ये कलारंग कि ज्यामध्ये रंगकर्मीला नाट्सेवेचा आनंद मिळत सर्व सेवेचा लाभ घेता येईल अशा संकुल निर्मितीचे स्वप्न आहे कि जे बारामतीकरांच्या रंगसेवेत आयुष्य घालविणा–या बबन गुजर यांचे स्मरण ठेवेल.

## 'नटराज नाट्य कला मंदिर'



# बारामती काल, आज आणि उद्या

– ना.गो.प्रभुणे, मा.अध्यक्ष जेष्ठ नागरिक संघ



धातूत जसे हाटक नाटक वर सर्व सुप्रबंधात ।
ते अरसिकात संप्रति निष्फळसे मुकुर जेवि अंद्यात ।।

रामारीती

धातूत जसे सोने श्रेष्ठ असते. त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या उत्तम वाड.मय प्रकारात नाटक हे सर्वश्रेष्ठ आहे. ज्याप्रमाणे अंधारात आरशाचे महत्त्व कळत नाही त्याप्रमाणे अरसिक माणसास नाटकाचे महत्त्व कसे कळणार ? सुमारे २२५ वर्षांपूर्वी कविवर्य मोरापंतांनी नाटकाविषयी हे गौरवोद्‌गार काढून आपले नाटकाविषयी प्रेम व्यक्त केले आहे. त्या मोरोपंतांच्या बारामतीत आज आपण अखिल भारतीय ९३ व्या मराठी नाट्यसंमेलनानिमित्त आलेले आहात. आज ही नगरी माननीय नामदार शरदरावांची बारामती म्हणून प्रसिद्ध पावली आहे. ज्या नगरीत आपण आला आहात त्या नगरीचा पूर्व इतिहास, प्राचीन महत्त्व, उज्ज्वल भूतकाळ जाणून घेण्यीच जिज्ञासा नक्कीच तुमच्या मनात असणार आणि ते साहजिकच आहे. कारण पूर्ववैभव स्मरण हे केवळ मनोरंजन नसते तर ते स्फूर्तीचा जिवंत झरा असतो. कवी विनायक यांनी म्हटल्याप्रमाणे

पूर्व दिव्य ज्याचे त्यांना रम्य भावि काळ ।
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ ।।

त्या दृष्टीने या नगरीची थोर परंपरा लिहिण्याचा मी अल्प प्रयत्न करणार आहे.

बारामती हे गाव महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्याचे मुख्य केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. या तालुक्याला पूर्वी भिमथडी तालुका असे सरकार दप्तरी नाव आहे. भिमा व नीरा या नद्यांच्या दरम्यानचा प्रदेश या अर्थाने भिमथडी हे नाव आहे. कऱ्हा नदीने बारामतीचे दोन स्वाभाविक भाग झाले आहेत. ही नदी येथे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. उत्तर अक्षांश १८°–१०° व पूर्व रेखांश ७४°–३९° अशा भौगोलिक स्थळात हे गाव वसले आहे.

पुण्यापासून आग्नेय दिशेस सुमारे १०० किलोमीटर अंतरावर हे गाव वसले आहे. पूर्वकाळापासून कऱ्हेपठार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात बारामतीचा समावेश आहे. कऱ्हेच्या दोन्ही काठावर काही पट्ट्यात सोरा हा क्षार असल्यामुळे ही जमीन बागायतीला काही अंशी प्रतिकूल आहे. परंतू नीरा नदीच्या पश्चिम बाजूने काढलेला कालवा या भागात आला. तेव्हापासून परिस्थिती पुष्कळ बदलली आहे. शेतजमिनीला या कालव्याने फायदा झालाच याशिवाय या भागातील विहिरींना पाण्याचा भरपूर पुरवठा होऊ लागला. या भागात पाऊस कमी व उन्हाळा जास्त आहे. सरासरी पर्जन्यवृष्टी २० इंचापर्यंत आहे. डिसेंबर ते मे पर्यंत सुमारे २.५ इंच, जून ते सप्टेंबर १३.५ इंच आणि ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात सुमारे ४ इंच पाऊस पडतो. पावसाचे असे ३० ते ३५ दिवस सबंध वर्षात असतात. अशी परिस्थिती असूनही आधुनिक मशागत पद्धतीने सर्व प्रकारची बागायत या भागात होते आणि महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात एक अग्रगण्य बागायत भाग म्हणून बारामती ख्यातनाम झाली आहे.

बारामती ही नगरी फार पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे. तिचे प्राचीनत्व दर्शविणाऱ्या खुणा आजही आपणास दिसून येतात. या नगरीत कऱ्हेच्या पश्चिम तीरावर श्री काशीविश्वेश्वराचे देवालय आहे. त्याच्या रचनेवरून हे मंदिर इ.स. ७०० ते ९०० पर्यंतच्या काळात बांधले असावे असा अंदाज आहे. या देवालयाच्या समोर एका शिलेवर कोरलेले राशीचक्र आहे. त्यावरून या देवालयाचा काळ ठरविता येतो. कऱ्हेच्या काठी याच देवालयात सुमारे ३०० वर्षांपूर्वी श्रीधर कवीने शिवलीलामृत हा ग्रंथ लिहिला आहे. याचा उल्लेख शिवलीलामृताच्या चौदाव्या अध्यायाच्या शेवटच्या १२ व्या व १३ व्या ओव्यात आहे. या नगरीचा उल्लेख अनेक ठिकाणी दिसून येतो. देवगिरीच्या यादवांच्या राज्यात हा भाग होता. यादवांच्या सत्तेचा लोप झाल्यानंतर गुलबर्ग्याच्या







बहामनी राज्यात प्रथम बारामती हे गाव सामील झाले. यानंतर आदिलशाहीत बारामतीचा संबंध पोहोचतो. इ.स. १६०३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराव भोसले यांना अहमदनगरच्या निजामशहाने ङ्कराजेङ्क हा किताब व फौजेच्या खर्चास चाकण, पुणे, सुपे हे परगणे दिले. याप्रमाणे भोसले यांच्या वंशाच्या ताब्यात बारामती आली व पुढे शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्यामध्ये बारामती सामील झाली. छत्रपती शिवाजी महाराजांचे कारकीर्दीत बारामतीचा कारभार दादोजी कोंडदेव यांचेकडे होता. त्यानंतर दिल्लीच्या मोगलांचा अंमल येथे सुरु झाला असे चाँदशावली दर्ग्याला दिलेल्या इनामतीच्या सनदेवरून आढळून येते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बारामती पुन्हा स्वराज्यात सामील झाली. १७४३ मध्ये शाहू महाराजांनी बाबुजी नाईक यांना बारामती महलाची जहागिरी दिली. त्यात सांगवी, गुनवडी, माळेगाव, कटफळ, गोजुबावी, कन्हेरी व सर्व बारामती महालाचा समावेश होतो. १८ व्या शतकात गाजलेल्या कर्त्या पुरूषापैकी बाबूजी नाईक हे होते. ते पेशव्यांचे सावकार होते. तोतया प्रकरणी बाबूजी नाईक हे रामशास्त्री इत्यादी २१ पंचापैकी एक होते. परंतू त्यांची कीर्ती कविवर्य मोरोपंत यांचे आश्रयदाते म्हणून चिर:काल टिकणारी आहे. कऱ्हा नदीच्या पूर्व तीरावर बाबूजी नाईकांनी शनिवारवाड्याच्या धर्तीवर आपला वाडा बांधलेला आहे. त्याचे उंच तट आजही आपणास त्याची साक्ष देत आहेत. बाबुजींनी आपल्या वाड्याच्या दक्षिणेस श्री सिद्धेश्वराचे देवालय बांधले आहे. 'क्षेत्रे सिद्धेश्वरास्य प्रथिम प्रभुगुणे मूर्त कैलासरूप ' या शब्दात खुद्द मोरोपंतांनी या देवालयाचे वर्णन केले आहे. या मंदिरातील नंदीची मूर्ती भव्य व बैठी आहे. या देवालयाच्या मागे उजव्या सोंडेच्या गणपतीचे मंदिर आहे. हेच मोरोपंताचंचे स्फूर्तीस्थान आहे.

कविवर्य मोरोपंत–मोरोपंतांचे पराडकर घराणे मूळचे कोकणातील सौंदळ गावचे. मोरोपंतांचा जन्म पन्हाळगडावर शके १६५१ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण केशव पाध्ये व गणेश पाध्ये या विद्वान पंडितांकडे झाले. ते लहान असतानाच त्यांचे वडील रामजीपंत बाबुजी नाईकांकडे बारामतीस आले. विद्या साधना केल्यानंतर मोरोपंत वडिलांना भेटण्यास बारामतीस आले. बारामतीस आल्यावर सीतागीत, सावित्रीगीत, रूक्मिणीगीत ही काव्ये नाईकांच्या मुलींना, सुनांना त्यांनी रचून दिली. अत्यंत सोपी, रसाळ अशी ही काव्ये पाहूनच बाबूजींनी त्यांना पुराणिक म्हणून ठेऊन घेतले. त्यांची विद्वत्ता व काव्यशक्ती पाहून बाबुजींनी त्यांना गणपती मंदिराजवळीत वाडा दान दिला. आजही त्या ठिकाणी मोरोपंतांची लेखन कार्याची खोली जतन करून ठेवली आहे व त्यांची पुण्यतिथी प्रतिवर्षी मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. मोरोपंतांच्या सुमारे पाऊणलाख कविता आहे. त्यांच्या आर्या आजही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या सर्व काव्यांचा उल्लेख करणे शक्य नाही. कुश–लव आख्यान, महालसा आख्यान, हरिश्चंद्राख्यान, कृष्णविजय, संशय रत्नावली, मंलभागवत, हरिवंश, १०८ रामायणे अशी त्यांची रचना विविध व विपुल  आहे. मंत्रभागवतात ङ्क नमो भगवते वासुदेवाय ङ्क हा मंत्र साधला आहे. मंत्ररामायणात ङ्क श्रीराम जयराम जयजयराम ङ्क हा तेरा अक्षरी मंत्र निरनिराळ्या प्रकारे साधला आहे. निरोष्ठ रामायणात ओठाला ओठ लागत नाहीत. अशा तऱ्हेने प्रत्येक रामायणात निराळी खुबी, निराळे वैशिष्ट्य व अनुपम गोडी आहे. वयाची साठी ओलांडल्यानंतर माळेगावच्या अमरसिंह जाधवांच्या कृपेने पंत काशीयात्रेला गेले. काशीहून आल्यानंतर त्यांनी केकावली लिहिली. यामध्ये प्रेम, प्रतिभा, प्रसाद यांचा जणू त्रिवेणी संगम आहे.

पंतांच्या वाणीने व लेखणीने प्रभावीत होऊन सुप्रसिद्ध शाहीर रामजोशी यांनी तमाशा फडातील डफ खाली ठेवून विणा हाती घेतला. अहिल्याबाई होळकर व दुसरे बाजीराव पेशवे यांनी पंतांना आपल्या पदरी बोलावले होते. परंतु अखेरपर्यंत त्यांनी बारामतीकरांना सोडले नाही. हनुमान जयंतीला शके १७१६ मध्ये त्यांचे निधन झाले. मोरोपंत हे पंडीती परंपरेतील सर्वश्रेष्ठ कवी होत. म्हणूनच राम बडवे यांनी मोरोपंतांच्या काव्यगुणाची महती खालीलप्रमाणे फार मार्मिकपणे वर्णिली आहे.

सुश्लोक वामनांचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंतांची ।।

बारामतीचे काळे घराणे प्रसिद्ध आहे. कृष्णराव काळे हे निजामाच्या दरबारी पेशव्यांचे वकील होते. राघोबादादा व थोरले माधवराव यांच्यात बेबनाव झाला तेव्हा यांनीच आनंदवल्लीस जाऊन सलोखा करण्याचा प्रयत्न केला. कृष्णराव काळे यांचा मुलगा गोविंदराव काळे, हेही निजामाच्या दरबारी पेशव्यांचे वकील होते. मुत्सद्देगिरीत ते प्रति नाना फडणवीस होते. नाईकांच्या वाड्याच्या पूर्वेस त्यांचा वाडा आहे. आजही ती वास्तू चांगल्या स्थितीत असून तेथे देवीचे मंदिर आहे. नवरात्रात तेथे देवीचा उत्सव असतो.





बारामतीच्या पश्चिमेस चार मैलावर माळेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या आजोळाच्या घराण्यापैकी जाधव घराणे आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांना सळो की पळो करून सोडणारे प्रसिद्ध सेनानी धनाजी जाधव यांचेच हे वारस आहेत. यांच्याच घराण्यातील अमरसिंह यांनी मोरोपंतांना काशीयात्रेस आपल्या बरोबर नेले. त्याचवेळी त्यांनी गंगावकिली, विष्णुपद ही काव्ये केली.

बारामती येथील मुनि सुश्रुत्त दिगंबर जैन मंदिर हे फार पुरातन आहे. जैनांच्या तीर्थंकरांपैकी विसावे तिर्थंकर म्हणजे या मंदिराची मूळ मूर्ती मुनी सुश्रूत्त तीर्थंकरांची आहे. हे अंदाजे २२५ वर्षांपूर्वीचे आहे. १९३२ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार झाला. दिगंबर पंथीयांचे सर्व सुविधांनी युक्त असे महावीर भवन आहे. तसेच श्वेतांबरांचे शहरात मंदिर आहे. अलिकडील काळात भिगवण रस्त्यावर भव्य दिव्य जैन मंदिर उभारण्यात आले आहे.

येथील चांदशावलीचा उरुस जवळजवळ ३०० वर्षांपासून सुरु आहे. उरुस हिंदू, मुस्लिम दर्गा एतिहासिक आहे त्याचा एकत्रीतरित्या तो साजरा करतात असा भेदभाव नाही. एकात्मतेचा पाठ देणारी संस्था म्हणून हे स्थान विलोभनीय आहे. कसब्यातील मशीद, काशीविश्वेश्वराचे मंदिर यांचे नुकतेच नुतनीकरण झाले आहे. मंदिर व मशिद अगदी शेजारी असूनही दोन्ही समाजातील वातावरण अगदी सलोख्याचे आहे. थोडक्यात उरुस, मोहरम व गणेशोत्सवातही हिंदु मुस्लिम भाई भाई ही गांधीजींची शिकवण जनमानसात पुरेपूर रूजलेली आहे.

गावात पुरातन राममंदिर आहे. तसेच बारामतीच्या परिसरात पांढरीचा महादेव, माळावरची देवी, मळदचा मारूती ही पुरातन देवस्थाने आहे. ख्रिस्ती उपासना मंदिर व दाऊदी बोहरी समाज मस्जिद आहे. श्री क्षेत्र कऱ्हेरी येथे रामदास स्वामींनी स्थापन केलेले मारुतीचे मंदिर आहे. कऱ्हा–निरा नदीच्या संगमावर सोनगाव येथे सोनेश्वर हे शंकराचे मंदिर आहे. शिर्सुफळ येथील शिरसाई देवीचे मंदिर जुन्या घटनांचे अहे. सायली हिल येथील गणपती मंदिर सुबक शिल्पात आहे. सुमारे ३५ किमी परिसरात अष्टविनायकांपैकी मोरगावचा मयूरेश्वर आहे व सोमयाचे करंजे येथील प्रसिद्ध व जागृत सोमनाथाचे देवस्थान आहे. अशी ही बारामतीची उज्वल व थोर परंपरा आहे. या संबंधी अत्यंत चपखल शब्दात बारामतीचे कवी कै. ख.म.खंडागळे यांनी केलेली कविता इथे लिहिण्याचा मोह होतो.

वाहे पापहरा कऱ्हा झुळझूळू श्री काशिराजापदी ।
श्री सिद्धश्वर भव्य मंदिरी वसे, श्रीराम गावामधी ।।
सीमा रक्षित मारुती, निवसते माळावरी देवी ती ।
मोरोपंत कवीश भूषण जिचे, ती धन्य बारामती ।।

अशा या थोर परंपरेबद्दल आपणास अभिमान वाटणे साहजिक आहे. परंतू रामदासांनी सांगितल्याप्रमाणे सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख या वचनाप्रमाणे केवळ पूर्वजांची कीर्ती सांगण्यात बारामतीकर धन्य मानीत नाहीत, त्यांचा वारसा आजही टिकवून आहेत. एवढेच नव्हे तर त्यात भर घालीत आहेत.

द्राक्षे, ऊस, कापूस इत्यादी क्षेत्रात बागायतदारांनी विक्रम केले आहेत. नावे तरी कोणाकोणाची घ्यावीत ? विविध क्षेत्रातील विविध मान्यवर आहेत. बारामतीतील द्राक्षाचे उत्पादन एकरी २२ टनापर्यंत आहे. पिंपळी येथील ग्रेप इंडस्ट्रीज मार्फत वाइन निर्मितीचा प्रकल्प असून आहे. वाइन निर्मितीस उपयुक्त द्राक्षाचे उत्पादन बारामतीस झाल्यास येथील वाइन परदेशात सुद्धा निर्यात करता येईल असा विश्वास इटलीतील श्री. बोस्का यांनी या कारखान्यास भेट दिली तेव्हा व्यक्त केला. बारामती ग्रेप इंडस्ट्रीज आणि युनायटेड स्पिरीटस या कारखान्यांमुळे शेतकऱ्यांचा द्राक्ष विक्री व्यवस्थेचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटला आहे.

या परिसरात तीन साखर कारखाने असून त्या सर्वांची प्रगती वाखणण्यासारखी आहे. माळेगाव कारखाना हा अगदी नजिकच्या परिसरात आहे. दाणेदार साखरेचे उत्पादन, इंडस्ट्रीयल आल्कोहोल व एक्स्ट्रा न्यूट्रल आल्कोहोलचे उत्पादन, ऊस उत्पादकांना मालाची जास्तीत जास्त किंमत, हायस्कूल, पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, फार्मसी यासारख्या शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन हे या कारखान्याचे वैशिष्टय आहे.

कृषी विकास प्रतिष्ठान : नामदार शरदचंद्र पवार यांनी बारामती तालुक्यातील व विशेषत: अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने विविध सेवाभावी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने १९७१ मध्ये ही संस्था स्थापन केली. पाझर तलाव, शेती मॉडेल फार्म,







आदर्श नर्सरी, फळबाग विभाग, वनसंवर्धन व वनविस्तार, कुक्कुट पालन, तरुण शेतकऱ्यास प्रशिक्षण, फिरता दवाखाना, रेशीम पेदास केंद्र, शेती विज्ञान मंडळ इत्यादी अनेक योजना कार्यान्वित होत आहेत. तुषार पद्धत व ठिबक सिंचन पद्धत इ. जलसिंचनाच्या योजना येथे कार्यान्वित केल्या आहेत. कमी पाण्यावर ऊस, डाळिंब, सिताफळ, बोर वगैरे पिकांचे वाढलेले उत्पादन पाहून याची प्रचिती येते. या प्रयोगाचे संकल्पक व संयोजक कै. आप्पासाहेब पवार यांना या क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल पद्मश्री हा बहुमानाचा किताब बहाल करण्यात आला आहे. तसेच राहुरी विद्यापीठाने कृषीरत्न व पुणे विद्यापीठाने डी लिट पदवी देऊन गौरविले आहे. भारतातील एवढेच नव्हे तर परदेशातील अनेक तज्ञ हे प्रतिष्ठान पाहण्यास आवर्जुन येतात. म्हणून हे स्थान म्हणजे जणू नंदनवन आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

याशिवाय ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस कमिटी, फलोत्पादन संघ, खरेदी विक्री संघ, व्यापारी असोसिएशन संघ, दूध संघ, सहकार आणि व्यापारी क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक संस्था आहेत. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इ. व्यवसाय सहकार आणि वैयक्तिक स्तरावर चांगलेच बाळसे धरू लागले आहेत. बारामती ॲग्रोची स्थापना झाल्यामुळे कुक्कुटपालनास स्थैर्य व बळकटी आली आहे. येथील शेतकरी प्रगत असून तो ट्रॅक्टर्स, इलेक्ट्रीक मोटर्स व इंजिन्स, शेतीची सुधारलेली अवजारे, बियाणे बरेच दिवसांपासून वापरू लागला आहे.

औद्योगिक वसाहत २५ वर्षांपूर्वी बारामतीपासून सुमारे तीन किलोमीटर अंतावर ३२ एकर परिसरात इंडस्टीयल एरियात अनेकविध उद्योग सुरू झाले आहेत. फाऊंड्री, ऑईल मिल्स, बर्फ व रंग, अॅल्युमिनिअम भांडी बल्ब इ. अनेकविध छोटे-मोठे कारखाने सुरू झाले आहेत. त्यामुळे अनेक लोकांना रोजगारी मिळून स्वयंरोजगाराचे समाधान मिळत आहे.

औद्योगिक वसाहत (एम.आय.डी.सी.) : तसेच भिगवण रोडवर बारामतीपासून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर औद्योगिक विकास मंडळाने सुमारे ३००० एकरात आपले कार्यक्षेत्र सुरू केले आहे. उजनी धरणापासून पाणीपुरवठ्याची सोय केली आहे. रोडच्या उजव्या बाजूस सुमारे १०० एकर परिसर राहण्यासाठी असून तेथे गेस्ट हाऊसेस, अद्ययावत हॉटेल्स, शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल, शॉपिंग मार्केट, बँका, पोस्ट ऑफिस इ. सोयी याठिकाणी निर्माण झालेल्या आहेत.

एम.आय.डी.सी. परिसराला लागूनच ब्रॉड गेज लाईन गेली असून औद्योगिक सामान पाठविणेस फार विमानतळ असून तेथे पायलट प्रशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. सुलभ व्यवस्था झालेली आहे. या परिसराला लागूनच विमानतळ असून तेथे पायलट प्रशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या शहरांशी त्वरीत संपर्क साधला जाऊन उद्योग धंद्यास चालना मिळणार आहे.

या परिसरात भारत फोर्ज, श्रायबर डायनामिक्स डेअरी, इंडियन सिमलेस ट्यूब कारखाना, एस.टी. महामंडळाचे मोठे वर्कशॉप, मोदी ग्रुपचा होम अप्लायन्सेसचा कारखाना, ऑरटॉन सिंथेटिक लि., हेमराज ग्रुपचा गॅलव्हनाईज्ड पाईप कारखाना, ग्रीव्हज लि. चा डिझेल रिक्षा कारखाना, स्पेंन्टेक्स, सोमा टेक्सटाईल्स, बारामती टेक्सटाईल, डेअरी दुधापासून सर्व पदार्थांचे कारखाना सुरु झाले आहेत. उद्योगपती अनेकविध उद्योग सुरु करीत आहेत.

शिक्षणक्षेत्र : या क्षेत्रात बारामतीचे भरीव प्रगती झाली आहे. १९६२ साली अनेकात एज्युकेशन सोसायटीने कॉलेज स्थापन केले आहे. या कॉलेजमध्ये कला, वाणिज्य, शास्त्र अशा सर्व शाखा असून सुमारे ३५०० विद्यार्थी शिक्षत आहेत. नगरपालिकेच्या वतीने कविवर्य मोरोपंत आंतर महाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा येथे घेतल्या जातात. समृद्ध ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, भाषा विज्ञान, प्रयोगशाळा, व्यायामशाळा, छपाईची सेवा, इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर शिक्षणाची सोय इ. या कॉलेजची वैशिष्ट्ये आहेत. १९११ साली स्थापन झालेल्या म.ए.सो. हायस्कूलच्या दोन भव्य इमारती आहेत. बालवाडीपासून १२ वीपर्यंत येथे शिक्षणाची सोय आहे. एस.एस.सी. च्या मेरिटलिस्टमध्ये या शाळेचे विद्यार्थी आले आहेत. पार्टटाईम ऑब्झर्व्हेटरी, आंतरराष्ट्रीय शंकर्स विकली चित्रकला स्पर्धेत सतत बक्षिसे हे या शाळेचे वैशिष्ट्य आहे. याच परिसरात विद्या प्रतिष्ठानची इंग्रजी माध्यमाची शाळा १९७२ साली स्थापन झाली आहे. उत्तम शिस्त, १० वीचा सातत्याने १०० % निकाल, एस.एस.सी. प्रमाणे आय.सी.एस.ई. चा अभ्यासक्रम हे या शाळेचे वैशिष्ट्य आहे. एम.आय.डी.सी. परिसरात या संस्थेने भव्य संकुल उभे केले आहे. तेथे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कला, शास्त्र, वाणिज्य महाविद्यालय, विधी महाविद्यालय, आय.टी. प्रशिक्षण, वनस्पतीशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी इ. विभाग आहेत. मराठी माध्यमाची शाळा सुरू झाल्या आहेत. लवकरच तेथे अनेकविध कोर्सेस सुरु होऊन तो एक उत्तम शैक्षणिक परिसर होईल. या संस्थेने टी.सी. कॉलेजचे प्रांगणात महिला वसतीगृह बांधले आहे.







रयत शिक्षण संस्थेच्या शाहू हायस्कूल, टेक्निकल हायस्कूल आपापल्या वैशिष्ट्यांनी कार्यरत आहेत. दोन्ही हायस्कूलमधील कर्मवीरांचा पुतळा आपले मन वेधून घेतो. याशिवाय मिशन हायस्कूल, महात्मा गांधी बालक मंदिर, मोरोपंत बालक मंदिर व नगरपालिकेच्या अनेक विभागात प्राथमिक शाळा आहेत.

शारदानगर : बारामती–नीरा मार्गावर बारामतीपासून ४ किलोमीटरवर शारदानगर हा शैक्षणिक परिसर जून १९८९ पासून नव्याने निर्माण केला आहे. येथील भव्य व आकर्षक इमारती, रमणीय परिसर, शैक्षणिक वातावरण डोळे दिपविण्यासारखे आहे. प्राथमिक शिक्षण, डी.एड, बी.एड, बी.पी.एड., आर्टस्, सायन्स, कॉमर्स कॉलेजची येथे सोय आहे. तसेच महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळाचे, राहुरी विद्यापीठाचे, कृषी विकासचे प्रतिष्ठानचे अनेक अभ्यासक्रम चालू आहेत. बालवाडीपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व प्रकारचे शिक्षण मिळण्याचे दृष्टीने हा परिसर प्रगतीपथावर आहे. येथूनच पुढे माळेगाव परिसरात भव्य व आकर्षक इमारती असलेले व सर्व सुविधांनी युक्त पॉलिटेक्नीक, इंजिनिअरिंग व फार्मसी कॉलेज आहे.

क्रीडा क्षेत्रातील प्रगतीही वाखाणण्यासारखी आहे. शाळा, कॉलेजच्या प्रशस्त मैदानावर अखिल भारतीय स्तरावरील खो–खो, हुतुतूचे सामने खेळले गेले आहेज. येथील निरनिराळ्या खेळाडुंची अखिल भारतीय पातळीवर निवड झालेली आहे. बारामती जिमखाना, यूथ फाऊंडेशन इ. संस्था क्रीडा क्षेत्रात भरीव कार्य करीत आहेत. या शतकाच्या सुरुवातीस येथे बारामती समाचार नावाचे साप्ताहिक आहे. पुढे काही काळांनी ते बंद पडले. परंतु सध्या रणशिंग, कऱ्हावार्ता, बारामती लोकवार्ता, वतन की लकीर, बारामती टाईम्स, बारामती वैभव इ. साप्ताहिके मोठ्या दिमाखाने प्रसिद्ध होत आहेत. श्री. प्रतापराव पवार हे दैनिक सकाळचे अध्यक्ष असून त्या माध्यमातून भरीव कार्य करीत आहेत. या ५ हजार वस्तीच्या शहरात सर्व प्रमुख बँका असून त्या गरीब जनतेच्या कल्याणासाठी झटत आहेत. तसेच येथे सुमारे २५० डॉक्टर्स असून त्यात विविध प्रकारचे तज्ञ आहेत. याशिवाय रोटरी क्लब, लायन्स क्लब, जायंट्स ग्रुप, धार्मिक सेवा मंडळ, भगिनी मंडळ, कै. शारदाबाई पवार व्याख्यानमाला, संगीत विद्यालय, शारदोत्सव यांचे स्मरणार्थ सामाजिक संस्था व धार्मिक कार्य करण्यात अग्रेसर आहेत. ५ वर्षापूर्वी स्थापन झालेल्या ज्येष्ठ नागरिक संघाने चांगलेच बाळसे धरले आहे. त्याचे सुमारे १५०० आजीव सभासद असून दर १५ दिवसांनी नियमितपणे कार्यक्रम होत असतात. नाट्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या नाट्य साधना, नटराज नाट्य कला मंडळ इ. संस्था आहेत व त्यांच्या नाटकांना राज्यस्तरावर बक्षिसे मिळाली आहेत. अशा तऱ्हेने सामाजिक, सहकारी, शैक्षणिक, कृषी, औद्योगिक, राजकीय, सांस्कृतिक व आध्यात्मिक क्षेत्रात अनेक लहानमोठ्या संस्था व व्यक्ती यांचा सहभाग अवर्णनीय आहे. विशेषत: कै.शेट रामचंद्र मुलुकचंद कै. गणेश गोपाळ ऊर्फ दादासाहेब शेंबेकर, कै. सोपानराव तुकाराम जाचक, कै. स.वा.करंदीकर, कै.एकनाथ गंगाराम पोटे, कै.धों.आ.सातव ऊर्फ कारभारी इ. अनेकांचा या नगरीच्या जडणघडणीत फार मोठा वाटा आहे. आजही अनेक व्यक्ती या नगरीच्या विकासासाठी झटत आहेत. परंतू सर्वांचा उल्लेख अशक्य असल्याने केवळ ठळक बाबी नमूद केल्या आहेत. थोडक्यात या शहरात शिक्षण, क्रीडा व कला याचा त्रिवेणी संगम झाला आहे.

नगरपालिका : येथील नगरपालिका १ जानेवारी १८६५ ला स्थापन झाली आहे. शुद्ध व मुबलक पाणीपुरवठ्यासाठी नगरपालिकेने सातत्याने प्रयत्न करून घरोघरी नळ आणले आहेत. परंतु वाढत्या लोकसंख्येने ते अपुरेच पडत आहेत. नवीन विस्तारीत योजनेत ही उणीव भरून निघेल. बंद गटार योजना, स्वतंत्र सुसज्ज दवाखाना, मोरोपंत ग्रंथालय व वाचनालय, मोरोपंत सभागृह, स्त्रियांसाठी व बालकांसाठी स्वतंत्र विस्तारीत विभाग, सर्व सुविधांनी युक्त असे सांस्कृतिक केंद्र, भव्य मंडई, कमर्शियल कॉम्प्लेक्स, श्रीधर सभागृह/या नगरपालिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी आहेत. पूर्वीच्या दोन बागांशिवाय स्टेशनरोडची विस्तीर्ण बाग व तेथील कारंजे, कॅनॉल शेजारील रमणीय बाग व झुलता पूल कोणाचेही लक्ष वेधून घेतो. याशिवाय पोहण्याचा तलाव अशा तऱ्हेने शहरातील सुखसोयी व स्वच्छतांकडे नगरपालिकेचे विशेष लक्ष असते.

राजकीय क्षेत्र : ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त होऊन सत्तेचे हस्तांतर ब्रिटीश साम्राज्याकडे आले. ब्रिटीश साम्राज्य निर्मितीनंतर २०–२५ वर्षेबारामतीचे फारसे योगदान नाही. १८६५ साली नगरपालिका स्थापन झाल्यावर प्रगतीची व विकासाची नवीन क्षितीजे दिसू लागली. १८८० च्या सुमारास बारामतीत प्रचंड दुष्काळ पडला. अन्नासाठी बारामतीकरांनी दंगली केल्या. त्या फेमिन रायटस म्हणून नोंदविल्या आहेत. क्षोभाला नियंत्रित करण्यासाठी म्हणून नाईलाजाने का होईना दुष्काळी मदत कार्य सुरू करावे लागले व त्यातूनच ११० मैल लांबीचा नीरा डावा कालवा तयार झाला. १९३३ ते १९४७ काळात महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली भारतातील असंख्य व्यक्ती स्वातंत्र्याच्या देशव्यापी आंदोलनात उतरल्या. यामध्ये बारामती परिसराने








आपले योगदान दिले आहे. प्रभात फेऱ्या काढणे, तिरंगी झेंडा घेऊन मिरवणुका काढणे, वंदे मातरम् घोषणा देणे, सूतकताई इ. विधायक प्रकाराने जागृती घडवून आणली. १९३५ मध्ये येथे मंडईत पंडीत नेहरूंचे भाषण झाले होते. बॉम्ब तयार करणे, प्रचाराचे साहित्य वगैरे अनेक कामे स्वातंत्र्य सैनिकांनी केली. काहींनी टेलिफोनच्या तारा तोडल्या म्हणून त्यांना फटक्यांची शिक्षा झाली.१९४२ मध्ये पोस्ट ऑफीस जाळले. बारामती रेल्वे स्टेशनवर एका युरोपियन प्रवाशाचे विदेशी कपडे काढून त्याला जबरदस्तीने खादीचे कपडे घालण्याचा लावण्याचा मजेदार प्रसंग याच काळात घडला. या सर्वांचा परिणाम म्हणून भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर मध्यंतरीच्या काही काळात राजकीय क्षेत्रात थोडी ग्लानी आली होती. स्थानिक प्रभावी नेतृत्व नव्हते. बाहेरच्या कॉंग्रेस उमेदवारास बारामतीकर मोठ्या निष्ठेने निवडून देत असत. ही उणीव १९३२ पासून नामदार शरद पवार यांच्या तडफदार नेतृत्वाने भरून काढली. त्यांनी १९५८ पासून सुमारे १० वर्षेयुवकांच्या चळवळीत सक्रीय भाग घेतला. युवक चळवळीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी परदेश दौरा केला. १९६७ मध्ये बारामतीमधून विधान सभेवर ते प्रचंड मतांनी निवडून गेले. पुढे विधीमंडळ कॉंग्रेस पक्षाचे चिटणीस, महाराष्ट्र कॉंग्रेसचे सरचिटणीस व पुढे फोरम ऑफ सोशॅलिस्ट ॲक्शनचे अध्यक्ष झाले. आणि समाजवादी कार्यक्रमाला नवा आकार देण्याचा एक धडाडीचा कार्यक्रम सुरू केला. १९७२ साली पुन्हा मोठ्या दिमाखाने निवडून आले व गृहराज्यमंत्री, शिक्षणमंत्री, शेतीमंत्री, गृहमंत्री व मुख्यमंत्री अशा चढत्या क्रमाने शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे त्यांचा उत्कर्ष होत गेला. काही काळ विरोधी पक्षनेते म्हणून तडफेने काम केले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी त्यांनी केलेल्या गौरवपूर्ण कामाची नोंद घेतली गेली व ते भारताचे संरक्षणमंत्री म्हणून विराजमान झाले. संरक्षणमंत्री असताना त्यांनी भारताच्या धगधगत्या सीमा सुरक्षीत ठेवण्याचे व जवानांना धैर्य देण्याचे काम अत्यंत कुशलतेने केले व महाराष्ट्राची शान वाढविली. दिल्लीत असताना त्यांना महाराष्ट्राचा विसर पडला नाही. घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी या उक्तीची प्रचिती त्याचवेळी आली. याचवेळी महाराष्ट्रात जातीय दंगली उसळल्या. मुंबईत बॉम्बस्फोट होऊन कोट्यावधी रूपयांची हानी झाली. शेकडो लोक मृत्यूमुखी पडले. दु:खी जनतेचे अश्रू पुसण्यासाठी व त्यांना धैर्य देण्यासाठी शरदराव स्वत: महाराष्ट्रात आले व दिवस रात्र एक करून त्यांनी शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्विकारल्यानंतर निसर्गाने जणू त्यांची परीक्षाच घेतली. लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यात भूकंपाचा उद्रेक होऊन अतोनात मनुष्यहानी झाली. तेथील जनता भयभीत झाली. यावेळी जनतेला दिलासा देऊन फार थोड्या अवधीत त्यांचे संसार उभे केले. या संकटात त्यांनी केलेली कामगिरी खरोखरच अविस्मरणीय आहे. तसेच त्यांनी मराठवाडा नामविस्ताराचा प्रश्न योग्य तऱ्हेने हाताळून मार्गी लावला. महिला विकास आयोग स्थापन करून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा वैचारिक वारसा त्यांनी चालू ठेवला आहे, एवढेच नव्हे तर कृतीत आणला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

राजकारणाबरोबर समाजजीवनातील अनेक गोष्टीत त्यांना रस आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनात भर घालणाऱ्या संघटनांमागे ते ठामपणे उभे आहेत. नवीन जबाबदारी स्वत:हून घेणे, त्याचा बारकाईने अभ्यास करणे व घेतलेले काम तडफेने व जिद्दीने पूर्ण करणे हे त्यांच वैशिष्ट्य आहे. स्पष्ट व मार्मिक बोलणारा परखड नेता, कणव आणि कळकळ असलेला पल्लेदार दृष्टीचा जाणता संघटना सम्राट, कृतीने लाजविणारा धीरोदत्त विचाराचा महामेरू आणि वक्तृत्वाने मंत्रमुग्ध करून टाकणारा हा महान जादुगार आहे. लोकप्रियतेच्या बाबतीत सामान्यांपासून असामान्यांपर्यंत, झोपडीपासून ते हवेलीपर्यंत, दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत एवढी लोकप्रियता संपादन केलेला दुसरा नेता तुलनेसाठी सुद्धा जवळपास नाही.

शरदराव यांनी संरक्षणमंत्री म्हणून भारताच्या राजकारणात प्रवेश केला तेव्हा महाराष्ट्राच्या प्रत्येक गोष्टीत बारकाईने लक्ष देणे त्यांना शक्य होणार नाही. बारामती पोकी होणार की काय असे वाटू लागले होते. परंतु ही उणीव बारामतीचे तरूण, तडफदार युवक नेते श्री. अजितदादा पवार यांनी भरून काढली. अगदी तरूण, कोवळ्या वयात बारामती लोकसभा मतदार संघातून ते प्रचंड विक्रमी मताधिक्याने निवडून आले. महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात ऊर्जा व जलसंधारणमंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांची काम करण्याची जिद्द, त्वरीत निर्णय घेण्याची क्षमता, परखड व स्पष्ट वकृत्व खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. बारामतीचे व पर्यायाने महाराष्टांचे भले करण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात. या युवक नेत्यापासून लोकांच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. अलीकडील काळात त्यांनी उपमुख्यमंत्रीपद भूषविले.





शिक्षणाच्या सर्व सुविधा निर्माण करून दिल्यानंतर घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग आपल्याच भागासाठी करावा या उदात्त हेतूने मा. शरदराव पवारांनी जी एम.आय.डी.सी. उभी केली. तेथील कारखान्यात येथे शिक्षण घेतलेली उच्च विद्या विभूषित मुले–मुली काम करतात, रोजगार मिळवतात आणि आपल्या भागाचा विकास करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात.

पुण्याच्या जिल्हा न्यायालयापेक्षाही मोठी इमारत बारामती न्यायालयास निर्माण करून देऊन कृषिमंत्र्यांनी जिल्ह्यापेक्षा तालुका मोठा हे दाखवून दिले. सुप्रीम कोर्टाच्या इमारतीच्या आकारची व तेवढेच क्षेत्र असणारी आमची न्यायालयाची इमारत गावचे वैभव आहे. औद्योगिकीकरणामुळे वाडा संस्कृती लयाला जाऊन सिमेंटची नगरी असलेली सुसज्ज इस्पितळे, खाजगी दवाखाने आमच्या बारामती नगरीत आहेत. पुण्याला असणारी सर्व शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक सुविधा, तत्परतेने मिळणारी वैद्यकीय सेवा हे सर्व आता बारामतीमध्ये उपलब्ध आहे. पूर्वीची नॅरोगेज रेल्वे बंद करून ब्रॉड गेज रेल्वे झाल्यामुळे येथून मुंबईला फक्त ५० रूपयात जाता येते. एम.आय.डी.सी. येथे विमानतळ आहे व वैमानिक होण्याचे शिक्षण देणारी खाजगी संस्था आहे. एस.टी. बसेसचे जाळे सर्वत्र विणले आहे. बारामती–पुणे–बारामती अशी विना वाहक, विना थांबा अशी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. दर तासाला ३ बसेस पुण्याला जातात व तेवढ्याच परत येतात.

तांदुळवाडी या बारामतीजवळच्या खेडेगावात ज्येष्ठ नागरिक निवास (वृद्धाश्रम) ज्येष्ठांच्यासाठी निर्माण केले आहे. कृषिमंत्र्यांनी खासदार निधीतून १० लाख रूपयांचे डोळ्याच्या शस्त्रक्रियेचे साहित्य दिले आहे. या वृद्धाश्रमात महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी अतिशय अल्प दरात डोळ्याच्या सर्व शस्त्रक्रिया केल्या जातात. समाजातील गरीबांसाठी ही एक अतिशय स्वस्त अशी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पुढील ५/६ वर्षात भारताच्या नकाशावर बारामती हे शहर शैक्षणिक, धार्मिक–सामाजिक, आर्थिकदृष्ट्या प्रगतीपथावर असलेले पहिल्या क्रमांकाचे शहर करण्याचा प्रयत्न मा. शरदराव पवार कृषिमंत्री, भारत सरकार, माननीय अजितदादा पवार व खासदार सौ. सुप्रिया सुळे यांचा आहे. शहरातील वाहतूक यंत्रणेवर पडणारा ताण कमी करण्यासाठी गावाच्या बाहेरून रिंगरोड व बायपास रोड मार्फत वाहतूक सुरू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांना दररोजची हवामानाची माहिती देण्यासाठी, तसेच शेतमालाचा बाजारभाव कळण्यासाठी व शेतकऱ्यांची करपणूक करण्यासाठी बारामतीमध्ये वसुंधरा वाहिनी सुरू करण्यात आली आहे. तसेच बारामतीमधील सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच बारामतीमधील सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी संयुक्त प्रशासकीय कार्यालय उभारण्याचा प्रयत्न हाती घेतला आहे. अशी आमची बारामती नगरी. कविवर्य मोरोपंत म्हणतात, बा राम तीत आहे म्हणून आमच्या नगरीत राम आहे. रामाचे मंदीरही आहे.

बारामती...... शहराचा फील असलेले मात्र स्वत:चे गावपण आजही जपून ठेवलेलं एक टुमदार गाव, विकासाच्या खुणा जागोजागी दिसून येत असल्या तरी प्रदूषण आणि शहरीकरणापासून स्वत:ला जाणीवपूर्वक अलिप्त ठेवलेले एक सुंदर शहर म्हणजे बारामती अशी या शहराची ओळख. पूर्वीची कविवर्य मोरोपंतांची व आजची शरद पवार व अजित पवार यांची बारामती म्हणून देशाच्याच नाही तर जगाच्या नकाशावर एक वेगळे स्थान या नगरीने मिळविले आहे. कृषी, सहकार, शिक्षण, समाजकारण, सांस्कृतिक, औद्योगिक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात गेल्या चार दशकात पुणे जिल्ह्यात पुण्याखालोखाल आघाडीवर राहिलेले एक शहर ठिकठिकाणी जाणवेल याची काळजी येथील नागरिकांनी व संस्थांनी जाणीवपूर्वक घेतली. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार व पालकमंत्री अजित पवार यांच्या राजकीय इच्छाशक्तीमुळे शहर खऱ्या अर्थाने टुमदार आहे.

जेथे भूकंप होत नाही महापूर येत नाही, खूप थंडीही नाही व ऊनही तापत नाही, प्रदूषण नाही तरी शहराच्या सर्व सुखसुविधा उपलब्ध आहेत, असे स्थायिक होण्यासाठी एक अत्युत्तम गाव म्हणून बारामतीचे आवर्जून नाव घ्यावे लागेल. इंग्रजी, मराठीपासून ते पदवी व पदव्युत्तर शिक्षण असो वा तांत्रिक अभियांत्रिकी ते आयटी–बीटीपर्यंत कायद्याचे ज्ञान मिळवायचे असो वा थेट विमान चालविण्याचे प्रशिक्षण पाहिजे असले तरी ते सर्व बारामतीतच मिळण्याची सुविधा आहे. शहरात तब्बल ३२ हजारांहून अधिक लोकसंख्या विद्यार्थ्यांची आहे. विद्या प्रतिष्ठान, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, शारदानगर शैक्षणिक संकुल, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ या सारख्या संस्थांसह इतरही शैक्षणिक संस्थांकडून शिक्षणाची नवनवीन दालने उपलब्ध होत आहेत. सर्व दृष्टींनी एक मोठे शैक्षणिक केंद्र म्हणून पुण्याखालोखाल आता बारामतीला विद्यार्थी–पालकांची पसंती आहे. एकीकडे सहकारी संस्थांद्वारे







शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न दूध संघ, सहकारी साखर कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघासारख्या संस्था करीत असताना दुसरीकडे ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टसारख्या संस्था कृषी संशोधन व नवनवीन प्रयोग करून शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्राद्वारे शेती करण्यासाठी उद्युक्त करीत आहेत.

भारत फोर्ज, आयएसएमटी, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, पियाजिओ, श्रायबर डायनामिक्स डेअरी यासारख्या मोठ्या कंपन्यांनी विस्तारवाढ व त्यानिमित्ताने नव्याने उपलब्ध होणारा रोजगार ही बाब शहराच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. बारामती हायटेक टेक्सटाईल पार्कचा विस्तार कृषीमंत्री शरद पवार, मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व सौ. सुनेत्राताई पवार यांच्या समर्थ पुढाकारातून वेगाने होतो आहे. पाच हजारांवर महिलांना येथे रोजगार निर्माण होणार आहे. बारामतीच्या विमानतळाच्या धावपट्टीचे व ॲप्रोनच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले असून आता रिलायन्सकडे या धावपट्टीच्या देखभाल दुरूस्तीचे कामकाज सोपविण्यात आले आहे. या विमानतळाच्या विकसनामुळे आगामी काळात बारामती देशाच्या हवाई नकाशावर ठळकपणे पुढे येणार आहे.

कृषी क्षेत्राची बारामतीची वाटचाल वेगाने होते आहे. ताजी फळे, भाजीपाला, शेतीमाल बारामतीतून मोठ्या शहरात किंवा परदेशात निर्यात करण्यासाठी सुसज्ज विमानतळ भविष्यात महत्त्वाचा ठरेल. पुण्या मुंबईच्या विमानतळांवरचा ताण कमी करण्यासाठी जवळचे विमानतळ म्हणून बारामतीचा पर्याय उत्तम ठरणार आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडे अधिक विकासाच्या दृष्टीने हा विमानतळ सोपविण्यात आल्याने आता अधिक गतीने येथे काही घडामोडी होतील अशी अपेक्षा आहे.

शहरात रिंगरोडच्या दुसऱ्या टप्प्याचे काम झाले असून संपूर्ण शहराबाहेर उत्तम रस्त्यांचे जाळे तयार होत आहे. सर्व शासकीय कार्यालयांना एकाच ठिकाणी आणण्याच्या दृष्टीने अजित पवार सेंट्रल बिल्डिंग तसेच सांस्कृतिक भूक भागविण्यासाठी एक सुसज्ज ऑडीटोरियम उभारण्याच्या कामाला गती आली आहे. शासनाच्या बहुसंख्य आणि प्रमुख कार्यालयांनी उपलब्धता असल्याने अनेक महत्त्वाची कामे बारामतीतच होत असल्याने हेलपाटे मारण्याचीही गरज नाही. वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी शहरात किमान तीन हजार सदनिका विविध ठिकाणी उभारण्याची कामे वेगाने सुरू आहेत. शहर व आसपास अनेक ठिकाणी सदनिकांची बांधकामे वेगाने उभी राहत आहेत. प्लॉट घेऊन बंगले बांधणाऱ्यांचीही संख्या वाढते आहे. शहराचा विस्तार झाला तशा आरोग्याच्या सुविधाही येथे निर्माण झाल्या. सिटीस्कॅनपासून ते इंटेसिव्ह केअर युनिटपर्यंत व बायपास पासून ते हाडाच्या विविध शस्त्रक्रिया येथे सहजतेने होतात. पुण्याखालोखाल महत्त्वाचे आरोग्य केंद्र म्हणूनही बारामतीची आता ओळख होते आहे. मेडीकल टुरिझमच्या दृष्टीने येथील वैद्यकीय व्यावसायिकांनी आपल्या हॉस्पिटलची सज्जता केलेली आहे. पंचक्रोशीतून लोक उपचारासाठी बारामतीत येतात. कोणत्याही आजार किंवा शस्त्रक्रियेसाठी बारामतीच्या बाहेर रूग्णाला जावे लागणार नाही इतके अत्याधुनिक व सुसज्ज असे हॉस्पिटल बारामतीत आहे.

पुण्या मुंबईत मिळणाऱ्या बहुसंख्य वस्तू व सेवासुविधा आज बारामतीत सहजतेने मिळतात. संगणक व इंटरनेटच्या सहज सुविधेमुळे बारामती शहर जगाच्या जवळ आले आहे. गावाचे गावपण जपताना आपली रसिकता बारामतीकरांनी सोडलेली नाही. परिवर्तन व्याख्यानमाला, शारदोत्सव, शारदा व्याख्यानमाला, जागृती व्याख्यानमाला, नटराज नाट्य कला मंडळाच्या एकांकिका स्पर्धा, लावणी महोत्सव यासह सातत्याने होणारे नाट्य व संगीताचे प्रयोग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या कविवर्य मोरोपंत तसेच विद्या प्रतिष्ठानच्या प्रतिभा आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेमुळेही बारामतीकारांना सांस्कृतिक मेजवानी मिळते. सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली एन्व्हार्यमेंटल फोरम ऑफ इंडिया या सेवाभावी संस्थेच्या वतीने सादर होणारी विज्ञानजत्रा व पर्यावरण व निसर्ग व संरक्षणाचे होणारे काम महत्त्वाचे ठरते.

दिवसभर थकून भागून आल्यानंतर करमणूक व मनोरंजनासाठी बारामती क्लबचाही प्रारंभ भिगवण रस्त्यावरील सायली हिल येथे झालेले आहे. मनोरंजनाची दालने येथे आहेत. दुर्गा सिटीप्राईडच्या माध्यमातून मल्टीप्लेक्स बारामती सुरू झाले असून एमआयडीसीतही नव्याने दोन पडदे असलेल्या एका मोठ्या मल्टिप्लेक्सचेही काम झाले आहे. खवय्या बारामतीकरांच्या जिभेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी येथे उत्तम हॉटेल्स व फास्टफूड सेंटर्स असून नव्याने अनेक हॉटेल्स सुरू होत आहे.








शहरीकरणाच्या सर्व खुणा बारामतीत ठळकपणे दिसतात मात्र तरीही परस्परस्नेह जपणारी माणसेही याच शहरात आजही दिसतात. कोणाच्या घरी कार्य असो वा काही वाईट घटना घडली तरी एका हाकेसरशी हजारो हात मदतीसाठी या गावात पुढे येतात. कितीही गर्दी असो वा घाई, संध्याकाळी मित्रमंडळींच्या भेटीसाठी येथील प्रत्येकजण आसुसलेला असतो. आमच्या घरापेक्षाही आम्हाला ज्येष्ठ नागरिक निवास या संस्थेत अधिक घरच्यासारखे वाटते असे आत्मियतेने ज्या निवासाचे वर्णन केले जाते तो ज्येष्ठ नागरिक निवासही येथे दिसतो. वाढत्या विकासामुळे रोजगार व व्यवसायाच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. पर्यायाने बारामतीकरांचे स्टँडर्ड ऑफ लिव्हींग उंचावले आहे त्यामुळे खऱ्या अर्थाने संपन्न जीवन बारामतीकर जगतात असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या संपन्नतेचा फायदा विविध कंपन्यांनी न उठविला तरच नवल म्हणावे लागेल. वाढते शहरीकरण व व्यापारीकरणाबरोबरच एक महत्त्वाची बाजारपेठ म्हणून बारामती उदयास येत आहे. मोठ्या शहरांप्रमाणेच बारामती एक महत्त्वाचे सेल्स सेंटर असल्याची जाणीव एव्हाना सर्वच कंपन्यांना झालेली असल्याने चारचाकी वाहनांपासून ते इलेक्ट्रॉनिक वस्तूंपर्यंत अनेक महत्त्वाच्या डीलरशिप व गॅसस्टेशनही बारामतीत झालेली आहेत. रेल्वेची ब्रॉडगेज सेवा व मालवाहतुकीसाठीचे केंद्र असल्याचाही फायदा बारामतीस होतो आहे. येथून साखर व इतर वस्तू देशभरात रेल्वेच्या माध्यमातून जातात व लोडिंग अनलोडिंग सुविधेमुळे विविध प्रकारचा मालही येथे येतो. पुणे जिल्ह्यात सर्वात मोठे राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बसस्थानक बारामतीत असून उत्तम सेवा एसटीकडून बारामतीकरांना मिळते. बारामती–पुणे–बारामती विनावाहक विनाथांबा या गाड्या प्रचंड लोकप्रिय आहेत. सध्या दोन सव्वा दोन तासांचे अंतर रस्त्याच्या रूंदीकरणानंतर कमी झाले तर पुण्याची वाढ बारामतीकडे सरकण्यास वेळ लागणार नाही हे निश्चित आहे.

गेल्या दोन दशकात बारामतीच्या विकासाला वेगाने गती देण्यात ज्यांचा मोलाचा सहभाग आहे अशा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा येथे आवर्जुन उल्लेख करावा लागेल. त्यांनी बारामतीच्या विकासासाठी तन, मन, धनाने काम केले. त्यांच्या दूरदृष्टीने शहरातील अनेक विकासकामांना गती मिळाली. अपेक्षेहून कमी वेळात अनेक प्रकल्प पूर्ण झाले. त्यांच्या बारामतीच्या विकासाचा आढावा घेताना उल्लेख आवश्यक ठरतो. बारामतीचा चेहरामोहरा बदलण्याचे काम त्यांनी केले. येत्या काही वर्षात मध्यवर्ती प्रशासकीय इमारत व पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिराच्या धर्तीवरील सुसज्ज ऑडीटोरियम, आरटीओची इमारत, एकात्मिक गृहनिर्माण प्रकल्प, सिमेंट काँक्रीटचे साठवण तलाव, रिंगरोडचा तिसरा टप्पा, माळेगावनजिक होणारी एक हजार विद्यार्थी क्षमतेची आयटीआयची सुसज्ज इमारत असे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प अजित पवार यांनी हाती घेतले आहेत. कालबद्ध कार्यक्रम राबवून प्रकल्पांची पूर्तता करण्यात त्यांचा हातखंडा आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनीही बारामती लोकसभा मतदारसंघात आपल्या कामाचा ठसा उमटविण्यास प्रारंभ केला असून केंद्र शासनाच्या पातळीवरील अनेक कामे त्यावेगाने मार्गी लावत आहेत. संसदेत सर्वाधिक प्रश्न उपस्थित करून विविध विषयांवरील चर्चेत सहभागी होण्यासोबतच परदेशी शिष्टमंडळासमवेत भारतीय शिष्टमंडळात प्रतिनिधीत्व करण्यातही त्या आघाडीवर आहेत. देशातील सर्वाधिक प्रभावी युवा खासदारात त्यांचा आवर्जुन उल्लेख केला जातो. उत्तम इंग्रजी व हिंदी भाषा अवगत असल्यामुळे त्यांच्या संसदेतील भाषणांची नोंद प्रशासनाला घ्यावी लागते व अनेक कामे या माध्यमातून मार्गी लागत आहेत.

राजेंद्र पवार व सुनंदा पवार यांच्या नेतृत्वाखाली ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्रामार्फत सुरू असलेले कृषी संशोधन व नवीन प्रयोगांचे काम राज्यातीलच नव्हे तर देशातील शेतकऱ्यांसाठी मोलाचे ठरत आहे. महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासह या बचत गटांच्या उत्पादनांना राज्यातील जनतेपुढे आणण्यासाठी सुरू करण्यात आलेली भीमथडी जत्रा बचत गटांसाठी मैलाचा दगड ठरला आहे.

कविवर्य मोरोपंत, शिवलिलामृतकार श्रीधरस्वामी व शाहीर रामजोशी अशी संत, तंत व पंतकवींचा वैभवशाली त्रिवेणी वारसा लाभलेल्या बारामतीने इतिहासाच्या खुणा जपत आधुनिक तंत्रज्ञानाचाही सहजतेने स्वीकार केला आहे. येथे आलेल्यांना आपल्यात सामावून घेत आपलेसे करीत या शहराने अनेक बरेवाईट बदल पाहिले आहेत. आजही स्थानिकांसमवेतच बाहेरून येणाऱ्या हजारो लोकांना या शहराने आपल्यात सामावून घेतले आहे. शहर व परिसरात गृहनिर्माणाच्या अनेक स्कीम्स सुरू असून अल्प, मध्यम व उच्चमध्यम लोकांना मनाजोगती घरे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न येथील बांधकाम व्यावसायिकांकडून सुरू आहे. बारामती शहराच्या हद्दवाढीची प्रक्रियाही येत्या काही दिवसात होण्याची शक्यता आहे.

आजही बारामतीविषयी राज्यातीलच नाही तर देशातीलही लोकांना नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. इंटेलचे प्रमुख क्रेग बॅरेट असोत वा गानसम्राज्ञी लता मंगेशकर, माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम असोत वा उद्योगपती मुकेश अंबानी या सर्वांनाच बारामती पाहायची उत्सुकता होती. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी तर कृषीमंत्री शरद पवार यांनी विकासाचा राबविलेला बारामती पॅटर्न देशात सगळीकडे राबविला पाहिजेत अशी पावती दिली आहे. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे खेड्याकडे चला, बारामतीमध्ये वावरताना गावाचे गावपण जागोजागी दिसते, दुसरीकडेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या खुणाही दिसतात. ज्या स्वच्छतेचे महात्मा गांधी पुजारी होते, सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील अशा सर्वांगीण स्वच्छतेचा पुरस्कार करण्यात काटेवाडीसारखी गावे राज्यातच नाही तर देशात आघाडीवर आहेत. खऱ्या अर्थाने सुखी व शांत जीवन जगायचे असेल, शहरीकरणाची फळे चाखूनही निसर्गाच्या सान्निध्यात वावरायचे असेल आणि राहणीमान उंचावूनही आप्तस्वकीय व मित्रमंडळींचा दररोजचा सहवास हवाहवासा वाटत असेल तर तुम्ही बारामतीत राहायला या.... एवढेच या निमित्ताने म्हणावे लागेल.

• • •

# विकासाचा बारामती पॅटर्न...

- किरण गुजर




पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी बारामतीच्या विकासाच्या कामांची मुक्तकंठाणे प्रशंसा केली आणि देशाच्या पातळीवर चर्चा होवू लागली ती बारामतीच्या विकासाच्या पॅटर्नची. यापूर्वी देखील प्रत्येक राजकीय पक्षाचे नेते हे आपल्या भाषणांमध्ये पवारांनी बारामतीचा विकास केला तसा इतरत्र का नाही अशा सकारात्मक व नकारात्मक टिकेतून भावना व्यक्त करताना दिसतात. शेवटी त्या मागील सत्य मात्र एकच आहे. ते म्हणजे बारामतीचा विकास. हा विकास काही जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे एका रात्रीत झालेला विकास नाही. तर त्यामागे देखील एक इतिहास निर्माण झाला आहे.




एखाद्या भागाचा विकास होतो, कामे होतात म्हणजे नेमके काय होते ती कोण करतात. शासन-यंत्रणा ही विकासाची काम करणारी माध्यम आहे. मग सर्व ठिकाणी विकास त्याचा वेग, का दिसत नाही तर यामागे असणारी शक्ती पाहिली पाहिजे की जी या ठिकाणाच्या नेतृत्वामधून दिसते. अर्थात लोक प्रतिधिनीच्या माध्यमातून विकासकामे ही लोकशाही संकल्पना आहे. या व्यवस्थेत लोकप्रतिनिधी हा शासन व जनता यामधील दुवा आहे.
विकासाची गंगा सर्वसामान्य माणसाच्या दारापर्यंत आणण्याचे काम त्यांना करावे लागते. सन १९६७ पासून बारामती विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व मा.ना. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी केले ते विधानसभा व तद्नंतर २००९ पर्यत बारामती लोकसभा मतदार संघाचे त्यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. म्हणजे एकाच मतदार संघाचे सातत्याने गेली ४० वर्षेत्यांनी लोक प्रतिनिधीत्व केले.



या कालावधीमध्ये त्यांनी बारामती तालुक्याच्या विकासाची मुहुर्तमेढ रोवली व त्यास चालना दिली. शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी, सर्वसामान्यातून पुढे आलेले नेतृत्व, राजकीय बाळकडू मिळाल्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्याच्या व्यथा त्यांना ज्ञात होत्या. विद्यार्थी दशेपासून त्यांनी समाजकारण, क्रिडा, सांस्कृतिक कार्यास सुरुवात केली व नंतर राजकीय कार्यात सहभाग घेतला. तळागाळापर्यंत जावून काम केलेल्या अनुभवाचा फायदा त्यांना पुढील वाटचालीत झालेला आहे.

बारामती तालुका हा तसा अवर्षणग्रस्त भाग सर्वात कमी पाऊस पडणारा विभाग. निरा डावा कालव्यामुळे एक तृतीयांश भाग बागायती व दोन तृतीयांश भाग जिरायती असणारा. ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल तर प्रथम शेतीचा विकास करणे आवश्यक आहे हे जाणून बारामती तालुक्यातील जिरायती भागामध्ये उपलब्ध ठिकाणी पाझर तलाव करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. कासा योजनेमधून हाताला काम मिळवून देऊन सुमारे १८५ पाझर तलावांची निर्मिती केली गेली. कऱ्हानदीचे पाणी पाऊस पडला की वाहून जायचे या पाण्याचा अडवून त्याठिकाणी ठिकठिकाणी कोल्हापूर पद्धतीचे व भूमिगत बंधारे बांधले आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेती विषयक अत्याधुनिक तंत्रज्ञान माहिती शेतकऱ्यांना मिळावी या उद्देशाने कृषि विकास प्रतिष्ठान ट्रस्टची स्थापना केली. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ही धूरा सांभाळली.



शेतकऱ्यांना शेती विषयक माहिती, सुधारीत जाती, बी-बियाणे, खते-रोग किड यावरील उपाय माती परीक्षण हे काम सुरु केले. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन

मिळू लागले व पर्यायाने अन्नधान्य, भाजीपाला, फळबाग या विषयीच्या शेतीकडे शेतकरी मोठ्या प्रमाणावर वळले. ऊसाच्या सुधारीत जाती व उत्पादन वाढीच्या मार्गदर्शनामुळे एकरी ऊस उत्पादन वाढण्यासही मदत झाली.



पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन शेतीकरीता पाणी नियोजनाचा कार्यक्रम हाती घेतला गेला व तुषार व ठिबक सिंचनाचा कार्यक्रम तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर राबविला गेला. शेततळ्यांची योजना कार्यान्वित झाली. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये निर्माण होणारी फळे, द्राक्ष, डाळींब परदेशामध्ये पाठविण्यापाठीचे कामही केले जाते. तर नाशवंत फळासाठी शीतगृहाची निर्मिती,फलोत्पादक संस्थेने केलेली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या फळभाजी पाल्यांना चांगली बाजारपेठ व भाव मिळत आहे.



शेतकऱ्याच्या मालाला चांगला दर मिळावा म्हणून अन्न–धान्याची खरेदी–विक्री करण्यासाठी बारामती तालुका खरेदी–विक्री संघ संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना खते, बि–बियाणे, औषधे रास्त भावामध्ये मिळत आहेत. शेती व्यवसायाला पूरक असे व्यवसाय केले पाहिजेत यासाठी दूग्धव्यवसायाला चालना देण्याचे काम केले गेले. दूध व्यवसायाकरीता प्रथमत: कृषी विकास प्रतिष्ठान संस्थेने पथदर्शी प्रकल्प करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून जर्सी गाईचा प्रकल्प आणला तो वाढविला. तालुक्यात स्वत:चे एक लिटर ही दुध नसताना आज प्रतिदिनी २ लाख लिटर दूध शेतकऱ्यांचे जमा होत आहे. याबाबतचे नियोजन करून वितरण करणेकामी बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ सुरू करण्यात आला. जनावरांकरिता नंदन दुध व दुधाचे उपपदार्थ, नंदन पशु खाद्य, पेट्रोलपंप, मंगल कार्यालय या सुविधा करण्यात आलेल्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत शेतकऱ्यांना धान्यबाजार, गुरे बाजार, राज्यातील बाजारभाव कळण्याची व्यवस्था, यांत्रिक चाळणी, भाजीबाजार,पेट्रोल पंप, शेतकरी निवास, रयत भवन मंगल कार्यालय व्यवस्था करण्यात आल्या आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन व्यवसायाला चालना दिली गेली. लघुउद्योगासाठी औद्योगिक वसाहतीची निर्मिती केली आहे. सन १९७२ मध्ये विद्या प्रतिष्ठान या शैक्षणिक संस्थेची स्थापना करून इंग्रजी माध्यमाची शाळा बारामतीमध्ये सुरू केली गेली. साखर कारखानदारी हा या भागातील मुख्य व्यवसाय असला तरी यापूर्वी निर्माण झालेल्या साखर कारखान्यांना ऊर्जितावस्था आणून अद्ययावत करण्याचे काम केले व उपपदार्थांची निर्मिती करून ऊसाला चांगला भाव मिळवून देण्याचे काम केले गेले आहे हे सर्व सहकारी तत्वावर.





बारामती तालुक्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली तर पवारसाहेब सन १९८८ मध्ये दुसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर मा. पवारसाहेब राज्याची जबाबदारी सांभाळीत असताना स्थानिक समन्वयाची जबाबदारी घेण्यासाठी अजितदादा पवार यांचे नेतृत्त्व तालुक्यातील जेष्ठ व युवक कार्यकर्त्यांनी पुढे आणले. बारामतीच्या विकासाला गती देण्याची जबाबदारी मा.ना. अजितदादा पवार यांच्यावर आली व तेव्हापासून ते आजपर्यंत म्हणजेच गेली २६ वर्षे ती त्यांनी समर्थपणे सांभाळली आहे. सन १९८८ मध्ये रूईच्या उजाड माळरानावर बारामती औद्योगिक वसाहतीची निर्मिती करून व्यवसाय निर्मितीने तरुण बेरोजगारांना कामाची संधी मिळाली. आधुनिक सुविधा भागात उपलब्ध करून देणे, रेल्वे रूंदीकरण, विमानतळ, त्याठिकाणी विमान चालविण्याचे प्रशिक्षक केंद्र या सुविधा झालेल्या आहेत. १०० वर्षांपासून कालबाह्य झालेल्या निरा डाव्या कालव्याचे मजबुतीकरण करून शेतीला वेळेवर पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन जिरायती भागाला वरदान ठरणाऱ्या जनाई, शिरसाई पाणी पुरवठा योजना केली आहे. उपसा जलसिंचन योजना केल्या आहेत. विद्या प्रतिष्ठान, शारदा संकुल या शैक्षणिक संस्थामधून मराठी, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, विद्यालय महाविद्यालय, आय.टी. इंजिनिअरिंग, लॉ कॉलेज, बायोटेक, शिक्षकशास्त्र,आर्किटेक्चर कॉलेज या शिक्षणाच्या सोई झाल्या. विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेत कोणत्या

एकांकिका स्पर्धा ' मध्ये भाग घेणे हे हौशी नाट्यसंस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचे मानले जात आहे ही संस्थेच्या कार्याची पावतीच आहे.



**ज्येष्ठ कलावंत सन्मान :** रंगभूमी चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्याचा गौरव करून त्यांचे ऋण व्यक्त करण्याकरिता दर वर्षी एका ज्येष्ठ कलावंताचा सन्मान संस्थेच्या वतीने केला जात असतो. या अंतर्गत स्व. राजा गोसावी, शरद तळवळकर, चंद्रकांत मांढरे, निळू फुले, ललीता पवार, वसंत कानिटकर, लीला गांधी, विठाबाई नारायणगावकर, रोषन सातारकर,



शकुंतला भूमकर, छबुताई नगरकर, जगदिश खेबूडकर, फैयाज तसेच ज्येष्ठ लावणी गायीका सुलोचनाताई चव्हाण यांचा अमृत महोत्सवी गौरव समारंभ, श्री.वसंत कानेटकर यांच्या अमृतमहोत्सवी गौरव समारंभ इ. मान्यवरांचा गौरव करण्यात आलेला आहेत.

**नाट्य संमेलन :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे ७५ वे नाट्य संमेलन १९९५ मध्ये बारामती येथे संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. नाट्य संमेलन जेष्ठ, हौशी, युवा कलावंत म्हणून ३००० प्रतिनिधी उपस्थित होते.



**प्रथम युवा नाट्य संमेलन :** बारामती येथे संस्थेच्या वतीने पहिले युवा नाट्य संमेलन १९९४ मध्ये आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात महाराष्ट्रातील ६० हौशी नाट्यसंस्थेचे ४५० प्रतिनिधी उपस्थित होते.

**विविध कार्यक्रम :** संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांकरिता, व्यक्तीमत्व विकास योजना चालविली जात असून, त्याअंतर्गत १५ ऑगस्ट



रोजी चित्रकला स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम स्पर्धा, मेंहदी स्पर्धा हस्तकला प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन, उच्चस्तरीय नाट्य शिबीर, नृत्यप्रशिक्षण शिबीर, तमाशा महोत्सव, भजन-किर्तन महोत्सव,बालनाट्य प्रशिक्षण शिबीर, बालचित्रपट महोत्सव ३४ वी राष्ट्रीय शालेय क्रिडा स्पर्धा, अपणा उत्सव, तृतिय विविध कला महोत्सव, मुखवटे नृत्य व युध्दकला महोत्सव, मणिपुरी नृत्य महोत्सव, राजस्थान विविध कला महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना प्रजासत्ताकदिन संचलन, सांस्कृतिक कार्यक्रम निवड शिबीर अखिल भारतीय पातळीवरील संयोजन व्यवस्थापन, वसंत कानेटकर नाट्य महोत्सव

इत्यादी कार्यक्रम संस्थेने आयोजित केले होते.



**मार्गदर्शन :** मा.मच्छिंद्र कांबळी,निळू फुले,विक्रम गोखले,प्रा.लक्ष्मणराव देशपांडे,रमेश चौधरी,वंदना गुप्ते,गिरीष ओक,संजय नार्वेकर,वर्षा उसगांवकर,सुकन्या कुलकर्णी,लता नार्वेकर,प्रभाकर पणशीकर,चित्तरंजन कोल्हटकर,भक्ती बर्वे यांनी संस्थेस वेळोवेळी भेट देवून मार्गदर्शन केले आहे.



**स्वस्त नाटक योजना :** बारामतीकर नाट्य रसिकांना पुणे-मुंबईची नावाजलेल्या नाट्य संस्थेची दर्जेदार नाट्य,कमी दरामध्ये बारामती येथे पहावयास मिळावी या उद्देशाने संस्थेने १९९८ मध्ये स्वस्त नाटक योजना सुरू केली .या मध्ये १३०० सभासद असल्याने हि योजना महाराष्ट्रातील एकमेव सर्वात मोठी योजना मानली जात आहे. सन १९९९ मे २००५ ही योजना कार्यरत झाली. १)घर श्रीमंतच ,२)अधांतर,३)आमच्या सारखे आम्हीच,४)ऑर्केस्ट्रा झंकार म्युझीकल नाईट,५)आणि मकरंद राजाध्यक्ष, ६)अभिनेत्री, ७)भाग्यांक,८)त्रिवेणी (शास्त्रीय उपशास्त्रीय गाण्याचा कार्यक्रम),९)अशोक साठे (एकपात्री) हे कार्यक्रम व बोनस म्हणून आर्य चाणक्य या नाट्य प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. सन२००० मध्ये १) तू तू, मी मी, २) शुभ बोले तो नारायण, ३)सरगम म्युझिकल नाईट, ४) शोभायात्रा ५) स्वभावाला औषध नाही, ६) दिपसंध्या (सहभाग सुकन्या कलकर्णी, संजय मोने, सुधीर गाडगीळ, सुरेखा पुणेकर, पदमजा फेणनी.) बोनस म्हणून, ७) मी माझ्या मुलांचा, ८) शांतेचं कार्ट चालू आहे या नाट्य प्रयोगांचे आयोजन करण्यात आले होते. सन २००१ या वर्षी योजनेत १) जाऊ बाई जोरात २)भूले बिसरे गीत ३) कुलकर्ण्यांचं स्थळ ४) आता कसं वाटतंय ५) यदा कदाचित ६) वस्त्रहरण ७) तुका म्हणे आता ही नाटके दाखविण्यात आली, २००२ ची नविन योजना झाली असून त्यामध्ये १००० सदस्य सहभागी आहेत. योजनेचा शुभारंभ १) आई रिटायर होतेय या नाटकाने झालेला आहे, नंतर २) सर आले धावून हे दुसरे नाटक दाखविण्यात आले ३) गोष्ट हसऱ्या घराची ४) कन्यादान ५) भूपाळी ते भैरवी ६) नाट्य महोत्सवाने या वर्षाची योजना पुर्ण झाली. आगपेटीतला राक्षस हे बालनाट्य तसेच प्रभात गिते हे बोनस कार्यक्रम म्हणून या योजने अंतर्गत साजर करण्यात आले.







**गणेशोत्सव कार्यक्रम :** संस्थेच्यावतीने नाटकाची निर्मिती करून गणेशोत्सव काळात त्या नाटाकांच्या प्रयोगांचे आयोजन केले जात असून संस्थेने या निधीमधून रिमांड होम बारामती, प्रियदर्शिनी मुकबधीर, मतीमंद विद्यालय या संस्थाना आर्थिक मदत केली आहे.

**बारामती गणेश फेस्टीव्हल :** सन २००२ मध्ये पहिल्या बारामती गणेश फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आले होते तेंव्हापासून दरवर्षी बारामती गणेश फेस्टीव्हलचे पारंपारीक पध्दतीने आयोजन करण्यात येत आहे.या कार्यक्रमामधून बारामतीकरांना दर्जेदार नाटके, ऑर्केस्ट्र, एकपात्री,भजन,किर्तन असे भरगच्च कार्यक्रम तसेच पाककृती स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा, कथाकथन, कविसंमेलन, व्याख्यान असे अनेक कार्यक्रम या कालावधी मध्ये पहाण्यास मिळतात.



**लावणी महोत्सव :** दरवर्षी ३०-३१ मार्च रोजी लावणी महोत्सवाचे आयोजन नटराज मंदिर बारामती येथे करण्यात येते या कार्याक्रमातून मिळणारे सर्व उत्पन्न सामाजिक संस्था कार्यासाठी उपलब्ध करून दिले जाते. लावणीमहोत्सवात पारंपारीक शास्त्रीय लावणी नृत्य केले जातत व लावणी तमाशा क्षेत्रातील एका जेष्ठ कलवंताचा सन्मान दर वर्षी केला जातो.तसेच महिला करिता स्वतंत्र कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.



**सामाजिक बांधीलकी :** राष्ट्रीय नैसर्गीक आपत्तीच्या वेळी संस्थेने मदत कार्यात वेळोवेळी सहभाग घेतला आहे. किल्लारी भुकंपग्रस्तांना आर्थिक मदत निधी भुकंपग्रस्त भागातील मुलांचे बारामती मुक्कामात सेवा कार्य केले आहे गुजरात येथे झालेल्या भुकंपग्रास्तांना मदतीकरीता 'ही श्रींची इच्छा' या नाटाकाचा प्रयोग बारामती येथे करून १ लाख रूपये मुख्यमंत्री सहाय्यता निधी करीता पाठविले आहेत. तसेच कारगील युध्द प्रसंगीही निधी जमा करून पाठविलेला आहे.



नाट्य प्रयोगाद्वारे बारामती मधील सामाजिक संस्थाना निधी उभा करण्यास मदत केलेली आहे तसेच सामाजिक कृतज्ञाता निधी लग्नाची बेडी नाट्य प्रयोग नियोजन यशवंतराव चव्हाण नाट्य संकूल मुंबई निधी करीता वस्त्रहरण नाट्य प्रयोग नियोजन व ५० हजार रूपयाच्या निधी आखिल भारतीय मराठी नाट्यपरीषदेस दिलेला आहे.

## महाराष्ट्र शासन सांस्कृतीक कार्य संचलनालय आयोजित
## राज्य नाट्य स्पर्धा नाट्य निर्मिती – पारितोषिके

| नाटक | वर्ष | पारितोषिक |
|---|---|---|
| १) रूद्रवर्षा | १९९१ | उत्तेजनार्थ पारितोषिक |
| २) माझा खेळ मांडू दे | १९९२ | अभिनय पारितोषिक – सौ कमल हावळे |
| ३) गाठ आहे माझ्याशी | १९९३ | द्वितीय क्रमांक सांघिक पारितोषिक |
| | | अभिनय रौप्य पदक – प्रदीप कोथमिरे |
| | | नेपथ्य परितोषिक – सुनिल जोगळेकर |
| ४) व्यर्थ का या जन्मवेणा | १९९४ | अभिनय रौप्य पदक – विवेक पांडकर |
| | | दिग्दर्शन पारितोषिक – प्रदीप कोथमिरे |
| | | अभिनय पारितोषिक – कु. साधना भोसले |
| ५) गुड बाय डॉक्टर | १९९५ | अभिनय पारितोषिक – प्रदीप कोथमिरे |
| ६) भिंत काचेची | १९९६ | अभिनय पारितोषिक – कु. सोनाली पासंग |
| | | नेपथ्य पारितोषिक – किरण गुजर |
| ७) मोरूची मावशी | १९९७ | अभियन परितोषिक – प्रदीप कोथमिरे |
| | | (नाट्य दर्पण मुबई आयोजित आचार्य अत्रे जन्मशताब्दी महोत्सव स्पर्धा सांघिक द्वितीय क्रमांक परितोषिक) |
| ८) आर्य चाणक्य | १९९८ | प्रथम क्रमांक सांघिक पारितोषिक |
| | | अंतिम फेरी पाचवा क्रमांक –पारितोषिक |
| | | अभिनय रौप्य पदक – प्रदीप कोथमिरे |
| | | अंतिम स्पर्धा अभिनय रौप्य पदक – प्रदिप कोथमिरे |
| | | दिग्दर्शन प्रथम क्रमांक – विवेक पांडकर |
| | | अभिनय पारितोषिक – गणेश देव |
| | | (अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुरस्काराने सन्मानित) |
| ९) मी माझ्या मुलांचा | १९९९ | प्रथम क्रमांक सांघिक पारितोषिक |
| | | अभिनय रौप्य पदक – प्रदीप कोथमिरे |
| | | दिग्दर्शनन प्रथम क्रमांक – प्रदीप कोथमिरे |
| | | अभिनय पारितोषिक – कु. अपर्णा देव |
| | | नेपथ्य पारितोषिक – प्रदीप परकाळे |
| | | अभिनय पारितोषिक – अमोद देव (अंतिम फेरीत) |
| १०) ही श्रींची इच्छा | २००० | प्रथम क्रमांक सांघिक पारितोषिक |
| | | दिग्दर्शन प्रथम क्रमांक – विवेक पांडकर |
| | | अभिनय रौप्य पदक – अमोद देव |
| | | अभिनय पारितोषिक – प्रदीप कोथमिरे |
| | | अभिनय पारितोषिक – कु. अवंती करंदीकर |

सोडण्याचे ठरविले.

इ.स. १७१३ साली रामाजीपंत व कोकणातील गोळवलीहून केशव पाध्ये व गणेश पाध्ये हे बंधू असे तिघेजण अणुस्करा घाट ओलांडून कोल्हापूरला आले व ते कोल्हापूरची राजधानी पन्हाळगड येथे वास्तव्यास गेले. पन्हाळगडावर ताराबाईने राजधानी वसविल्यापासून देशावरील व कोकणातील शेकडो गुणी लोक पन्हाळगडावर आले. अशाच वेळी पराडकर व पाध्ये आपल्या गुणांचा प्रकाश पाडण्यासाठी कोकणातील आपली गावे सोडून तेथे आले. पन्हाळगडी आल्यावर १७१८ साली रामाजीपंताचा विवाह किर्लोस्कर घराण्यातील एका मुलीशी झाला. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मी ठेवण्यात आले.

पन्हाळगडावर आल्यावर पराडकर व पाध्ये यांनी शेजारी शेजारी घरे बांधली दोन्ही घरात समाईक भिंत होती. घराच्या वळचणी एकमेकाला लागून होत्या. आताच्या भाषेत ते ट्वीन ब्लॉक्स होते. दोन्ही घरांचा घरोबा व आपुलकीचे संबंध होते. पराडकरांच्या घरात एखादा नवीन खाण्याचा पदार्थ केला की तो पाध्येकाकूंच्याकडे हमखास जाई. पाध्यांच्याकडे चांगली भाजी झाली की ती पराडकरांच्या घरात लगेच येई. पाध्ये बंधू व रामाजीपंत रोज संध्याकाळी शिळोप्याच्या गप्पा मारत बसत. कधी धर्मग्रंथावर चर्चा करीत. रामाजीपंत उभयंता गणपतीभक्त होते. दोघेही चतुर्थीचे व्रत मोठ्या निष्ठेने आचरीत होते. त्यांना १७२९ साली मुलगा झाला. गणपतीच्या प्रसादाने मुलगा झाला म्हणून त्याचे नाव मयूर असे ठेवण्यात आले.

मोरोपंताची ही जन्मभूमी म्हणजे पन्हाळगड अत्यंत रमणीय आहे. येथील हवा आरोग्यदायक व पाणी स्वच्छ व पाचक आहे. जागोजागी तुटलेले मोठे खडक व खडकात खोदलेल्या गुहा व लेणी आहेत. गडावर अनेक तलाव निसर्गरम्य झरे आहेत. सर्वात उत्कृष्ट झ-याचे नाव नागझरी आहे. नागझरीच्या पोटात अतिरम्य गुहा आहे तिला पराशर ऋषींची गुहा म्हणतात. म्हणून पन्हाळगडास पराशरक्षेत्र असेही नाव आहे. गडावर नाना प्रकारचे वृक्ष आहेत. वसंत ऋतूत तर गडावरील वातावरण अत्यंत आल्हाददायी असते. असे निसर्गरम्य स्थळ मोरोपंतासारख्या कवीस पूर्वायुष्यात लाभले, हे मोठेच भाग्य.

रामाजीपंत मोरूला रूपावली, समासचक्र, रामरक्षा, विष्णुसहस्त्रनाम व लिहीणे- वाचणे शिकवीत. याशिवाय सौंदळचे उपाध्याय हरिभट वरेकर यांनीही त्यांना काही काळ शिकविले. त्यांनीच त्याचा उपनयन विधी केला. पाध्ये बंधू फार विद्वान होते. मोहोराने लवलेल्या आम्रवृक्षाकडे ज्याप्रमाणे भ्रमराच्या झुंडीच झुंडी लोटाव्यात त्याप्रमाणे देशावरील व कोकणातील लोक पाध्यांच्याकडे शिकण्यास येत. शेकडो विदयार्थी त्यांच्याकडे संथा घेत असत. मोरू लांबून हे सर्व पहात असे. वयाच्या बाराव्या वर्षी मोरू पाध्यांच्याकडे जेवणास गेला असता पाध्यांनी मोरूने लिहीलेला श्लोक पाहिला व त्याची अलौकिक बुध्दिमत्ता पाहून त्याला आपल्याकडे अध्ययनास ठेवून घेतले. रामाजीपंतानीही त्यास आनंदाने मान्यता दिली.

याप्रमाणे मोरूने पाध्यांच्याकडे अध्ययनास सुरवात केली. दोघेही पाध्ये बंधू मोरूला शिकवत. पाध्यांचे चिरंजीव आणि मोरू यांची चांगलीच मैत्री जमली होती. विशेषतः सदाशिव पाध्ये हा मोरोपंताच्या समवयस्क असून अत्यंत सलगीचा सोबती होता. या दोघांनीही गडावर बारा वर्षे परस्परांच्या सहवासात, अध्ययनात व काव्यानंदात घालविली. ते एकत्र संध्या करीत, गडावर फिरत, संस्कृत सुभाषितांचा अर्थ एकमेकांना सांगत. काळी वेळा पराशर गुहेत जावून काव्याचा अभ्यास करीत. विदयेची आवड, नम्र स्वभाव, श्रमसातत्य, व आज्ञाधारकपणा यामुळे मोरू गुरूंचा अत्यंत आवडता झाला. मोरूचा स्वभाव शांत व मनमिळावू असल्याने तो सर्वांना हवाहवासा वाटे. तो फार बोलत नसे किंवा दुस-याच्या कुचाळक्या करीत नसे.

पाध्यांच्यासारखे गुरू व मोरोबासारखे उत्तम शिष्य असा समसमा संयोग झाला. उत्तम भूमीत उत्तम बीज पेरल्यावर उत्तम पीक येणारच. मोरोबांनी निरनिराळ्या ग्रंथाचा, महाकाव्ये साहित्यशास्त्र यांचा बारा वर्षेगुरूंच्याकडे सखोल अभ्यास केला. पंताच्या मनात गुरुविषयी नितांत आदर होता. पंताच्या विचारांना, आचारंना व आयुष्याला गुरूंनी ग्रंथाद्वारे व स्वतःच्या आचारविचाराने उदात्त वळण लावले, आणि हेच खरे शिक्षण होय. पाध्ये बंधूनी पन्हाळगडावर शेकडो शिष्य तयार केले. परंतु पंताच्यासारखा एकच शिष्य त्याच्या श्रमाचे चीज करून त्यांची किर्ती पसरविण्यास कारणीभूत झाला.

वयाच्या बाराव्या वर्षी मोरोबा पाध्यांच्याकडे अध्ययनास येवू लागले व यानंतर रामाजीपंताना लवकरच पन्हाळा सोडावा लागला. तशीच एक अद्‌भूत घटना त्यास कारणीभूत झाली. रामजीपंत गडावर नोकरीस होते. त्यांच्या हाताखाली एक मोतद्दार होता. मोतद्दाराचे हातून एक क्षुल्लक चूक झाली. एवढी मनावर घेण्यासारखीही ती नव्हती. परंतू रामाजींपंताचा स्वभाव तापट होता. त्यांना क्रोध अनावर झाला. त्यांनी एक ढब्बू पैसा घेतला. तो तापविला व त्याने त्या मोतद्दारास डाग दिला. चर्र आवाज झाला. तो कळवळून ओरडू लागला. त्याच्या कातडीवर लाल डाग दिसू लागला. लगेच शेजारचे सेवक धावत आले. त्यांना झालेली गोष्ट समजली. तो रामाजीपंताना म्हणाला, ''चूक ती काय, आणि त्यासाठी केवढी अघोर शिक्षा केलीत! अशा शिक्षा आपण करावयाच्या नसतात. प्रत्यक्ष सरकारने अशी शिक्षा केली तर ती केवळ एक वेळ क्षम्य होईल. जिजाबाई कर्दनकाळ आहेत. त्या रागावल्यास तुम्हाला जड जाईल. नोकरी तर जाईलच कदाचित शिक्षाही होईल'' रामाजीपंत घाबरले व मित्राच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी पन्हाळा सोडण्याचे ठरविले. सर्वांचा निरोप घेवून आपले कोकणातील मित्र बाबूजी नाईक यांच्याकडे बारामतीस आले.

बाबूजी नाईक लक्षाधीश सावकार होते. ते पेशव्यांचे व्याही होते. पेशवाईसाठी खटपट करणारे चळवळे गृहस्थ होते. रामाजीपंतानी बाबूजी नाईकांची गाठ घेतली. बाबूजी म्हणाले, ''अरे, रामाजी, किती दिवसांनी भेट होते आहे आपली. आज अचानक कसा काय आलास? तुम्ही गडावरची माणसे, आमचेकडे कसे काय आलात?'' रामाजीपंताचा चेहरा चिंताक्रात झाला. त्यांनी घडलेली सर्व हकीकत सांगितली. बाबूजी म्हणाले, ''माझ्यासारखा एवढा मित्र तुझ्या

चव्हाण बंधू, देशमुख देशपांडे पाटील असे अनेक जातीचे, पेशाचे व अधिकाराचे पुरुष डाव्या बाजूच्या दालनात बसत बाबूजींची भार्या कमलाबाई मोठया अदबीने येवून बसे. त्यांचे शेजारी पंताची भार्या रमा, पंताची स्त्रीगीते पाठ असलेल्या नाईकांच्या मुली व सुना बसलेल्या असत. त्यांच्या सभोवार शेकडो स्त्रियांनी गर्दी केलेली असे.

रामायणासारखे मनोहर, उदात्त, व पवित्र काव्य, महाभारतासारखा सर्वांगसुंदर इतिहास व भागवतासारखा भक्तिरसपुर्ण धर्मग्रंथ सा–या त्रिभुवनात सापडणार नाही. या तिन्ही ग्रंथावर पंताचे असामान्य प्रभुत्व होते. यातील भगवद्भक्तीच्या वीरश्रीच्या मुत्सद्देगिरीच्या व नितीच्या प्रेम, बोधप्रद कथावर पंत पुराण सांगत व विविध रसांचा भाव श्रोत्यांच्या चेह–यावर स्पष्ट उमटलेले दिसत. पंताचे संस्कृत अध्ययन उत्कृष्ट होते. ते फार चतुर, समयसुचक, मार्मिक, मितभाषी पण मुद्देशीर भाषण करीत त्यामुळे त्यांच्या किर्तनपुराणास रंग येवून श्रोत्यांची अतिशय गर्दी होई व श्रोते भक्तीसुखसमुद्रात तल्लीन होत. पंताची शांत व प्रेमळ मुर्ती श्रोतृवृंदाच्या हृदयात प्रेमरसाचे कल्लोळ उत्पन्न करी.

अशा त–हेने चार्तुमासात बाबूजींच्या वाडयात रोज पुराण चाले. बाबुजींचा व पंताचा सहवास पंचवीस ते तीस वर्षेहोता. दोघांचे एकमेकांवर अतिशय प्रेम होते. पंताच्या मनात यजमानाविषयी निर्मळ प्रेम होते व त्यांच्या घराण्यातील लोकाविषयी त्यांना कळकळ वाटत असे. एका संस्कृत पोथीच्या शेवटी त्यांनी 'यजमानस्य कल्याणमस्तु' अशी अक्षरे लिहीली आहेत. यावरुन याची प्रचिती येते.

बाबूजी व त्यांचे कनिष्ठ पुत्र पांडूरंगराव हे दोघेही रसिक होते. पंताच्या गुणावर ते अतिशय लुब्ध होते. पंताच्या आर्या पाहून त्यांना अभिमान व आनंद वाटे. बाबूजी युध्दकार्यात विशेष निपुण असल्याने त्यांना पंताचे भारत विशेष आवडे. बाबूजींच्या मृत्यूनंतर बारामतीचे ऐश्वर्य कमी झाले. त्यांच्या पुत्रात वाटण्या झाल्या त्यामुळे नाईकांचे वैभवही कमी झाले. परंतू पंताचा ओढा पहिल्यापासून पांडुरंगरायाकडेच होता. पताचे पांडूरंगरायावरइतके शुध्द प्रेम होते की, अहिल्याबाई व बाजीराव पेशवे हे त्यांना आपल्या आश्रयास जादा पगार देवून बोलावित होते परंतू पंतानी शेवटपर्यंत पांडुरंगरायांचा आश्रय सोडला नाही.

यासंबंधी घडलेली कथा फार बोधप्रद आहे. पेशवे होण्यापुर्वी दुसरे बाजीराव एकदा भाउबिजेसाठी बारामतीस आले होते. त्यांची बहिण दुर्गाबाई पांडूरंगरावाना दिली होती. दुर्गाबाईंनी आपल्या बंधूना अभ्यंगस्थान घातले. मोठया थाटाने भाउबिजेची ओवाळणी झाली. नंतर सर्व आश्रितांसह सुग्रास भोजन झाले. तांबुलभक्षणानंतर सर्वजण दिवाणखान्यात येवून बसले. दिवाणखान्यात लोडाला टेकून पांडूरंगराव व बाजीराव बसले उजव्या बाजूस मोरोपंत बसले डावीकडे वयोवृध्द कारभारी होते व पुढे आपापल्या मानाप्रमाणे सर्वजण बसले.

पांडूरंगरावांनी सर्वांची ओळख करून दिली व त्यात पंताची विशेष तारीफ केली. पांडुरंगराव मोठया पूज्य भावाने म्हणाले ''मोरोपंत हा बारामतीचा अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या जिभेवर जणू सरस्वतीच वास करीत आहे. त्यामुळे आम्हा सर्वांना स्वर्गसुखाचा लाभ होत आहे हे ऐकताच बाजीराव आढयतेने म्हणाले, 'तुमच्या पदरी असले रत्न असणे हे तुम्हाला मोठे भूषणावह आहे' यावर पांडूरंगराव विनम्रपणे म्हणाले, 'छे, असे नव्हे ते आमच्या पदरी नाहीत आम्हीच त्यांच्या आश्रयाने राहत आहोत. यानंतर बाजीराव पंतना म्हणाले, 'पंत तुमची स्तुती ऐकून आम्हास आनंद झाला तुम्ही आमच्या आश्रयास यावे असे आम्हास वाटते तुम्हास वेतन वाढवून देवू. सर्व सुखसोयी तुम्हास मिळतील भविष्यकाळात कदाचित राजाश्रयही मिळेल तुमचा मानमरातब वाढेल यासाठी जरूर तुमच्या यजमानांची संमती घेवू ते नाही म्हणणार नाहीत.' मोरोपंत म्हणाले ' नको धन, नको मान। नको मोतियांचे हार । पांडूरंग राया देई । प्रेमाचा आधार ।।

यजमानांचा आणि आमचा ऋणानुबंध फार जुना आहे. हे आपणास माहीत आहेच. बाबूजींपासून आमचा सहवास आहे. पांडूरंगराव हे आमच्या अंगाखांदयावर खेळले आहेत. आमच्या यजमानांस आमचा कंटाळा आल्यास ते आम्हाला दुसरीकडे जाण्यास सांगतील.

बाजीराव : यजमानांचे अन्न खावून जीभ फार जड झालेली दिसते.

मोरोपंत : दुसरे घरटे सुबक असले तरी पक्षी आपले घरटे सोडत नाही. नाईकांचा आश्रय आम्हाला सोडवणार नाही.

बाजीराव : नाईकांनी हाकलून दिल्यावर ?

मोरोपंत : प्रभू इच्छा, त्यांनी जा म्हटल्यावर ईश्वर वाट दाखवील तिकडे जावू

बाजीराव : आश्रितांना एवढा तोरा असेल याची कल्पना नव्हती.

मोरोपंत : हा तोरा आश्रितांचा नाही, त्यांच्या सरस्वतीचा आहे क्षमा असावी.

बाजीराव (रागाने) : पाहून घेईन

यापुढे पेशयांच्या वाडयात कीर्तनात आर्या म्हणण्यास बंदी घालण्याता आली कालांतराने ती उठवण्यात आली हे वेगळे.

अशात–हेने मोरोपंत आपला काल पांडूरंगरावाकडे मोठया सुखाने व समाधानाने घालवीत होते. तनुनिर्वाहापुरता संग धरून निरीच्छ वृत्तीने धर्माचरणात व भगवद्भक्तीत काळ कंठणारे ते साधुपरुष होते. मानसन्मान, द्रव्य किंवा व्यावहारिक लाभ याची त्यांना आसक्ती नव्हती यजमानांच्या आश्रयामुळे व

प्रेमामुळे त्यांच्या लेखनकार्यास बहर आला होता मोरोपंताचे समकालीन मित्र श्री. राम बडवे यांनी त्यांच्या काव्यावर खालील मार्मिक अभिप्राय दिला आहे.

सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिध्द तुकयाची ।
ओवी ज्ञानेशाची तैसी आर्या मयूरपंताची ।

रसिकतेच्या दृष्टीने, भाषादृष्टीने व भक्ती दृष्टीने योग्य असाच हा अभिप्राय म्हणावा लागेल.

मोरोपंताचे मित्रमंडळ फार मोठे होते. सात्विक व विदयाव्यासंगी कवींचाच त्यात विशेषकरून भरणा होता. सर्व महाराष्ट्रात त्यांचे आर्याभक्त उत्पन्न झाले होते. पंताच्या मित्रमंडळीत रामजोशींचा विशेष उल्लेख केला पाहिजे. राम जोशींची बुध्दी लोकोत्तर व वाणी रसाळ होती. त्यांची काव्यसंपदा विपुल होती. या सर्व गुणांमुळेच त्यांना असामान्य लोकप्रियता लाभली होती. रामजोशींनी तिशी उलटण्याच्या आतच मोरोपंताकडून 'कविप्रवर' ही पदवी मिळविली होती व आपल्या भेटीचा मोरोपंताना चटका लावला होता ही गोष्ट सामान्य नाही.

मोरोपंत पंढरीस विठोबाच्या दर्शनास नेहमी जात तेथे त्यांचे मित्र बाबा पाध्येही होते. याशिवाय पाध्यांची मुलगी पंताच्या मुलाला दिली होती. त्यामुळे नात्याचे संबंधही जोडले होते. नेहमीप्रमाणे मोरोपंत एकदा पंढरीला गेले होते. योगायोगाने त्या दिवशी चंद्रभागेच्या वाळवंटात रामजोशींचा तमाशा होता. हजारो भाविक मोठया उत्सुकतनेने गर्दी करून बसले होते सारा वाळवंट प्रेक्षकांनी फुलून गेला होता. तसूभरही जागा शिल्लक नव्हती. पंत पंढरपूरला आल्याचे रामजोशींना समजे त्यांनी त्यास मुद्दाम बोलावणे पाठविले परंतू तमासगिराचे व नटाचे तोंड पाहणे शास्त्रसंमत नसल्याने त्यांनी येण्याचे नाकारले. नंतर रामजोशींनी स्वतः जावून त्यांना येण्याचा आग्रह केला तेव्हा त्यांनी येण्यास नाईलाजाने संमती दिली

जोशीबुवांना येण्यास उशीर झाला त्यामुळे वाळवंटातील प्रेक्षकवर्गात चुळबूळ सुरू झाली. रामजोशींची शृंगाररसपूर्ण लावणी ऐकण्यास त्यांचे कान अधीर झाले होते त्यांच्या वाटेकडे सर्वांचेच डोळे लागले होते. अखेर जोशीबुवा मोरोपंतासह वाळवंटात आले या उभयतांना पाहताच प्रेक्षकांनी टाळयांचा कडकडाट केला जोशीबुवा आपल्या नियोजीत जागी स्थानापन्न झाले. मोरोपंत थोडया अंतरावर पण त्यांच्याकडे पाठ फिरवून बसले. पंताचा आपल्या विषयीचा दूषित ग्रह काढून टाकण्याकरीता जोशीबुवांनी मुद्दाम हा प्रसंग घडूवन आणला होता

नेहमीच्या ऐटबाज पोशाखात जोशीबुवा मोठया थाटात उभे राहिले. सा–या प्रेक्षकांकडे एकवार नजर फिरवली. डफावर थाप मारूनर त्यांनी एक तान घेतली. वाळवंटात स्तब्धता पसरली. गणगवळण झाली व ख–या अर्थाने तमाशास सुरवात झाली पंताच्या उपस्थितीमुळे जोशीबुवांच्या प्रतिभेस आज जणू उधाण आले होते. त्यांनी वैराग्यपर लावण्या म्हणून श्रोत्यांना तल्लीन करून सोडले ते आर्येचे महत्व वर्णन करून सांगत होते जसे कातावाचून पान रंगत नाही, भार्यवाचून संसारात रंगत नाही त्याप्रमाणे आर्येवाचून किर्तनास रंगत नाही. सारे निरूपन ऐकून मोरोपंत संतुष्ट झाले व रामजोशींची पाठ थोपटून त्यांना म्हणाले, 'तुमची ही अमृतवाणी विषयकर्दमात का खर्चता? परमार्थाचा मार्ग वेचाल तर तुमचे व लोकांचेही कल्याण होईल तुम्ही कीर्तन का करीत नाही? जोशीबुवा म्हणाले, 'माझी कीर्तन करण्याइतकी तयारी नाही, पंत यावर उद्गारले, 'आहे ही तयारी काही कमी नाही तुमची विद्वत्ता व वक्तृत्व असामान्य आहे मी आर्या करतो तो कशासाठी कोणासाठी? तुमच्या सारख्यांना कीर्तनात उपयोगी पडाव्यात म्हणून तर हा उदयोग चालविला आहे'' जोशीबुवांना हा उपदेश पटला. त्यांनी लगेच डफ फोडून विणा हातात घेतला व तमासगीरांचा हरदास झाला. पंताना अतीव आनंद झाला त्यांनी लगेच जोशीबुवांच्या गळयात माळ घातली. हे दृश्य पाहून पंढरीचा पांडूरंग सुध्दा मनातून खदखदून असला असेल. पंतानी जोशी बुवांना कीर्तनाचे पहिले आमंत्रण दिले. जोशीबुवांनी बारामतीस कीर्तनास येण्याचे मान्य केले.

रामजोशी व पंत यांचा स्नेह होताच. परंतू रामजोशी कीर्तन करू लागल्यानंतर त्यांच्या स्नेहात विशेष भर पडली. जोशीबुवांनी पंताच्या आर्यांचा व्यासंग खूपच वाढविला. एके दिवशी जोशीबुवांच्या कीर्तनप्रसंगी पंत हजर होते. जोशीबुवा विनोदी व धीट होते. पंताच्या भारतातील एका आख्यानावर त्यांचे कीर्तन चालले होते. त्यांनी एका आर्येचा कथानकपर आणि वेदान्तपर असे दोन अर्थ सांगितले व चटकन पंताच्या उदराकडे बोट करीत मिस्कीलपणे म्हणाले, माझ्या अल्पमतीस सुचलेले दोन अर्थ मी सांगितले. पण या विशाल उदरात आणखी किती अर्थ सामावले आहेत त्यांचे त्यांनाच ठाउक' याप्रमाणे पंताच्या विशाल बुध्दीची तारीफ करीत करीत पंताच्या मोठया पोटावरही त्यांचा रोख होता.

याप्रमाणे पंताचे व जोशीबुवांचे एकमेकाकडे जाणे येणे वाढले. एकदा पंत निरोष्ठ रामायण रचत होते. ओठाला ओठ न लागता (म्हणजे प,फ,ब,भ,म ही अक्षरे) रामायण रचण्याच्या त्या दिवशी त्यांनी बेत केला होता. जोशीबुवांनी सहज आपल्या कारकूनास पंत आतल्या खोलीत काय करीत आहेत ते मुकाटयाने पाहून येण्यास सांगितले. कारकून पंताच्या दाराशी आला. त्याला पाहताच पंतानी खोलीतून उत्तर दिले 'मी रघुनाथ चरित लिहीत आहे' कारकुनाने ते जोशीबुवांना सांगितले रोजचा राम हा शब्द सोडून रघुनाथ हा शब्द का वापरला याचा जोशीबुवा विचार करू लागले. चतुर रामजोशींच्या एकदम लक्षात आले की प वर्ग गाळून पंत रामायण रचित असावेत. पंत त्यावेळी अनेक रामायणे रचित होते त्यातील बहुतेक जोशीबुवांनी पाहिली होती रघुनाथ व राम हे शब्दातील वर्णाचा विचार करता 'म' हे 'प' वर्गातील अक्षर गाळण्याकरीता पंतानी रघुनाथ हा शब्द वापरला असला पाहिजे. असा या चतुर पुरूषाने तर्क बांधला. दुस–या दिवशी ते पंताच्या भेटीला गेले आणि म्हणाले 'पंत काढा बघू तुमचे निरोष्ठ रामायण बाहेर' पंताना जोशीबुवांच्या कल्पकतेची धन्य वाटली. आता पंताना बारामतीस येवून प्रदीर्घ काळ लोटला होता या काळात बाबूजी नाईक व त्यानंतरचे पुत्र पांडूरंगराव यासारखे थोर आश्रयदाते त्यांना लाभले होते.

एका यजमानाच्या सनिध्यात राहिल्यामुळे त्यांना विदयाव्यासंग करता आला व भगवद्भक्ती करून शांतपणे जीवन व्यतीत करता आले. तसेच राम जोशी, बाबा पाध्ये, विठोबादादा चातुर्मासे व राम वडणे यासारखे विद्वान व्यासंगी, व प्रतिभासंपन्न असे त्यांचे मित्रमंडळ होते. रमाबाईसारखी सोज्वळ पत्नी त्यांना लाभली होती. पंताचे रमाबाईशी वागणे फार प्रेमाचे व आदराचे असे. तिचा शब्द ते कधीच मोडत नसत व तीही साध्वी फार सुशील व सगुणवती होती. पंताच्या घरी येणा–या जाणा–यांचा फारच राबता होता. तरी सुध्दा गृहकृत्याचा भार ती सदासर्वकाळ आनंदाने वाहत होती. पंतानी रमाबाईच्या भलेपणाची स्तुती विष्णूपदवकिलीत केली आहे

मी जरी अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली रमा आर्या ।<br>
इतें सद्वति दे तू हे करी प्रथम बोध या कार्याचि ।।

पंताना तीन पुत्र व तीन कन्या होत्या. पंताना मुलाबाळांविषयी फार प्रेम होते ते आपली व आपल्या भावांची मुले लडिवाळपणे खेळवीत. पंताचे घर जणू गोकूळ होते त्यामुळे त्यांच्या कवितेत वात्सल्यरस फारच बहारीचा उतरला आहे. पंताची सारी स्तोत्रे वात्सल्यरसाने भरली आहेत. पंत कर्मनिष्ठ होते परंतू देवपुजेच्या प्रसंगी मुगा ओवळयोन येवून शिवला तर त्याचेवर ते कधीच रागवत नसत. कोमल फूल व प्रेमळ मुल यांच्या केवळ दर्शनाने ज्याचे मन प्रसन्न होत नाही असा प्राणी जगतात सापडणे विरळा. मोरोपंत तर गृहस्थाश्रमी होते. त्यांचे हृदय न द्रवले तरच नवल! शेजा–यापाजा–याच्या मुली सुना आपण अभंगवृत्तात रचून दिलेली गीते झोपाळयार बसून मोठया हौसेने म्हणतात हे पाहून पंताना फार आनंद होत असे.

पंताचा स्वभाव प्रेमळ आणि सत्वशील वृत्ती निःस्पृह आणि मानी, आणि चारित्र्य उदात्त कथोर होते. प्रपंचात अनासक्त राहून आसक्ताप्रमाणे व्यवहार करणारे ते आदर्श गृहस्थाश्रमी होते. अशा त–हेने पंताचा गृहस्थाश्रम सुखाने चालला होता. त्यातून पंत मुळातच विदयाव्यासंगी व कुशाग्र बुध्दीचे होते. ग्रंथसंग्रह व ग्रंथ वाचनाची त्याची आवड जबरदस्त होती. त्यामुळे त्यांच्या प्रतिभेस चांगलीच पालवी फुटली. त्यामुळे या काळात त्यांनी विस्तृत लेखन केले आहे. त्यांना यजमानांच्या घरी रामायणादि मोठे ग्रंथ वाचावयास मिळत होते. कित्येकवेळा त्यांनी मोठमोठे ग्रंथ आणवून स्वतः पाठीचा कणा वाकेतो रात्रंदिवस जागून लिहून घेतले आहेत. ग्रंथ संपादन करून तो लिहून घेणे हे त्याकाळी श्रमाचे व खर्चाचे काम होते. अलीकडे छपाईच्या युगात याची कल्पना येणार नाही पंताची ग्रंथसंग्रह करण्याची आवड व जलद लिहीण्याची त–हा यांसंबधी घडलेली हकीकत मोठी मनोरंजक आहे.

कोल्हापूरला एक गृहस्थ होते त्यांना आपल्या ग्रंथाचा वियोग अजिबात सहन होत नव्हते. त्यांचेजवळ भारतचंपू नावाचा ग्रंथ आहे हे पंताना कळाले तो गृहस्थ आपला ग्रंथ कोणासही देत नव्हता व पंताना तर तो ग्रंथ वाचण्यची अनिवार्य इच्छा होती. तेव्हा पंतानी खालील युक्ती योजिली. लिहीण्याचे सर्व साहित्य घेवून एका स्रेहयाबरोबर पंत त्यांचे घरी गेले तो स्वही ओसरीवर त्या गृहस्थाजवळ बसला व सावकाशपणे ग्रंथ वाचू लागला पंत शेजारच्या खोलीत कागद, दौत, लेखणी घेवून बसले त्यांचे स्नेही ठरल्याप्रमाणे स्पष्ट व सावकाश वाचीत व पंत खोलीतून ऐकून भराभरा लिहून घेत होते याप्रमाणे पंतानी तो सर्व ग्रंथ अतिजलद लिहून पूर्ण केला व दुस–या दिवशी आपला भारतचंपू मालकापुढे ठेवला. त्यांना पंताची जिद्द, आस्था जलद लिहीण्याची त–हा व चातुर्य यांचे मोठे कौतुक वाटे. त्यांनी पंताची पाठ थोपटून आनंद व्यक्त केला पंत काव्य रचना फार जलद करीत एका बैठकीला १००–१५० आर्या सहज लिहीत. दररोज रात्री धुळीची पाटी, संस्कृत पोथी व समीप समई एवढी तयारी चाकराने करून ठेवावी. नित्यकर्म आटोपल्यानंतर पंत पाटीभरून लिहून झोपत. दुसरे दिवशी पाटीवरील गंथाची प्रत लक्ष्मणभट वाईकर करून ठेवी असा नित्यक्रम होता. पंतानी वैद्यकाचा अभ्यास सुश्रुतादि ग्रंथावरून चांगला केला असून ते कधी कधी औषधोपचारही करीत. त्या संबंधी त्यांच्या आर्या उपलब्ध आहेत. पंत अखंड लेखन करीत त्यांचा लेखन व्यासंग जबरदस्त होता. एकेक दौतीतील शाई संपेपर्यंत ते लिहीत असत दोन्ही हातांनी ते लिहू शकत उजवा हात दमला म्हणजे ते डाव्या हाताने लिहीत. त्यामुळे त्यांच्या हस्ताक्षरात काही ठिकाणी फरक आढळून येतो. काहींच्या मते ते लिहून दमल्यानंतर थोडा वेळ विश्रांती घेत व स्वतः किंवा दुस–याकडून लिहून घेत त्यामुळे हस्ताक्षरात फरक पडत असावा. काहीही असले तरी त्यांचे लेखन जबरदस्त होते हे दिसून येते.

लेखन,वाचन व उच्चार ही शिक्षणाची तीन प्रमुख अंगे आहेत या तीनही अंगात मोरोपंत परिपूर्ण होते. व्याकरणशुध्दतेकडे त्यांच्याइतके लक्ष महाराष्ट्रकवीत कोणाचेही आढळत नाही. प्रास, यमक, रूपक उत्प्रेक्षा इत्यादी अर्थालंकार त्याच्या काव्यात विपूल आहेत. त्यांच्या कवितेत संस्कृत शब्दांचा भरणा जास्त आहे. काही ठिकाणी रचनाही थेडी कठीण आहे. पंतांनी यांची पूर्ण कल्पना आहे हे खालील आर्येवरून स्पष्ट होते.

गीर्वाणशब्द पुष्कळ जनपदभाषाचि देखता थोडी ।<br>
यास्तव गुणज्ञ लोकीं याची घ्यावी हळूहळू गोडी।।

पंत शरीराने स्थूल, वर्णाने गोरे, वृत्तीने शांत व संयमी होते. त्यांचा स्वभाव फार उदार व प्रेमळ होता. विनय हा तर त्याचां स्थायीभाव होता. पंतांना डावा पंजा हलविण्याची चमत्कारिक खोड होती. पंत लिहीत बसले की त्यांचा पंजा नेहमी हाले. एकदा एक दूरचा गृहस्थ रामजोशीबरोबर पंताच्या भेटीस आला होता. त्यास पंताचा हलणारा हात पाहून हसू आले. त्याने जोशीबुवास विचारले, 'यांच हा हात असा का हलतो? जोशीबुवांनी समयसूचक उत्तर दिले की, पंत काव्यरचना करू लागले की, त्यांच्यापुढे यमकांची गर्दी होते, प्रत्येक यमक मी येतो माझी सोय करा' असे विनवीत असते. प्रत्येक यमकाला 'तू ये, तू नको' असे सांगण्याचा कामावर डाव्या हाताची नेमणूक केली आहे. जोशीबुवांचे समयसूचक उत्तर त्या गृहस्थास पटले व त्याचे समाधान झाले.

पंतांच्या कविता सुमारे पाउण लाख आहेत. पंत बारामतीस आल्यावर त्यांनी सीतागीत, सावित्रीगीत व रूक्मिणीगीत ही काव्ये नाईकांच्या मुलींना, सुनांना रचून दिली. अत्यंत सोपी रसाळ अशी ही गीते आहेत. त्यामुळे मुली झोपाळयावर बसून ही गीते म्हणत. त्यामुळेच बाबूजी नाईकांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. व ते नाईकांचे पुराणिक झाले. यानंतर ब्रम्होत्तर खंड, कुशवचरित, मदालसाख्यान, हरिश्चद्राख्यान इत्यादी काव्ये त्यांनी रचली. त्यातील कुशलवचरित हा पहिला मोठा ग्रंथ असून तो सुमारे ५०० श्लोकांचा आहे. त्यानंतर पुढील काळात मंत्ररामायण, कृष्णविजय, संशयरत्नावली, आर्यकिकावली व देव संत, तीर्थक्षेत्रे यावरील बहुतेक स्तोत्रे. रचिली. यातील मंत्ररामायण हा सर्वात मोठा ग्रंथ असून तो सुमारे दोन हजार आर्यांचा आहे. पंताचा तिसरा मोठा ग्रंथ म्हणजे कृष्णविजय होय.

यानंतर महाभारतरचनेस पंतानी सुरवात केली. स्तोत्रात जशी केकावली, लघुकाव्यात जसे कुशलवचरित, रामायणात जसे मंत्ररामायण तसे महाकाव्यात महाभारत हा उत्कृष्ट ग्रंथ आहे. हा ग्रंथ जसा आकाराने मोठा तसा योग्यतेनेही मोठा आहे. यात पंताची प्रतिभा पूर्णत्वाने विकास पावली आहे. मूळ भारतात एक लक्ष श्लोक आहेत. परंतू पंतानी अगांतूक कथा गाळून किंवा संक्षेपात आणून आपले भारत रचिले. त्यात सुमारे सतरा हजार आर्या आहेत. मोरोपंती महाभारतात वीर रसाला प्रचंड भरती आली आहे. पंतांची खरी प्रसिध्दी या ग्रंथामुळेच झाली. मोरोपंती भारत रचनाकाळीच लोकप्रिय झाले.

यानंतर पंतांनी मंत्रभागवत लिहून पूर्ण केले. पंतांनी सर्व भागवत सुमारे ३६०० आर्यात आणले. यामध्ये 'नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र साधला आहे. यातील पहिले नउ स्कंध थोडक्यात आहेत. परंतु दशम स्कंध विस्ताराने लिहीला आहे. भागवताचा गाभा म्हणजे दशम स्कंधच होय. पंताच्या वाणीच्या माधुरीचा उत्कर्ष येथेच झाला आहे. एकादश स्कंध केवळ वेदान्त, भक्तिपर आहे. यानंतर पांडूरंग नाईक यांचे सांगणेवरून व नाईकांच्या मुलांत वाटणीचे तंटे चालले असण्याच्या काळात पंतानी घाईघाईने हरिवंश लिहीला व रामायणे लिहीण्यास सुरवात केली.

ही रामायणे १०८ आहेत, अशी पंताच्या वेळेपासून सर्वांची समजूत आहे. तारांगणात जसा सुर्य, नक्षत्रात जसा चंद्र, पुष्पात जसे कमळ, वृक्षात जसा कल्पवृक्ष, तसे काव्यात रामायण होय. राजनीति व धर्मनीति यांची ती खाणच होय. मंत्र रामायणात 'श्रीराम जयराम जयजयराम' हा तेरा अक्षरी मंत्र पहिल्या कांडात पहिल्या अक्षरात दुस-या कांडात दुस-या अक्षरात याप्रमाणे सातव्या कांडापर्यंत चढत्या अक्षरात साधला आहे. निरोष्ठ रामायण हे प,फ,ब,भ,म, हे वर्ण गाळून लिहीले आहे. त्यामुळे हे रामायण वाचताना ओठाला ओठ लागत नाहीत. अशा त-हेने प्रत्येक रामायणात काही ना काही निराळी खुबी आहे. निराळे वैशिष्टय आहे प्रत्येकाची निराळी व अनुपम गोडी आहे. ती प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय कळणार नाही.

'वेडेवाकुडे गाईन परि मी तुझा म्हणवीन' अशी सद्भक्ताची शुध्द भावना असते. साध्या भक्तीभावाने तो प्रभूला आळवून संतुष्ट करून घेत असतो. तथापि एखादया गायनकुशल भक्ताने हाती वीणा घेवून प्रभूला आळविण्यासाठी मधुर आलाप काढले तर, त्याच्या भक्तीत कमीपणा मानण्याचे काहीच कारण नाही. त्याचप्रमाणे पंतासारख्या महापंडीताने आपल्या पांडित्याचा पुर्ण उपयोग प्रभूयश गाण्यात केला तर, त्यांच्या भक्तीभावात उपोषण आहे असे मानण्याचे मुळीच कारण नाही. ही रामायणाची रत्नमाला तयार करताना रामप्रभूच्या प्रसादाशिवाय त्यांनी दुस-या कशाचीही अपेक्षा केली नाही. कोणाकडून त्यांना वाहवा मिळवायची नव्हती. रामचिंतनार्थ हा व्यासंग त्यांनी आरंभिला होता.

पंताच्या हातून आतापर्यंत विस्तृत लेखन झाले होते. त्यांचे वय आता साठीच्या जवळ आले होते. आता काशीयात्रेस जावे असे त्यांना वाटू लागले होते. काशीयात्रेचे महत्व प्रत्येक भारतीयास प्राचीन काळापासून वाटत आले आहे. जन्मास आल्यावर काशीयात्रा घडावी अशी प्रत्येक भाविकाची इच्छा असते. मरणसमयी गंगोदक मुखात पडावे, मरणानंतर अस्थी गंगेत पडाव्यात असे प्रत्येक भारतीयास वाटत असते. काही तरूण विदयाव्यासंगी लोक अध्ययनासाठी काशीत जातात. उदा. रामशास्त्री प्रभुणे तरूणपणी काशीस जावून तेथे बारा वर्षे राहिले व त्यांनी शास्त्री ही पदवी संपादन केली. राजकारणात जन्म घालविलेले काही कर्तेपुरूष उतार वयात चित्तशुध्दी होवून विश्रांती मिळावी म्हणून काशीचा आश्रय घेतात. तर काही मोठमोठे कवी व ग्रंथकर्ते काशीच्या पंडिताकडून आपल्या ग्रंथास मान्यता मिळविण्यासाठी काशीला जातात. अनेक कारणामुळे काशीयात्रेचे महत्व आपल्याकडे आहे. पुस्तकी ज्ञानाच्या पूर्ततेसाठी प्रवासाची आवश्यकता असते. प्रवासामुळे अनेक लोकांच्या चालीरिती पाहण्यास मिळतात. अनेकांच्या ओळखी होतात. अनेक प्रसंग, अडचणी येतात. त्यातून बाहेर पडण्याची तालीम मिळते. सृष्टीवैभवाचे अनेक नमुने पाहण्यास मिळतात. त्यामुळे चित्ताला प्रसन्नता येते. एकंदरीत ग्रंथवाचनापासून मिळालेले ज्ञान मुरायला प्रवासासारखे दुसरे साधन नाही म्हणूनच म्हटले आहे.

केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार ।
शास्त्र.ग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ।।

मराठी कवीपैकी ज्ञानदेव, नामदेव, मुक्तेश्वर, एकनाथ, रामदास वगैरेंनी तीर्थयात्रा पूर्ववयातच केल्या होत्या हे खालील अभंगावरून स्पष्ट होते.

ज्ञानदेव म्हणे नामदेवाप्रती । ऐकावी विनंती एक माझी ।
पृथिवीची तीर्थेकरावी समस्त । पाहावे महंत साधू जन ।
जीवनमुक्ता तुज नाही काही काज । इच्छा असे मज त्वाही यावे ।
नामा म्हणे तुम्ही पुसावे विठ्ठला । देता आज्ञा मला मीही येती ।।

नामदेवांनी पंजाबात भ्रमण करून केलेले हिंदी अभंग सर्वश्रूत आहेत. रामदासांनी सुध्दा अखंड तीर्थेधुंडाळली आहेत. मारोपंत गरीब स्थितीतले व प्रापंचिक पुरूष असल्याने त्यांना पुर्ववयात काशीयात्रा करता आली नाही. तरी महाराष्ट्रातील अनेक तीर्थे व क्षेत्रे त्यांनी पाहिली होती. पंढरपुरास ते अनेकदा गेले होते दोन तीन वेळा यजमानाबरोबर गेले होते. याशिवाय पंढरीस पंताचे मित्र बाबा पाध्ये होते. पुढे त्यांच्याशी नात्याचे संबंध आले. त्यामुळे त्यांचे अनेक वेळा पंढरपूरला जाणे झाले. याशिवाय आळंदी, देहू, पैठण, परळी, नाशिक, वाई, चिंचवड, जेजुरी वगैरे क्षेत्र पतांनी निरनिराळ्या वेळी पाहिली होती. कोकणात आपल्या सौंदळ या गावी ते जेव्हा जात तेव्हा राजापुरच्या गंगेचे स्नानही त्यांना घडले होते. याप्रमाणे अनेक लहानमोठी तीर्थक्षेत्रे त्यांनी पाहिली होती. पण काशीयात्रा मात्र घडली नव्हती. साठी उलटून गेली होती. म्हातारपणाची चिन्हे शरीरावर स्पष्ट उमटू लागली होती. तेव्हा काशीयात्रा करण्याचा बेत त्यांनी केला व माळेगावच्या अमरसिंह जाधवाच्या कृपेने त्यांचेबरोबर पंत काशीयात्रेस निघाले.

अमरसिंह जाधवराव यांचे घराणे इतिहासप्रसिध्द आहे. प्रसिध्द धनाजी, संताजी, या जोडीपैकी धनाजींच्या वंशजापैकी ते आहेत. बारामतीपासून सहा किलोमीटर अंतरावर माळेगाव आहे. तेथे ते राहत असत. पन्नाशी उलटून गेली तरी पुत्रलाभ झाला नाही त्यामुळे ते खिन्न होते. म्हणून त्यांनी काशीयात्रेस जायचे ठरविले व त्यांनी आपल्याबरोबर आपल्या भागातील विद्वान पंडीत कविवर्य मोरोपंत यांना मोठया सन्मानाने नेण्याचे ठरविले. म्हणून तर पंतांचा काशीला जाण्याचा योग जमून आला. पांडूरंगराय यांनी मोठया आनंदाने पंताना काशीला जाण्यास मान्यता दिली. पांडूरंगराय म्हणाले, 'पंत यात्रेस दोन वर्षेलागली तरी चालतील. सर्व देवदेवतांचे दर्शन यथास्थित धार्मिक विधी करून या. इकडील काळजी करू नका. आमचा विश्वेश्वरास नमस्कार सांगा.' त्यावेळेस काशीयात्रेस जाणे फार धोक्याचे होते. सातपुडयाचे डोंगर व घाट यात्रेकरूंना फार धोक्याचे होते. या पहाडात भिल्ल, रामोशी, दरोडेखोर यांची वस्ती होती. तेथे चोर, दरोडेखोर, लुटारू हे दिवसाढवळ्या यात्रेकरूंना लुटून मारहाण करीत. त्यामुळे एकटयादुकटयाने प्रवास करणे शक्य नव्हते. शेदोनशे बैलगाडया एकजुटीने निघत. बरोबर हत्यारबंद शिपाई घ्यावे लागत. इ.स. १७८८ कार्तिक शुध्द प्रतिपदेस काशीला जाण्याचा मुहूर्त निश्चित झाला. माळेगावचे बरेच लोक अमरसिंहबरोबर जाणार होते. म्हणून माळेगावहून प्रस्थान करण्याचे ठरले. सर्वांनी आदल्या दिवशीच तयारी पूर्ण केली. प्रतिपदेची पहाट उजाडली. मंदिरातून सनईचे सूर निघू लागले. चौघडा वाजू लागला. नगा-यावर टिपरू पडले. सारे गाव जागे झाले. सा-या गावात चैतन्याचे वारे पसरले होते. स्नान उरकून यात्रेला जाणारे लोक सा-या लवाजम्यासाह गावाबाहेरील पटांगणात जमा झाले. बरोबर सहा वाजता सरदार अमरसिंहाची स्वारी सा-या लवाजम्यासह हजर झाली. बरोबर पाचशे हत्यारबंद पोलीस होते. पेशव्यांच्या कडून गावोगावच्या अधिका-यांना बंदोबस्त ठेवण्यासाठी पत्रे गेली होती. अमरसिंहाबरोबर दुकाने, बाजार व गाईची खिल्लारे होती. दर चार मैलावर मुक्काम करण्याचे ठरले होते. मुक्कामाच्या ठिकणी सर्व दुकाने उघडावयची व ज्याला जो जिन्नस लागेल त्याने तो घ्यायचा व सारा खर्च जधवरावांच्या तिजोरीतून करावयाचा असे ठरले होते. असा सर्व बेत करून माळेगावहून ठीक सात वाजता सारेजण निघाले व बारामतीस आले.

जाधवराव बारामतीस आल्याची खबर मोरोपंतांना मिळाली. मोरोपंतांनी सिध्देश्वराची पूजा केली. गणपतीचे दर्शन घेतले व यात्रेत सामील झाले. त्याचबरोबर वडील भाउ सोनोपंत, पत्नी रमाबाई, आईपेक्षा प्रेम करणारी आत्या, धाकटा मुलगा, व इतर नातलग होते. तसेच नाईकांकडील काही मंडळी व बारामतीचे शेकडो लोक सामील झाले होते. यात्रेस भव्य स्वरूप प्राप्त झाले होते. अनेक डेरे, तंबू, राहूटया, मेणे व डोल्या होत्या. सामान वाहून नेण्यासाठी उंट होते. पंतासारख्या मान्यवर व्यक्तींसाठी भोई नोकरीस ठेवले होते. पंतानी आपले सर्व ग्रंथ बरोबर घेतले होते. रेशमी बासनात गुंडाळून ते स्वतंत्र मेण्यातठेवले होते. कारण पंताना आपल्या मराठी काव्याची परीक्षा काशीच्या संस्कृत पंडिताकडून करून घ्यावयाची होती. पंताना निरोप देण्यासाठी कित्येक लोक जमले होते. लोकांनी शुभास्ते पंथानः म्हणून अभिवादन केले. सर्व यात्रा मोठया दिमाखाने पुढील टप्प्याकडे निघाली. साधारणतः चार पाच मैलावर टप्पा उंडवडी, शिर्सुफळ या मार्गाने टप्प्याटप्प्याने यात्रा निघाली व सुमारे सहा महिन्यांनी काशीक्षेत्री आली. काशीस गेल्यावर काशीच्या पंडितांना पंत काशीक्षेत्री आल्याचे कळविण्यात आले. पुर्वी त्यांना पंताकडून पत्रे गेलेली होतीच. चार दिवसांनी शलाका परीक्षेसाठी काशीविश्वेराच्या मंदिरात जमण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे काशीविश्वेश्वराच्या भव्य मंदिरात काशीतील सर्व पंडीत जमा झाले. ते संस्कृतचे गाढे व्यासंगी होते. नंतर पंताना निरोप पाठवून सन्मानाने बोलविण्यात आले. मंदिराच्या मध्यभागी उच्च आसनावर वेदपाठशाळेचे प्रमुख आचार्य विराजमान झाले. त्यांच्या चेह-यावर विद्वत्तेचे तेज व करारीपणा दिसून येत होता. त्यांच्या भोवताली विद्वान पंडीत बसले होते. मोरोपंताचे प्रसन्न चेह-याने मंदिरात आगमन झाले. प्रमुख आचार्यांच्या शेजारी त्यांना जागा देण्यात आली. त्यांचे ग्रंथभांडार कवितासंग्रह प्रशस्त आसनावर ठेवण्यात आला. आता शलाका परीक्षा होणार हणून सर्वांचे लक्ष तिकडे लागले होते. मंदिरात पुर्ण शांतता व उत्सुकतेचे वातावरण पसरले होते. प्रमुख आचार्यांनी शलाका हातात घेतली शलाका म्हणजे छोटी सळई असते. समोरील ग्रंथातून कोणताही एक ग्रंथ घ्यायचा. त्यामध्ये कोठेही ती सळई घालायची व त्या पानामध्ये असलेल्या काव्यावरून त्या सर्व ग्रंथांची परीक्षा करायची यालाच शलाका परीक्षा म्हणतात. थोडक्यात, ही शितावरून भाताची परिक्षा असते. शलाका परिक्षेत खालील सुंदर आर्या निघाल्या.

वदवि मयूरकरवी श्रीराम विराटपर्व चवथे वा ।
स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ती सर्व चव थेंबा ।।
रामघन सत्प्रसादामृत जो जो बहहु वळुनि वर्षतसे ।

तो तो भक्त मयूर स्वार्या केका करूनि हर्षतसे ।।

यात कथनाकाचा काही संबंध नसून या केवळ पंताच्या स्वतंत्र व निर्मळ प्रतिभानिर्मित आर्या आहेत. या आर्यातील पदलालित्य, प्रसाद व अर्थगांभीर्य पाहून काशीतील महापंडित फार प्रसन्न झाले. संस्कृत पंडितांना बरेच वेळा प्राकृत काव्याबद्दल अप्रीती असते तरी सुध्दा संस्कृत पंडितांनी पंताच्या कवितेची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. पंताना महावस्त्र अर्पण करून त्यांचा मोठा गौरव करण्यात आला. त्यांची व्यासपुजा करण्यात आली. हा मान फार थोडयांच्या वाटयास येतो.

मोरोपंतांनी आपली कविता काशीच्या पंडितास दाखवून त्यांचेकडून पसंती मिळविली. या गोष्टीचे महत्व मराठी भाषेच्या दृष्टीने फार आहे. संस्कृतातील ज्ञान भांडार मराठीत आणण्याचा कित्ता प्रथम ज्ञानोबारायांनी घालून दिला. प्राकृताविषयीचा पंडितांचा दुराग्रह काढून टाकून, सामान्यजनांच्या उध्दारासाठी प्राकृत ग्रंथ करण्यास कोणतीच हरकत नाही. असे संमतिपत्रक एकनाथ महाराजांनी मिळविले. प्राकृत ग्रंथसंपत्ती काशीच्या पंडितास दाखवून त्यांचेकडून प्राकृत भाषेच्या गौरवाचे श्रेय पंतांनी मिळविले आहे. म्हणून पंताचे प्राकृत भाषेवर अनंत उपकार आहेत.

पंत संपूर्ण चातुर्मासात काशीत राहिले रोज सकाळी स्नानानंतर भगवत्‌गीतेचे पद्यात्मक भाषांतर रचून ते ब्राम्हणाला दान केल्याशिवाय पंत भोजन करीत नसत शलाका परीक्षा झाल्यानंतर पंतानी काशी, प्रयाग व गयेस असताना तेथील देवतांवर लहान लहान स्तोत्रे केली. बरोबर असलेल्या लोकांनी पंताची योग्यता ओळखून त्यांची चांगली व्यवस्था ठेवली होती. त्यामुळे ही यात्रा पंताना सुखावह झाली. पंतानीही या सुजनांचे हे ऋण फेडण्याची एक चांगली युक्ती शोधून काढली. त्यांनी बरोबर आलेल्या व मागे बारामतीस राहिलेल्या बहुत लोकांच्या वतीने गंगा व विष्णूपद यापुढे वकिली, प्रार्थना केली आहे. आलपे यजमान 'अत्यंत सदय अन्नद' बाबूजी नाईक, गुरू, बंधू, मित्र सुना इत्यादि आप्तेष्टांची वकिली केली आहेच, याशिवाय बारामतीतील आपल्यावर सुस्नेह करणारे शिंपी, पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, खाटीक, न्हावी, परीट, तेली वगैरे सर्व जातींच्या व दर्जांच्या लोकांबद्दल सप्रेम वकिली केली आहे. याशिवाय बापूभट जामदार, मैराळ, शिंपी, आठवले,दाते इत्यांदी अनेकांची नावे घेवून त्यांच्या दारिद्रयाची निपुत्रिकपणाची, व्याधीची गा–हाणी गंगा व विष्णूपद या देवतांजवळ सांगितली आहेत व त्यांचे निरसन करण्याविषयी पंतानी प्रेमळपणे विनवले आहे. या दोन्ही वकिल्यांवरून पंत बारामतीस अबालवृध्दात कसे प्रिय होते ते दिसून येते. तसेच या सर्वांबद्दल पंताच्या मनात किती उत्कट प्रेम होते तेही दिसून येते. ज्या भोयांनी त्यांचा मेणा वाहून नेला व ज्या गडयांनी त्यांची सेवा केली, त्यांनासुध्दा पंत विसरले नाहीत. यावरून त्यांची विश्वकुटूंब वृत्ती प्रेमळ व विनयशील स्वभाव याची प्रचीती येते. पंत गंगावकीली आपल्या आप्तेष्ठ मित्रांच्या वैभवशाली स्त्रीपुरूषांचा उध्दार व्हावा इतकीच याचना करून थांबले नाहीत तर मुसलमान, इस्त्रायल इत्यादी जे अहिंदू आहेत त्या सर्वांचेच तारण व्हावे म्हणून गंगामातेस त्यांनी गळ घातली आहे

गंगे सद्गति सर्वा हैबतिरायदि, बावराला हो ।

खळ हासोत, मज भले म्हणतिल, 'घेतोसि बा वरा लाहो ।।'

काशीयात्रा संपवून मोरोपंत परत निघाले. काशी, गया, प्रयाग, येथे असताना त्यांनी खुशालीची खुलासेवार पत्रे घरी पाठविली होती. काशीहून परत येताना वाटेत चोळीमहेश्वर येथे अहिल्याबाई होळकर या साध्वीचा मुक्काम होता. साधुसंतास आवर्जुन बोलावून अहिल्याबाई त्यांचा सत्कार करीत. त्याप्रमाणे पंतानांही तिने पालखी पाठवून महेश्वरला आणले व त्यांचा योग्य आदरसत्कार केला. अहिल्याबाईंनी पंताना आपल्या आश्रयास राहण्याची विनंती केली. परंतू पंतांनी ही विनंती नम्रपणे अमान्य केली. याप्रमाणे ही महायात्रा यथासांग करून पंत इतर मंडळीसह इ.स १७९० चा पावसाळा सुरू होण्यापूर्वी बारामतीस आले. यात्रेला जावून येण्यास सुमारे दीड वर्ष लागले. यात्रेचा सर्व खर्च अमरसिहांनी केला तो सुमारे तीन लक्ष रूपये आला आज त्यांची किंमत किती होईल कल्पनाच केलेलीच बरी !

पंताचा काशीस मोठा सत्कार व व्यासपूजा झाल्याचे बारामतीच्या लोकांना समजले होतेच. त्यामुळे लोकांना फार आनंद झाला होता व पंताच्या येण्याची ते आतुरतेने वाट पाहत होते. पंत बारामतीस आल्यावर त्यांच्या स्वागतासाठी फार गर्दी झाली होती. सुवासिनींनी त्यांना ओवाळले व गावक–यांतर्फे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. पंत काशीहून आल्यावर म्हणजे इ.स. १७९० ते १७९२ या दरम्यान त्यांनी केकावली लिहीली आहे. पंताचे शरीर थकले होते. देहपात समय जवळ आला होता. त्यांचे नेत्र साक्षात रामदर्शनासाठी उत्सूक झाले होते. अशावेळी त्यांच्या मुखातून ही केकागंगा प्रगट झाली. पंताच्या सर्व काव्यात अत्यंत प्रसिध्द व लोकप्रिय व अति उत्कृष्ट असे हे काव्यरूप स्तोत्र आहे. पंताच्या कवितेचे गुणसर्वस्व यात दिसून येते. केकावलीत प्रेम, प्रतिभ व प्रसाद यांचा जणू त्रिवेणी संगम आहे. केकावलीत १२१ पद्ये आहेत. त्यांची गोडी अवीट आहे ती सांगून कळणार नाही. त्यांचा आस्वादच घेतला पाहिजे. पंतानी रचलेल्या काव्यामध्ये केकावली हे शेंडेफळ आहे. ते केवळ कालक्रमानेच नव्हे तर गुणानुक्रमानेही शेंडेफळ म्हणून गणले जाते केकावलीच्या समाप्तीनंतर पंतानी फारशी काव्ये केली नाहीत. काही प्रकरणे व थोडीशी रामायणे लिहीली आहेत. परंतू ती नष्ट झाली आहेत. आयुष्याच्या शेवटी रामरीति हे १०३ आर्यांचे प्रकरण रचिले आहे. म्हातारपणाची लक्षणे जाणवू लागल्यावरसुध्दा बिहारी भाषा शिकून तिच्यातील भक्तिरसाचा साठा लुटावा, अशी त्यांना उत्कंठा लागली होती ते 'रामरीति' त म्हणतात.

सद्वचनी वेचावे आयुष्य, नसेचि भरवसा याचा ।
झाले जीर्ण, तरि मनी आहे रसिकांत भर वसायचा ।।
समजुनि द्यावी वळवुनि सेवेने सुरसिका बिहारी ती ।
म्हणतो अद्यापि तसी वेडा भूसुर शिकावि ही रीती।।

पंताचे आता वय झाले होते. शरीरप्रकृती त्यांच्या उत्साहाला साथ देत नव्हती. नाईकांच्या वाडयात रोज सायंकाळी पुराण सांगत होते. परंतू त्यांना जास्तवेळ बसवत नव्हते. जास्त दगदग सहन होत नव्हती. परगावी प्रवासास जाणे त्यांनी कमी केले होते. लिखाणाचा वेगही आता मंदावला होता.

दरवर्षी पंतांकडे रामनवमीचा उत्सव मोठया उत्साहाने साजरा होत असे. श्रीरामाचे ते परमभक्त होते. या वर्षी गुढीपाडव्यास गुढी उभारून रामनवमीच्या उत्सवास पंतगृही सुरवात झाली. आठ दिवस रोज भजन, किर्तन, रामायणाचे पारायण होत असे. उत्सवात एक दिवस रामजोशींना कीर्तनास बोलावण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे रामजोशी मुद्दाम सवड काढून आले. दोघांचे एकमेकांवर तसेच प्रेम होते. पंताच्या घरचेच ते पाहुणे होते. रात्री नऊ वाजता पंताच्या वाडयासमोरील पटांगणात जोशीबुवांचे कीर्तन सुरू झाले. सर्व पटांगण प्रेक्षांनी फुलून गेले होते. अमाप गर्दी लोटली होती. जोशीबुवांनी मीराबाईंचे आख्यान लावले होते. आपल्या ओघवती वाणीने जोशीबुवांनी बारामतीचे वृंदावन करून टाकले. प्रत्येक पुरूषास वाटले की, बासरी वाजविणारा कन्हैया तो मीच. प्रत्येक स्त्री मीराबाई झाली होती. या जादूनगरीत रामजोशी गात होते. 'मीराके प्रभु गिरिधर नागर' आख्यान संपले. सारे प्रेक्षक गहिवरून गेले. शेवटी 'हेचि दान देगा देवा' झाले. आरती फिरवली गेली. आरतीत नाणी पडू लागली. शेवटी पंतांनी २५ रूपये आणि दारातील सुपभर टपो-या बोरांचा आहेर केला. रामजोशी गहिवरले. दोघांनी एकमेकांना कडकडून मिठी मारली. सा-या प्रेक्षकांची अंतःकरणे हेलावून गेली.

पंताच्या घरी रामनवमीचा उत्सव चालूच होता. दशमीस पारणे झाले. पारण्याचे ब्राम्हण भोजन होवून उत्सव आटोपला. उत्सवात प्रारंभापासून पंतांना अस्वस्थता वाटत होती. परंतू नित्य स्नानसंध्या, पारायण सुरू होतेच. उत्सव चालू होता तोपर्यंत मनाच्या उत्साहामुळे त्यांनी प्रकृतीस जुमानले नाही. परंतू उत्सव संपल्यावर एकायीस पंताना ताप आला. द्वादशीस ताप वाढला. ताप कमी होण्याचे चिन्ह दिसेना वैदयांननी औषधोपचारांची पराकाष्ठा केली परंतू काहीच परिणाम दिसू नयेत नव्हता. पंतानी आता शेवट जवळ आला हे ओळखले. आता रामनामाशिवाय दुसरे औषध नाही पंत म्हणाले, ''माझ्याजवळ बसून गीता, विंष्णू सहस्त्रनाम यांचे पाठ करा. भगवन्ना नामाचा गजर करा 'पंताच्या चिरंजीवानी दुःख आवरून तशी व्यवस्था केली. रांत्रदिवस पाळया ठरवून पवित्र ग्रंथाची पारायणे, प्रेमळ करूणापर अभंग म्हणून भजनाचा गदारोळ सुरु झाला. सर्व गणगोत जमा झाले. पंतानी सर्वांचा निरोप घेतला. निरवानिरव केली 'मरणसमयी कोणी भोवती जमन रडारड करू नका. आनंदाने रामनामाचा जप करा' असे आप्तेष्टास बजावले व अगदी अखेरचे १७ आर्यांचे हृदयद्रावक, अंतःकरणाला पाझर फोडणारे असे काव्य केले त्यामध्ये गोमाता, भूमाता, तुळस, तुळशीवृदांवन, देवघरातील समई, देव्हा-यातील रामाची मूर्ती, अंगणातील सडासारवण, विहीरीजवळचा कडुनिंब, त्याची शितल छाया, भक्तजन, आप्तजन यांना करूणा रसाने विनविले आहे व त्यांनी जन्मभर केलेल्या उपकाराचे प्रेमपूर्वक स्मरण केले आहे. ही कृतज्ञता पाहून कोणाचे हृदय द्रवणार नाही?

चतुर्दशीस जागा गोमयाने सारवून, दर्भ अंथरून त्यावर घोंगडी अंथरली व त्यावर पंताना निजवले. त्यांची वाचाशक्ती शेवटपर्यंत शाबूत होती. तोंडाने हळू भगवान्नाम चालू होते. मुद्रा प्रसन्न व सतेज होती. सर्वांना मारुती जन्माची वेळ न चुकविता, बरोबर सुर्योदयापुर्वी गुलाल फेकावा असे सांगून ज्येष्ठ पुत्रास मांडी देण्यास सांगितले. त्याने वडिलांच्या मुखात तुळशीचे पान व कुपीतील गंगोदक घालून कपाळास तुळशीतील मृत्तिका लावली. चैत्र पौर्णिमा, मंगळवारचा दिवस उजाडला हनुमान जयंतीचा दिवस होता तो, तरी सुध्दा मोरोपंताच्या वाडयात उदासकळा पसरली होती. सा-या बारामतीची त्यांच्या वाडयाकडे रीघ लागली होती. रमाबाईचे कुंकू पुसायला, त्यांच्या मुलांना पोरके करायला यमदूत जणू सज्ज झाले होते. त्यांना माहेरास नेण्यासाठी सुग्रीव, हनुमंतादि रामभक्त व सर्व मंडळी सज्ज होती. पडल्या पडल्या नमस्कार करून पंतांनी त्यांचे स्वागत केले. पंताना धाप लागली होती श्वासोच्छ्वास जोराने होत होता. अंथरूणावरच त्यांना अंतःसमय दिसू लागला होता परंतू चेहेरा शांत होता. भितीचा लवलेशही दिसत नव्हता. ज्येष्ठ पुत्रांने त्यांचे डोके मांडीवर घेतले होते. सारी मुले दिडमुढ होवून भोवती उभी होती. अंगणा प्रतिष्ठित लोक जमले होते.

सुर्योदय होताच 'रामदूत हनुमानकी जय' म्हणून सर्वांनी गुलाल उधळला. त्याच वेळेस मोठयाने त्रिवार राम म्हणून पंतांनी आपल्या इष्ट देवतेला नमस्कार केला. देवघरात निरांजनापची वात फडफडत होती. आकाश झाकोळून आले होते. तेवढयात ज्योत फडफडली आणि विझली. भाद्रपदातील एखादया दुपारी जितक्या सहजतेने सुर्य ढगाआड होतो तितक्या सहजी पंतांच्या कुडीतून प्राण बाजूला झाला. पौर्णिमा जणू अमावस्येच्या रूपाने उगवली होती. उषःकाली काळरात्र झाली होती. सा-या कुटूंबावर आभाळ कोसळले. एखादा प्राचीन वटवृक्ष उन्मळून पडावा तसे झाले. हनुमानजयंतीच्या दिवशी पंत रामरूप झाले तेजात तेज मिळसले. पावित्र मांगल्यात एकरूप झाले. ज्या दिवशी एका ख-या रामभक्तांचा जन्म झाला त्याच दिवशी दुसरा रामभक्त रामरूप झाला. रामजोशींना बोरांचा आहेर करणारे आता कोणी उरले नाही.

आप्तस्वकीय सांत्वन करीत होते, अश्रू पुसत होते. पण पोरकेपणाची पोकळी कोणीही भरून काढू शकत नव्हते पंताच्या दर्शनासाठी अंक्षरक्षः रांग लागली होती. ते अजातशत्रू होते याची प्रचिती येत होती. पंताच्या थोरल्या मुलाने सुन्न मनाने गीतेचे पुस्तक उघडले. त्याचे पठण केले समोर पित्याचे

अचेतन कलेवर आहे हे पक्के माहीत असूनही मध्येच त्याच्या मनात येते, कुठे आपला उच्चार चुकला तर पंत रागावतील! पण छे, या रागलोभाच्या पलीकडे ते पोचले होते. सारे कुटूंब सर्वार्थाने पोरके झाले होते.

पंताचा देह दर्शनासाठी बाहेरच्या चौकात ठेवला. सारी बारामती अंत्ययात्रेसाठी लोटली होती. नाईकांचेकडील मंडळी उपस्थित होती. माळेगावहून जाधवराव आले. होते. रामजोशी आले ते भावनाविवश झाले. त्यांना दुःखावेग आवरेना. त्यांच्या तोंडातून शब्दही फुटला नाही. सारी पंचक्रोशी जमा झाली. पंताचा देह पुष्पहारांनी व सुंगधी द्रव्यांनी झाकून रामनामाच्या गजरीत अंत्ययात्रा क–हेच्या काठी आली. पंतांचा देह खाली ठेवला. जागा मंत्र म्हणून शुध्द केली. त्यावर चंदनकाष्ठाची सुंगंधद्रव्ययुक्त चिता रचली. पंतांचा पार्थिव देह चितेवर ठेवला. सर्वांनी पुन्हा नमस्कार केला.साश्रू नयनांनी शेवटचे दर्शन घेतले. चिरंजीवांनी चितेस प्रदक्षिणा घालून अग्नी दिला. काही वेळाने चितच्या ज्वाळा उंच जावू लागल्या. चिता चहूबाजूनी धगधगत होती. त्या ज्वालातून जणू काय....

सुसंगती सदा घडो, सुजनवाक्या कानी पडो ।
कलंक मातीचा झडो, विषय सर्वथा नावडो ।

हा आवाज आसमंतात घुमत होता. काळ्या निळ्या आणि तांबडया ज्योतींनी पार्थिव देह वेढून टाकला होता. देह पंचत्वात निमाला, पंत अनंतात विलीन झाले. फक्त अस्थी शिल्लक रहिल्या होत्या. पतांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थीचे पंढरीस चंद्रभागेस डोहात विसर्जन करण्यात आले. ज्यांनी आपला जन्म पांडूरंगाच्या व त्यांच्या भक्तांच्या यशोवर्णनात घालविला त्याच्या अस्थीनेही पांडूरंगाच्या चरणी दडी घ्यावी हे अगदी स्वाभाविकच आहे.

जरी ते देहरूपाने नाहीसे झालेले असले तरी त्यांच्या अक्षर वाड्मयाने त्यांनी भारतीयांच्या हृदयात अमर स्थान मिळविले आहे. जोपर्यंत मराठी माणसांचे अंतःकरण ज्ञानेशाच्या ओवीने उंचबळून येत आहे, तुकोबांच्या अभंगाने भक्तीरसात डुंबत आहे, नारदीय कीर्तनातील नवरसांनी ओथंबून जात आहे. तोपर्य।त मोरोपंत आणि त्यांची आर्या अमर आणि अमरच राहील. व महाराष्ट्राची मान उंचवली जावून त्यांना मराठी माणसाकडून मानाचा मुजरा नेहमीच मिळत राहील, म्हणून गोविदग्रजांनी म्हटले आहे,

मयूर कवीच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा ।।

सुरवंटांनी आपल्या निद्रेकरता निर्माण केलेला कोश म्हणजे माणसांचे मुलायम रेशीम होय. त्याप्रमाणे संतांनी स्वान्तसुखाय केलेली रचना हेच लौकिक दृष्टया सुंदर काव्य झाले. मोरोपंतांचे काव्य याच प्रकारातील आहे. अशा या शब्दसृष्टीचे ईश्वर, कल्पनेचे कल्पतरू, सरस्वतीचे निजस्थान, अमृताचे मेघ व महाराष्ट्र भाषेचे कंठमणी असलेल्या मयूरास माझे शतशः प्रणाम.

**मारोपंती निवडक वेचे**

१) पंतांची पहिली आर्या

नित्य तुम्ही प्रभुपाशी पेढे, बर्फी नवा खवा खावा ।
तरि म्यां एके दिवशी रेवडिचा स्वाद का न चाखावा ?

अर्थ – पंत पंढरपूरला विठ्ठलदर्शनास गेले होते. तेथे एके दिवशी रेवडीकर बुवांचे कीर्तन चालू होते. कीर्तनास इतकी गर्दी झाली होती की, पंतांना आत जाण्यास वाट मिळेना. तेव्हा तेथील लोकांना उद्देशून पंतांनी ही पहिली आर्य केली आहे. पंत म्हणतात 'रोज तुम्ही प्रभुपाशी पेढे, बर्फी, खवा म्हणजेच निरनिराळी प्रवचन, कीर्तने ऐकत आहात. मला एक दिवस तरी रेवडीचा, म्हणजे रेवडीकर बुवांच्या कीर्तनाचा स्वाद घेवू दे' येथे रेवडी या शब्दावर श्लेष आहे.

२) औषधावरील आर्या

जीर्णज्वरासि वटिका चिंचवटी घे समान ती कुटकी
कवडी खर्च न करिता जाइल बापा न वाजवता चुटकी ।।
नवसागर भाजुनिया सेवी तक्रांत पावलीभार ।
मुनिदन किंवा त्रयदिन होईल मुलिहून नारूसंहार ।।

अर्थ – पंतांचा सुश्रुतादि ग्रंथाचा वैदयकीय अभ्यास चांगला होता. ते कधी कधी औषधयोजनाही करीत. उदाहरणार्थ त्यांनी दोन आर्या दिल्या आहेत. मुरलेला ताप असताना चिंचवटी आणि कुटकी ही औषधे समप्रमाणात घेवून त्यांची गोळी घेतली असता, काहीही पैसा खर्च न करिता चुटकी वाजविण्याच्या आत म्हणजे ताबडतोब ताप नाहीसा होतो. तसेच पावलीभर वजनाचा नवसागर भाजून तो ताकातून तीन दिवसांनी किंवा सात दिवसांनी घेतल्यास नारूचा

समूळ संहार होतो.

३) लहान मुलांचे भांडण

अज्ञ मुले कलह करिति, नवदावे तेचि बोलती स्वैर ।
ते चित्तात धरूनिया प्राज्ञे पुरुषे धरू नये वैर ।। (आदिपर्व १०)

अर्थ – आपल्या घरची व शेजारची मुले भांडली की, कुटूंबवत्सलाने कसे वागावे ते वरील आर्येत सांगितले आहे. लहान मुले आपसात भांडण करतात. बोलू नये ते बोलतात. तरी मोठया माणसाने ते मनात धरून भांडण करू नये, वैर धरू नये.

४) सीतागीत

राम वनवासातून आल्यावर सीतेच्या जावा तिला चौदा वर्षात घडलेली हकीकत विचारू लागल्या. तेंव्हा सीतेने त्यांना अयोध्येत परत येईपर्यंत झालेले सर्व वर्तमान सांगितले. त्यातील काही अभंग दिलेले आहेत. ते इतके सोपे आहेत की त्यांचा अर्थ सांगण्याची जरूरी नाही.

यज्ञासाठी भूमी नागरिता धन्या । सापडली कन्या सीतादेवी ।
जनकाची पुत्री दुर्जना दुर्मिळा । ती भार्या उर्मिला लक्ष्मणाची ।
जनकाचा बंधू होता एक निष्ठ । वयाने कनिष्ठ श्रेष्ठ गुणें ।
तेणे भरतासी मांडवी दुहिता। दिली जी सु–हिता दोन्ही कुळी ।
शत्रुघ्नाला दिली श्रुत –कीर्ती । जिची गाती कीर्ती पतिव्रता ।
चवघी बहिणी भाग्ये झाल्या जावा । त्यांच्या गीती गावा सुसंवाद ।
सीता म्हणे ऐका वनवास कथा । परी मनी व्यथा न धरावी ।
लक्ष्मण भावोजी मागे पुढे स्वामी । मज आहे धामी ऐसे वाटे ।
न बाधेची मज उष्ण क्षुधा तृषा । तुम्हापासी मृषा न बोलावे ।

५) रुक्मिणीगीत

श्रीकृष्णाच्या प्रमुख भार्या व द्रौपदी एकत्र बसलेल्या असता द्रौपदीच्या सांगण्यावरून रुक्मिणीने आपल्या लग्नाची कथा सर्वांना सांगितली. तेच हे गीत होय. श्रीकृष्णाला रुक्मिणीने पत्र पाठवून त्वरीत येण्याविषयी काकुळतीने विनविले असून तो लवकर आला नाही. लग्नमुहूर्ताला फक्त रात्रच राहिली तेव्हा तिची कशी धांदल उडते ते खालील गीतात सांगितले आहे.

न आले त्या दिशी । मध्ये मात्र रात्र।
चिंताज्वरे गात्र तापविले ।।
त्या रात्री लागला । नाही माझा डोळा ।
प्राण कंठी गोळा । झाले होते ।।
जो ऐसे मन्मन । चिंतेत राहाते ।
स्फुरला पहाटे । डावा बाहू ।।

६) सावित्री गीत

यमधर्माने सावित्रीला परत जाण्यास सांगून पतीची सांगक्रिया करण्यास सांगितले तेव्हा सावित्रीने यमास दिलेले उत्तर खालील गीतात आहे.

सावित्री म्हणे 'गा' । देहासवे छाया ।
जशी, तशी जाया । पतीसवे ।।
प्राण जाउ दयावे । पती न सोडावा ।
स्वधर्म जोडवा । मुख्य हाचि ।।

सीतागीत, रुक्मिणीगीत, सावित्रीगीत ही गीते इतकी सोपी आहेत की, त्यांचा वेगळा अर्थ देण्याची जरूरी नाही.

७) मदालसेची पुत्रशिक्षणपध्दती

स्तन पाजिता निजविता हालविता बालकासि खेळविता ।
दे बोध, जोसुदुर्लभ थोरासि सहस्त्रकल्प मेळविता ।।

अर्थ – या आर्येत पंतांनी सन्मातेचे मनोहर चित्र काढलेले आहे. थोरांनाही हजारो वर्षाच्या ग्रंथाध्यनाने, अवलोकनाने व स्वबुध्दिसामर्थ्याने जो धर्मनीतिबोध, शिक्षण मिळविणे कठीण आहे, तो सन्मातेपासून स्तन पिताना, निजविताना, बालकाला हलविताना व खेळविताना सहज मिळू शकतो.

८) वात्सल्यरस (रासाच्या बाललीला)

पीता स्तनाते क्षणमात्र राहणे ।
महादरे मातृमुखासि पाहणे ।
वक्त्रात तें दुग्ध तसेंचि वाहणे ।
तेणेचि फूत्कार करूनि नाहणे ।। १।।
मुखातूनी दुग्ध गळे सुनिर्मळ।
उरावरी ये अतिशुभ्र ओगळ ।
मंदाकिनीच्या गगनी प्रवाह तो ।
चंद्रप्रभा पांडूर काय वाहतो ।। (छंदोरामायण)

अर्थ – पंतांना मुलांबाळाविषयी फार प्रेम होते. त्यांनी आपली व आपल्या भावाची मुले लडिवाळपणे खेळवली. या स्वानुभवामुळे वात्सल्यरस त्यांच्या कवितेत अतिशय सुंदर उतरला आहे. छंदोरामायणात रामाच्या बाललीला वर्णिताना वरील अत्यंत मधुर श्लोक त्यांनी लिहीले आहेत. स्तनपान करीत असताना मध्येच थांबून कौतुकाने बाळ आईच्या तोंडाकडे पाहत राहते. तोंडात दुध थोडा वेळ तसेच ठेवून फुर्र करून अंग दुध्तने माखून घेते त्यांच्या मुखातून दुधाचा अतिशुभ्र ओघळ छातीपर्यंत येत असतो. तेंव्हा असे वाटते की, जणू काही गंगेचा पांढराशुभ्र प्रवाह आकाशातून खाली झेप घेत आहे.

९) करुणरस

आर्या केकावलीतील स्त्रोतात करूण रस उत्कृष्ट उतरला आहे. या आर्या गोड असून नित्य म्हणण्यासारख्या आहेत. फार सोप्या असल्यामुळे त्यांचा अर्थ दिला नाही

श्रीरामा ! तू स्वामी अससी माझ्या शिरावरी जागा ।
आम्हासि तुझ्या पायावाचुनि निर्भय नसे दुजी जागा ।।
अपराध फार केले परि आता हात जोडले स्वामी ।
करूनि हया तारावे आवडि वाढो सदा तुझ्या नामी ।
बहु गोड गुण तुझे ऐकावे आदरे आम्ही गावे ।
यावेगळे मनोरथ नसती ते तूज काय सांगावे ।।
(आर्या केकावली)

१०) वीररस (युध्दवर्णातील आर्या)

स् सणणण सणणणणण वाजती शरनिकर कायहानिकार ।
वदले सुरमुनि करितो नररूपे रूद्र काय हा निकर ।। (भीष्मपर्व)

अर्थ : भीष्मपर्वापासून गदापर्यंतच्या पर्वात युध्दवर्णन केले असल्यामुळे त्यात वीरस ओतःप्रोत भरलेला दिसून येतो. वरील भीष्मपर्वात आर्येतून अर्जुनाचे युध्दकौशल्य स्पष्ट दिसून  येते यातील शब्दध्वनी आल्हाददायक व अर्थबोधक आहे. कीर्तनकारांच्या आख्यानातून ही आर्या अनेक वेळा ऐकावयास मिळते. सू सणणण असा आवाज करीत सुटणोर बाणांचे समूह देहाचा नाश करीत होते. हे पाहून देवमुनींना वाटले की, शंकर जणू नररूपाने युध्द करण्यास अवतरला आहे.

१९) राम–लक्ष्मण बंधूप्रेम

छाया तनूची तनुला न सोडी । त्या बंधूची एक तशीच जोडी ।
परस्परीं त्यास अपार गोडी । त्या मित्रभावा उपमाचि थोडी।

(छंदोरामायण)

अर्थ – रामलक्ष्मणच्या बंधूप्रेमाचे वर्णन तनुछायेच्या दृष्टांताने सुरेख केले आहे. ज्याप्रमाणे शरीराची सावली शरीरास सोडत नाही. त्याचप्रमाणे रामलक्ष्मणाची अतुट अशी जोडी आहे. त्यांचे एकमेकांवर अतिशय प्रेम आहे. या प्रेमास उपमा दयावी तेवढी थोडीच आहे.

१२) मारुती स्तुती

हा तनय मारुताचा, याच्या ऐका अपार वीरलीला ।
भक्षित होता, परिणत फलमतिने उपजताचि सूर्याला ।।१।।
व्यर्थचि मनात धरता चिंता, पावेन सेतुला याला ।
ओजस्तेजे यासम कोणी प्राणी नसे तुलायाला ।। २।।
याचे भुजदंड महाप्रचंड यमदंड दंडदक्ष महा ।
हा वज्रदेह केवळ सुरशत्रू पराजयप्रद धर्म हा ।।३।।
हा विजय वीरशाली, दुर्धर दुर्धर्ष सर्ववीरमणी ।
लंघुनि नदीपतीने, शोधील नृपालसुनूची रमणी ।।४।।
(मंत्ररामायण)

अर्थ – सीतचा शोध घेण्यास, समुद्रोल्लंघन करण्यास कोण तयार आहे याचा विचार करण्याकरिता वानरांची सभा भरली होती. कोणाचाच हिय्या होत नाही हे पाहून वृध्द जांबुवताने मारुतीची शिफारस वरील काव्यात केली आहे. हा मारुताचा पुत्र हनुमान अत्यंत शूर वीर आहे. जन्मल्यबरोबर सुर्यबिंब, पिकलेले फळ आहे समजून त्याकडे याने झेप घेतली होती. याने समुद्रावर सुध्दा सेतू बांधला आहे. असे असताना तुम्ही उगाच का चिंता करता ? यांच्यासारख्या तेजस्वी प्राणी तुलनेतसुध्दा नाही. याचे बाहू प्रचंड असून हा शिक्षा करण्यात अत्यंत सावध आहे. याचा वज्रासारखा कठीण देह राक्षसांचा पराभव करण्यास समर्थ आहे. हा अत्यंत पराक्रमी असून त्याला पकडणे, त्याचा पराभव करणे, अत्यंत कठीण आहे. सर्व वीरांचा हा जणू मुकूटमणी आहे. हा समुद्र सहज पार करून सीतेचा निश्चित शोध लावील.

१३) कुंभकर्णजागृती

एक सहस्त्र महारव दुंदुभि संताडिले कितेकाही ।
मुग्दरमुसले करिती ताडन, परि लागती ते न काही ।।
शतसंख्याक जलाचे कुंभही आणुनि रिचविले कानी ।
केशोन्मुलन केले, जाले निजकंठ शुष्क हाकांनी ।।
चावूनिया काय बळे धावती अंगावरूनिया, हसती ।
मृतवन्य गजास जसे वायसगण वेष्टिती तसे दिसती ।।
दशशतगज देहावरी चालविले, ताडिला शिलाशिखरे ।
निद्रापराजयास्तवच केले, त्याही प्रसिध्द युध्द खरे ।।
ऐसा बहुत यत्ने जागा केला, जसा महाकाळ ।
मधुलोहित घट घटघट सेवी मासासमेत तत्काळ ।।

अर्थ – कुंभकर्णला उठवावयाला राक्षसांना किती प्रयास पडले याचे सुंदर वर्णन वरील काव्यात केले आहे. हजारो ढोल त्याच्या कानाशी मोठयाने वाजविले मुसळांनी त्याच्या अंगावार प्रहार केले परंतू ते त्याला काहीही लागले नाहीत. पाण्याच्या शेकडो घागरी त्याच्या कानात आणून ओतल्या. त्याचे केस उपटले. हाका मारमारून लोकांचे ओठ कोरडे पडले. परंतू तो जागा झाला नाही. जोरजोराने चावून त्याच्या अंगावर लोक धावले मोठयाने हसले. मेलेल्या हत्तीला जसे कावळे वेढून टाकतात तसे ते दिसत होते. शेकडो हत्ती त्याच्या शरीरावर चालविले, त्याला अणकुचीदार दगडांनी मारले. त्याला झोपेतून जागे करण्यासाठी जणू काय युध्दच आरंभिले. याप्रमाणे अनेक प्रयत्न करून या महाकालालाच जागे केले. जागा झाल्याबरोबर त्याने तात्काळ मांसाबरोबर मदयाचे घट घटाघट

सेवन करण्यास सुरवात केली.

१४) श्रीकृष्णाचे विदूरप्रेम

शतसंख्य वाजवी ज्या जेवविता माय देवकी चिटक्या ।
तो नित्यतृप्त भगवान विदुरगृही भोजनात दे मिटक्या ।।
आले ढेकर, दिधल्या मिटक्या, बहुसाल मारिले भुरके ।
उरके सर्वामागुनि अशन, परि न ताट चाटणे उरके ।।
(उद्योगपर्व, मोरोपंती भारत )

अर्थ – ज्या श्रीकृष्णाला जेवण्याकरिता देवकीला शेकडो वेळा हाका माराव्या लागत होत्या. तोच सदा तृप्त असलेला श्रीकृष्ण विदुराच्या घरी मात्र मिटक्या मारीत जेवत होता. ढेकर आले. मिटक्या मारून झाल्या भुरके मारले, सर्वांची जेवणेही झाली तरी श्रीकृष्णाचे ताट चाटणे उरकेना. थोडक्यात श्रीकृष्णाला विदुराघरच्या कण्या गोड लागल्या.

१५) श्रीकृष्ण सुदाम मित्रप्रेम

तों जीर्ण मलीन वस्त्री सापडली श्रीकरासी गाठोडी ।
जोडी द्रव्याची जसि चुकली कृपणास हे तुला थोडी ।।
हे काय सख्या ऐसे बोले डोले हळूच मग सोडी ।
गोडी याची मज बहु, भेटी उदारा गमे थोडी ।।

अर्थ – ही सुदाम देवाची कथा आहे. हा लहानपणाचा कृष्णाचा गुरूबंधू. अठराविश्वे दारिद्र्यात संसार कंठीत होता. बायकोच्या सांगण्यावरून सर्वसंपन्न श्रीकृष्णाच्या भेटीला निघाला. निघताना रिक्त हातांनी जावू नये म्हणून घरात असलेले चार दोन मुठी पोहे फाटक्या तुटक्या वस्त्रात बांधून त्याला दोन तीन गाठी देवून निघाला. तो हळू हळू द्वारकेत श्रीकृष्णाकडे आला. दुरून आपला लहानपणीचा मित्र बघून कृष्ण धावत गेला व त्यास मिठी मारली. थोडया गप्पा गोष्टी झाल्यावर माझ्यासाठी काय आणलेस म्हणून स्वतः शोध लागला. त्याचे वर्णन मोरोपंतांनी वरील आर्येत सुरेख केले आहे. लोकांच्या भव व धनाची गाठ सोडणारा तो कृष्ण सुदाम्याच्या बायकोने बांधलेली ती पुरचुंडीची गाठ स्वहस्ताने सोडून ते पोहे मिष्टान्नापेक्षा अधिक प्रेमाने खाउ लागला.

१६) समर्थावरील आर्या

द्विज सावधान ऐसे सर्वत्र विवाहमंगली म्हणती ।
ते एक रामदासे आयकिले, त्या असो सदा प्रणती।।
हुरडा घेता ताडी पाडी, देउनियाही जो गाळी ।
साधु इनाम करूनि दे शेत, सुता तातसा तया पाळी ।।
(संतवर्णनपर प्रकरणे )

अर्थ – सगळीकडे विवाहाचे वेळी 'शुभमंगल सावधान' असे म्हणतात. परंतु एकटया रामदासांनीच ते ऐकले व त्याप्रमाणे कृती केली. त्या रामदासांना नमस्कार असो. हुरडा खाल्यामुळे ज्या पाटलाने समर्थांना चाबकाचा मार दिला त्या पाटलास व त्यांचे मुलास ते शेत इनाम करून दिले त्या रामदासांना माझा नमस्कार असो.

१७) बोबडे बोल

ऐसे वदोनि कन्या रडवुनि रडे, तशा जवळूनि ।
खवळूनि उठे बालक, बोले हस्ते तृणास कवळून ।।
समजावुनि त्यास म्हणजे ऐसे लाह्लिलासी मालीन
का ललता । आललता, पलता, मी सागलात तालीन ।।
(आदिपर्व )

अर्थ – बोबडया मुलांना साजेशी मंजूळ शब्दरचना करण्याचे चातुर्य पंतामध्ये होते. घरातले एक मनुष्य बकासुरास अर्पण करावयाचे होते. पुरूष, कन्या, स्त्रिया चिंतातूर होवून शोक करीत होती. तोच लहान मुलगा खवळून उठतो आणि गवतास हातानी कवटाळून म्हणतो, 'मी याप्रमाणे बकासुरास आवळून मारीन, तुम्ही का रडता? का आरडता? का पळता? मी त्याला समुद्रात फेकून देईन'.

१८) गुरुशिष्य संवाद

'काय त्यागावे ? ते स्वामी ! सांगा अजाण त्यासा मज ।
'शिष्या ! अकार्य सारे टाकावे, हे मनी बरे समज ।।'
'स्वामी वैरी कोण ? 'छात्रा ! तो शत्रू अनुद्योग ।'
'ज्या उद्योगाभावे पावति विलयासि सर्व सुखभोग ।।'
'दारिद्रय कोण सांगा ? बहु पुसतो, की तुम्हा नसे रोष।'
'शिष्या! बरवे पुशिले, दरिद्रपण तेची असंतोष ।।'
'मित्र कवण हे सांगा, संशय न तुम्हाविना दुजा छेदी।'
'तो मित्र होय बापा! पापाचारात जो बुडो नेदी ।।'
'शल्य कोण असे? गुरो ! मरणापर्यंत ज्यामुळे ताप।'
'ते शल्य, नेत्र झाकुनि गेले असते सुगुप्त जे पाप ।।'
'यत्न करावा कोठे ? हे सांगा जी ! तुम्ही महा ज्ञानी । '
'शिष्या ! यत्न करावा विद्याभ्यासी, सदौषधी, दानी ।।'

अर्थ – याचा अर्थ इतका सोपा आहे की तो शब्दशः देण्याची जरूरी नाही, या संवादात प्रश्न विचारून त्याची उत्तरे दिली आहेत. यातील उत्तरांचा मतितार्थ थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे जे अकार्य आहे.वाईट कृत्य आहे, त्याचा त्याग करावा. अनुदयोग म्हणजे काहीही उदयोग न करणे, हा सर्वात मोठा शत्रू आहे. असंतोष, असमाधान हेच दारिद्रय होय. जो पापाचरणात बुडू देत नाही. त्यापासून सावरतो तोच खरा मित्र होय. डोळे झाकून दुस–याला न कळत केलेले जे पाप असते तेच शल्य होय. आपल्या मनाला ते सारखे खुपत असते. डाचत असते. विदयाभ्यास करणे, उत्तम औषधयोजना करणे व सत्पात्री दान करणे यासाठी नेहमी प्रयत्न करावा. तोच समाधान देणारा असतो.

१९) शब्दालंकार – अनुप्रास

देवि ! दयावती ! दवडिसी दासाची दुःख दुर्दशा दूर ।।
पापाते पलवितसे परमपवित्रे तुझा पयःपूर ।।

(गंगास्तुती)

अर्थ – एका वर्णाने आरंभ झालेल्या तीन किंवा तीनापेक्षा अधिक अक्षरांचा समुदाय एकत्र आला की चित्ताला चमत्कार वाटतो. या प्रकारच्या अनुप्रासाची उदाहरणे पंतांच्या पुर्वीच्या कवींनी विशेष योजलेली आढळत नाहीत. निदान पंतांनी याही सर्व कवींवर ताण केलेली आहे. हे निश्चित हे वरील आर्येवरून दिसून येते. गंगेला उद्देशून पंत म्हणतात, :'देवी तू दया करणारी आहेस. तुझ्या पायाशी आलेल्या दासांची दुःखे तु नाहीशी करतेस. तुझ्या पाण्याच्या पवित्र ओघाने सगळी पापेही वाहून जातात.

यमक

अनळसमीहित साधी राया । वारा महावीरा । कामा !
अनळस मी हि तसा धीरा । यावा रामही वराका मा ।।

हे यमकाच्या परमावधीचे एक उदाहरण आहे. येथे यमकांची हद्दच संपली आहे. दहा, बारा पंधरा अक्षरांची यमके साधून –हस्व, दीर्घ, अनुस्वारांकडेही पंतानी किती बारीक लक्ष दिले होते. व व्याकरण नियमांचे उल्लंघन होवू न देण्याविषयी त्यांनी किती खबरदारी घेतली आहे हे दिसून येते. वरील सुप्रसिध्द आर्या पांडवांचा छळ करण्यासाठी आलेल्या दुर्वास ऋषीस, द्रौपदीने श्रीकृष्णांचा धावा करून संतुष्ट करून परत लावल्यावर, धर्मास धीर देण्यासाठी श्रीकृष्णाने भाषण केले त्या प्रसंगातील आहे.

शब्दशः अर्थहे गंभीर पृथ्वीपते धर्मा, वारा जसे अग्नीचे वांछित पूर्ण करतो तसे तुला सहाय करण्यास मी सदैव तयार आहे. प्रसंग पडला तर बळीराम दादाही येतील. मग आम्ही दोघे आल्यावर रूक्मिणीच काय मोठी आहे ! तीही येईल तुझे मनोरथ पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वजण सर्वदा तत्पर आहोत.

२०) विचित्र रामायण

भावाब्धि सुकवी कविप्रिय करी, करीशतम हा महादय हरी ।
सुकीर्ति परमा रमाप मिरवी रवीडित महा महास्पंद नवी ।।

अर्थ : हे रामायण नावाप्रमाणे खरोखरच विचित्र आहे हे यातील रचनेवरून व ठळक शब्दावरून दिसून येते. हे विष्णूचे वर्णन आहे. त्याच्या शब्दशः अर्थपेक्षा यातील शब्दवैचित्राला विशेष महत्व आहे.

निरोष्ठ रामायण

श्रीहरि दशरथनंदन झाला दशकंठसंक्षय कराया ।
दर शेष चक्रही जनि घेती जगदखिल संकट हराया ।
सकानिष्ठ सरदार निघे चरणगति, तयासि तात धाडी ।
सारथि गंगा वरिता , त्यजि अजि ! निषाद खेदही झाडी ।।

अर्थ – ओठाला ओठ लागणारे प,फ,ब,भ,म, हे पाच वर्णन गाळून हे रामायण लिहीले आहे. खुशाल विडा खावून हे रामायण वाचावे. रामाच्या ऐवजी दशरथनंदन रघुनाथ असे शब्द वापरले आहेत. यात त्यांच्या बुध्दीचे चातुर्य दिसून येते.

२१) आर्येचे महत्व व स्वकवितेचे निंदक

ज्वरितासी शर्करा जसी कटू होय खलास सुरस ही कविता ।
शिष्टा पद्मा सुख दे, दुष्टा धूपास ताप दे सविता ।
आर्या आर्यासि रूचे, इच्या ठायी जशी असे गोडी ।
आहे इतरा छंदी गोडी, परि यापरीस ती थोडी ।।
(प्रश्नोत्तर रत्नमाला )

अर्थ : ताप आल्यावर ज्याप्रमाणे साखरसुध्दा कडू लागते त्याप्रमाणे दुष्ट लोकांना सुंदर कवितासुध्दा कटू वाटतात. सुर्योदयाबरोबर फुले उमलतात. परंतू धुके मात्र नाहीसे होवू लागते. आर्या ही सभ्य माणसास आवडते, कारण तिच्या ठायी अवीट गोडी आहे. इतर छंदात गोडी आहे. परंतु आर्याच्या गोडीची त्यास सर येत नाही.

२२) पंतांची वाचकास प्रार्थना

गीर्वाण शब्द पुष्कळ जनपदभाषाचि देखता थोडी ।
यास्तव गुणज्ञ लोकी याची घ्यावी हळूहळू गोडी ।।
प्राकृत संस्कृत मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कथा ।
भव–शीत–भीति–भीत स्वांताला दाविला बरा पंथा ।।
(मंत्र रामायण)

अर्थ : आपली भाषा प्राकृत संस्कृत मिश्रित आहे., अशी कोणी शंका घेईल म्हणून पंतांनी वरील आर्येत त्यास उत्तर दिले आहे. मी केवळ मराठी भाषेतच काव्य रचिले असते. परंतू मराठी भाषेत शब्दांचा भरणा पुरेसा नाही व गीर्वाण भाषेत शब्दसंग्रह मोठा आहे. म्हणून नाईलाजाने अशी मिश्र भाषा वापरली आहे. ही काव्ये हळू हळू वाचीत जा म्हणजे कालांतराने तिचा परिचय होवून ती कठीण वाटणार नाही. प्राकृत व संस्कृत शब्दांची सरमिसळ असलेली माझी कविता कोणाला कथा म्हणजे गोधडीही वाटेल पण आहे, भवशीत म्हणजे संसाररूपी थंडीला भ्यालेल्या मनुष्याच्या अंतःकरणाला हया माझ्या कवितारूपी कंथेने चांगला मार्ग दाखविला आहे. भवभय दूर करणारी माझी कविता आहे.

२३) पंताचे आपल्या काव्याविषयी विचार (प्राकृत भाषेची थोरवी)

रामाचे रचिले चरित्र मुनिने वाल्मिकीने संस्कृती ।
नाही हानि कदापि अन्य कविही ते वर्णिता प्राकृती ।।
मुक्तांचा रचिलाचि हार वाहिला जो रेशिमाच्या गुणे ।
तो कार्पासगुणे करूनि करिता काय प्रभेला उणे ? ।।

गीर्वाणे राघवाचे यश रसिकजना लागते फार मिष्ट ।
तैसे न प्राकृताने अचतुर म्हणती, मानिती ते न शिष्ठ ।।
पीता गोक्षीर, कार्तवस्वरमणिचषके देतसे जेवि गोडी ।
सारज्ञाला पालाशद्रुमदलपुटके सेविता न सोडी ।।

अर्थ – याचा अर्थ सहज समजण्यासारखा म्हणून थोडक्यात मतितार्थ दिला आहे. कविवर्य वाल्मिकींनी रामचरित्र संस्कृतात लिहीले आहे म्हणून इतर कवींनी ते मराठीत वर्णिल्यास काहीही हानी होणार नाही. मोत्याचा हार रेशमाच्या दो–याने गुंफला काय किंवा कापसाच्या दो–याने गुंफला काय त्याच्या तेजात काहीही फरक पडणार नाही. संस्कृतमध्ये रामचरित्र जितके गोड लागते तितकेच ते मराठीतही वाटते. गायीचे दुध सुवर्णाच्या रत्नखचित पेल्यातून घेतले असता जी गोडी लागते तीच गोडी पळसाच्या द्रोणातून घेतले तरी लागते थोडक्यात प्राकृत भाषेची थोरवी, महती यामध्ये पंतानी वर्णिलेली आहे.

२४) कृष्णार्जुनयुध्द

कृष्ण म्हणे राधेया ! भला बरा आजि स्मरसि धर्माते ।
नीच व्यसनी बुडता निंदिति दैवास न स्व–कर्माते ।
जेव्हा तू दुर्योधन दुःशासन शकुनि एक मति झाला ।
कैसे कपटे द्युतीं चित्तीही न धर्म लांघिता भ्याला ।।
जेव्हा सभेसि नेली पांचाली मानिले न मनी शर्म ।
तेव्हा गेला होता कोठे राधा सुता तुझा धर्म ।
फेडी वस्त्र सीतेचे जेव्हा उघडे करावया अंग।
गेला होता कोठे धर्म तुझा तेधवा वृषा सांग।।

(कर्णपर्व)

अर्थ : पृथ्वीने कर्णाचे रथचक्र गिळले तेव्हा तो खाली उतरून चाक काढण्याचा प्रयत्न करीत असता अर्जुन त्याचेशी युध्द करीत होता. त्यावेळी कर्ण अर्जुनास म्हणाला, 'मी रथचक्र काढीपर्यंत तु युध्द करणे क्षणभर बंद ठेव. मला संकटात पाहून युध्द करणे हा अधर्म होय' त्यावेळी कृष्ण वरील आर्यात कर्णास खोचदार उत्तर देतो. 'राधेया, (कर्णा) आजच तुला धर्माची आठवण बरी झाली. नीच संकटात बुडत असताना स्वकर्माला दोष न देता दैवास दोष देतात. जेव्हा तु दुर्योधन, दुःशासन शकुनी एक झालात आणि कपटाने द्यूत खेळलात तेव्हा धर्माचे उल्लंघन झाल्याची तुम्हाला भीति वाटली नाही. जेव्हा पांचालीला सभेत नेलेत तेव्हा शरम वाटली नाही. तिचे वस्त्र फेडून तिला उघडे केलेत तेव्हा तुला धर्माची आठवण झाली नाही आताच धर्माच्या गोष्टी सांगत आहेस.

२५) केकावली (भरतवाक्य)

सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो ।
कलंक मतीचा झडो, विषय सर्वथा नावडो ।
संदध्रि कमळीं दडो, मुरडिता हटाने अडो ।
वियोग घडता रडो, मन भवचरित्री जडो ।।

(श्लोक केकावली)

अर्थ – सज्जनांचा सहवास नेहमी लाभो. साधुजनांचा उपदेश ऐकायला मिळो. बुध्दीची मलिनता नाहीशी होवो आणि इंद्रिय उपभोगाचा पूर्ण वीट येवो. माझे मन संताच्या चरणकमळाच्या ठायी आसरा घेवो, तेथून त्याला माघारी वळविण्याचा प्रयत्न केल्यास ते हट्टाने तेथेच अडून बसो. संताच्या चरणकमलापासून त्यांची ताटातूट झाल्यास ते दुःखी होवो व अशाप्रकारे ते तुमच्या लीलाकथांच्या ठायी असाक्त होवो.

परिशिष्ट : आ

मोरोपंताच्या चरित्रातील ठळक गोष्टींची शकावली

शके १६३५पंताचे तीर्थरूप रामाजीपंत कोकणातून पन्हाळगडावर आले.
शके १६५१मोरोपंतांचा पन्हाळगडावर जन्म
शके १६६२रामाजीपंत बाबूजी नाईकांच्या आश्रयास गेले व मोरोपंत केशव पाध्ये व

गणेश पाध्ये यांचेपाशी संस्कृत शिकू लागले.
शके १६६५बारामती महाल शाहुने बाबुजी नाईकास दिला व बाबूजी नाईक बारामतीस राहण्यास आले.
शके १६७४मोरोपंत बाबूजी नाईकांच्या आश्रयास बारामतीस आले.
शके १६७४-८३ मोरोपंतानी संस्कृत काव्ये, नाटके, साहित्य, छंदशास्त्र इत्यांदीचे अध्ययन केले तसेच १०-१५ ग्रंथ स्वहस्ताने लिहून घेतले.
शके १६७५-८० मोरोपंतानी ब्रम्होत्तर खंड, कुशलवचरित मदालसाख्यान, हरिश्चद्राख्यान देवीमहात्म्य पुराणाधारे भाषांतररूप ग्रंथ रचिले सतींची गाणी (रूक्मिणीगीत सीतागीत, सावित्रीगीत ) स्वतंत्र रचिली. तसेच प्रल्हादविजय हे काव्य शके १६८० पौष शुध्द अष्टमीस संपविले.
शके १६७६मोरोपंतास प्रथम पुत्र रघुनाथ यांचा जन्म
शके १६८२मोरोपंताचा द्वितीय पुत्र रामकृष्ण यांचा जन्म व पंत चातुर्मासांत पंढरीस जावून आले.
शके १६८९माधवराव पेशवे बारामतीस बाबूजी नाईकांच्या येथे ४ दिवस पाहुणे होते.
शके १६८०-९४ या चौदा वर्षात पंतानी मंत्ररामायण, कृष्णविजय, अवतारमाला, वामनचरित्र, पृथुकोपाख्यान, भक्तभूषण, सुदामचरित्र, भीष्मभक्तिभाग्य, भागवती प्रकरणे तसेच संशयरत्नावली, साधुसत्कार, आयकिकावली, नामसुधाचषक, रामनामार्या, आर्यामुक्तामाला इ. स्फुट प्रकरणे व देव, संत व तीर्थक्षेत्रे यावरील स्तोत्रे रचिली. ही सर्व काव्ये अनंत पाध्यास दाखविली होती.
शके १६९५राघोबादांदाची कन्या दुर्गाबाई हिचे लग्न बाबुजी नाईकांचे मध्यम पुत्र पांडूरंगराय यांच्याशी माघ शुध्द पौर्णिमेस पुण्यास झाले. मोरोपंत माघ महिन्यात लग्नात नाईकांबरोबर पुण्यास होते.
शके १९९८भारताचे लेखन चैत्र पौर्णिमेपर्यत उदयोगपर्व संजययानपर्यत आले होते.
शके १६९९बाबूजी नाईकांनी बारामतीस पंताना घरवाडा बक्षीस दिला.
शके १६९३-१७०४ महाभारत रचनाकाल गीतार्या पुर्वार्ध ज्ञानदेवकीर्तन व अमृतमंथन यांची रचना
शके १७०२बाबाजी नाईक वारले
शके १७०३आषाढ वद्य नवमीपर्यंत शांतीपर्वाच्या भागापर्यंत भारत लिहून तयार झाले होते.
शके १७०४भारताची चातुर्मासात समाप्ती
शके १७०४-०७ महाद्विज्ञापना भागवत प्रकरणे मंत्रभागवत यांची समाप्ती
कार्तिक वद्य सप्तमीस शके १७०७ मध्ये मंत्रभागवत पुर्ण
शके १७०७-१० मोरोपंतानी पांडूरंगराय यांचे सांगणेवरून नाईकांच्या मुलांत विभक्तपणाचे तंटे चालले असता घाईघाईने हरिवंश लिहिला व रामायणे लिहीण्यास आरंभ केला
शके १७१०मोरोपंत कार्तिकात काशीयात्रेस गेले मोरोपंताचे पुत्र रामकृष्णपंत यास जगतापराव निंबाळकर व नरसिंगराव यांनी अनुक्रमे ३० व ६० बिघे जमीन
'पंत सत्पुरूष आहेत हे जाणून' इनाम दिली.
शके १७११ वैशाखात गयायात्रा, चातुर्मास काशीस राहून काशी, गंगा इ. स्तोत्रांची गंगावकिली विष्णूपदवकिली या वकिल्यांची व गंगा, काशी, तीर्थ शिव इत्यादी नामे साधून लिहीलेल्या
शके१७०७-१३ रामायणांची रचना
शके १७१२बहुतेक रामायणांची रचना
शके १७१५काशीयात्रा करून वैशाखात मोरोपंत बारामतीस परत आले.
शके १७१६केकावली, रामरीती इत्यादी काव्यांची रचना
चैत्र शुध्द पौर्णिमेस मंगळवारी सुर्योदयी मारूतीजन्मसमयी मोरोपंत रामरूप झाले.

# लोक-नागर रंगभूमीची सळसळती ऊर्जा !

– प्रा. डॉ.प्रकाश खांडगे

मराठी जनमानसाच्या समूहमनाचा गीत, नृत्य, नाट्यमय आविष्कार म्हणजे महाराष्ट्राच्या लोककला होत. प्रयोगात्मता हा लोककलांचा मूळ प्रकृतिधर्म आहे. लोककला हे लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. समूहमन आविष्कृत होते ते लोककला, लोककथा, लोकगीतांमधून. लोककला कालसंवादी, सहजस्फूर्त आणि उस्फूर्त असतात. पारंपरिकता हा या कलांचा गुणविशेष असतो. त्यामुळेच समग्र लोकसाहित्याला "बपमदबम वजितंकपजपवद' असे म्हटले गेले आहे.

भारतीय संस्कृतीत ईश्वरालाच मोठा रंगकर्मी मानले आहे. 'बहुरूपी रूपे नटला नारायण। सोंग संपादून जैसा तैसा।।' ईश्वराचे दहा अवतार अथवा त्याची विविध सोंगे, विविध रूपे ही लोकसंस्कृती आणि नागर संस्कृतीत संकीर्तनाचा विषय झाली आहेत. हे संकीर्तन केवळ गीतगायनातूनच नसते, तर नृत्य व नाट्यातूनही दृष्टोत्पत्तीस येते. धर्मश्रद्धा हा लोकनाटकाचा मूलाधार होतो हे लक्षात घेतल्याशिवाय आपणाला प्रयोगात्म लोककलांचा विचार करताच येणार नाही. लोकनाटकात धर्मश्रद्धा, देवदेवतांना प्राधान्य असते, किंबहुना देवदेवतांचे लौकिकीकरण हे लोकनाटकाचे प्रमुख अंग असते. लोकनाटकाची अधिक विस्तृत व्याख्या करताना पाश्चात्य लोकसाहित्य विशारदांनी म्हटले आहे – 'ैंदबजपवदमक इल उलजी ंदक हनपकमक इल `चपतपजनंस पे ूवतीपचचमक इमवितम ं चंतजपबनसंतपदह ंदक कंदबपदहए चनचचमज चसंलेए उंपदह चसंलेए `जपसज कंदबपदहए जीम बंततलपदह ंज ं संतहम बंतअपदह व` मितजपसपजल पिहनतम'

आपल्याकडील कृषी – संस्कृतीतील सुफलीकरणाचे विधी, देवदेवतांचे मखोटे घालून होणारे पंचमी, बोहड्याचे खेळ, काष्ठ्यपांचालिका अथवा कळसूत्री बाहुल्यांचे खेळ या सर्वांचा अंतर्भाव लोकनाटकात करता येईल.

भक्ती, प्रबोधन आणि रंजन अशा तीन पातळ्यांवर महाराष्ट्रातील लोकनाटकाने जनमानसावर आपला प्रभाव पाडला असून महाराष्ट्रातील लोकनाटकांचा किंवा प्रयोगात्म आविष्कारांचा आढावा जर आपण घेतला तर भक्ती, प्रबोधन आणि रंजन या तीन सूत्रांनी सहज हे प्रकार गुंफता येतात. आदिवासी, ग्राम आणि नागर हे आपल्या समाज जीवनाच्या उत्क्रांतीचे तीन प्रमुख टप्पे आहेत. या तीनही टप्प्यांवर लोकनाटक किंवा प्रयोगात्म लोककला आविष्कृत होताना दिसतात.

महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाद्वारे आविष्कृत झालेल्या भक्तिनाट्यापूर्वी आपणास यातुक्रिया किंवा यात्वात्मक क्रियांमधून आविष्कृत झालेल्या विधिनाट्यांचा विचार करावा लागेल. आदिवासी संस्कृती आणि ग्राम संस्कृतीत या विधीविधानांचे आपले एक विश्व असून बोहडा, चैती, आखाडी, पंचमी, गोंधळ, जागरण, भराड आदी विधिनाट्यांनी मराठी लोकधर्मात आपला स्वतंत्र ठसा उमटविल्याचे निदर्शनास येते. देवतावरण, देवतेचा संचार, देवतेच्या लीला, देवतेचे निर्गमन या लोकश्रद्धेतून विधिनाट्याची निर्मिती होते. 'विधी' नाट्यात्म असतो म्हणून त्याला विधिनाट्य म्हणायचे. कोकणातील दशावतार, खेळे, नाशिक–मालेगाव तसेच खानदेशातील काही भागातील भवाडा, मराठवाड्यातील पंचमी, ही विधिनाट्ये म्हणजे देवतावतराची विविध रूपे होत.

प्रतिवर्षी गावात देव अवतरतो. हा देव मुखवट्यांच्या रूपाने पूजनीय असतो. गावातून या मुखवट्यांची वाद्यांच्या गजरात मिरवणूक निघते. काही ठिकाणी त्याला छबिना म्हणतात. लोक मोठ्या श्रद्धेने ह्या अवतरलेल्या देवाच्या पाया पडतात. त्याच्यापुढे दंडवत घालतात. त्याला साकडे घालतात. देवाचा कोप आणि देवाचा संतोष ह्या धर्मश्रद्धेपोटी लोकमानसात या अवतरलेल्या देवाबद्दल एक भीतीयुक्त श्रद्धा असते. आखाडी, पंचमी, चैती अशा विविध नामाभिधानांनी लोकमानसात स्वतंत्र ठसा उमटविलेल्या या विधिनाट्यात देवतेची सोंगे, देवतेचे मुखवटे पूजनीय असतात. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक गावात सोंगे काढण्याची परंपरा आहे व ग्रामोत्सवातील अविभाज्य अंग म्हणून सोंगाकडे पाहिले जाते. ही सोंगे सर्व गावाला पूजनीय असतात. ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, वाडा आदी आदिवासीबहुल तालुक्यांमध्ये बोहड्याची परंपरा आहे. हे बोहडे म्हणजे विविध देवदेवतांची सोंगे होत.

खानदेशात भवाडा प्रचलित असून त्यात देवदेवतांची सोंगे सजवून रस्त्यावर आणतात. मशालीच्या प्रकाशातील ही सोंगे ठायी ठायी मिरवून नेतात, त्यावेळी पदे व संवादही म्हणतात. 'पंचमी' हे विधिनाट्य पूर्वरंग आणि उत्तररंगात सादर होते. सूत्रधार, त्याचे साथीदार, गणपती, सरस्वती, विदूषक अशी क्रमाक्रमाने सोंगे येत राहतात. जोगी, गोसावी, भाट, भगत अशा सोंगांनी अखंड रात्र जागविली जाते. म्हणूनच 'रात्र थोडी सोंगे फार' अशी स्थिती निर्माण होते. सामाजिक वैगुण्यांचा समाचार घेणारी काही लौकिक सोंगे हसता हसता नकळत चिमटे काढून जातात. दंभस्फोट हा लौकिक सोंगांचा प्रमुख उद्देश असतो. सत्यनारायणाची पूजा सांगणारा ब्राह्मण विष्णुसहस्त्र नामात अन्य नावे कशी घुसडतो. मेंडशी जोशी खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करणारे भविष्यकथन कसे करतो, आंधळे, बहिरे, मुके हे यात्रेच्या ठिकाणी प्रत्यक्षात तसे व्यंग नसताना कसे यात्रेकरूंना लुबाडतात. या व अशा अनेक लौकिक सोंगांमधून दंभस्फोट केलेला आढळतो. पंचमीसारखे विधिनाट्य असो अथवा ललितासारखे भक्तिनाट्य असो 'हित व्हावे तरी दंभ दुरी ठेवा' हा भागवत, संप्रदायी संतांचा विचारच त्यातून दृष्टोत्पत्तीस येतो.

पंचमी, ललितासारख्या प्रयोगात्म लोकाविष्कारांचे स्वरूप दुपेडी असते. 'तुज मज नाही भेद केला सहज विनोद' असा संवाद भगवत भक्तांनी ईश्वराशी केला असल्याचे ईश्वराच्या संकीर्तनासोबत ईश्वराची सोंगे आणली जातात. ईश्वराशी सहज विनोद करताना मग श्रीगणेशाला ''ढेरपोट्या'' अथवा सरस्वतीला ''पिसं लावलेली कोंबडी'' म्हणण्याचे स्वाभाविकच स्वातंष्य भक्तांनी घेतलेले असते. गणपती, सरस्वती, ऋद्धी-सिद्धी या सोंगासोबतच भालदार, चोपदार, छडीदार अशी ईश्वर-उपासकांची सोंगे हा झाला धार्मिक भाग.

अभिजन विरूद्ध ग्रामजन, संपन्न विरूद्ध विपन्न, पाखंडी विरूद्ध सश्रद्ध, वैदिक कर्मकांडी विरूद्ध सगुणोपासक नामसंकीर्तनकार, नागरी विरूद्ध ग्रामीण अशा संवाद विरोधातून रात्रभर सोंगांच्या रूपाने सुरू असलेल्या पंचमी, ललिताने आज मात्र आपला चेहरामोहरा गमावला असल्याचे दिसत आहे. गावगाडा आणि गावगाड्याबाहेरील जगताचा सांस्कृतिक परिघ बदलल्याने या कला प्रकारांचे कालसंवादी स्वरूप लोप पावत चालले आहे. आज खेड्यापाड्यांतून ललीत, पंचमी, बोहडा, भवाडा होत असेल; पण ते आपले सांस्कृतिक अवशेष (ब्नसजनतंस त्मसपबे) आहेत असेच म्हणावे लागेल.

खंडोबा, अंबा, भवानी, रेणुका आदी शिव-शक्तीरूपातील विविध क्षेत्रपाल देवतांचे एक वेगळेच संस्कृती-परिमंडळ असून या देवदेवतांच्या विधिनाट्यांनी आजवर लोकसंस्कृतीच्या चलनवलनात आपला चेहरामोहरा टिकवून ठेवला आहे. गोंधळ, जागरण, भराड आदी विधिनाट्ये आजही खेड्यापाड्यांतून व शहरांतूनही कुलाचारांसोबत सुस्थिर आहेत. खंडोबाचे जागरण, अंबेचा, रेणुकेचा गोंधळ व भैरवनाथाचे भराड लग्न, मुंजीसारख्या मंगलप्रसंगी करण्याचे कुलाचार, कुलधर्म आहे.

पाच उसांच्या मखरात प्रतिकात्मक देवदेवतांची स्थापना करून दीप, दिवटी पाजळून रात्रभर खंडोबाचे संकीर्तन जागरणाच्या रूपाने तर अंबा, रेणुकेचे संकीर्तन गोंधळाच्या रूपाने होते. वाघ्ये व मुरळ्या हे खंडोबाचे उपासक तर कदमराई, रेणुराई गोंधळी हे अंबा भवानी व रेणुकेचे उपासक.

गोंधळी रेणुकापुत्र परशुरामाला पहिला गोंधळी मानतात. गोंधळ हा दक्षिण भारतातील अतिप्राचीन देशी नृत्यप्रकार असून त्यात लोकदेवतेचे व भगताचे उन्नयन होत गेले. संबळ, तुणतुणे, मंजिरी या वाद्यांच्या साथीने सादर होणाऱ्या गोंधळाचे दोन प्रमुख प्रकार होत. कदमराई गोंधळी म्हणजे तुळजापूरच्या भवानीचे उपासक आख्यानाचा गोंधळ सादर करतात. त्याला 'हरदासी गोंधळ' असेही म्हणतात. गण, गवळण, आख्यान, आरती असा कदमराई गोंधळ्यांनी सादर केलेल्या आख्यानाच्या गोंधळाचा आविष्कारक्रम असतो. रामायण, महाभारत, पुराणातील कथा आख्यानपर काव्याच्या रूपाने गोंधळी सादर करतात. चौका-चौकांच्या पदांचे गायन, गायनातच मधूनच सपादणी, संवाद व निरूपण असे गोंधळाचे स्वरूप असते. कदंबांच्या काळापासून गोंधळ महाराष्ट्रात प्रचलित असून कोल्हापूर, माहूर, तुळजापूर, पुणे, सातारा, सांगली, मराठवाड्यातील औरंगाबाद, परभणी, बीड आदी परिसरात रेणुराई व कदमराई गोंधळ्यांची परंपरागत घराणी आहेत. 'गोंधळ' या विधिनाट्याने प्रायोगिक रंगभूमीलाही समर्थ योगदान दिले आहे. गोंधळ हे विधिनाट्य बाराव्या-तेराव्या शतकातही इतके लोकप्रिय होते, की भागवत -संप्रदायी संतांनी 'गोंधळ' हे विधिनाट्य व 'गोंधळी' ह्या लोकसंस्कृतीच्या उपासकांवर अनेक रूपके केली आहेत.

सुदिन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ
पंचप्राण दिवट्या दोन्ही नेत्रांचे हिल्लाळ
तू विटेवरी सखये बाई करी कृपा

आदी रचना आपण पाहिल्या तर गोंधळाची लोकप्रियता लक्षात येते. 'गोंधळा' सारखेच

वाघ्या मुरळ्यांनी सादर केलेल्या 'जागरण' या विधिनाट्यालाही मराठी लोकधर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. खंडोबाचे नामसंकीर्तन करणाऱ्या वाघ्यामुरळ्यांवर ही भागवत् संप्रदायी संतांनी अनेक अभंगरूप रूपके रचली आहेत.

।। अहं वाघ्या सोहं वाघ्या प्रेम नगारा वारी।।
।। मी निःसंग मुरळी झाले। या मालुचे घर रिघाले।।

या व अशा अनेक रचना उपलब्ध आहेत. मराठी लोकधर्मात वाघ्यामुरळ्यांचा उल्लेख शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर, मध्वमुनीश्वर, निरंजन रघुनाथ, चैतन्य महाप्रभू, बसवेश्वर आदी संतांनी अधःपतित लोकदीक्षितांच्या स्वरूपात केला असला व मुरळी म्हणजे 'अनाचाराचे घर चालविणारी' असे म्हटले असले, तरी 'लोकसंस्कृतीचे उपासक' म्हणून त्यांना खंडोबा भक्तांनी वंदनीयच मानले आहे. 'उग्गय' या कानडी शब्दापासून 'वाघ्या' शब्दाची उत्पत्ती झाली असून कुष्याप्रमाणे भुंकणारा अथवा व्यर्थ बडबड करणारा असा त्याचा अर्थ लावला जातो. खंडोबाला कुत्रे प्रिय म्हणून वाघ्यानेही स्वतःला श्वानस्वरूप मानले तर त्यात नवल नाही.

पूर्वरंग व उत्तररंग अशा दोन भागात जागरण रात्रभर सुरू असते. पूर्वरंगात गण, नमन, देवदेवतांना रंगस्थळी येण्याचे आवाहन, गवळण, स्फुटपदे असा प्रयोगात्म आविष्कार असून उत्तररंगात खंडोबा अथवा खंडोबाच्या परिवार देवतांचे आख्यान लावले जाते. नाट्यरूपाने सादर होणारे आख्यान रात्र

सरता सरता संपते. पहाटे पहाटे लंगरतोड, आरती हे विधी होऊन जागरण संपते. लग्न, मुंजीसारख्या मंगल प्रसंगी जागरण घालण्याचा कुळधर्म आहे.

जागरणाला पुरातन काळचे नाटक म्हणूनही संबोधले जाते. खंडोबाच्या अवताराची कथा, खंडोबा–बाणाईचे लग्न, खंडोबा–म्हाळसेचे लग्न, खैरे भक्तांची कथा, अशी वेगवेगळी आख्याने म्हणजेच अभिनित कथा जागरणात सादर होतात. मराठवाडा, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रात जागरणाचा अधिक प्रभाव असून कानड्या विठ्ठलासारखा कानडा मल्हारी म्हणजे पश्चिम महाराष्ट्र व कर्नाटकाच्या संस्कृती–संगताचा महत्त्वपूर्ण अनुबंध होय. जेजुरी, पाली, दरवडी निमगाव, शेगूड, नळदुर्ग, सातारे, आदिमैल्लार ही खंडोबाची जागृत देवस्थाने मानली जातात. या परिसरांत वाघ्या–मुरळ्यांना लोकदीक्षितांसारखे महत्त्व असते. वाघ्या–मुरळ्यांनी सादर केलेल्या जागरणाने आपल्या आध्यात्मिक उद्बोधनासोबत लोकरंजनाची ही परंपरा सांभाळली आहे. म्हणूनच तमाशा व आजच्या प्रायोगिक रंगभूमीनेही जागरणात शक्तिस्थळे शोधली. ''इंडियन नॅशनल थिएटर लोककला संशोधन केंद्र'' या मुंबईतील संस्थेने ''जागरण'' विधिनाट्यावर मूलगामी संशोधन करून ''खंडोबाचं लगीन'' हा नाट्यप्रयोग १९७९ साली सिद्ध केला. हैबती, बापू वाघ्या, रंगू वाघ्या, सगनभाऊ, दगडू साळी, हरिभाऊ साळी आदी रचनाकारांनी खंडोबाची पदे रचली. अलीकडील काळात शंकरराव धामणीकर जाधव यांनीही खंडोबाची अनेक पदे व कथा यांची रचना केली.

जागरण या विधिनाट्याची भुरळ आजही मराठी जनमानसावर आहे हेच खरे ! ''जागरण'' या विधिनाट्यावर तसेच खंडोबा या लोकदेवतेच्या वाघ्या–मुरळ्या या उपासकांवर जर्मनीच्या हॅडलबर्ग विद्यापीठातही संशोधन सुरू आहे. पुण्याच्या माणिकबाई भगवानराव रेणके, धामणी जि. पुणे येथील पारंपरिक वाघ्ये शंकरराव धामणीकर, म्हाळसाबाई चकटे पिंपळगाव (जि. पुणे), नामदेव सोनावणे (शेल–पिंपळगाव, जि. पुणे), पंढरीनाथ वाळके (बेलापूर, श्रीरामपूर, जि. नगर) आदी कलावंतांनी या विधिनाट्याला प्रतिष्ठा दिली असून सांगली येथे १९८० साली वाघ्या–मुरळ्यांच्या परिषदेचेही आयोजन करण्यात आले होते. 'देवदासी' प्रथेतील अनिष्ट बाबींचे उच्चाटन करून 'जागरण' लोकपरंपरेचे उन्नयन करण्याचे कार्यही आजवर झाले असून इतिहास संशोधन ग.ह.खरे, शं. बा. जोशी, संत साहित्य आणि लोकसाहित्याचे गाढे संशोधक डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे, लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक सरोजिनी बाबर, डॉ. प्रभाकर मांडे यांच्या विविध ग्रंथांतून या कलेचे साक्षेपी संशोधन झाले आहे. भारतीय लोकसंस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या डॉ. गुंथर सोंथायमर या जर्मनीतील संशोधकांनीही वाघ्या–मुरळ्यांवर मूलगामी संशोधन केले आहे.

जागरण, गोंधळासारखेच 'भराड' हे विधिनाट्यही पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात सर्वपरिचित असून भैरवनाथाचे उपासक हे विधिनाट्य सादर करतात; पण त्याचे स्वरूप विधिगीतांचे असते. नाट्याचा भाग अल्पांशाने असतो. भैरवनाथ, कानिफनाथ आदी शिव संप्रदायातील देवतांचे संकीर्तन भराडाद्वारे होते. डमरू, डौर ही वाद्ये भराडाची शिव संप्रदायाशी सांगड घालणारी आहेत. भराडातील एक पद पाहा–

शिव भैरव काशीचा बोला।
चांग भला आता चांग भला।

पंचमी, बोहाडा, आखाडी यासारखी संचारित नाट्ये, अभिचार–नाट्ये तसेच गोंधळ जागरणासारखी विधिनाट्ये आजही कालौघात टिकून आहेत. कारण विधिसंबद्धता आणि धर्मश्रद्धा यांचा या विधिनाट्यांशी अतूट धागा असतो.

डक्कलवारांचे जातिपुराण, स्मशान जोड्यांचे कथाकथन, चित्रकथ्यांचे सचित्र कथाकथन, धनगरांचे सुंबरान, वासुदेव, पांगुळ यांचे गीत संकीर्तन या सर्वांचे कलाविश्व असते. आजही या लोकपरंपरा महाराष्ट्राला परिचित आहेत.

बाराव्या–तेराव्या शतकात संपूर्ण भारतात जी आध्यात्मिक क्रांती झाली व नामसंकीर्तनपर सगुणभक्तीचे वारे वाहू लागले, त्यात महाराष्ट्रातील संतांच्या मांदियाळीचे अपूर्व योगदान होते. भक्तिनाट्याचा उगम याच कालखंडात झाला. देव आणि भक्त यांचे तादात्म्य हा भागवत संप्रदायी संतांच्या आध्यात्मिक शिकवणुकीचा केंद्रबिंदू होता. त्यामुळेच संतांनी देवाशी संवाद साधताना ''तुज मज नाही भेद। केला सहज विनोद'' असे म्हटले आहे. ''बहुरूपी रुपे नटला नारायणा। सोंग संपादून जैसा तैसा।'' बहुरूपी नटलेल्या नारायणाचे संकीर्तन व त्याच्या विविध लिलांची सोंगे संत आणि भगवत भक्तांनी प्रमाण मानली. त्यातूनच दशावतार, ललित, भारूड आदी भक्तिनाट्यांचा उगम झाला. कोकणात दशावताराची परंपरा असून पूर्वरंगात संकासुर, भटजी, सूत्रधार, गणपती, ऋद्धी–सिद्धी अशी पात्रे येतात. तर उत्तररंगात रामायण, महाभारत, पुराणांमधील आख्यान रंगते. दशवताराचे आख्यान रंगताना आपणास एखाद्या पौराणिक संगीत नाटकाची आठवण होते. दशावतारातील स्त्रीपात्रे पुरुषच सादर करतात. दशावतारातील पेटारे, ज्यात वेगवेगळे मखोटे घेऊन कोकणातील दशावतारी कलावंत जत्रांच्या म्हणजेच ग्रामोत्सवांच्या मोसमात गावोगाव भटकंती करतात. समर्थ रामदासांनी ''खेळता दशावतार नेटका'' असा उल्लेख केलेला आहे. बाबी नालंग, मोचेमाडकर, वालावलकर, पार्सेकर आदी दशावतारी कंपन्यांनी या कलेला लोकमान्यता व राजमान्यता मिळवून दिलेली आहे. दशवतारात पेटाऱ्याचे पूजन होते व दशावतारी खेळाची भूमी नारळ, लिंबू आदींनी अभिमंत्रित केलेली असते.

कोकणातील दशावतार व पश्चिम महाराष्ट्रातील ललितात खूपच साम्य असते. ही दोन्ही भक्तिनाट्ये आहेत. ललितातही गणपती, ऋद्धी–सिद्धी, सरस्वती, सूत्रधार, भटजी, गावपाटील आदी सोंगे असतात. नवरात्रात देवी सिंहासनारूढ झाली असे समजून तिच्यापुढे ललित सादर होते. ललितात रात्रभर सोंगे येतात. रात्र सरते पण सोंगे सरत नाहीत. भालदार, चोपदार, छडीदार ही सोंगे ईश्वराच्या दहा अवतारांचा महिमा गातात. वासुदेव, वाघ्या–

मुरळी, गोंधळी, काशी कापडी, जोशी, बाळसंतोष, गावदिंडीगान, राजदिंडीगान, गावभाट, राजभाट आंधळे, सौरी, मुंढा आदी सोंगे रात्रभरात सादर होतात. सद्गुरू देवा प्रसाद देई झडकरी या प्रसादगाण्याने ललिताची सुरूवात होते. संत एकनाथांची भारूडेही ललितात सादर होतात. ललितातून यादवकालिन समाजजीवनाचे व धार्मिक जीवनाचे यथार्थ दर्शन होते. ''ललिते ही भक्तिनाट्येच होत. सांगली संस्थानात तसेच पुणे जिल्ह्यातील पिंपळगाव (ता. जुन्नर), उंब्रज (ता. जुन्नर) येथे अद्यापि ललिताची परंपरा आहे. वारकरी संप्रदायाचा प्रभाव असणाऱ्या अनेक गावांमधून आजही ग्रामोत्सवात कीर्तन सप्ताहाच्या समाप्तीला ललित सादर होते.

देहभान विसर्जित होऊन ईश्वराच्या विविध रूपांचा अथवा सोंगांचा ध्यास भगवत् भक्तांना लागतो, तेच ललित होय. गावगाड्यातील बाळसंतोष, पिंगळा, वासुदेवापासून तो सौरी कैकायी, कोल्हाटी, जोशी आदी गावगाड्याबाहेरील संस्कृतीचा परीघ ललितातून दृग्गोचर होतो. शहरीकरण, औद्योगिकीकरणाने गावगाड्याचा आणि गावगाड्याबाहेरच्या सामाजिक, सांस्कृतिक अनुबंधाचा धागा निखळला असल्याने ललितासारखे भक्तिनाट्य कालौघात लव्हाळासारखे सांस्कृतिक अवशेषरूपाने टिकून आहे.

संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथांची भारुडे, पंढरपूर-आळंदीच्या वारीत दिंड्या-पालख्यांमधून म्हणण्याची तसेच अभिनित रूपात सादर करण्याची प्रथा आजही सुरू आहे. हीच भारूडे मखोटे व वेशभूषेद्वारे अभिनित होतात तेव्हा त्या प्रकाराला सोंगी भजन म्हणतात.

रंजनप्रधान कला-तमाशा, खडी गंमत

विधिनाट्य आणि भक्तिनाट्याच्या स्वतंत्र परंपरेप्रमाणेच 'तमाशा' या विशुद्ध रंजनपरंपरेने मराठी लोकसंस्कृतीवर आपला स्वतंत्र ठसा उमटविला असून तमाशापूर्व कलगीतुऱ्याच्या आध्यात्मिक शाहिरीने तसेच नंतरच्या काळातील प्रबोधनात्मक शाहिरीने म्हणजेच राष्ट्रीय शाहिरीने इथले लोकमानस घडविले आहे. लिंगायत कोष्टी समाज हा प्रामुख्याने कलगीतुऱ्याची आध्यात्मिक शाहिरी सादर करायचा. दांगट शाहिरांची स्वतंत्र गानसरणी शाहिरीकलेत ठसा उमटवून गेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आगीनदास, तुळशीदास आदी शाहिरांचा यथोचित गौरव झाला आहे. हातात चांदीचा तोडा आणि बसायला घोडा देऊन शाहिरांचा राजदरबारी गौरव झाला आहे.कविराज शिवभूषण यांचेही उदाहरण सर्वपरिचित आहे. पेशवाईत तर तंत शाहिरांची झळाळती मांदियाळीच होती. राम जोशी, सगनभाऊ, होनाजी-बाळा, प्रभाकर, हैबती आदी शाहिरांनी आध्यात्मिक कूटरचनेसोबत शृंगारिक लावण्याही रचल्या. उत्तरपेशवाईत विलास व शृंगाराचा अतिरेक झाला असा प्रवाद आहे. संत, पंत आणि तंताचे योगदान महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उभारणीत अपूर्व आहे. इ.स. १८४३ मध्ये विष्णुदास भावे यांनी सांगली मुक्कामी 'सीतास्वयंवर' नाटकाच्या रूपाने मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली. याच कालखंडात मराठी भूमीत तमाशा रुजला. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि अठराव्या शतकाच्या प्रारंभी लावणी रचना होत होती; पण १८५० च्या सुमारास सांगलीजवळील भिलवाडी गावी उमाबाबूंनी 'मोहनाबटाव' हा वग रचला व हाच काळ तमाशाचा उदयाचा काळ मानला जातो. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आदी प्रदेशात कलगी-तुऱ्याची परंपरा होती. या कलगी-तुऱ्याच्या परंपरेपासूनच पुढे तमाशा आणि खडी गंमत हे प्रकार विकसित झाले. खडी गंमत हा रंजनप्रधान लोककला प्रकार प्रामुख्याने विदर्भातील असून तेथील खडी गंमत पथकाची कलगी-तुऱ्हा ही घराणी आहेत. या पथकांचे भगवे निशाण, निळे निशाण, तिरंगा निशाण अशी निशाणे आहेत. तमाशात जसा ढोलकी-हलगी सलामी, गण, मुजरा, गौळण, बतावणी, लावणी आणि वग, भैरवी असा आविष्कारक्रम असतो. त्याच प्रमाणे खडी गंमती मध्ये बैठागण, खडागण, गौळण, लावणी आणि उत्तर रंगात एखाद्या विषयावर गंमत सादर केली जाते. खडी गंमत याचा अर्थ उभे राहून लोकांचे रंजन करणे व त्यातून लोकप्रबोधन करणे. विदर्भामध्ये खडी गंमतीचे दोनशेहून अधिक संच आहेत.

मराठी रंगभूमी आणि लोकरंगभूमी यांचे अतूट नाते आहे. लोकरंगभूमीने मराठी रंगभूमीला आजतागायत आशय आणि शैलीच्या अंगाने बरेच काही दिले. तमाशातील मुक्तपणा आणि नाटकाचा बंदिस्तपणा घेऊन महाराष्ट्र शाहीर साबळे यांनी 'कशी काय वाट चुकलात?', 'आंधळं दळतंय', 'बापाचा बाप', 'माकडाला चढली भांग' आदी मुक्तनाट्ये लिहिली, त्या दरम्यान अण्णाभाऊ साठे , गव्हाणकर, अमरशेख आदींनीही लोकनाट्ये सादर केली. किंबहुना लोकनाट्य या संकल्पनेचे जनकच मुळात अण्णाभाऊ साठे आहेत. दादा कोंडके यांची 'विच्छा माझी पुरी करा', पु.ल. देशपांडे यांचे 'पुढारी पाहिजे', शंकर पाटील यांचे 'कथा अकलेच्या कांद्याची', व्यंकटेश माडगुळकरांचे, 'पती गेले गं काठेवाडी', दादू इंदुरीकरांचे 'गाढवाचं लग्न' आणि त्यानंतर १९७८ पासून इंडिअन नॅशनल थिएटर, लोककला संशोधन विभाग यांच्या तर्फे आलेले 'खंडोबाचं लगीन', 'दशावतारी राजा', 'वासुदेव सांगती', 'अबक दुबक' आदी नाटकांमुळे लोकजागर रंगभूमी नावाची वेगळी रंगभूमी प्रस्तापित झाली.

'घाशिराम कोतवाल', 'हयवदन', 'अजब न्याय वर्तुळाचा', 'झुलवा', 'विठो रखुमाय' आदी प्रायोगिक रंगभूमीच्या संकल्पनेखाली मोडणाऱ्या नाटकांनी लोककलांच्या मुक्तशैलीचा अतिशय चपखल वापर केला. लोककलांनी मराठी रंगभूमीला सतत ऊर्जा दिली. हे नाकारता येणार नाही.

• • •



# पडले सावरले

– विठ्ठल मणियार

''अरे शरद, मी कॉलेजच्या स्नेहसंमेलनासाठी एक नाटिका लिहिली आहे. ७–८ पात्रांची ही नाटिका तुम्ही करावी''. एन.डी.आपटे सर सांगत होते. नेहमीप्रमाणे संध्याकाळी आमचा कंपू कॅफे मद्रासवर (आत्ताचे रुपाली) जमला. साहेबांनी नाटिका करण्याचा प्रस्ताव मांडला. स्टेजवर कधीही न गेलेलो आम्ही, एक नवीन धाडस करण्याचा निर्णय घेतला. नाटिकेचे नाव होते 'साप' !

गावातल्या मुलाला साप चावतो अन् गावातला प्रत्येकजण त्या घरात येऊन सापाबद्दल आपल्यालाच कळतं अशा थाटात सल्ला देत असतो. बहुतांश सल्ले अर्थातच सर्पदंशावरील 'रामबाण' आणि देशी होते. गावचा समजूतदार नेता मात्र परोपरीने सर्वांना विनवत असतो की सर्पदंशावर 'हे' उपाय कामाचे नाहीत. डॉक्टरकडेच त्या मुलाला न्यावे लागेल, हे तो त्यांना पटवून देतो, हा या नाटकाच्या कथेचा गाभा.

गावातल्या समजूतदार नेत्याची भूमिका साहेबांकडे होती. साहेब, अभय कुलकर्णी, विजय शहा, मी आणि इतर काही मित्रांनी मिळून नाटिका करण्याचा निर्णय घेतला. त्याच वेळेस नाटिकेत काहीही 'भूमिका' नसणारे आमचे काही इतर मित्र बाहेर एक वेगळंच नाटक ठरवत होते. आम्ही स्टेजवर आलो की, आरडाओरड करुन नाटिका पाडावयाची, असे त्यांनी ठरवले. अर्थात, त्यांनी रचलेली 'संहिता' आमच्यापासून पूर्ण लपून राहिली नाही आम्हाला सुगावा लागलाच.

स्नेहसंमेलनाचा दिवस उजाडला. छोटे मोठे ३–४ कार्यक्रम झाल्यानंतर आमचा नंबर होता. आम्ही मेकअप रुममध्ये आपापल्या वेषभूषेसह तयार होतो. खूप तयारी केली होती. भूमिकेत शिरण्याचा प्रयत्न सुरु होता. मेकअपनंतर आम्ही विद्यार्थी आहोत हेही ओळखावयास येत नव्हते. इतके की, मी विंगेत उभा नसताना मला मांडववाला समजून प्र.चिं.शेजवलकर सरांनी , स्टेज नीट बांधले ना, म्हणून विचारलेदेखील ! (माझ्या वेशभूषेची ती कमाल होती).

नाटिका पुकारली गेली. विजय शहा आणि माझी एण्ट्री झाली. तोपर्यंत ठीक चालले होते. साहेब आणि अभय कुलकर्णी येताच आमच्या मित्रांकडून टाळ्या 'पडल्या' आणि गोंधळाला सुरुवात झाली. अभय मिस्कील स्वभावाचा होता. नाटिकेतील वाक्ये बाजूस ठेवून ए गवळ्या, थांब तुझ्याकडे बघतो....'' ''ए , संध्याकाळी तुम्हाला बघून घेतो'' असे सहितेत नसणारे संवाद फेकण्यास त्याने सुरुवात केली. नाटिका जवळपास पडायला आली होती. नाटिका बसविण्यासाठी बरेच कष्ट घेणारे आपटेसर हवालदिलच झाले होते.

पडदा टाकण्याची सूचना दिली होती. इतक्यात प्राचार्य माळवणकर सरांनी स्टेजवर एण्ट्री घेऊन विद्यार्थ्यांना शांत राहण्याचं आवाहन करुन नाटिका सावरली. नाटिका पुन्हा सुरु झाली. आम्ही आमच्या भूमिका उत्कृष्टपणे वठविल्या. नाटिकेस पुरस्कारही मिळाला.

नाटिकेच्या आरंभी झालेला 'कौतुकाचा वर्षाव' इतका होता की , मी पुन्हा अभिनयाचं नावच घेतलं नाही !
माझ्यासारखेच इतरांचेही झाले. अपवाद फक्त साहेबांचा. नाटिकेत त्यांनी समजूतदार नेत्याची भूमिका बजावली होती. पुढे राजकारणात गेल्यावर त्यांनी ते चोख केले. 'नेता हा अभिनेता असावा लागतो' असे म्हणतात. इथे अभिनेत्याचा नेता झाला आहे. सारांश काय काढायचा...

विठ्ठलनामा मधून.....

• • •

# 'झिम्मा'

– विजया मेहता

' झिम्मा '. हा आहे कॅलिडोस्कोप ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या आयुष्याचा... बाईच्या आत्मशोधाचा , कारकिर्दीचा. ' राजहंस ' प्रकाशनातर्फे  नोव्हेंबर रोजी प्रकाशित होत असलेल्या विजया मेहता यांच्या ' झिम्मा ' या आत्मचरित्रातील एक प्रकरण...

दळवींचं ' अंधाराच्या पारंब्या ' वर बेतलेलं नाटक गोवा हिंदू असोसिएशनकडे आलं. त्याचं दिग्दर्शन मी करावं आणि ' मावशी ' ची भूमिकाही , ( रंगभूमीवरची नक्की शेवटची!) असं सर्वानुमते ठरवलं गेलं. त्यात अर्थात दामू केंकरे , रामकृष्ण नाईक , जयवंत दळवी आणि द. ग. गोडसे यांचा समावेश होता. मी ' हो ' म्हटलं. कादंबरी वाचली आणि हबकले. हे ' ब्रह्मांड ' दोन अंकी नाटकात कसं काय उभं राहणार ? दळवींनी लिहिलेला पहिला खर्डा वाचला. त्यांचीही तारांबळ उडाली होती. पहिल्या अंकात एकोणीस प्रवेश तर दुसऱ्या अंकात एकवीस. शिवाय पाच वेगवेगळ्या ठिकाणी घडणारं कथानक. काम खूप करावं लागणार , हे लक्षात आलं.

कादंबरीचा विषय कसा सुचला ? माझा नेहमीचा प्रश्न. दळवींचं उत्तर विलक्षण. त्यांचं मन आणि कल्पनाशक्ती कुठून आणि कशी झेप घेत असे याचं उत्तम उदाहरण : दळवी एका लहानशा गावातून (त्यावेळच्या नाशिकसारख्या) चालले होते. चौक पार करून एका छोट्याशा बोळात शिरले आणि आश्चर्यानं थबकले. बोळात एक बग्गी उभी होती. गावात इतरत्र टांगे दिसायचे पण ही चक्क बग्गी होती. वरचं छत उघडलेलं. चुरगळलेला खाकी युनिफॉर्म घालून बग्गीवाला आपल्या जागी बसला होता. बग्गीत बसण्याच्या तयारीत एक गृहस्थ जवळच उभा. अंगात थ्री–पीस–सूट , बो–टाय , केस पोमेडनं चोपून बसलेले , हातात पेटलेला चिरूट. एकूण प्रकारच दळवींना मजेशीर वाटला. गावातला छोटासा बोळ आणि त्यात तो बो–टायवाला माणूस! ते पुढे चालत राहिले. बग्गी एका जुनाट वाड्यासमोर उभी होती. वाड्याच्या तळमजल्यावर लोखंडी गजांची एक लहानशी खिडकी आणि त्यातून पुन्हा पुन्हा वाकून त्या बो–टायवाल्या गृहस्थाकडे पाहणारी एक बाई. मध्यमवयीन , लाल आलवण नेसलेली , सोवळी स्त्री. कोण असतील ही दोघं , काय यांचं नातं ? दळवींची कल्पनाशक्ती भराऱ्या मारू लागली. त्यांच्या मनाच्या भराऱ्या चालू असतानाच आठवड्याभरात ते गोव्यातील कुठल्या तरी एका ऐसपैस घरात गेले. दिवाणखान्याला हिरवा रंग आणि खूपसं जुनं फर्निचर. त्यांना भेटायला यजमान आला आणि भिंतीलगतच्या सोफ्यावर बसला. आपले भेदक डोळे विस्फारून , खूप हातवारे करत अव्याहत बोलत होता. दळवी त्याचं ऐकण्यापेक्षा त्याला पाहण्यातच गुंग. यजमानाच्या मागे भिंतीवर मिशावाल्या पुरुषांचे दोन पोर्ट्रेट्स होते. दोघांचेही डोळे यजमानासारखेच वटारलेले , त्रस्त. दळवी तसबिरीकडे पाहताहेत हे लक्षात येताच यजमान म्हणाला , ' माझे वडील आणि आजोबा ' दळवींच्या मनातल्या अंधाराला पारंब्या फुटायला सुरुवात झाली! केवळ दोन प्रसंगांमुळे. बोळात उभा असलेला बो–टायवाला गृहस्थ आणि त्याच्याकडे पाहणारी सोवळी बाई आणि गोव्यातील यजमान आणि रोखलेल्या डोळ्याचे , तसबिरीतून पाहणारे आणि पूर्वज.

दळवींना सापडलेलं कथानक १९२० च्या दरम्यानचं. म्हणून त्यावेळचं साहित्य वाचायचं ठरवलं. दळवी आणि गोडसे शिक्षक–मार्गदर्शक म्हणून होतेच. ' नाटक करायचं असलं की विजयाबाई खूप वाचतात , एरवी मात्र अनपढ ' असं दळवी सगळ्यांना गमतीनं सांगत. त्यावेळची खूप उपयोगी पडलेली कादंबरी , हरी नारायण आपटेंची ' पण लक्षात कोण घेतो! ' स्त्रियांचं आयुष्य , दिनक्रम , समाजातील वातावरण , प्रोग्रेसिव्ह चळवळ याबद्दल खूप माहिती मिळाली. बालगंधर्वांची नाटकं , नाटककंपनी , स्त्रियांसाठी राखून ठेवलेला थिएटरमधला सज्जा वगैरेची माहिती दुर्गाबाईंनी पुरवली. त्यांचे वडील श्री. लाड हे गंधर्वभक्त. त्यांच्याबरोबर तरुण दुर्गाबाई नाटकं पाहायला , गंधर्वांना भेटायला जात.

दळवींची प्रमुख पात्रं पाच. प्रत्येकाची तऱ्हा वेगळी. जुनाट वाडा. त्यात राहणारी तीन माणसं. दोन भाऊ : धाकटा इंग्लंडहून शिकून आलेला बॅरिस्टर रावसाहेब , विचारानं सुधारक पण कृतीत उतरवताना कचरणारा. मोठा भाऊ नाना , ' टिलकाईट ', पण बरीच वर्षं फक्त आरामखुर्चीत बसून डुलणारा आणि त्या दोघांची मध्यमवयीन विकेशा विधवा मावशी. तिघंही एकमेकांशी बोलत नाहीत. ' इब्सेन ' च्या ' घोस्ट ' या नाटकासारखं वातावरणाचं जड सावट वाड्यावर आणि त्यातल्या तीन रहिवाशांवर. काळोखाच्या पारंब्यांची दाट छाया. आपला मोठा भाऊ नाना , त्याच्या अगोदर आपले कर्तबगार वडील , दोघंही सगळं सोडून अचानक खुर्चीवर डोलत बसले. आपलंही असंच होणार का ? ही भीतीची टांगती तलवार सतत बॅरिस्टरच्या मनात , चुकचुकणाऱ्या पालीसारखी. पोटभाडेकरू म्हणून नवीन लग्न झालेलं तरुण जोडपं – भाऊराव आणि राधाक्का , वाड्यात राहायला येतं आणि काही वेळापुरतं वातावरण खुलतं , वाडा थोडाफार हसू लागतो. पण पुनःश्च एकापाठोपाठ एक विचित्र प्रसंगांची मालिका सुरू होते , त्यात भर म्हणून भाऊरावाच्या अतिशय कर्मठ , बुरसटलेल्या विचारांच्या वडलांचं आगमन. पारंब्यांचा विळखा वाड्याभोवती पुन्हा पहिल्यासारखाच.

एक भाऊराव सोडला तर इतर पात्रांच्या मनात लहान–मोठी अस्वस्थ चुळबुळ. तिला गुदमरलेल्या वासनांची तुरट चव. यातलं काही ठोसपणे , मूर्त स्वरूपात समोर उभं राहत नाही , पण त्याचं अस्तित्व मात्र भासतं. त्यातूनच कथानक पुढे जातं. हे सर्व जाणिवेच्या स्तरावर उभं करायचं , तेही दोन अंकांत , एकाच नेपथ्यावर , कठीण पण आव्हानात्मक जबाबदारी!

मूळ कादंबरीची आणि नाटकाच्या पहिल्या खर्ड्याची पारायणं केली आणि हळूहळू सर्व पात्रं माझ्या मनात वावरू लागली. वाड्यात , अंगणात ,

आऊटहाऊसवजा भाऊरावांच्या घरात , त्यांच्या ' प्रतिमा ' दिसू लागल्या. उजेडाच्या कवडशात बसलेल्या , एकमेकांकडे पाहत उभ्या असलेल्या.

सर्व पात्रांना मोकळेपणानं फिरता येईल असे नेपथ्याचे वेगवेगळे भाग रंगमंचावर जाणवू लागले. ते प्रत्यक्षात आणण्यासाठी गोडसेंशी आणि नेपथ्याला स्वर मिळावा म्हणून भास्करशी चर्चा सुरू झाल्या. दिलीप कोल्हटकर प्रकाशयोजना करणार होता , तोही चर्चेत भाग घेई. सुरुवातीलाच थोडासा मतभेद झाला. अंधाराच्या पारंब्या हे नाव नाटकाच्या जाहिरातीसाठी ' दुःखी ' वाटेल असं आम्हां सगळ्यांना वाटत होतं. त्यामुळे नाटक बोजड आहे असा प्रेक्षकांचा निष्कारण गैरसमज होण्याची शक्यता होती. गोडसेंच्या मते मूळ कादंबरीचं नावच सुयोग्य , प्रेक्षकांच्या प्रतिसादाला घाबरून नाव बदलणं चुकीचं. त्यांची समजूत काढण्यात दळवींनी पुढाकार घेतला आणि बॅरिस्टर हे साधं सरळ नाव ठरलं. नाटकाच्या जातीविषयी आगाऊ कल्पना कुणालाही येऊ नये हा हेतू.

भास्करचं संगीताचं काम बॅरिस्टरमध्ये हमिदाबाईच्या मानानं खूप कमी. त्यानं केलेली सूचना मात्र महत्त्वाची. १९२० च्या दरम्यानचा काळ उभा करायचा. बालगंधर्वांच्या रेकॉर्ड्स मावशीबाई ऐकतात आणि रावसाहेब पाश्चात्त्य संगीत ऐकतात , असा उल्लेख संहितेत आहे. तेव्हा बालगंधर्वांच्या जुन्या रेकॉर्ड आणि रावसाहेबांसाठी बिथोव्हनची सातवी सिम्फनी वापरावी. तांत्रिक संस्कार न करता जुन्या रेकॉर्ड्सवरील खरखर तशीच राहू द्यावी , ग्रामोफोनच्या मोठ्या पितळी कर्ण्यातून ऐकू यावी तशी. कुठे रेकॉर्ड्सचा वापर करायचा हे एकदा मी ठरवलं , की त्याप्रमाणे भास्करनं गंधर्वांची गाणी शोधून काढायची. भास्करनं सुचवलेला कर्ण्याचा ग्रामोफोन गोडसेंच्या नेपथ्याचा मध्यवर्ती बिंदू झाला आणि प्रवेश उभे करताना माझा जिवलग मित्र बनला.

गोडसेंचं काम सुरू झालं. कपडेपट तयार करण्यापूर्वी जुने फोटो पाहणं , तसे कपडे शिवून देतील असे शिंपी हुडकणं. जुन्या काळचा वाडा उभा करायचा , वडाच्या पारंब्यांनी झाकोळलेला , जड वातावरणात गुरफटलेला. त्यासाठी वाड्याचा डोलारा सांभाळणारे जाड शिसवी खांब , चिंचोळ्या खिडक्यांखाली एक फुटी लाकडी गज आणि वरच्या बाजूला कोरीव महिरपी असलेल्या चिंचोळ्या खिडक्या , भिंतींना जागोजागी तडे , रंग उडालेला , त्यावर जुन्या तसबिरी वर्षानुवर्षं टांगलेल्या , कोरीव शिसवी फर्निचर आणि या सर्वांमध्ये ग्रामोफोनचा चकचकीत पितळी कर्णा. प्रत्येक वस्तूला स्वतःचं अस्तित्व आणि इतिहास आहे , वाड्यातल्या खूप घटना या सर्व वस्तूंनी पाहिल्या आहेत , हे सर्व पडदा उघडताच भासायला हवं. वाड्याच्या छपरावर पसरलेल्या वडाच्या फांद्यांपैकी एखादी रंगमंचावरही डोकावताना दिसावी. गोडसेंच्या हाती नेपथ्याचं सूत्र म्हणजे ते संपूर्ण व्यक्तिमत्त्वानिशी उभं राहणार याची खात्री. गोडसेंची वास्तू उभी राहत असतानाच माझं योग्य नटसंच हुडकण्याचं काम सुरू झालं. मुख्य भूमिका बॅरिस्टर म्हणजे रावसाहेबांची. कादंबरीतील दळवींचं वर्णन डोक्यात मुरलं होतं. सतत चिरूट अथवा पाईप ओढण्यानं आवाजात खरखर , घसा साफ करत बोलण्याची सवय , अस्थमा वगैरे विकार असण्याची शक्यता , चेहरा ओढलेला , डोळे तेवढे भेदक , सडसडीत अंगयष्टी , वय ४०-४५, काळसर वर्ण. आम्ही सर्वांनी विचार करून अरुण सरनाईकची निवड केली. विक्रम गोखलेला ती भूमिका करायची अनिवार इच्छा होती. पण विक्रम सुदृढ , उमदा , शिवाय वयानं लहान. दळवींच्या रावसाहेबांच्या अगदी विरुद्ध. मी नकार दिल्यानं खूप रंजिस झाला.

काही कारणामुळे अरुण सरनाईक तालमीसाठी हजर राहू शकणार नाही असं कळलं आणि दुसरा पर्याय नाही म्हणून विक्रमला ती भूमिका मिळाली. त्यानं खूप मेहनत घेतली आणि ' रावसाहेब ' चं सोनं केलं. तालमीत त्यानं घेतलेल्या परिश्रमाचं चीज झालं. अभिनयाची वेगवेगळी तंत्रं आणि पैलू पदरी पडले , नट म्हणून त्याच्या पुढील कारकिर्दीत बॅरिस्टरमधल्या अनुभवाचा त्याला खूप उपयोग झाला.

– म.टा.मधील लेखामधून

● ● ●

# नाट्यप्रशिक्षण : आवश्यकता व उपयुक्तता

- डॉ.राजीव नाईक

नाट्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. नाट्य प्रशिक्षणाची आवश्यकता असा काही विषय दिलेला नाही. संपादकांच्या मनामध्ये एक शंका असावी. ह्या शंकेचं निरसन मला करता येईल की नाही ठाऊक नाही. तरीही...

मराठी रंगभूमीवरचे आद्य नाट्यप्रशिक्षक श्री. पार्श्वनाथ आळतेकर आणि श्री. नारायण काळे ह्यांना प्रमाण करून काही मुद्दे मांडतो.

नाट्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे काय? हा तात्त्विक/सैद्धान्तिक प्रश्न झाला. ह्याच उत्तर देता येणं अवघड आहे. खर तर असे प्रश्न विचारणाऱ्यांच्या मनात त्यांच म्हणून एक उत्तरही असतं, त्यापाठी एक (चुकीचीही असेल पण) भूमिका असते, पण ते आपले असे प्रश्नच विचारतात. ह्या प्रश्नांच्या उत्तराच्या बदल्यात एक प्रत्यक्षावर आधारित निरीक्षण नोंदवता येईल. नाट्यप्रशिक्षणाची उपयुक्तता असू शकेल.

पण असं नुसतंच प्रशिक्षण म्हणणंही बरोबर नाही. ती एवढी एकसाची गोष्ट नाही. ते जिथे कुठे दिलं जातं तिथे ते कसं दिलं जातं, त्या ठिकाणचीही काही वैशिष्ट्यं/परिणाम आहेत का, नेमकं काय काय शिकवलं जातं. जोर कशावर असतो, कोण शिकवतं, शिस्तीचे नियम अतिसैल आहेत की जाचक, एकंदर व्यवस्थेचं स्वरूप व राबवणूक कशी आहे, हे सगळंच महत्त्वाचं ठरतं.

महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, गोवा व इतरही काही ठिकाणी विद्यापीठांमध्ये औपचारिक, लक्षणीय कालावधीच्या बहुतेकदा पदव्युत्तर/पदवी प्रदान करणाऱ्या प्रशिक्षणाची सोय आहे. त्या त्या वेब-स्थळांवर जाऊन अभ्यासक्रम पाहिले तरी ह्यातल बारकावे, खासियती कळतील. कुठलंही प्रशिक्षण ही देण्या-घेण्या-करण्याची बाब आहे. नाटकासारख्या प्रयोगकलेबद्दल तर हे विशेष खरं आहे. इथे केवळ कागदी चर्चा काय कामाची? काय शिकवलं जातं ते नीट पाहिलं, तर ते शिकवावं की नाही हे कळेलच ना?

गॅलिलिओ ह्या ब्रेख्तच्या नाटकात गॅलिलिओ नव्यानेच शोधलेले काही तारे आपल्या दुर्बिणीतून चर्चच्या पदाधिकाऱ्यांना दाखवू पाहतो. त्या दुर्बिणीतून पाहायला ते धर्ममार्तंडे तयारच होत नाही. ते फक्त एक प्रश्न विचारत राहतात. अशा ताऱ्यांची काही आवश्यकता आहे काय?

ही चराचर सृष्टी सुद्धा फटकन जन्माला आलेली नाही, हळूहळू बनलेली आहे. अंतर्गत बदल म्यूटेशन्स आणि पर्यावरणातले बदल ह्यामुळे ती उत्क्रांत होत गेली आहे. मग एखादा माणूसच कसा जन्मत:च कलावंत निपजेल? फार तर तो पाळण्यात थोडा सुरात रडल्यासारखा वाटेल. आडातच नसलं तर पोहऱ्यात नाहीच यायचं, पण पैलू न पाडलेला हिरा खाणीतला एक दगडच.

नानासाहेब फाटकांपासून नाना पाटेकरांपर्यंत नटांनी प्रशिक्षण कुठे घेतलं, हा प्रश्न विचारणं कसंसंच आहे. तेही कुठल्या ना कुठल्या नाटकाच्या शाळेत गेलेच. त्यांचे गुरू विद्यापीठात नसले म्हणून काय झाल ? बरं, त्या वेळी सुनियोजित, औपचारिक प्रशिक्षणाची सोयच नव्हती. तेव्हाचे दाखले आज देण्यात काय हशील? मुलाला कुठल्याही शाळेत नका घालू, शिक्षकांच्या घरीच पाठवा असं आज पटकन म्हणता येईल ?

दुसरं एक सरकारमान्य दारूविक्री केंद्र बंद झाली तर गावगन्ना हातभट्ट्या लागतात. विद्यापीठीय नाट्यप्रशिक्षण नव्हतं तेव्हा आणि दुर्दैवाने आजही-आडझोड कार्यशाळा घेतल्या जातातच. इथे बहुतेकदा करता येतं तो करतो, करता येत नाही तो शिकवतो अशी गत दिसते. काही नाट्यव्यावसायिकांचा हा एक साइडबिझनेसच झालाय म्हणा ना. त्यात काही वेळा टीव्ही मालिकांमधल्या कामाचं आमिषही असतं. अपवाद असायचेच-होते आणि आहेतही-हे उघड आहे. सत्यदेव दुबे, विजया मेहतांपासून कमलाकर सोनटक्के, वामन केंद्रेंपर्यंतच्या कलावंत-शिक्षकांनी उत्तम नाट्यकार्यशाळा घेतल्या आहेत.

पण हे अपवाद हेही खरचं. काही ज्ञान नाही, अनुभव नाही, कर्तृत्व नाही असे लोक कार्यशाळा उघडून इंप्रोवायजेशन्स आणि थिएटर गेम्स घेत बसतात. दोनेक महिन्यांची फी कित्येक हजार रुपये!

तेव्हा प्रश्न लक्षणीय कालावधी व्यापणाऱ्या, आखीव अभ्यासक्रम असलेल्या, चांगले शिक्षक असलेल्या सुनियोजित, औपचारिक, अष्टावधानी, समकालीन, मातृभाषेतल्या नाट्यप्रशिक्षणाचा आहे. इथे पदवी व पदव्युत्तर शिक्षण असे दोन प्रकार संभवतात. पदव्युत्तर शिक्षणाचा प्रश्न थोडा बाजूला ठेवू. कारण तिथे एक स्पेशलायजेशन करून विद्यार्थी उच्चशिक्षणामध्ये नाटकाचा पर्याय निवडतो (उदाहरणार्थ, एन.एस.डी. वा विद्यापीठीय एम.ए.चे अभ्यासक्रम).

पण मुळातच कुठल्या विशेष विषयामध्ये रस नसला तरी देखील मराठी मानसिकेतवर पदवीची सक्ती आहे (मग काय हवं ते कर, पण आधी एक पदवी घे बाबा!) हे असं का, ह्याला पर्याय कोणते, हे मोठे समाजशास्त्रीय शैक्षणिक प्रश्न झाले. ह्या टिपणातून ते बाजूला ठेवू. पण घेऊन घ्यायचीच पदवी तर रस नसलेल्या विषयांत घेऊन मग नट म्हणून कामं शोधायची, त्यापेक्षा आवडत्या विषयाचं व्यावसायिक प्रशिक्षण का नाही घ्यायचं? म्हणजे नाटकात काम

करायचं असेल तर कॉमर्सचा पदवीधर होण्यापेक्षा नाटक ह्याच विषयात पदवी घेणं जास्त सेन्सिबल नाही का? डबलएंट्री–बुककीपिंगपेक्षा लोकनाट्याचा इतिहास केव्हाही अधिक रोचकही, आणि अधिक मोलाचीही आणि प्रत्यक्ष झील धरायला मिळाली तर मग फेटेच उडवायचे!

काही जण असा बीएचा कोर्स आहे हे माहितच नसल्यामुळे कुठल्यातरी कला–शाखेत जातात. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेतल्याने त्यांना नाटकाचा चस्का लागतो. कदाचित स्वत:मधले सुप्तगुणही खुणावतात. तोपर्यंत त्यांना नाटकाच्या पदव्युत्तर कोर्सेसची माहिती मिळालेली असते. आपलं नाट्यविषयक ज्ञान आणि अनुभव आवडीच्या मानाने बेताचे आहेत हे त्यांच्या लक्षात येतं आणि ते पदव्युत्तर नाट्यप्रशिक्षणाकडे जाणीवपूर्वक वळतात.

अर्थात घेतलं प्रशक्षण म्हणजे झाले नटश्रेष्ठ अशी समजूत केवळ ही फुशारकी ठरेल. कित्येक प्रशिक्षित नट भुक्कड असतात. पण तसे तर बरेचसे वकील, डॉक्टर्स, सीए वगैरेही फडतूस असतात.

पण ज्या गावाला जायचं त्याच गावाचा रस्ता धरलेला बरा नाही का? प्रशिक्षित वकील होऊन मग अप्रशिक्षित नट होण्यात तरी कुठली मोठी गंमल आहे? पण असमाधानी वकीलापेक्षा असण्यापेक्षा पेशा बदललेला बरा; आणि प्रेक्षकांना तर समोरच्या चांगल्या नटाचं कूळ शोधण्यात काही स्वारस्य असतच नाही.

आणखी काही मुद्दे पाहू. फायदा होवो न होवो, प्रशिक्षणाचा तोटा होत नाही तोवर ते घ्यायला कोणती हरकत? देखरेखीखाली आवाजाचा आणि शरीराचा थोडा व्यायाम केला, थोडं गायलं नाचलं, थोडे इतरांचे चेहरे रंगवले, बरीच नाटकं वाचली, तर कुठलाही होऊ घातलेला नट त्याला येतो तोही अभिनय विसरणार तर नाही ?

तरी प्रशिक्षण घेतलेल्यांमध्ये काहीसा बनचुकेपणा, सहजतेचं कॅज्युअलपणाकडे झुकणारं प्रदर्शन, करनीपेक्षा कहनी अधिक, मनाभिनयाहून शरीराभिनयावर भिस्त/असले दोष आणि त्याबरोबर काहीसा खुपेल इतका चढलेपणा, काहीवेळा नको तितका अतिउत्साह, तर बऱ्याचदा अनाठायी आत्मविश्वास असले महादोष दिसत नाहीत. असं नाही. कित्येक प्रांजळ नट प्रशिक्षणाने मुजोरही होताना दिसतात.

पण प्रशिक्षणाने कित्येकांची जाणीव संवेदना तीक्ष्ण, प्रतिक्रिया धारदार होते; देहबोलीत डौल, वाणीत स्पष्टता आणि आकलनामध्ये सखोलताही येते. मामला बहुतेकदा देणाऱ्यावर आणि घेणाऱ्यावर आहे. देणाऱ्याची ओंजळ वैविध्यपूर्ण नाजुकाने भरलेली, आणि घेणाऱ्याची झोळी बिनफाटकी मोठी हवी. आणि हे कुठल्याही शिक्षणाबाबत खरं आहे.

आम्ही टक्केटोणपे खात, चाचणी–चुका पद्धतीने धक्केबुक्के सोसत, छोट्याछोट्या शाबासक्या मिळवत, अनुभवाच्याच शाळेत जाऊन बघत ठेचकाळत नाही आलो इथवर–मग तुम्हाला काय झालं थोडं ठेचा खायला? हा प्रस्थापित नटांचा आविर्भाव मात्र चढेल अप्पलपोटेमणाचाच नव्हे तर सुनेने पण कष्ट उपसावेत ह्या खोचड सासूच्याच मनोवृत्तीचा आहे.

परत थोडं मागे जाऊ. ज्याला नाटक करायल आहे त्याला ऐतिहासिक, सामाजिक, लोक, फार्स अशा वेगवेगळ्या पठड्यांच्या नाटकात काम करायला मिळालं, दिव्यांचं ग्रुपिंग समजलं, सेटचा ग्राऊंडप्लॅन वाचता आला, आपल्याला कुठला पॅनस्टिक क्रमांक शोभतो हे ध्यालात आलं–तर फायदा होईल की नुकसान ?

आणि त्याला चार मुद्रा कळल्या आणि एखाद् दुसरं पद म्हणता आलं तर ? भरतमुनी नेमकं काय म्हणाले हे कळलं तर? त्याची शूद्रक–शेक्सपिअर–शॉ–चेकॉव्ह आणि आधुनिक भारतीय नाटककारांशी जानपहचान झाली तर? त्याला पडदा उघडल्यावर मंचावर वावरण्याबरोबरच, पडद्यामागे (बॅकस्टेज) आणि पडद्यांपुढे (फ्रंट ऑव्ह द हाउस) कसं वावरायचं हेही उमगलं तर ?

त्याला स्वत:च्या शरीरात गोल फिरू शकणारी हाडं किती, मूर्धन्य व्यंजन कसं उच्चारावं, स्टॅमिना कसा वाढवावा ह्याची माहिती मिळाली तर? त्याची स्तानिसलावस्की महाशयांच्या जादूई जर शी सलगी झाली तर ?

तर कदाचित असा नट भूमिकेनुसार आवाज आणि चाल बदलेल, असा दिग्दर्शक कॉमेडी आणि फार्स ह्यांची सीमारेषा चटकन ओळखेल, असा लेखक संवाद आणि भाषण ह्यांची गल्लत करणार नाही, असा प्रकाशयोजक नटाच्या चेहऱ्यावर सावल्या हव्या तेव्हाच पाडेल–वगैरे वगैरे. हे सगळं होण्याची गॅरंटी, शाश्वती नाही, पण तशी शक्यता, पॉसिब्लिटी खूप राहील.

आणखीन एक. नाटक प्रत्यक्ष करणं केव्हाही महत्त्वाचं. तेच चांगले करता येत नसेल, तर बाकी कशाचाही उपयोग नाही. पण नाटकाबद्दल आजवर झालेला विचार जाणून घेणं, नाटकाचं तर्कशुद्ध विश्लेषण करता येणं, नाटकावर मुद्देसूद आपलं मत/कारण देत मांडता येणं, हे काही पाप नव्हे! आत्ता लगेच मला तसं शब्दात सांगता येणार नाही, ते कुठेतरी भिडलं वगैरे जे बोलतात त्यांना नाटकाचं व्याकरण, संरचना मुळी कळलेलीच नसण्याची शक्यताच शंभरच्या वरच कितीतरी टक्के असते. तेव्हा असं प्रशिक्षण घेण्याचा एक असाही फायदा (खरं तर गाभ्याचा, पण म्हणू की जाताजाता झालेला) होऊ शकेल की ही मूळलं जे करतील ते विचार करून कतील; केवळ निसर्गदत्त गुणांवर आणि उसळत्या उस्फुर्ततेवर अवलंबून परंपरा जाणतील पण प्रश्नही विचारतील.

वेगवेगळ्या प्रशिक्षण–अभ्यासक्रमांची निरनिराळी खासियत असते. उदाहरणार्थ, पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रांमध्ये नाटककार–

दिग्दर्शक–नट श्री. सतीश आळेकर एक विषय घेतात. संहिता ते प्रयोग प्रत्येक विद्यार्थ्याला (भले त्याला पुढे नट व्हायचं असेल वा रंगवेषभूषाकार) स्वत: एक पंधराएक मिनिटाचं नाटक उभं करावं लागतं. पहिल्या सहामाहीत आपले अनुभव धांडोळून, आत्ता आपल्याला नाटक ह्या माध्यमातून काय व्यक्त करायचं आहे आणि का हे शोधून, शिकलेल्या सादरीकरण पठड्यांपैकी कुठली ह्या अनुभवाला उपयुक्त आहे ते ठरवून एक संहिता लिहावी लागते. हे काही कुठल्या महान मलावंताचं दैवी असं स्फुरलेलं लिखाण नाही, तर हा एक स्वाध्याय, एक्झरसाइझ आहे. त्यामुळे ह्याचं वाचन करून, त्यावर प्रतिक्रिया घेऊन, त्यातून पटलेल्या स्वीकारून पुनर्लेखन होतं. असा संहितांचा दुसऱ्या सहामाहीत त्याच विद्यार्थ्याला प्रयोग बसवावा लागतो. त्यात दिग्दर्शक तर तो असतोच, पण नेपथ्य–प्रकाश–रंगवेष–संगीत इत्यादी सारंही तोच सांभाळतो–फक्त ह्या प्रयोगात तो काम नाही करत! हे प्रशिक्षण लेखक–दिग्दर्शकाचं वाटतं, तसं ते आहेही; पण नीट पाहिलं की लक्षात येईल की ते खरं तर नटाचं आहे! ह्या प्रक्रियेतून काय गवसत असेल त्याचा आपणच विचार करावा.

अर्थात कुठल्याही कलेचं तंत्र बाहेरून घेता येतं, मंत्र आतून उमलावा लागतो, सृजनावा लागतो.

नाट्यप्रशिक्षण ही सांस्कृतिक प्रक्रिया आहे, म्हणूनच तिला एक घट्ट सामाजिक–आर्थिक अंग आहे. अगदी सरळसोट भाषेत आधी पैशांचा, फीचा प्रश्न आहे. बहुतेक विद्यापीठांचे नाट्यविभाग विनाअनुदानित आहेत. त्यामुळे विभागांनाही फी फार कमी ठेवता येत नाही. काही विद्यापीठबाह्य प्रशिक्षण–संस्था म्हणजे खरं तर नाट्यशिबिरंच असतात. तुटपुंज्या कालावधीची, थातुरमातुर अभ्यासक्रमाची आणि होतकरू–शिकाऊ अर्थप्रशिक्षित नटांनाच शिक्षक बनवणारी आणि ही शिबिरं तर भरमसाठ पैसे आकारतात, लुबाडतात.

शिबिरांचे चालक चक्क व्यावसायिक प्रथितयश नट असतात वा बेकार बिचारे स्ट्रगलर्लही. दोन्ही बाबतीत मोठ्ठीच गंमत असते. असली तथाकथित नाट्यप्रशिक्षणं ताबडतोब बंद पडली पाहिजेत असो. दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय नाट्य विद्यालय (एनएसडी) सारख्या पूर्ण अनुदानीत, काहीशा लावडावलेल्या संस्थांचे फुकटात शिकलेले स्नातक टीव्ही, सिनेमानेच पछाडलेले दिसतात. ह्याची वारंवारता हा एक प्रबंधाचाच विषय होय. किंबहुना एनएसडी, फिल्म इन्स्टीट्यूटमध्ये विसर्जित करावी असं काहींच मत आहे. ह्याचे अपवाद मात्र सणसणीतपणे सन्माननीय आहेत. उदाहरणार्थ, नसरुद्दीन शहा.

पण खरं तर असं प्रशिक्षण आवश्यक आहे का हे असं प्रशिक्षण घेतलेल्यांना विचारायला हवं. उदाहराणार्थ, सुहास जोशी ज्योती सुभाष, कमलाकर सोनटक्के, वामन केंद्रे, चंद्रकांत कुलकर्णी मुक्ता बर्वेवा अद्वैत दादरकरला. ही यादी वाढविता येईल आज प्रशिक्षत नाट्यकर्मीची संस्था मोठी आहे. मी कुठलाही नाट्यप्रशिक्षण घेतलेलं नाहह्र तेव्हा मी ह्याहुन अधिक काय सांगणार ?

शेवटी एकच : सहज करायच्या गोष्टीमध्ये गरज शोधू नये.

– डॉ. राजीव नाईक (नाटककार, नाट्याभ्यासक, नाट्य शिक्षक)

• • •

# निमंत्रण रंगकर्मींना



# नाटय अर्थयंत्रणा शास्त्राची निर्मिती हवी!

– बापू लिमये

अ. भा. नाटय संमेलनाचे हे शताब्दी वर्ष आहे. तर यंदा ८५ वे नाटय संमेलन भरत आहे. गेली तीस– पस्तीस वर्षे अपवाद सोडता मी सातत्याने संमेलनांना उपस्थित राहिलो आहे. संमेलनानिमित्त स्मरणिका काढणे हा परिपाठ आहे. संमेलनाची स्मृती राहते तसेच निधीही गोळा होतो. शिवाय रंगभूमी संबंधी काही लेखनही मंडळी करतात. संमेलन संयोजकांची छायाचित्रांसह आम रसिकांना ओळखही होते. स्थानिक संध्या कनावेत आर्दीचा परिचय होतो. संदेश, जाहिराती व अन्य वर निर्देशिलेला ऐवज मिळून तीन चतुर्थांशावर पाने भरतात. रंगभूमी विषयक लेखन करणारे ही तितक्याच सपक गांभिर्याने त्याकडे पाहतात कधी कधी वेळेवर नवीन काही लिहिण्यास वेळ न मिळाल्यामुळे नामवंताचे जुनेच लेख पुनर्मुद्रित करुन छापलेले असतात. त्यामुळे आजतागायत मी संधी व आवताण मिळूनही असा प्रकारणाच्या स्मरणिकांत लेखन केलेले नाही.

पण यंदाचे संमेलन गावकीने आमंत्रीत केलेले. शिवाय हे वर्ष परिषदेचे शताब्दी वर्ष. संयोजन समितीने जरी स्मरणीका समिती हे नाव या कामानिमीत्त योजले असले तरी त्यांचा मान एक चिंतनशिल असा संग्राह्य ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा ओ. निदान तसा पत्रात तरी उल्लेख आहे.

खरं तर रंगभूमी हा विषयच सर्वार्थाने चिंतन करण्यासारखा आहे. तेव्हा गांभीर्याने चिंतन व्हावे ही मनीषा स्वागताई आहे. आणि त्याच दृष्टीने शब्द संख्येच्या मर्यादित जमेल तितका एकाद दुसरा विषय मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. बघू या त्याचे कसे स्वागत होते.

विषयाची रुपरेखा : लिहायचे ठरविल्यानंतर प्रामंख्याने दोन विषय मनांत आले. रंगभूमीचे अर्थशास्त्र व नाटयशिक्षण. हे दोन्ही विषय मराठी रंगभूमीचे संदर्भात अभ्यासपूर्ण विचारस्तरावर काहीसे दुर्लक्षित आहेतअसे वाटते. रंगभूमीविषयक चिंतनाचा विषय हा मूलतः भारतीय संकल्पना, परिस्थिती, समाज , अर्थव्यवस्थापन व जीवनपध्दती विज्ञान (संस्कृती हे ढोगळनाव) आर्दीबाबत स्व चा पाया धरून करण्याची आपली सवय मोडली आहे. गेल्या शंभर– सव्वाशे वर्षात असे घडत आले आहे. जोपर्यंत एखादा परकिय विचार इथे पोहचत नाही तोपर्यंत आम्ही स्थितप्रज्ञ (?) (पु. ल. देशपांडे यांच्या व्याख्योनुसार ) असतो असे इतिहास सांगतो. अर्थात अगदी संज्ञांबाबतही आपण परक्यावरच अवलंबून आहोत. (अगदी नवे उदा. म्हणजे मुख्यधारा, प्रायोगिक, समांतर आदि) परिणामी परभृततेची सवय घट्ट होण्यात आली. आपण अनेक गोष्टिंची गल्लत तर करतोच,पण धर्म, अर्थ, काम व मोक्ष या जीवन पध्दतीच्या मूळ आधराचा नाटयाशी संबंध आहे हेही आपल्या विस्मृतीतगेले आहे. नाटयपुरूषार्थाचा विचार याच संबंधात भारतीय चिंतनातून (प्रस्तुतवेळी मराठी) होणे आवश्यक आहे. त्याच दृष्टिने काही विचार मांडणे योजिले आहे. कसे काय जमते पाहू या.

नाटयधर्म या विषयासंबंधी विस्ताराने लिहिणे प्रस्तुत शब्द मर्यादित कष्टाचे होणार आहे. आज अधिक कळीचा थेट मुद्दा वाटतो तो म्हणजे रंगभूमीचे अर्थकरण / अर्थशास्त्र. यासंबंधात वैचारिक व शास्त्रीय दृष्टिकोणातून फारसे काही झालेले नाही असे दिसते.

अर्थकारणः आर्य चाणक्याने अर्थशास्त्राची निर्मिती केली, त्यांचे अर्थशास्त्र राज्यशास्त्राशी जोडले आहे. किंबहुना त्यांच्या अर्थशास्त्राचा आधुनिक अवतार म्हणजे राज्यशास्त्र विषय हे जगन्मान्य झाले आहे.

अर्थ हा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अपरिहार्य असाच आहे. मग तो, राज्यकारभार असो वा कुटंब चालविणे असो. सामाजिक संध्या असो वा सेवा क्षेत्र असो, तद्वतच तो नाटय व्यवहारातही महत्त्वाचा आहे. त्यासाठी एक यंत्रणा–शास्त्र निर्माण करावे लागते. लोकराज्य व्यवहारांत जशी, विधानमंडळे, प्रशासन, न्यायप्रणाली व लोक/ प्रजा ही चतुर्भुज यंत्रणा असते. तशीच नाटय व्यवहारातही निर्माता, संस्था, रंगकर्मी, (नाटककार ते रंगमंच कलाकार) व्यवस्थापक आणि प्रेक्षक (त्यांच्या प्रतिनिधिक संघटना) असे एक अर्थ यंत्रास्त्र

असणे आवश्यक आहे या सर्वंकष यंत्रणेवरही थोडक्यात लिहिणे असंभव आहे. (परंतु या पैकी या संबंधात नाटयपरिषदे सारख्या मध्यवर्ती संघटनेकडून काय होऊ शकते याचा थोडक्यात विचार पुढे नाटय शिक्षणः दुसरा एक मांडण्याचा विषय आहे नाटय शिक्षणाचा. यासंबंधी प्रथम थोडे निरूपण करणार आहे. कारण परिषदेने लक्ष घालावा असा तो विषय आहे.

आपल्याकडे शिक्षण हा विभाग राज्यशासनाचे आधीन आहे. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालये व विद्यापीठे ही शासकीय धोरण व नियमावली अंतर्गत व्यवहार करतात. प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर नाटय हा विषयच नाही. उच्च शिक्षण क्षेत्रात (कनिष्ट, उच्च व विद्यापीठे) या विषयाचे स्वतंत्र विभाग कार्यरत झाले आहेत. काही विद्यापीठात केवळ स्नातकोत्तर अभ्यासक्रम आहेत. त्यात, प्रवेश मिळवू शकतो.

मराठवाडा, पुणे व कोल्हापूर विद्यापीठात स्नातक पदवीसाठी प्रवेश मिळतो दिल्लीचे राष्ट्रीय विद्यालय संपूर्ण भारतासाठी आहे. माध्यमाचे बाबतीत दिल्लीत हिंदी व इंग्रजी माध्यम आहे तर महाराष्ट्रात मराठी प्रामुख्याने तर काही टक्के अन्य भाषिक अध्यापकांचे बाबतीत अपवाद आहे.

अभ्यासक्रमः बहुतांशाने राष्ट्रीय नाटय विद्यालय ( दिल्ली ) राबवीत असलेल्या धर्तीवरच आधारीत अभ्यासक्रम महाराष्ट्रात आहेत. या

अभ्यासक्रमातून नाटयविषयक विविध अंगांचे ज्ञान प्रामुख्याने माहितीवजा प्राप्त होते. अन्य लौकिकशिक्षणानुसार पदवी वा पदविका पदरात पाडते, पण दुदैवाने या प्रमाणपत्रावर व्यावसायिक क्षेत्रात प्रवेश मिळतोच असे नाही. आज लौकिक शिक्षणाचे बाबतीतही हाच अनुभव येतो. या अनुभामुळे अन्य व्यावसायिक क्षेत्रात गांभीर्याने विचार जाणतें करताहेत. काही विद्यापीठात व महाविदयालयात लौकिक शिक्षण घेताघेताच सोय उपलब्ध होत आहे.

नाटय विद्यालयातून पदवी प्राप्त करून पूर्णवेळ नाटयव्यवसाय, काही अपवाद सोडल्यास , किती मंडळी करताहेत हे तपासावे लागेल . बहुतांश मंडळी एकतर चित्रपट क्षेत्रात धडपडत आहेत किंवा प्रामुख्याने चित्रवाणीत सामील होण्याचा प्रयत्न करीत आहेत. तेंव्हा आता शिक्षण व व्यवसाय यांची सांगड घालताच अभ्यासक्रमाची आखणी करणे गरजेचे आहे. अर्थात हे काम व्यावसायिकांची संघटना, विद्यापीठे व शासन यांचे आहे व समन्वयक म्हणून काम करणे नाटयपरिषदेतील जाणत्या मंडळींनी गांभीर्याने केल्यास फलदायी होणार आहे .

बहिःशाल शिक्षणः विद्यापीठात शिक्षणाची सोय होण्यापूर्वी शिक्षणाचे विविध मार्ग अनुसरले जात. आजही ते होत आहे. अर्थात तेंव्हा नाटय – शिक्षण ही संज्ञा निर्माण झाली नव्हती, पण शिकणे व शिकविणे चालूच होते. प्रारंभी व्यावसायिक नाटयसंस्थांची बिऱ्हाडे म्हणजे निवासी शिक्षण संस्थाच होत्या. त्यानंतर निर्माण झालेल्या हौशी नाटयसंस्था. प्रत्यक्ष कार्यानुभवावर आधरित ज्ञान नवोदितांपर्यत पाहोचवले जाई. स्वातंत्रयोत्तर काळांत रेजीसार आळतेकरांनी वर्ग घेणे सुरू केले, नंतर मग के. नारायण काळे यांनी महाराष्ट्र शासनासाठी अभ्यासक्रम तयार केला व दीड महिन्याच्या निवासी कार्यशाळा दरवर्षी होऊ लागल्या. श्रीमती विजया मेहतांनी बरीच वर्षेत्याचे नेतृत्व केले, पुढे माधव वाटवे व त्यांच्या पिढीतील अनेकांद्वारा हा उपक्रम आजतागायत राबवला जात आहे. त्याद्वारे रंगकर्मींना शिक्षणाचे महत्व काही प्रमाणात पटू लागले आणि मग, नाट्य–अभिनय शिकविणाऱ्यांचे व शिकणाऱ्यांचे पेव फुटले आहे. त्यात आणखी बालनाट्य शिबिरांची मांदियाळी जमू लागली आहे. अगदी गदारोळ होऊ लागला. या प्रकारच्या उद्योगाचे स्वरुप सहन करण्यापलिकडचे झाले आहे.

काही विद्यापीठे, महाविद्यालये काहि निश्चित अशा आखिव अभ्यासक्रमाची योजना करु लागली आहेत. ही स्वागतार्ह घटना आहे. हे अभ्यासक्रम अर्ध–वेळ मुक्त विद्यापीठे जसे कार्य करतात, तसे दीर्घ मुदतीचे राबविले जातात. निर्मिती व प्रात्यक्षिकांचीही त्याला जोड असते. परंतू त्याबद्दल पदवी–पदविका न देता केवळ उपस्थिती प्रमाणपत्रे दिली जातात.

अशा अभ्यासक्रमांना मुक्त विद्यापीठासमान दर्जा देऊन किमान पदविका अभ्यासक्रम संबंधतांनी मान्य करावा. म्हणजे पूर्ण वेळाच्या अभ्यासक्रमांना परिस्थीतीमुळे विन्मुख व्हावे लागणाऱ्या रंगकर्मींना त्याचा निश्चित उपयोग होईल.

शिक्षक कोण ? : लौकिक शिक्षणांत अगदी उच्च पदवीधारक हा शिक्षक पदवी वा पदविका प्राप्त केल्यानंतरच शिकविण्यास प्राप्त समजला जातो, याचे कारण असे की शिकणे व शिकवणे यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आज प्रत्यक्ष शिक्षण, त्याबरोबर प्रदीर्घ अनुभव तसेच ज्ञानी अशा अनेक व्यक्ती नाट्यशिक्षक म्हणून काम करीत आहेत. हे जरी खरे असले तरी त्यांची संख्या मर्यादित आहे शिवाय ते वृद्धत्वाकडे झुकलेले आहेत. शिक्षणाची जिज्ञासा वाढती आहे. त्यामुळे नाट्यशिक्षक हा पेशाही होणार आहे. त्यासाठी नाटयशिक्षक सनद प्राप्त करण्यासाठीचे स्वतंत्र अभ्यासक्रम सर्व स्तरावर झाले पाहिजेत. प्रशिक्षित शिक्षकच नाटयविषयक कार्यशाळा वा शिबिरे घेऊ शकतील अशी उभी करणेही गरजेचे आहे. नवी पिढी यातूनच योग्य शिक्षण प्राप्त करेल व फुटलेली पेवे बुजविता येतील. हे ही काम परिषदेला करता येण्यासारखे आहे.

सर्वच शिक्षण रंगाकर्मी व्यवसायात जातीलअसे नव्हे, हे जरी खरे असले अश तज्ञांचा फायदा अव्यवसायिक रंगभूमी, शालेय व बालरंगभूमी यांना होऊ शकेल. अन्ति हे व्यवसायालाही लाभकारक ठरणार आहे. अशापैकी अनेक मंडळी संशोधन व नवनव्या संकल्पना याकडे वळून रंगभूमी प्रगतीकडे झेपावले

अर्थ यंत्रणाशस्त्रः प्रास्तविक परिच्छेदात उल्लेखिलेल्या वरील विषया– संबंधी तर विस्तृतता अपरिहार्य आहे असे म्हटले आहे. लेखमर्यादेनुसार ाकही सूचनावजा प्रस्ताव मांडणे ठरवावे लागत आहे.

आजतागायत एकून रंगभूमी संबंधी संघटित असा अर्थकारणचा विचार झालेला नाही. अर्थात व्यक्तिगत निर्माता वा संस्था याचा प्रत्येक निर्मितीचे वेळी विचार करतेच, तरीही काही बाबी या संघटित करणे आता विस्तारलेल्या नाटय व्यवहारासाठी आवश्यक झाले आहे.

जगातील सर्व व्यवसायी क्षेत्रात आता हे रुढ झाले आहे. कोणतीही निर्मिती करताना त्या पुरताच विचार करणे आतां अप्रस्तुत आहे.

अर्थव्यवस्थेत काही गोष्टी आम्ही शास्त्रीय दृष्टिकोणातून किंवा लौकिक अर्थाने वैज्ञानिक दृष्टिकोणातून करत नाही. अपरिहार्यता म्हणून तुटपुंजे माध्यम स्विकारतो आहोत.

मुख्य मुद्दे : अन्य व्यवसाय करताना भंडवल, उत्पादन वस्तू व साधने अपेक्षित ग्राहक व त्यानुसार दर्जा व विक्री व्यवस्था व साधने अशी मांडणी असते. भांडवल व्यवस्था विधि प्रकारे केली जाते. उत्पादन त्यासाठीची साधणे यासाठी संशोधन हा पाया असतो. ग्राक्हकांसंबधी सर्वेक्षण करावे लागते तर त्या अनुषंगाने विक्री व्यवस्थेची यंत्रणा उभी केली जाते. यातील प्रत्येक प्रक्रिया ही सातत्याने चालूच ठेवावी लागते व त्यात आवश्यक तो बदलही करावा लागतो. व्यक्ति, संस्था, (मालकी व सहकारी ) यांच्या स्वतंत्र अनुभवाची देवाण घेवाण करण्याच्या व त्यावर प्रगतीचे दृष्टिने उपाय शोधण्याच्या दृष्टिने एक स्वतंत्र

व्यवसायपरत्वे संघटना निर्माण केलेली असते व शेवटी एकूनच व्यवसाय उद्योगांची केंद्रिय अशी वैचारीक व कृती मार्गदर्शन संघटनाही असते.

नाटयक्षेत्रात आजच्या यागात याची नितान्त आवश्यकताआता गरजेची झाली आहे. भांडवल उभारतो निर्मितीही करतो, परंतु एकूण परिस्थितीचे सर्वेक्षण करतो का? ग्राहक (इथे प्रेक्षक ) हा अन्य ग्राहकांसारख ा केवळ व्यक्तिगत स्तरावरचा उपभोक्ता नाटयक्षेत्रात नसतो. त्याचा सामाजिक संर्दभही असतो. तसाच जीवन पध्दतीशी म्हणजे शी नव्हे तर माणूस म्हणून जगण्याशी ही असतो. हा अन्य व्यवसाय व कला व्यवहार (इथे नाटय व्यवहार ) यातला मुलभूत फरकही अधिकच चिंतेची बाब आहे. प्रत्येक वीस वर्षात पिढीबरोबर यात बदल हातो. तसेच एकून सामाजिक, राजकीय, आर्थिक शैक्षणिक आदि बदलांचाही परिणाम ग्राहक वृत्तीवर पडतो.

तेंव्हा नाटय अर्थकारण उपर्युक्तबाबी संघटितपणे ध्यानी घेऊन त्याचे एक नाटय अर्थ यंत्रणा शास्त्र निर्माण होणे बरजेचे आहे. या तपशीलावर विवेचन म्हणजे एक प्रबंधच व्हावा व तो सिध्द होणे निकडीचे आहे.

नाटयपरिषदेची भूमिकाः संमेलनानिमित्त प्रकाशित होणारा हा
ऐवज संग्राहय अंक आहे असे म्हणताना स्मरणिका समितीने नाटयपरिषदेच्या आगामी वाटचालीविषयी दिग्दर्शन करणारा असावा अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

नाटयपरिषदेने हे करावे ते करावे असे भरमसाठ सांगणरा मी नाही. नाटय परिषद वतिचे काम मी जवळून पहात आहे. नाटय परिषदेने हे करावे असे म्हणण्यापेक्षा मी परिषदेच्या कार्यास किती हातभार लावू शकतो याला महत्व देणे आता संबंधितांनी पुनःश्व एकदा सुरू करावेअसे वाटते.

गेली पंधरा वर्षेनाटय संकुला भेवतीच नाटपरिषद पिंगा घालत होती. आता ताकेविषय संपला असा नेटाने एकदा विषयच शिरोधार्य धरत जेंव्हा प्रदीर्घ काळ जातो आणि तो विषय संपता तेंव्हा पोकळी निर्माण होते, त्याचवेळी काही मार्ग शोधणे आवश्यक असते.

याच परंतु एका वेगळया संदर्भात एकस चळवळीची, संघर्षाची आठवण मला आहे. ती म्हणजे मराठवाडा विद्यापीठाचे नामांतरण करण्याची चळवळ. सतत पंधरा वर्षेसतत पाठपुरावा, संघर्ष या एकच मुद्याभोवती संपूर्ण मराठवाडा गंतला होता. जीवघेणा संघर्ष होता. माझे अनेक मित्र त्यात हिरीरीने सहभागी झाले हाते. त्यात काही साहित्य व नाटयक्षेत्रातलेही होते. अत्यंत तणावाचे स्थितीत एका उच्चतम शिखरावर चळवळ होती आणि एक दिवस अचानक नामांतराचा निर्णय झाला. त्यानंतर माझी भेट त्या चळवळीत सहभागी झालेल्या एका सर्जनशील नाटककार मित्राशी झाली. त्यावेळी बोलताना त्याने वरील पोकळीची समस्या मोठया खेदाने मांडली होती. परिषदेची ती अवस्था होऊ नये असे वाटते आणि त्या दृष्टिने विषय मांडला. माझी खात्री आहे की उपयुक्त दोन्हा विषया – संबंधी गांभीर्याने परिषद विचार करेल. या सर्व व लवकरात लवकर किंबहुना या संमेलनाबाबत त्यादृष्टीने ठराव करुन नंतर

● ● ●

# निमंत्रण रंगकर्मींना



# माता दिसली गायनी विहरत नेत सकळ रंगमंदिरी...

- सौ.दीप्ती किरण भोगले

विनय, नम्रता हा आईचा अंगभूत गुण आहे. ती म्हणते, आम्ही जे समृध्द गाणं ऐकल, त्यातल कणभरसुध्दा आमच्या गळयातून भाहो निघत नाही. आणि माझा विश्वास आहे, जे दिव्य संगीत आम्ही अनुभवलं, ते पुढे केव्हातरी पुन्हा अनुभवता येईल, तोपर्यत पूर्वजांचा हा अमोल वारसा आपण सांभाळला पाहिजे. त्या अनामिक स्वरगंधर्वांपर्यंत संगीत नाटकाचा हा वारसा आपल्याला सतेज ठेवायचा आहे. साधना खडतर आहे, पण दुःखदायक नाही.

मला आनंदान तृप्त करणारी एकच गोष्ट आहे ती महणजे लोकांमध्ये आमची ओळख , गाणारं कुटुंब, अशी आहे. मंगल ते स्वर धाम, ही ओल सार्थ करणारं ते गाणं, संगीत नाअकाच आहे. हे गाणं पिढयानपिढया झिरपणार आहे. याची साक्ष अवघं मराठी मन आहे. हे गाणं आमच्यापर्यत आईनं पोहचवलं.

अहमदनगरच्या ८३व्या नाटय संमेलनाची अध्यक्ष म्हणून आईची निवड झाली. हे आणखी वेगळं रूप! आतापर्यंत मी आईची वेगवेळी रूपं पाहिली. गृहिणी, आई, गायिका, अभिनेत्री गुरू अशा वेगवेगळया रूपात ती मला दिसली आहे, ते संगीत सेवेचं अर्घ्य देणाऱ्या एका नादवतीचं! एक वैभवशाली परंपरा, व्रतस्थपणे सांभाळणारं ते रूप आहे स्वमुग्ध योगिनीचं!

मला आइवतय तेंव्हापासून, रियाझ करणारी, रंगभूमीवर गाणारी, मैफल जमवणारी माझी आई सरळ स्वभावाची साधी भोळी, अस्स्ल संसारी स्त्री आहेत्र भांडणतंटे, रूसवेफुगवे, बारीकश गोष्टिंचे मोह, घरातले कष्ट, सुगरणपणा, हे गुण इतर बायकांप्रमाणे तिच्यातही पुरेपूर आहेत. पण जेंव्हा ती पातळीवर दिसते. माझ्यापासून मी तिचं गाणं ऐकत आले आहे. तिची स्वर मांडण्याची धाटणी मला पूर्ण परिचीत असूनही काही वेळेला तिचं गाणं ऐकतानां वाटतं, आजचे सूर काही वेगळेच आहेत. कुठल्यातरी चैतन्याचा स्पर्श झालेले हे सूर झळझळीत आहेत. प्रत्येक कलाकाराला दैवी देणगी असतेच. त्या देणगीचा शोध जेंव्हा तो कलाकार घेतो, तेव्हा हे अननुभूत क्षण त्या कलाकाराबरोबर रसिकांनाही मिळतात, एरव्ही नित्य सवयीनं कलाकार कारागिरी करतो. आईची कारागिरी माझ्या ओळखीची आहे. पण जेंव्हा आत्मनंदात गुंग होऊन ती गाते तेंव्हाची माझी अनोळखी वाटणारी आई, मला फार प्रिय आहे. १९४२ पासून आजतागायत म्हणजे सतत ६१ वर्षे, ती या कालानंदात गुंग आहे. १९९२ हे वर्ष आमच्या घरात मोठं गमतीच होतं. रंगभूमीवर सतत ६१ वर्षेमाझे वडील , ५० वर्षेआई, २५/३० वर्षेमी आणि कीर्ती काम करत होतो. म्हणजे एकाच घरात हिरक महोत्सव, सुवर्ण महोत्सव, एकाच वर्षी विश्रांतीसाठी न थंबता आम्ही या संगीत नाटकाच्या सहवासात आहोत. देवानं आम्हाला केवढा आनंदाचा ठेवा दिलाय! आम्ही कृतज्ञ आहोत.

विनय, नम्रता हा आईचा अंगभूत गुण आहे. ती म्हणते, आम्ही जे समृध्द गाणं ऐकल, त्यातल कणभरसुध्दा आमच्या गळयातून भाहो निघत नाही. आणि माझा विश्वास आहे, जे दिव्य संगीत आम्ही अनुभवलं, ते पुढे केव्हातरी पुन्हा अनुभवता येईल, तोपर्यत पूर्वजांचा हा अमोल वारसा आपण सांभाळला पाहिजे. त्या अनामिक स्वरगंधर्वांपर्यंत संगीत नाटकाचा हा वारसा आपल्याला सतेज ठेवायचा आहे. साधना खडतर आहे, पण दुःखदायक नाही.उलट हे कष्ट करतानाही जो आनंद मिळतो, त्याचं मोल कशालाचं नाही. या आनंदाची श्रीमंती, त्याचं मोल कशालाच नाही. या आनंदाची श्रीमंती, ही दद्रैपतीच्या अक्षय थाळीप्रमाणे सतत वाढणारी आहे.

खरोखर, हा अनुभव आम्ही लहानपणासून घेतोय, संगीत नाटकाच्या कलाकारांना हा अनुभव जसा येतो, तसाच तो रसिकांनाही येतो. सुप्रसिध्द लेखिका कमलाबाई फउके नेहमी म्हणायच्या व्याधीग्रस्त आप्पा साहेबांना (ना. सी. फडके) जयमालाबाईंचं गाणं नेहमीच टॉनीकप्रमाणे उपकारक ठरलं आहे. रॅग्लर ग. स. महाजनी म्हणायचे – शिलेदारांची नाटकं म्हणजे माझं ट्राँक्विलायझर आहे.

मुलगी म्हणून मी आईची स्तुती करत नाही. ६७ मध्ये आईच्या नायिका जीवनाचा रौप्य महोत्सव साजरा करणारा एक गौरव ग्रंथ प्रसिध्द झाला होता. त्यात आदरणीय हिराबाई बडोदेकर म्हणतात– सौ. जयमालाबाई पाच वर्षाच्या होत्या, तेंव्हापासून मी त्यांना ओळखते. त्यावेळी त्याच गाणं एकून मला असं वाटल, की ही मुलगी पुढेमागे नाव काढणार. माणी ही भविष्यवाणी खरी ठरती, हे पाहून मला आज समाधान होतय. नाटयकलेची सेवा बालपणापसून आतापर्यत, त्या अव्याहतपणे करत आहेत. नाटय संगीत आणि शास्त्रीय संगीत गाण्यात त्या सरस आहेत. ज्या मुलींना संगी नाटकातून भूमिका करायच्या असतील त्यांनी जयमालाबाईचा आर्दश दृष्टिसमोर ठेवावा असं मी अभितानाने सांगते.

ज्यांच्यामुळे स्त्री गायिकांना आदराचं स्थान प्राप्त झालं, त्या हिराबाईंचं हे प्रशस्तीपत्र आम्हा शिलेदार कुटुंबियांना फार मोलाचं वाटतं.

सौ. जयमालाबाईंनी किर्लोसकर, गंधर्व परंपरा चालविली आहे. स्वच्छ वाणी, उत्तम नाटयसंगीत, परंपरेतला सभ्यपणा आणि भारदस्तपणा त्यांनी चांगलाच आत्मसात केलाय. सौ. जयमालाबाई आणि जयरात शिलेदार यांच्याशिवाय मराठी नाटयसृष्टीचा इतिहास पूर्ण होणार नाही. असं माझ प्रांजळ मत आहे, असं जेंव्हा आदरणीय पं. विनायक पटवर्धन म्हणतात, तेंव्हा मन गौरवानं फुलून येतं.

आदरणीय प्रा. ना. सी. फडके यांनी ईच्या गाण्यातलं वैशिष्टय सांगितलं – सौ. जयमालाबाईनी स्वत;च्या अंगच्या गायन सामर्थ्याचा

स्वावलंबनाने विकास येईल ते ते आत्मसात करण्याची तत्परता त्यांनी दाखवली आहेच, परंतु शिवाय स्वतंत्र बुध्दिनं काही चांगलं निर्माण करण्याची हौस त्यांच्या ठिकाणी आहे. खास स्वतःची अशी आपल्या गाण्याची एक स्वतंत्र आणि श्रुतीमनोहर कला त्यांनी निर्माण केली आहे. त्यांच्या नाटयसंगिताचं सगळयात अधिक महत्त्व आहे. ते माधुर्याला, रंजकतेला आणि कल्पक चमत्कृतीला. ही गोष्ट ओळखून जयमालाबाईंनी नाटकातली पद गाण्याची एक विशिष्ट श्रुतीमनोहर पध्दती बसवली आहे. विशेषतः का रागातील कोणत्यातरी एका स्वरावर त्या स्थिर होतात,त्या स्वरातून दुसऱ्या रागाची उपज करतात, आणि पुन्हा पहिल्या रागाकडे येताना मुलायम सफाईने सांधे जुळवतात, ही सारी करामत इतकी चातुर्याची असते, की तिची गोडी अवीटच म्हणावी लागेल.

मराठी रंगभमूवरचे भीष्माचार्य, असे परशराम सामंत म्हणतात सौ. हिराबाई बडोदेकर यांच्यानंतर मराठी रंगभूमीवर तितक्याच दर्जेदारपणे कामे करणारी आणि पदे म्हणणारी नायिका म्हणजे सौ. जयमाला शिलेदार, सुंदर वागणं आकर्णि देखणं गाणं म्हणजे सौ. जयमालाबाई . उत्तम नट, दिग्दर्शक, निर्माता असे गोपिनाथ सावकार म्हणतात. व्यवस्थित चाललेलं कार्य मोडकळीला आलेले असताना पुन्हा ते उभे करणं, फारच कठण आहे.

कविवर्य सोपानदेव चौधरी म्हणतात- खरे मराठी ढंगाचे गाणे अशी आत्मीयता जयमालाबाईंनी निर्माण केली आहे. बालगंर्धवाच्या गाण्याला अनुसरता अनुसरता त्यांनी आपलं वैशिष्टय निर्माण केल आहे, स्वतःची शिलेदारी राखली आहे.

आदरणीय गोपालकृष्ण भोळे म्हणतात, सौ. जयमालाबाईजवळ उकृष्ट अभिनयाबरोबर गाननैपुण्य या दोन्ही गोष्टी समतोल आहेत.त्यांनी केवळ परंपरा राखली, एवढेच नव्हे तर त्या परंपरेला उजाळा देऊन स्वतःपासून एक नवी परंपरा निर्माण केली. श्रोत्यांचे मन व्यापून टाकणारा, धुंदी चढवणारा, चटकण डोळयात पाणी उभे करणारा षड्ज असा आनंददायी आहे. बालगंधर्व घराण्याची गायकी, त्यांची सर्व पदे, त्यातील कठीण व लयदार स्वरालंकारांसह भावभावनांसह, समजदार लोकांना रूचतील अशी, कोण गात असतील, तर त्या एकमेव सौ. जयमाला शिलेदार याच होत.

ख्यातनाम संगीतकार वसंत देसाई म्हणतात, बालगंधर्वच्या रंगभूमीवर, त्यांचा आशीर्वाद जयमालाबाईंना मिळालेला आहे.

आई ही अशी एकूणच भाग्यशालिनी आहे. तिनं स्वतः बालगंधर्वांची परंपरा पुढे चालवली आणि यापुढेही चालवण्यासाठी तिला कीर्तीसारखी मुलगी मिळाली. बालगंधर्व, गंगाधरपंत लोंढे, चिंतामणराव कोल्टकर, गणपतराव बोडस, गोविंदराव टेंबे, विनायक बुवा पटवर्धन, चिंतुबुवा गुरव अशा दिग्गजांकडून तिच्या कलेला नेटके रूप मिळाले. जयराम शिलेदारांसारख्या रसिक पति मिळाल्यामुळे तिच्या हातून नाटय संसाराचा प्रपंच आणि संगिताचा परमार्थ घडू शकला. किर्लोसकर खाडीलकर, देवल गडकरी अशा नाटककारांनी ज्या नायिका रेखाटल्या, त्या विनयवती कांता आहेत. त्यांची रूपं सोज्वळ, शालीन, सात्विक, नम्र आहेत ज्या रूपात माझी आई सहज तन्मय होते. मनाला शांत करणारा तिचा आवाज, उत्तम गानशिक्षिका असूनही स्वतःला विद्यार्थिनी समजत असल्यासारखी तिची वृत्ती- मला हेच गाणं म्हणायला लावते- सूरगंगा मंगला!

या सूरगंगेची सुरूवात, आजोबा नारायणराव जाधव यांच्याकडून झाली. आजोबाचं आणि संगीतसूर्य केशवराव भोसल्यांचं लांबचं नातं होतं. केशवराव हे आजोबांच्या मावशीचे यजमान. आजोबा उत्तम तबला वाजवत. ललित कलादर्शमध्ये ते कामही करत. नंतर काही दिवस गंधर्व कंपनीत, नंतर गोविंदराव टेंबे यांच्या शिवराज मंडळीत! भाटेबुवांची नाटयकलाप्रवर्तक मंडळी इंदूर मुक्कामी असताना आईचा जन्म झाला. आपल्या मुलांनी चांगले कलाकार बनाव. अशी आजोबांची तळमळ असे. लहान वयातच आई गाण्याचं नोटेशन करयात तयार होती. आजोबांनी बेळगावला स्थायिक होऊन गायन क्लास काढला. बायकांना गाणं शिकवायला मुलगी हवी म्हणून छोटया प्रमिलेकडे ही कामगिरी आली. ८/१० वर्षाचे हे छोटे गुरूजी आधी शिकून घेतलेले ज्ञान ४०/५० वर्षाच्या मोठया शिष्यांना शिकवत असत.

क्लासच्या वार्षिक उत्सवात गाणं एकून गोविंदरराव टेंबे यांनी प्रमिलेला आपल्या वेषांतर नाटकाची नायिका केलं. पुढं गंगाधर पंत लोंढे यांनी शारदा, सुभद्रा आणि मग बालगंधर्वानी तिला रुक्मिणी केलं. डॉ.भालेराव यांच्या साहित्य संघाच्या नाट्योत्सवात जयराम शिलेदार आणि प्रमिला जाधव यांची दुष्यंत शकुंतलेच्या भूमिकांमध्ये गाठ पडली. नारायणराव जाधव आणि जयराम शिलेदार यांनी मराठी रंगभूमी, पुणे ही संस्था स्थापन केली. विजयादशमीच्या शुभमुहुर्तावर - १९४९ मध्ये प्रमिला जाधव सौ.जयमाला शिलेदार झाली ती १९५० मध्ये तेव्हापासून हे नटी सुत्रधार संगित नाटकांचा संसार सांभाळू लागले मराठी रंगभूमी पुणे ही संस्था आजतागायत कार्यरत आहे.

आईनं संस्थाचालिकेचं काम मोठ्या आत्मीयतेनं सांभाळल पुढची पिढी घडवली. नवीन कलाकारांना शोधुन उत्तम शिक्षण देण्यासाठी आजही ती तत्पर आहे. गुरुपौर्णिमेला तिच्या विद्यार्थ्यांनी आवर्जून संगीत नाट्यप्रवेश सादर करतात.

आईची ही प्रत्येक रुपं मोठी मनमोहक वाटतात. आता हे नवं - अध्यक्षपदाचं रुप तिला किती खुलुन दिसतंय ते पहायचं.

• • •

# संगीत नाटक, नटांची उपेक्षा

– जयमाला शिलेदार

ठिकठिकाणी भरलेल्या भारत महोत्सवात भारतातल्या कलांना स्थान मिळालं, पण संगीत नाटक हेतुपुरःसर डावललं गेलं. पारंपारिक रंगमंच उत्सवात मराठी संगीत नाटकाला स्थान नाही.गेल्या पंधरा वर्षात एकाही संगीत नाटला संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला नाही.

रंगभूमीवर नितांत प्रेम असलेले रंगमंचावरील  सगळे मान्यवर, उपस्थित कलाकार, स्नेही, कार्यकर्तेआणि रसिक हो ... आपल्या सर्वाना माझ विनम्र अभिवादन . अनेक थोर, गुणी लोकांनी भुषवलेलं ह पद, मला मिळालं, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. आयुष्यभर संगीत रंगभूमीची सेवा केली, तिला मिळालेली ही दाद आहे, असं वाटतं. आमच्या दुर्लक्षित रंगभूमीची व्यथा मांडण्याची संधी यानिमित्तानं मला मिळाली आहे. पंडितराव नगरकर, रूस्तुमकाकांपासून मामा तोरडमल, सदाशिव अमरापूरकर यांच्यापर्यंत अनेक गुणी कलाकरांची कला ज्या भूमीत बहरली, त्या अहमदनगरच्या संमेलनात, आपल्या सर्वाच स्वागत असो.

मी संगीत रंगभूमीची प्रतिनिधी आहे. संगीत नाटकांबद्दल आजपर्यंत पुष्कळ उलट सुलट बोललं गेलं आहे. आज मला माझा अनुभव सांगायचा आहे. वडिल, पती, मुली आणि नातवंड, अशा आमच्या चार पिढयांना संगीत नाटकानं जो आनंद दिला आहे, त्याचबद्दल मला सांगायचे आहे. मी देवाची ऋणी आहे त्यानं मला संगीत नाटकाच्या वातावरणात जन्माला घातलं. माझ्या वडिलांनी नारायणराव जाधवांनी माझ्या गुणांना लहानपणापासूनच उत्तेजन दिलं. सुदैवानं शिलेदारांसारख`जीवनसाथी मिळाले. आम्हा दोघांचं परमदैवत होतं नटसम्राट बालगंधर्व, दोघांनाही गंधर्व मंडळीत काम करण्याची संधी मिळाली. गणपतरावदादा बोडस चिंतुबुवा गुरव यांच्यासारख्या गुरूजनांकडून संगीत, अभिनयाची तालीम मिळालीच संगीत नाटकात काम करण्याचा सुंदर अनुभव मिळत गेला आणि नकळत संगीत नाटकाची अदृश्य वीणा आम्ही कधी खांद्यावर घेतली ते कळलच नाही.

मी शाळेत पाचवीपर्यंत शिकले. तर शिलेदार सातवीपर्यंत. त्यानंतर आमचं पुढचं शिक्षण संगीतनाअक मंडळीत होत गेलं.  पूर्वीच्या नाटक मंडळरूा म्हणजे गुरूकुलचं होती. किर्लोसकर, देवल, खडिलकर, गडकरी अशा थोर  लोकांची नाटकं आम्हाला शिकायला मिळाली. शुद्ध भाषा, शुध्द आचार आणि शुदध विचारांची शिकवण तिथचं मिळाली. बालगंधर्वाचं निकोप गाणं, सहज अभिनय, प्रसन्न दर्शन या गुणांबरोबरच रंगभूमीरची त्याची निष्ठा, मायबाप रसिकांवरचं त्यांचं प्रेम आणि सहकारी कलाकारांबद्द लची तळमळ या सगळ्या गोष्टि जवळून पाहण्याची संधी गंधर्व मंडळीतल्या वास्तव्यात मला आणि शिलेदारांचा अुभवायला मिळाली. किर्लोस्कर – देवल यांच्या  पठडीचं नाटय आणि संगीत शिक्षण गणपतरावदादा बोडस आणि चिंतूबुवा गुरव यांच्याकडून मिळालं. पद म्हणताना पदाचा अर्थ, भाव आणि रस जाणून त्याचा अभिनय व्हायला हवा, हे फार काटेकोरपणे  सांगितल गेलं. गणपतरावदादांनी आम्हाला भूमीकांचा अभ्यास जसा शिकवला तसा पदातल्या टप्पा गायकिच्या नाटकीताना, मुरक्या, हरकती या गोष्टिही शिकवल्या. पद गाताना त्यातलं नाटय कसं प्रगट होईल, हे समजावून सांगितलं. आम्हा गायक मंडळींना ते नेहमी बजावत, एकटे असाल तेंव्हा थोडसं गाऊन घ्या. दोन पात्रं रंगभूमीवर असली तर त्याहून आटोपशीर गा. आणि जास्त पात्रं असतील तर नुसती आऊटलाईन म्हणा.

त्या काळी तालीम मास्तरांचा वचकनाटक कंपनीतल्या नटवर्गावर चांगला असे. कडक शिस्तितल्या तालमीनंतरही नटांकडून चुका झाल्या, तर दुसऱ्या दिवशीच्या तालमीत चांगली खरडपट्टी निघे. धन्य आनंद दिन सारखं पद कुणी कपाळाला आठया घालून म्हटलं की दुसऱ्या दिवशी गणपतराव त्यांचं असं विडंबन करीत की त्या नटाला प्रसन्न वदन राहण्यावाचून गत्यंतर नसे शब्दांची तोडमोड अजिबात चालायची नाही. मधुमधुरा तवगिरा या पदातील भासं निशेची भूल मना ही ओळ म्हणताना भासे निशेची भू  ........ लमना असं कोणी म्हटलं िगणपतराव दादांच्या भुवया  उंच व्हायच्या. डोळे मोठे व्हायचे आणि त्यांच्याकडून जी सरबत्ती सुरू व्हायची की पुन्हा म्हणून यतिभंगाची भूल तुमच्या हातून आयुष्यात घडणारचं नाही.ही किर्लोस्कर मंडळींची शिस्त होती. ही ताली तालीम सुदैवाने शिलेदारांना मिळाली. तशी मलाही मिळाली. आम्हाला मिळालेली ही दीक्षा आम्ही पुढच्या पिढीपर्यत पोहोचवली.

मी जेंव्हा कामाला सुरूवात केली, तेंव्हा रंगभूमीवर स्त्री पार्टी कलाकारांचा जोर होता. रंगभूमीवर स्त्रीयांनी नुकताच प्रवेश केला होता. नटवर्य चंद्रकांत गोखल्यांच्या मातोश्री कमलाबाई गोखले संदर काम करीत. मी शारदा असताना त्यांनी शारदेच्या आईचं इंदिराकाकूचं काम माझ्याबरोबर केलं होतं. स्त्रीपार्टी नटांच्या युगात मानापमानातल्या धैर्यधराचं काम त्यांनी अतिशय तडफेनं केलं होतं. हिराबाई बडोदेकरांनी सुभद्रेची भूमिका केली ती खूप लोकप्रिय होऊन गेली. सुभद्रेच्या वद जाऊ कुणाला या पदावर त्योच्यामुळं किराणा गायकिची छाप ठसली असं म्हणावसं वाटतं. त्याच्यानंतर ज्यांत्सनाबाई भोळ्यांनी आपलं युगच निर्माण केलं.तिथून पुढं स्त्रियांना रंगमंचावर वावारणं सोप होत गेलं. त्या सगळ्या आद्या कलावतींना माझं विनम्र वंदन त्या काळात आम्ही सगळ्या जणी माईकशिवाय गात होतो. अर्थात त्या काळचे रसिकही जिवाचा कान करून नाटकांचा आनंद घ्यायचे.

नुकतच बोलपट सुरू झाल्यानं रंगभूमीला पडता काळ आला होता. नाटक कंपन्या धडाधड कोसळत असताना रंगभूमीला संजीवन देण्यासाठी डॉ. अ. ना. भालेरावांसारख्या देवमाणसानं, आपल्यासारखीच तळमळीची कार्यकीर्ती माणसं जमवली. जंष्ठ कलाकारांना आणि आमच्यासारख्या होतकरू

तरुण मंडळींना एकत्र आणलं. चांगल्या तालीम करून, उत्कृष्ट नेपथ्य, वेशभूषा जमवून  नेटक्या संयोजनानं त्यानी चांगल्या गद्य आणि संगीत नाटकाचे भव्य महोत्सव केले. आणि पुन्हा ऐकदा नाटकाच्या चळवळीला पोषक वातावरण निर्माण केलं. याच महोत्सवातल्या शाकुंतल नाटकाच्या वेळी शिलेदारांची गाठ पडली. दोघांचे विचार जुळले आणि पहिल्यांदा आम्ही संगीत नाटक कंपनी काढायचं ठरवलं. डॉ. भालेरावांना भेटायला गेलो. आमचा संगीत नाटक कंपनीचा मनोदय कळताच डॉक्टरांनी आनंद व्यक्त केला आणि दोन ट्रक नेपथ्याच सामान कोणताही मोबदला न घेता त्यांनी आम्हाला वर्षभर वापरायला दिलं. त्या शाबासकीवर सुरू झालेली आमची मराठी रंगभूमी गेली चोपन्न वर्षे अविरत वाटचाल करीत राहिली आहे. सुरूवातीचा काळ खूप खडतर होता. पण सहकरी कलाकारांनी त्या काळात मोलाची साथ दिली. बाबा वैशंपायन, श्रीधरपंत चाफेकर, हंसराज कोरडे, अनंतराव वेर्णेकर, रा. वि. राणे, बाळ कोल्हटकर अशी गुणी मंडळी कंपनीत होती. आमच्या कंपनीला विर्दभात चांगलं यश मिळालं. पण सगळे दिवस सारखे कधीच नसायचे. इन्कम पडल्यावर महिना महिना एका गावी असलेला मुक्काम दुसरीकडं हलवताना माझ्या गाण्याच्य मैफिली करून पुढचा मुक्काम गाठावा लागे. आजही तेच तत्त्व आम्ही पाळत आहोत. आम्च्या संगीत नाटकांचा संसार सर्वस्वी गाण्याच्या मैफिलीवरच चाललेला आहे. कंपनीचं पगारी बिऱ्हाडी स्वरुप ५८ साली बंद झालं पण नंतर नाईट पद्धतीनं नाटकं होऊ लागली. मराठी रंगभूमीनं १५ जुन्या संगीत नाटकांबरोबर बावीस नवीन संगीत नाटकं रंगभूमीवर आणली. पौराणिक, ऐतिहासिक, काल्पनिक,सामाजिक सगळ्या प्रकारचे विषय हाताळले. मोजक्या कलाकृतींनी यश पाहिलं. जेंव्हा जेंव्हा आमच्यावर कठीन प्रसंग आले तेंव्हा आमच्या साध्यासुध्या रसिकांनी आपणहून मदतीचा हात देऊन ते संकट निवारलं आहे. नांदेडचे विठ्ठलपंत ठोंबरे, नागपूरचे श्रीमंत बाबुराव देशमुख, मुंबईचे केशवराव पोतनीस, दादासाहेब आपटे अशा रसिकांच्या ऋणातून आम्ही कधीच मुक्त होऊ शकत नाही.

मुलीच्या शिक्षणासाठी आम्ही पुण्यात स्थयिक झालो. आमच्यामुळे मुलीवर संगीत नाटकाचे संसेर नकळत घडत होते. संगीत नाटकांकड आम्ही मुलींना सक्तीने मुळीच वळवलं नाही. पण त्या आमच्या नाटकाच्या खेळांना आणि तालमींना हजर राहत, त्याला कधी आडकाठीही केली नाही. आदल्या दिवशी पाहिलेल्या प्रयोगाचं त्या दुसऱ्या दिवशी विडंबन करीत. शिलेदारांनी त्यांच्यातले सुप्त गुण ओळखलेआणि त्यांच्यासमोर सौभद्र नाटकाचं आव्हान ठेवलं. वर्षभर मुलींनी आणि पुतन्या सुरेशनं मेहनत घेतली आणि तीन शिलेदारांचं सौभद्र साकारलं. मुलींचे पाय संगीत रेगभुमीवरच घट्ट रोवले गेले. मुली आमच्यासारख्या संगीत नाटयवेडया झाल्या हा माझा सर्वात मोठा आनंद आहे. आम्ही दोघं आणि दोन्ही मुल संगीत नाटकात पूर्णपणे विरघळून गेलो. संगीत नाटक हेच जीवन झाल्यानं आमच्या घराला सदैव समाधानाचं वरदान लाभलं. माझ्या सदा हसतमुख राहण्याचं रहस्य कशात आहे सांगू? मी संगीत नाटकात काम केलं आहे ... मी नाटयसंगीत गाते आहे... ते सूरच माझ माझ्या जीवनाचा श्वास बनले आहेत.

साधारणपणे साठच्या दशकात प्रोजनाटकांनी चांगला जम बसवला होता. वेगळे विषय , उत्तम नेपथ्य, नेमकी प्रकाश योजना आणि नव्या विचारांची कलाकार मंडळी एकत्र येऊन उत्तम बांधणीचं गद्य नाटक पकरणामकारकपणं सादर व्हायला लागलं आणि बघता बघता जाणकार रसिकांच्या मनात त्यानं आपल स्थान निर्माण केलं. संगीत नाटक मंडळ्या बंद पडत गेल्यावर कंत्राटदार मंडळींनी संयुक्त नटसंचातले प्रयोग सुरू केले. अर्जुन मुंबईचा सुभद्रा पुण्याची, तर कृष्ण  कोल्हापूरचा असे कलाकार एका नाटकापुरते एकत्र येऊन, तालमीविना, कशातरी नेपथ्यात, जमले त्या वेषभूषेत सेगीत नाटक सादर होऊ लागलें. पदांच्या मैफिलीसुरू झाल्या. रसिकांनीही संगीत नाटकातल्या पदांचं अवास्तव कौतुक केले.संगीत नाटकाच्या गद्यपद्याच्या तराजूचं पद्याचं पारडं जड झाल्यानं संगीत नाटकाची बांधणी ढासळत गेली. या कंत्राटी प्रयोगातही आपलं कर्तृत्व सिध्द करणाऱ्या कलाकारांनी संगीत रंगभूमी जागती ठेवली हे नाकारून चालणार नाही. छोटा गंधर्व, रामभाऊ मराठे, मा. दामले,नानासाहेब फाटक, मा. दत्ताराम अशा अनेक मंडळींनी सौभद्र, मानापमान, स्वयंवर, एकच प्याला, संशयकल्लोळसारखे प्रयोग गाजवले.

मानापमान नाटकापासून गोविंदराव टेंब्यांनी संगीत दिग्दर्शकाचं स्थान निर्माण केलं. भास्करबुवा बखल्यांनी स्वयंवर नाटकानं शास्त्रीय संगीताची जाणकारी मराठी रसिकांना प्राप्त करून दिली. मा  कृष्णरावांच्या लडिवाळ सुगम शैलिनं रसिक मोहून गेले. गायनाचार्य वझे बुवांनी आपल्या आगळ्या ढंगाची तडफदार गायकी ललितकलादर्श, बलवंतच्या रंगमंचावर आणली. असं वेगवेगळया ढंगाच गाणं संगीत नाटकात आलं. वेगवेगळे ताल, ठेके, संगीत नाटकानं स्वीकारले आणि नाटयसंगीत दिवसेंदिवस समृध्द होत गेलं. बालगंधर्व, केशवराव भोसले, मा. दीनानाथ अशा दिग्गज कलाकरांनी संगीत रंगभूमी तळपत राहिली. संगीत नाटकाच्या याब सुवर्ण काळानंतर चित्रपट – बोलपट युग अवतरल्यावर संगीत रंगभूमीची लोकप्रियता घटू लागली.

बालगंधर्वाच्या नंतर ज्योत्सनाबाईंच्या कुलवधु, आंधळयांची शाळ, अशा नाटकांनी एक कालखंड चांगला गाजवला. मो. ग. रांगणेकरांनी आटोपशीर नेपथ्य, कौटुंबिक कथानक आणि मापक संख्या असलेली पदं योजून सुटसुटीत संगीत नाटकाचासाचा बेतला. ज्योत्सनाबाई भोळयांनी आपल्या गोड गळयाने आणि सहजसुंदर अभिनयानं रंगवलेल्या नायिका त्या काळात अतिशय लोकप्रिय होऊन गेल्या. त्यानंतर साठच्या दशकात विद्याार गोखल्यांनी पंडितराज जगन्नाथ आणि सुवर्णतुला ही नाटकं लिहिली. भालचंद्र पेंढारकर आणि गोपिनाथ सावरकर यांनी ती रंगभूमीवर आणली. त्यामुळं पुन्हा एका नवीन संगीत नाटकाचा कालखंड गाजवला. कानेटकरांच्या मत्स्यगंधा शिरवाडकरांच्या ययाति आणि देवयानी दारव्हेकरांच्या कट्यार काळजात घुसली या नाटकांनी प्रेक्षकांना तृप्त केले. त्यातील खाँसाहेबांची भूमिका डॉ. वसंतराव देशपांडयांनी अजरामर केली. वसंत देसाई, रामभाऊ मराठे, छोटा गंधर्व, प्रभाकर भालेकर, गोविंदराव अग्नि यांच्यासारख्या संगीतकारांचं संगीत नव्या नाटकांना लाभलं. जितेंद्र अभिशेकींसारख्या प्रतिभावान संगीतकारानं

एकाहून एक गोड चाली देऊन नाट्यसंगितात आपला स्वतंत्र ठसा उमटवला.

आमच्या मराठी रंगभूमीसाठी विद्याधर गोखल्यांनी माय फेअर लेडी वर आधारित स्वरसम्राज्ञी हे नाटक लिहिलं. या नाटकानं पंडित नीलकंठगुवा अभ्यंकरांसारख्या एका अतिशय गुणी कलावंतांचा लाभ झाला. अभ्यंकरबुवा हेही आमच्यासारखेच गंधर्वप्रेमी आणि मास्तर कृष्णरावांचे भक्त. शास्त्रीय संगीतात लयदार गायक असलेल्या अभ्यंकर बुवांनी स्वरसम्राज्ञी नाटकात लावणी, गजल, ठुमरी, भावगीतापासून शास्त्रीय चीजांपर्यंत सगळ्या पदांना सुंदर चाली दिल्या. गाणं शिकवण्याचीत्यांची पध्दत किर्लोस्कर देवल परंपरेला साजेशी होती. गाण्यातले भाव डोळ्यात प्रकट झाले पाहिजेत हे गणपतरावदादांचे बोल बुवांच्या गाण्यात प्रत्ययाला येत होते. आमचं हे स्वरसम्राज्ञी नाटक रसिकांना खूप आवडलं.

नाटकात वास्तववाद बोकाळल्यानं संगीत पाअक टीकाकारांच्यातडाख्यात सापडलं. या टीकेला आमच्यासरख्या कमी शिकलेल्या कलाकारांनी कधी उत्तर दिले नाही. त्यामुळे त्यांना फारच उत आला. नवनाटकवाल्यांनी त्यामुळं संगीत नाटकाला कायम हीन लेखलं. एका चांगल्या परंपरेची पायम पायमल्ली होत राहिली. नवे नाटककार, कलाकार, साथीदार आणि रसिक, संगीत नाटकांबद्दल उदासीन होऊ लागले. चांगले गळे असणारे तरुण कलाकार रीमिक्स किंवा फ्युजन संगीताकडं आहेत. शास्त्रीय संगीतातल्या कलाकारांनी नाट्यसंगीताला अकारण दुय्यम स्थान दयायला सुरुवात केली आहे. नाट्यसंगीत गाऊन लोकप्रियता मिळवलेल्या गायक गायिकांनी कृतघ्नपणे त्याच्याकडं पाठ फिरवली. एवढच काय पण आपल्या शिष्यांना संगीत नाटक किंवा नाट्यसंगीत या विषयांना बंदी घातली. त्यामुळं सहज साधणाऱ्या चांगल्या अनुभवांपासून आपण नव्या पिढीला वंचित करत आहोत हे त्यांच्या गावीही नाही. आपल्याच मातीतल्या चांगल्या परंपरेचा आपण ऱ्हास करतोय, हे या विद्वान मंडळींना कसं समजत नाही? अब्दुल करीम खाँ साहेब, पु. भास्करबुवा बखले, सवाई गंधर्व, कुमार गंधर्व, भीमसेन जोशी अशा थोर गायकांनी नाट्यसंगीताचा आनंद स्वतःही घेतला आणि रसिकांनाही दिला. त्यात कमीपणा मानला नाही. पण अलीकडच्या शास्त्रीयसंगीतवाल्या मंडळींनी हे नसतं अवडंबर का माजवलं हे त्याचं त्यांनाच ठाऊक!

संगीत नाटकांवर प्रखर टीका झाली. पण त्याचं सामर्थ्य जाणलं गेलं नाही. स्वातंत्र्य संगीत नाटकांना श्र्य मिळायचा. पण संस्थानं खालसा झाल्यावर ती मदत पूर्ण थांबली. गंधर्व शताब्दीनंतर एकाएकी संगीत नाटकाला वाईट काळ आला. ठिकठिकाणी भरलेल्या भारत महोत्सवात भारतातल्या सगळ्या कलांना स्थान मिळालं पण संगीत नाटक हेतुपुरःसर डावललं गेलं. पारंपारिक रंगमंच उत्सवात मराइी संगीत नाटकाला स्थान नाही. गेल्या पंधरा वर्षात एकाही संगीत नटाला संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला नाही. दोन-अडीच तास चालणाऱ्या गद्यनाटकांच्या मापामुळं संगीत नाटकांना पुरेसा अवधी आणि चांगल्या तारखा पुण्या-मुंबईतल्या थिएटरमध्ये मिळत नाहीत. गेल्या १०-१२ वर्षात प्रचंढ वाढलेली थिएटर भाडी, जाहिरात, प्रवास, नाईट, इतर खर्च आणि तुटपुज इन्कम यांची तोंडमिळवणी करताना संगीत नाटक कंपन्या जरीला आल्या आहेत. प्रेक्षक तुटत चालला आहे. आणि संगीत नाटक दुर्मिळ होतय!

शाकुंतल-सौभद्रापासून सुरू झालेला संगीत नाटकांचा ओघ विद्याधर गोखल्यांच्या नाटकापर्यंत चालू राहिला. नंतर नवविचारांच्या मंडळींनी घाशीराम कोतवाल, तीन पैशाचा तमाशा इत्यादी नाटकांना, तसेच अलीकडच्या हलक्या फलक्या नाटकांना संगीत नाटक म्हटलं जावं, असे विचार व्यक्त केले आहेत. माझ्या मते ही वेगळ्या विचार धारांची नाटकं आहेत. संगीत हा त्यांचा प्रधान हेतु नाही. सौभद्र शारदासारख्या नाटकातून संगीत वगळलं तर त्यांचा परिणाम बासरीतून फुंर वगळल्यासारखं होईल. केवळ पाश्चात्य सुरांचा उपयोग केला तरच नाविन्य येइल असं तला वाअत नाही. अजुनही आपल्या संगीत नाटकांत न आलेले आपल्या देशातले संगीत प्रकार, लोकसंगीत धुंडाळून ते प्रकशात आणले गेले पाहिजेत. त्यासाठी नव्या जुन्या कलाकरांनी एकत्र येऊन, अभ्यास करून एखदी कलाकृती घडवली, तर नवीन संगीत नाटक सिध्द होणं कठीण नाही! त्याबरोबर जुन्या पारंपारिक नाटकाचं संवर्धनही झाले पाहिजे. माझ्यासारचो संगीत नाटकात आयुष्य घालवलेले अनेक कलाकर आहेत. नव्या पिढीला मार्गदर्शन द्यायला आम्ही हौसनं तयार आहोत.

आज रंगमंचावरच्या करमणुकीचा चेहराच बदलत चलला आहे. दर्जेदार विषयांवरची नाटकं खूप कमी निघत आहेत. नाट्य परिषदेनं सगळ्या घटक संस्थांच्या सहाय्यानं या परिस्थितीचा आढावा घ्यायला हवा.मराठी चित्रपट सादर होण्यासाठी सरकारनं चित्रपटगृहांवर जशी बंधनं घातली आहेत तशीच जबाबदारी नाट्यगृहांवर टाकावी. प्रत्येक महिन्यातला एक शनिवार-रविवार दर्जेदार कार्यक्रमासाठी सवलतीच्या दरात राखून ठेवण्यात यावा. त्यात बालरंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी, संगीत रंगभूमी आणि पारंपारिक लोककलांना वाव मिळावा. संपूर्ण महाराष्ट्रात दर दिवशी किमान १०-१५ प्रयोगहोत असतात या सगळ्या प्रयोगामागं पहिल्या रांगेतल्या एका तिकाटाची रक्कम नाट्य परिषदेकडे जमा होत रहावी. हा निधी सांस्कृतिक निधी म्हणून उपयोगात यावा, अशा काही सूचना मी करू इच्छिते.

संगीत नाटक परंपरा टिकवण्यासाठी आम्ही आमच्या जयराम शिलेदार ट्रस्टतर्फेगेली दहा वर्ष संगीत नाट्य प्रवेश स्पर्धा, नाट्यसंगीत स्पर्धा घेत आहोत. छोटया स्तरावर हे प्रयत्न चालू आहेत. कारण आमची शक्ति अपुरी आहे. नवोदित मंडळींना रंगमंच मिळावा आणि त्याचा आनंद रसिकांनी घ्या घ्यावा त्यासाठी हे कार्यक्रम पुणेकर रसिकांना आम्ही विनामूल्य दाखवतो, त्याला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सरकारी अनुदान कधी मिळतं, कधी मिळत नाही. पण या उपक्रमात अजूनपर्यत खंड पडला नाही. तमरूण भावी कलाकारांना माझां एवढच सांगणं आहे की संगीत नाटकात काम करण्याचा एकतरी अनुभव घ्या. कॅसेटवरून पदं न बसवता गुरूमुखातुन विद्या घ्या . कॅसेटवरून फक्त बाहेरच रूप कळेल तर गुरूकडं शिकल्यानं त्याचा आत्मा

कळेल! मजी संमेलनाध्यक्षांनी चांगलं संगीत नाटक काढण्याची इच्छा व्यक्त केली होती ती प्रत्यक्षात येवो. निर्माते, कलाकार, तंत्रज्ञ, साथीदार यांच्याप्रमाणच रसिक हो आपलाही सहभाग महत्त्वाचा आहे. आपल्या मुलाबाळांवर, नातवंडावर चांगल्या संगतीचे संस्कार करा. एकदा त्यांना त्याची गोडी वाटली की ती आपसुक या प्रवहाकडे वळतील. नाट्यसंगीत शिकवताना नव्या पिढीतील मुलं कशी रंगून जातात हेमी स्वतः अनुभवले आहे. माझे विचार मांडताना संगीत नाटकाच्या वेदनेकडं आपलं लक्ष वेधावं हाच माझा हेतू होता. तुमच्या आमच्या प्रयत्नानं संगीत नाटकांची परंपरा पुन्हा सतेज होवो हीच नटेश्वरचरणी प्रार्थना करून माझं मनोगत पुरं करते.

धन्यवाद.

● ● ●

# संगीत रंगभूमीला नव संजीवनी लाभेल!

मराठी रंगभूमीच्या पुढील १०० वर्षेच काय, त्यहीपेक्षा जास्त काळ टिकेल आज पहिली गरज आहे ती मराठी भाषा टिकविण्याची. पृथ्वीवर जोपर्यंत मराठी भाषेचे अस्तित्व आहे तोपर्यंत रंगभूमीवर मराठी नाटकाचे प्रयोग होतच राहणार. मराठी रंगभूमीला परंपरा आहे ती १५० वर्षांच! पूर्वी किर्लोसकर पंचायतननं सुरू केलेल्या हया नाटयप्रकारचे पुढे विद्याधर गोखले, पुरूषोत्तम दारव्हेकर, दाजी भाटवडेकर आणि पंडित जितेंद्र अभिषेकी यांसारख्या दिग्गजांनी संवर्धन केलं.

गेल्या तीस चाळीत वर्षात संगीत रंगभूमीवरची बरीच स्थित्यंतरे जवळून पहात आलो आहे. आज काळ बदलला आहे. मुंबई–पुण्यासारख्या शहरी भागात संगीत नाटकाला येणाऱ्या प्रेक्षकांची संख्या रोडावत चालली आहे, हे दुर्दैवी सत्य आहे. पण ग्रामीण भागातून मिळणारा प्रतिसाद अजूनही उत्साहवर्धक आहे. असे असले तरीही संगीत मराठी रंगभूमीचे भविष्य मला तरी कठीन वाटते. त्यासाठी आजच्या संगीत रंगभूमीच्या कलावंतांनी एकत्र येऊन तळमळीने काही तरी करणे खूपच आवश्यक आहे. ती काळाची गरज आहे.

आज एखाद चांगलं संगीत नाटक रंगभूमीवर आणायचं म्हटलं तर चांगली संहिता मिळणे कठिण. ताकदीचे संगीत दिग्दर्शक आजआपल्याकडे नाहीत हेही एक दुर्दैवी सत्य आहे. असे ताकदीचे संगीत दिग्दर्शक घडविणे आज गरजेचे आहे. अलीकडच्या रंगमचाची व्यवस्ब म्युझिक दिले जाते. मला वाटत नवीन नाटयगृहाच्या बांधणीतही संगीत रंगभूमीच्या प्रयोगासंबंधी कुणी विचार करतच नसावेत. एकंदरच अशा परिस्थितीमुळे प्रक्षकांना आवडेल/रूचेल असं संगीत नाटक रंगमंचावर येत नाही. असं खेदानं म्हणावं लागतं.

जुन्या काळात लिहिल्या गेलेल्या काही संगीत नाटकांचे विषय इतके ज्वलंतआहेत की, ते आजच्या काळासाठीही जसेच्या तसे लागू आहेत. तरूण तडफदार नायकांच्या भूमिका जरी आम्ही करत असलो तरी आम्हालाही कुठेतरी खटकतं. त्यासाठी नवीन कलावंत घडणे जरूरीचे आहे.

आजच्या पिढीला नाटयसंगीत शिकायला आवडतं, पण त्यांना संगीत नाटकात काम करणे आवडत नाही. मग मराठी संगीत रंगभूमी आम्ही पुढे टिकवावी कशी आणि कशी विकसित करावी? आजकालच्या मुला–मुलींना संगीत नाटकांना आवश्यक असा पौराणिक पोषाख घालून पल्लेदार वाक्ये म्हणायला आवडतही नाही, असा माझा अनुभव आहे. पण अशी मानसिकता जुन्या संगीत नाटकप्रेमी मुलांनी त्यांची मानसिकता बदलायला हवी. जुन्या संगीत नाटकाचे सादरीकरणाचे आव्हान त्यांनी यशस्वीपणे पेलले पाहिजे. आम्ही त्यांच्या पाठिशी उभे राहू.

संगीत नाटकाची आजची परिस्थिती जरी फारशी चांगली नसली तरी मी निराश झालो आहे. अशातला भाग नाही. पुढे बरेच काही चांगले घडेल अशी आशा आहे.

मराठी रंगभूमी, विशेषतः संगीत रंगभूमी, वर्तमानात आणि भविष्यातही कार्यरत रहावी, विकसत जावी यासाठी काही नाटक संगीतवेडे अपापल्या परीने काम करित आहेत हेही काही कमी नाही. माझ्या सारखे लोक अशांना आवर्जुन मदत करतील.

गेल्या वर्षी विद्याधर गोखले अकादमीतर्फे संगीत नाटकांसाठी दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे.हा एक फार मोठा उपक्रम आहे असे मला वाटते. पहिल्याच वर्षीची जाहिरात आल्यानंतर ऐंशीच्यावर लोकांनी त्याला प्रतिसाद दिला. त्यातून १८ सुयोग्य उमेदवारांची निवड आम्ही केली. आता ही मुलं एक वर्ष पर्ण करणार आहेत आम्हा सर्व संगीत नाटक वेडया मंडळींच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे आणि नटेश्वराने कृपा केली तर या अशा प्रयत्नांतूनच नवीन किर्लोसकर, देवल तयार होतील. अशी अशा बाळगण्यास हरकत नाही.

दुसरे असे की केशवराव आणि बालगंधर्वच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त संगीत नाटकाची शिबीरं भरवली जातात. या शिबीरांचा कालावधी फक्त दोन ते तीन दिवसांचाच असतो. शासनाने अशी शिबीरे दीर्घ काळाची ठेवावीत. त्यातूनच नवीन टॅलेंट पुढे येत राहील. माझ्यासारख्या छोट्या कलावंताने याहून जास्त बोलणे योग्य नाही

संगीत नाटकावरील माझं प्रेम, मनातला दुर्दम्य आशावाद आणि इच्छाशक्तिच्या बळावर नवीन पिढीत संगीत नाटकाची गोडी निमार्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी सतत करत असतो. आणि करत राहणार. माझी खात्री आहे या प्रयत्नांतूनच संगीत रंगभूमीला नवसंजीवनी लाभेल.

# 'मराठी रंगभूमी ..... उणे मुंबई - पुणे'

- राज काझी

मुंबई-पुण्याव्यतिरिक्त महाराष्ट्रभरात विखुरलेल्या रंगभूमीची परंपरा मोठी आहे व तिची स्वतःची अशी वैशिष्ट्येही आहेत. सांस्कृतिक धोरणांच्या आराखड्यात या रंगभूमीचा विचार अत्यावश्यक आहे.

'मराठी रंगभूमी' हा महाराष्ट्राबाहेर देशभर विस्मयाचा विषय आहे. इथल्या नाट्यगृहांमध्ये रोज नाटकाचा किमान एक प्रयोग होतो. शनिवार-रविवार, सुटीच्या दिवशी तर दोन-तीन प्रयोग होतात. व्यावसायिक रंगभूमीखेरीज आपल्या रंगभूमीच्या इतरही अनेक गोष्टी सुबकतेच्या मानल्या जातात. राज्य नाट्यस्पर्धेची राज्यभरातली केंद्रे, एकांकिका स्पर्धांची रेलचेल ही मराठी माणसाच्या नाट्य प्रेमाची व नाट्यकलेच्या प्रसाराची परिमाणे समजली जातात. शासकीय किंवा खासगी संस्थानांच्या आर्थिक मदतीविना स्वतःच्या खिशाला चाट लावून चालणारी आपली हौशी किंवा समांतर रंगभूमीची चळवळ परदेशी रंगकर्मी व अभ्यासकांनाही चकित करणारी आहे. संगीत रंगभूमी, कामगार रंगभूमी, युवा-महाविद्यालयीन रंगभूमी, बालरंगभूमी, पथनाट्य, एकपात्री सारेच प्रवाह इथे समृद्ध दिसतात. हे सगळे खरे असले, तरी ही सगळी दर्शनी स्थिती मुख्यतः मुंबई-पुण्यातल्या नाट्यव्यवहाराच्या मोजमापांवर आधारलेली आहे.

मुंबई-पुण्याव्यतिरिक्तच्या महाराष्ट्रभरात विखुरलेल्या रंगभूमीचे या दर्शनी वैभवात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान निश्चितच आहे; पण ते नीटसे अधोरेखित होत नाही व ते प्रवाहाबाहेरच राहते. खरे तर उर्वरित महाराष्ट्राच्या रंगभूमीची परंपराही मोठी आहे व आपली विविध वैशिष्ट्येही आहेत. मुंबई-पुण्यातली व्यावसायिक रंगभूमी ही स्वाभाविकच कमानी, मुख्यतः 'स्थळ : दिवाणखाना' चौकटीतली व शहरी मध्यमवर्गीय जाणीव व अभिरुचींची आहे. गंमत म्हणजे हेच नाटक जेव्हा चंद्रपूर, नागपूर, विदर्भातल्या झाडीपट्टी रंगभूमीवर सादर होते, तेव्हा त्याचे स्वरूपच बदलते. दहा ते वीस हजारांच्या संख्येतल्या प्रेक्षकांसमोर माळरानात ट्रॅक्टरच्या ट्रॉल्या जोडून उभारलेल्या मंचावर दोन-अडीच तासांचे ते नाटक सहा-सात तास पहाटेपर्यंत चालते! कोकणातल्या 'झापाच्या थेटरा'त नाटकांचा अनुभव पुन्हा वेगळा असतो. कोकणातले 'दशावतारी महोत्सव', अकलूजचा 'लावणी महोत्सव', बीडचा 'भारुड महोत्सव' या लोककला उत्सवांच्या प्रेरणा अनागर रंगभूमीला आविष्काराच्या वेगळ्या दिशा दाखवत राहतात.

त्या त्या परिसरातल्या प्रेरणा स्थानांनी तिथल्या रंगभूमीची वैशिष्ट्ये घडविली. ज्याचा 'मुख्य प्रवाही' रंगभूमीवर कालांतराने परिणाम दिसला, असे खूपदा घडत आले आहे. अशाच संस्कारातून घडलेल्या 'घाशीराम कोतवाल'ने पुढे कित्येक वर्षे शहरी स्पर्धांच्या व समांतर रंगभूमीवरच्या नाटकांच्या सादरीकरणांच्या शैलीवर आपला प्रभाव ठेवला. औरंगाबादच्या डॉ. लक्ष्मण देशपांडेंच्या 'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्री प्रयोगाने त्यातल्या बोली भाषेचा गोडवा लोकप्रिय केला. डॉ. देशपांडेंचा पुढाकार मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग फलदायी होण्यातही महत्त्वाचा होता. ज्यातून पुढे संपूर्ण मराठवाड्याच्या अनेक महाविद्यालयांतून नाट्यशास्त्र विभाग सुरू झाले. प्रा. अजित दळवी, प्रशांत दळवी, अरविंद जगताप या नाटककारांशिवाय चंद्रकांत कुलकर्णी हा महत्त्वाचा दिग्दर्शक व प्रतीक्षा लोणकर, नंदू माधव, संदीप पाठक हे कलाकार आणि मकरंद अनासपुरे हा आजचा लोकप्रिय 'स्टार' त्यातूनच आले.

राज्य नाट्यस्पर्धांनी मुंबई-पुण्यातून अनेक दिग्गज मंडळींना आरंभीची ऊर्जा पुरवली, तशीच मुंबई-पुण्या बाहेरील प्रतिभावंतांनाही चेतना दिली. नागपुरातून रंजन दारव्हेकर, औरंगाबादचे प्रा. कुमार देशमुख, सोलापूरचे डॉ. वामन देगावकर, कोल्हापूरचे डॉ. शरद भुताडिया, अकोल्याचे राम जाधव आणि याही सगळ्यांच्या आधी नगरचे प्रा. मधुकर तोरडमल व नंतर सदाशिव अमरापूरकर या सगळ्यांनी आपापले ठसे उमटवले. मुंबई-पुण्याबाहेरच्या चळवळीतूनच वामन केंद्रे, दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्यविद्यालयापर्यंत पोचले. व्यक्ती शिवाय सामूहिक पातळींवर किंवा 'संस्था' माध्यमातूनही सर्जनात्मकदृष्ट्या महत्त्वाचे अक्षरशः खेड्या-पाड्यातूनही घडत आले आहे. कणकवलीच्या कलाकारांकडून अतुल पेठेंनी बसवून घेतलेला दिवाकरांच्या नाट्यछंटांवर आधारित वेगळा नाट्यप्रयोग, पेठेंनीच जालन्याच्या जांबसमर्थ परिसरातील शेतकरी कलावंताद्वारे सादर केलेले 'दलपतसिंग...' ही उदाहरणे ठरावीत. 'जांबसमर्थ'च्या याच राजकुमार तांगडे व सहकाऱ्यांनी नंदू माधवांच्या मार्गदर्शनाखाली निर्मिलेले 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला' हे नाटक सध्या चर्चेत असून राज्यभर त्याचे उत्तम प्रतिसादात प्रयोग होताहेत.

दर दहा वर्षांमधील नऊ नाट्यसंमेलने मुंबई-पुण्याबाहेरच साधारणतः भरविली जातात. राज्यभर नाट्यपरिषदेच्या शाखांचे जाळे मोठे आहे. दर वर्षी शेकडो नवीन एकांकिका लिहिल्या जातात... आदी गोष्टीही मुंबई-पुण्याबाहेरील रंगभूमीचे महत्त्व मांडणाऱ्या आहेतच; पण या सगळ्यांचीही दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. ही दुसरी बाजू ओसरणीला लागलेल्या ऊर्जेची, ओहोटी लागलेल्या चळवळींची, नव्या नेतृत्वांच्या अभावाची आणि शासकीय धोरणशून्यता व अनास्थेची आहे.

अत्यंत झगमगाटात व वैभवी वातावरणात पार पडणाऱ्या नाट्य संमेलनानंतर त्या परिसरात 'नाटक' मागे किती शिल्लक राहते, याचे उत्तर दुर्दैवाने

खूपसे नकारात्मक आहे. 'उत्सव' पार पडल्यानंतर पुढे नियोजन व निष्ठा दोन्ही कमी पडताना दिसतात. एकांकिका स्पर्धांतचेही नाट्यसंमेलनासारखेच राजकीयीकरण होताना दिसते आहे. तरुणांशी संपर्क वाढवू शकणारा उपक्रम म्हणून राजकीय मंडळी एकांकिका स्पर्धांकडे पाहतात. परिणामी खऱ्या कळकळीने स्पर्धा घेऊ इच्छिणाऱ्या संस्थांना आता प्रचंड रकमेची स्पर्धकांची अपेक्षा पुरी करणे शक्य उरलेले नसते. वास्तविक छोट्या संस्थांनी कामे मोठी केली आहेत. बारामतीच्या नटराज करंडक स्पर्धा सलग २८ वर्षे चालल्या आहेत. वाईच्या 'प्रतीक'च्या स्पर्धेने पंचवीस वर्षे आपला दर्जा व आकर्षण टिकवले होते. कणकवलीच्या आचरेकर प्रतिष्ठानने स्पर्धेचा परीघ ओलांडून त्याला अभ्यासपूर्ण महोत्सवाचे स्वरूप देण्यात यश मिळवले. सहभागाच्या पातळीवरही हे प्रयत्न आहेत. तळेगाव दाभाडेची 'कलापिनी' सातत्याने संगीत नाट्य स्पर्धेत असते, तर बारामतीचे 'नटराज' हिंदी नाट्यस्पर्धेतही उतरते. सांगलीचे 'अबकड प्रतिष्ठान' ते नागपूरचे 'थर्ड बेल' वेगळे उपक्रम राबवताहेत; पण दुसरीकडे बंद पडणाऱ्या एकांकिका स्पर्धा व राज्य नाट्यस्पर्धेच्या केंद्रांतून रोडावणारी 'एंट्रीज'ची संख्या चिंता वाढवताहेत.. कोल्हापूर, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक, जळगाव आदीकडील एकेकाळी धडाक्यात असणारी नाट्य चळवळ नवे नेतृत्व व कलाकारांची पुढची फळी यांच्या अभावाने चैतन्य संपवून बसली आहे.

राज्यभरातल्या युवा नाट्यचेतनेला एकत्रित बांधण्याचा प्रयत्न 'सकाळ करंडका'च्या माध्यमातून होत आहे. त्याला पाठबळ मिळण्याची गरज आहे. जागतिकीकरण व माध्यमक्रांतीचा मुंबई-पुण्याबाहेरील युवा पिढीवरचा परिणामही या अनास्थेचे कारण आहे. समाजातले वातावरण पोषक उरले नसतानाच शासकीय नाकर्तेपणा व नियोजनशून्यता यात भरच टाकीत आहेत. राज्याच्या अद्याप रखडलेल्या सांस्कृतिक धोरणांच्या आराखड्यात मुंबई-पुण्याबाहेरील या रंगभूमीचा विचार अगत्याचाच नव्हे, अत्यावश्यक आहे.

● ● ●

## मूड मूड के देख

– हेमंत एदलाबादकर

मला वाटत नव्वदच्या आसपासच कुठलं तरी वर्ष असावं. मी आणि आमची आकार या नाट्यसंस्थेची टिम शरीराचा कान करून बारामतीच्या थिएटरमध्ये बसलो होतो. कारण एकांकिका स्पर्धेचा निकाल लागणार होता. निकाल लागला सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम क्रमांक – सत्य शोधम सुंदरम! थिएटरमध्ये जल्लोष झाला न आम्ही मोऽऽठ्ठा सुस्कारा सोडला. कारण एकांकिका क्षेत्रात धडपडणाऱ्या आमच्या ग्रुपला पहिल्यांदाच सर्व पहिली बक्षीसं मिळाली होती. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ किरण गुजर यांच्या फार्म हाऊसवर अजितदादांच्या हस्ते झाला. अगदी वेगळ्या वातावरणात, अचानक किरणदादांनी मला एकांकिकेमधील स्प्रिंग हा तुकडा करण्याबद्दल सुचविले व मी श्रीधर पिसाळबरोबर तो प्रवेश अजितदादांना करून दाखविला. राजकीय विडंबनात्मक या प्रवेशाला बारामतीत मिळणारी दाद ही खरेच मती गुंग करणारी आहे.

बारामतीत पहिला करंडक मिळाला पण या स्पर्धेनं नुसता करंडक दिला नाही तर स्पर्धेकडे पाहण्याचा नव्वाकोरा दृष्टिकोन! स्पर्धा म्हटलं की हार-जीत आलीचं हारणं-जिंकणं महत्त्वाचं नसतं. असली बिन कण्याची बुळबुळीत वाक्य आमच्या डायरीतून पार पार हद्दपार झाली. पुढची सात-आठ वर्ष आम्ही केवळ जिंकण्यासाठी जिद्दीन स्पर्धा केल्या आणि जिंकलोही! जिंकण्याची जणू सवयच लागली आणि या साऱ्याचा फायदा हा झाला की ही जिंकण्याची सवय आयुष्यालाच लागली. त्यामुळे नटराजची स्पर्धा ही नुसती स्पर्धा न राहता आयष्यातली निर्णायक घटना ठरली. आणि म्हणूनच जुने मित्र भेटले, जुन्या एकांकिकांचा विषय निघाला की आमचा एक कोपरा बारामतीने पकडून ठेवलेला असतोच असतो.

आज सिनेमा टी.व्ही.च्या जमान्यात एकांकिका स्पर्धा २५ वर्ष यशस्वीरीत्या पार पाडणं ही सोपी गोष्ट नाहीए. त्यासाठी किरणदादांचं खास अभिनंदन ! नव्वद सालापासून मला त्यांचा 'होईल की'? हा शब्द परिचित आहे. दादा एकांकिकेला १८ मोढे पाहिजेत. व्यवस्था होईल. दादांचं उत्तर असायचं होईल की !

असं असं नेपथ्य पाहिजे. व्यवस्था होईल? उत्तर असायच 'होईल की' त्यामुळे एकांकिकेतील सर्व एक्स्परिमेंट आम्ही इथं फार बिनधास्तपणे करू शकलो.

परवा दादांचा फोन आला नं स्पर्धेचं पंचवीसाव वर्ष असल्याचे कळलं न अक्षरश: चाट पडलो. हे सगळं काल परवा घडल्यासारखं वाटतय नं. पंचवीसाव वर्ष? तेही खरचं आहे म्हणा. विचारवंत सांगतात की वर्तमानकाळ अशी काही कन्सेप्टच नाहीए. आत्ताचा क्षण पुढच्या क्षणी भूतकाळ होतो न जुने क्षण आठवले की ते सारं वर्तमानातच घडतयं असं वाटतं.

त्यामुळे व्यस्ततेमुळे आज जरी एकांकिका आणि एकांकिका स्पर्धांच्या संपर्कात नसलो तरी माझ्यासारख्या असंख्य रंगकर्मींच्या शुभेच्छा या स्पर्धेला आहेत. पंचवीस वर्ष तर झालेली आहेतच. एखाद दिवशी सकाळी यंदाच हे स्पर्धेचं पन्नासावं वर्ष आहे, तुम्ही आवश्य या. असा परत किरणदादांचा फोन यावा अनं मी जुन्या आठवणींना उजाळा देत देत पुन्हा बारामतीची वाट धरावी हिच नटराजच्या चरणी प्रार्थना !

# एकांकिका लेखन आणि प्रयोग गांभिर्याने व्हायला हवेत !

– डॉ.वि.भा.देशपांडे

रंगभूमीच्या क्षेत्रात ज्याला काही वेगळ्या वाटेने जोखायचे आहे त्याने एकांकिका या नाट्य प्रकारात स्वत:ला आविष्कारीत होऊन पाहावे. कारण ते एक आव्हान असते. अतिशय मर्यादित वेळात स्वत:च्या मनातील विषय आणि आशय नेमक्या पध्दतीने व्यक्त करावा ही आव्हानाची गोष्ट आहे. एकांकिका एके काळी एककेंद्री, एकपरिणामी स्वरुपाची होती. नंतर ती बहुकेंद्री, बहुपेडी आणि अर्थातच विस्तारीत स्वरुपाची झाली. तिची अनेक रंगरुपे गेल्या पन्नास वर्षात बदलत राहिली. विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळातल्या तिच्या विविध स्वरुपांचा जन्म, विकास आणि –हास अशी सारीच रुपे पहायला मिळाली. मराठी रंगभूमीत मोठ्या नाटकानंतर एकांकिका प्रकाराला स्थान मिळाले. काही वेळेला तर ते स्थान मोठ्या नाटकाच्या बरोबरीने मिळत गेले. प्राधान्याने हौशी – प्रायोगिक किंवा समांतर रंगभूमीवर तिचे स्थान कमी – जास्त प्रमाणात का होईना अबाधित राहिले. मात्र या प्रकाराला कधीही व्यावसायिक रुप आले नाही. वास्तविक स्वातंत्र्यपुर्व काळात मो. ग. रांगणेकरांनी काळाची गरज ओळखून तीन एकांकिकांचा एक व्यावसायिक प्रयोग करुन पाहिला. 'तुझं माझं जमेना', 'फरारी' आणि 'सतरा वर्षे' या तीन एकांकिकाचा एक नाट्य गुच्छ रांगणेकरांनी मराठी प्रेक्षकांसमोर ठेवला, पण तो त्यावेळच्या नाट्य प्रेक्षकांना भावला नाही. मोठ्या नाटकाला पर्याय म्हणून तो पुढे आला. परंतु तो त्या अर्थाने मान्य झाला नाही. प्रत्येकी तासाभराची एकांकिका एकत्रित करून नाटकाच्या ऐवजी दाखवली तर तो पर्याय कसा होऊ शकेल? हा प्रश्न फक्त अडीच – तीन तास मनोरंजन करण्याचा नाही. तीन तासांच्या नाटकाचा जो एकात्मक परिणाम असतो, त्याची विभागणी तीन तुकड्यात किंवा तीन वेगवेगळ्या एकांकिकेत होणे नाही. प्रत्येक एकांकिका हा एक स्वतंत्र, स्वायत्त, स्वयंपूर्ण असा लेखनाविष्कार असतो, स्वतंत्र प्रयोग असतो. तीच गोष्ट नाट्यास्वादाच्या स्तरावरची असते. गेल्या काही वर्षात मोठे नाटक आणि एकांकिका यातून एक पर्याय शोधण्याचा प्रयत्न झाला, तो म्हणजे दीर्घांक या नावाचा नाट्यप्रकार. या तीनही प्रकारातले नाट्याचे अंत:सूत्र जरी एक आहे, असे दाखवता आले तरी त्याची मांडणी, परिणाम आणि एकूणच नाट्यात्मक आव्हाने भिन्नस्तरीय असतात, हे भान राखायला हवे. सोयीने ते गृहीत धरु नये. !

अनेक नाटककारांची आपल्या लेखनाची सुरुवात एकांकिका लेखनापासून झालेली आपण पाहतो. ज्यांचा नाट्यलेखनारंभ मोठ्या नाटकापासून झाला त्यातला अनेकांनी नंतरच्या काळात एकांकिका हा नाट्यप्रकार लिहून पाहिला परंतू त्यात त्यांच्या नाट्यप्रतिभेची झळाळी जाणवली नाही. पण तो प्रवास मुळात एकांकिकेपासून झाला तर नाट्यलेखनातील ताकद, सशक्तता काय असते, हे जाणून घ्यायचे झाले तर विजय तेंडूलकर आणि महेश एकलकुंचवार त्या खालोखाल रत्नाकर मतकरी, सतिश आळेकर इ. नावांचा उल्लेख करता येईल. या नावांत नंतरच्या काळात भर पडली, यात काही शंका नाही, पण नामावली सांगणे हा आता मुख्य उद्देश नाही. जीवनातील एखादा अनुभवाचा तुकडा घेऊन तो नाट्य माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत तितक्याच तीव्रतेने, जाणकारीने पोहचण्याची हातोटी तेंडूलकरांच्या लेखनात आहे. मुळात त्यांचे लेखक म्हणून व्यक्तीमत्व एकाग्र पध्दतीचे, आत्मशोधी वृत्तीचे आहे. चिंतनशील आहे. त्यातली अथांगता किती आहे याचा नेमका अंदाज येत नाही. तसा येणारही नाही असे वाटते. त्या अथांगतेचाच एक परिणाम म्हणून त्यांची लेखणी मिताक्षरी आणि दीर्घ परिणामी झाली असावी. विशेषत: एकांकिका लेखन प्रक्रियेच्या संदर्भात हे सांगता येईल. 'मादी', 'ओळख', 'खलित्यांची लढाई ', 'रात्र' अशी काही उदाहरणे यातले काही लेखन हे आकाशवाणी माध्यमासाठी झाले जिथे श्रवण महत्वाचे असते. पण हे लेखन जेंव्हा रंगमंचावर आले तेंव्हा त्यातील दृश्यात्मकता प्रकर्षाने जाणवते. याचाच अर्थ तेंडूलकर जरी पन्नास वर्षापूर्वी आकाशवाणीसाठी श्रुतिका म्हणून लेखन करीत होते, ते लेखन त्या माध्यमातील एकांकिकाच होती. त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे त्या श्रुतिका श्राव्य माध्यमाच्या नव्हत्या, तर त्यातली दृश्यात्मकता तेंडूलकरांना अभिप्रेत असावी. तिचे प्रकटीकरण रंगमंचावर झाले. 'मादी 'आणि 'रात्र' ह्या दोन एकांकिका मी दोन्हीही नाट्य अनुभव तितकाच गहिरा होता. डॉ. श्रीराम लागू आणि विजया मेहता यांनी 'मादी' एकांकिकेचा केलेला प्रयोग पाहून आता चाळीस वर्ष झाली. त्या नाटयानुभवाचे स्मरण ज्यांना असेल त्यांना माझ्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट होईल. एकांकिकेच्या लेखनातून – प्रयोगातून आलेला अनुभव इतका घट्ट, तीव्र, खोलवर असू शकतो, हे महत्वाचे आहे. तीच अनुभव कहाणी महेश एलकुंचवारांच्या 'होळी', 'यातना घर', ह्या एकांकिकांची आहे. प्रेमानंद गज्वी यांच्या 'घोटभर पाणी' ची आहे.

तेंडुलकर, एलकुंचवार, गज्वी यांचे उदाहरणे याच करिता सांगितली की ज्याला चांगली एकांकिका लिहायची आहे. त्याला नेमके समोर उदाहरण कोणते असावे. कोणत्या आणि कोणाच्या एकांकिकांचा आदर्श समोर ठेवायचा, अभ्यास करायचा, असे प्रश्न समोर आले तर त्यासाठी हा वानवळा आहे. त्यात आणखी भर पडेलही ! काही वर्षापूर्वी मुंबईला नाट्य संमेलन झाले होते, त्यावेळी एका कार्यक्रमात आत्माराम भेंडे आणि बबन प्रभू यांनी 'जनावर' नावाची एकांकिका पेश केली होती. मुळातल्या एकांकिकेचे नाव आहे. 'झू स्टोरी' आल्बी या लेखकाची ही एकांकिका श.ना.नवरे यांनी रुपांतरीत केली. लेखन आणि प्रयोग किती दीर्घकाळ परिणाम करु शकतो त्याचे ते एक उत्तम उदाहरण आहे. तशी आणखीही काही उदाहरणे सांगणे शक्य आहे.

अशा काही उदाहरणातून एक गोष्ट ध्यानात यायला हरकत नाही ती म्हणजे एकांकिका लेखन ही गंभीर तर गोष्ट आहेच. पण ती जर ताकदीने लिहीली आणि केली तर ती कित्येक वर्षे लक्षवेधी ठरु शकते. त्यासाठी एकांकिका लेखनासाठी कोणता विषय निवडतोय, त्या विषयाकडे कोणत्या नजरेनं

पाहतोय, कोणत्या पध्दतीने व्यक्त होतोय याला महत्वं असते, केवळ एखादा चटपटीत विषय घेऊन, तो संवाद रुपाने मांडून काही रंगमंचीय प्रयुक्त्या वापरायच्या आणि एकांकिका करायची, अशी वृत्ती एकूणातच दिसते आहे. कोणत्याही कला प्रकाराला विस्तार आणि विकास याचा अर्थ नीटपणे लावता आला पाहिजे. विस्तार व्हायला हरकत नाही. पण त्याच बरोबर त्याचा गुणात्मक विकास याचा अर्थ नीटपणे लावता आला पाहिजे. विस्तार व्हायला हवा. विकासाला क्रम असतो, दिशा असते, नेमकेपणा असतो निदान असावा अशी अपेक्षा असते. विस्तार हा गरजेप्रमाणे वाढत जातो. त्याला कोणतेच धरबंद नसतात. सर्वार्थाने त्यात तात्कालिकता असते आणि तीच घात करते. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात एकांकिका स्पर्धेचे पीक उदंडपणे वाढलेले आहे. धान्याच्या पिकाला जमिनीची मशागत, हवा, पाणी, इ. ची अनुकुलता हवी असते त्यावर त्या पिकाचे भवितव्य अवलंबून असते. पण एकांकिका लेखनाला तशी काहीच गरज नाही ही अनेकांची समजूत असावी. स्पर्धेसाठी जशी संस्था स्थापिली जाते, तशीच एकांकिकाही लिहिली जाते. लिहिणाराच अनेकदा दिग्दर्शक बनतो, मुख्य व्यक्तीरेखा होतो, आणखी खुप काही तरी. त्या सगळ्या प्रयत्नातून त्या स्पर्धेत पारितोषिक मिळाले व त्यातील लॉटरी लागली तर तो लिहिणार – करणारा सुखावतो, त्याचे संबंधीतही सुखवतात.

पण हे तात्कालिकतेचे चित्र बदलायला हवे आहे. कारण तेवढ्यापुरते गवता ऐसे उदें पीक येते आहे. काही दिवसातच ते मातीत जिरून जाते आहे. त्या लेखनाला, प्रयोग निर्मितीला प्रयोजन आहे ते फक्त स्पर्धेचे. स्पर्धेत मिळणा–या पारितोषिकाचे. जर पारितोषिक प्राप्त झाले तर वर्षभर ती एकांकिका एका गावाहून दुस–या गावाला जाणे होते आहे. ती एकांकिका करणे – वाजवणे होते आहे. तिथे काही जमले तर ठीक, नाही तर पुढला गाव किंवा पुढचे वर्ष आहेच !

स्पर्धा होताहेत, एकांकिका लिहिल्या – केल्या जाताहेत, पण त्यातून रंगभूमीविषयक चळवळ उभी राहत नाही, ही खरी खंत आहे. ही चळवळ उभी करण्यासाठी स्पर्धेशी संबंधीत युवा रंगभूमीला घडवायला कारणीभूत ठरणार आहे. तशी आज गरज आहे. १९५० ते ५५ किंवा त्या दशकात जसे तेंडूलकर, मतकरी हे एकांकिका लेखक निर्माण झाले, त्यातून एक नाट्य चळवळ, नाट्य दिशा निर्माण झाली. दामू केंकरे, विजया मेहता, माधव वाटवे, कमलाकर सारंग, अरविंद देशपांडे इ. रंगकर्मी त्याच रंगवाटेने आले. त्यांनीही स्पर्धेत भाग घेतला, पण तेवढ्यावर थांबले नाहीत. आपल्याला जर नाटकाच्या माध्यमातून व्यक्त व्हायचे असेल तर आपण एकांकिका प्रकारात लेखक, दिग्दर्शक, कलाकार आणि प्रेक्षक निर्माण केले पाहिजेत, अशी मनोमन खूणगाठ बांधली. सारे एकाच वर्षात, एका दमात घडले नाही. त्यांनाही वाट शोधावी लागली. पण त्या सा–या कलात्मक प्रवासाकडे केवळ क्षणरंजन किंवा स्पर्धा पारितोषिक यांचाच विचार केला नाही. त्यात ते गुंतून पडले नाहीत. त्या पेक्षा अधिक गांभीर्याने हा कलाप्रकार आपण हाताळला पाहिजे याचे भान राखले. त्या रंगभानाचा उपयोग पुढे दीर्घकाळ राहिला. तशी आज गरज निर्माण झाली आहे.

ती गरज ध्यानी घेऊन ज्या स्पर्धा आयोजन करणा–या संस्थानी जबाबदारी उचलायला हवी आहे. त्यासाठी प्रामुख्याने लेखन, अभिनय, दिग्दर्शन आणि प्रयोगतंत्र यांच्या कार्यशाळा नव्याने सुरू करायला हव्यात. त्यामध्ये सातत्य हवे. स्पर्धेच्या आधी काही महिने याचे आयोजन व्हायला हवे. त्या कार्यशाळेत जे सहभागी होतील त्यांनाच स्पर्धेत सहभागी करून घ्यायला हवे. गेल्या काही वर्षात रंगभूमीच्या क्षेत्रात कोणीही यावे, एकांकिका लेखन करावे, प्रयोग करावे आणि पारितोषिक घेऊन जावे असे उघड स्वरूपाचं चित्र दिसते आहे. तो लेखक, कलाकार नंतर या क्षेत्रात राहतोच असे नाही. त्याला या क्षेत्रात यायला तशी कोणतीच अट नसते. इथे येण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज नाही, असे त्याने गृहीत धरले आहे. एक दृष्टीने रंगभूमीचे हे क्षेत्र मुक्तसंचारी बनले आहे. थोडावेळ या स्पर्धेच्या वातावरणात थांबून दूरदर्शन किंवा वाहून जाणा–या वाहिन्यांच्या मालिकांमध्ये आणि चित्रपटामध्ये मिरवायचा प्रयत्न केला जातोय. तिथे जर संधी मिळाली तर तो कलाकार आपण केंव्हातरी एकांकिका केली होती, ती अशी होती, अन ती तशी होती, अशा संधी याकाळच्या गप्पात इतरांना सांगतो. त्याला आता रंगभूमी माध्यमाचे काहीच देणे घेणे राहिलेले नसते. तो या संधीचा वापर पुढच्या संधीसाठी 'पायरी' म्हणून करतोय. हे सारे थांबायला हवे. या सा–याच स्पर्धकांना औपचारीक किंवा अनौपचारीक स्वरुपाचे नाट्य प्रशिक्षण घ्यायला हवे, अशी परिस्थिती निर्माण झालीय. ती जबाबदारी दुसरे कुणी घेणार नाही, म्हणूनच स्पर्धा संयोजकांनी ती जबाबदारी घेणे महत्वाचे.

मार्गदर्शन कार्यशाळांच्या बरोबरीने स्पर्धेत उत्तम ठरलेल्या एकांकिकांचे प्रयोगही निरनिराळ्या गावी न्यायला हवेत. अनेक चांगल्या प्रयोगांबद्दल बोलके जाते, वाचले जाते, पण ते प्रयोग व लेखन वाचन करायला मिळत नाही. पुण्यातले 'परेश एजन्सी' या कंपनीचे मालक श्री. भाटे सध्या मोठ्या प्रमाणात एकांकिका प्रकाशन करीत आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे पण त्यांच्याही मर्यादा आहेत. स्पर्धक संस्थेने एक वेळ पारितोषिकाची रक्कम कमी करून वा आणखीन एखादा प्रायोजक हाती धरून, स्पर्धेत पहिल्या आलेल्या तीन तरी एकांकिकांची प्रकाशने करावीच. त्यावरून स्पर्धेचा दर्जा तर कळेलच, पण त्या संहिता इतरांना विनासायास उपलब्ध होऊ शकेल. त्या वाचून काहींना कदाचित प्रेरणाही मिळेल. आयोजन हे तर करावचे, त्याबरोबरच प्रयोगानंतर प्रेक्षकांशी संवाद करण्याचे संवादही घडवायला हवेत. कारण यातलेच काही जण उद्याच्या रंगभूमीचे लक्षवेधी कलाकार असणार आहेत. हेच कलाकार आणि प्रेक्षक रंगभूमी घडवणे, तसेच बिघडवणे करणार आहेत. अशा अनेक कारणांसाठी एकांकिका स्पर्धा ही लक्षवेधी व्हायची असेल तर आपण प्रयत्नशील रहायला हवे. स्पर्धा संपली की सारे संपले असे मानता कामा नये. मग तो गणपती उत्सव होतो, तसे होऊ नये ही इच्छा !

# अभिनय

– चं.प्र.देशपांडे

लेखक म्हणुन नाट्क्षेत्रात काही कृती करत असताना अभिनयाबद्दलही काही विचार मनात येत असतात. एवढ्या आणि इतपतच अधिकारात या या विषयावर लिहितोय. म्हणजे अधिकाराशिवारच असेही म्हणायला हरकत नाही. या बाबतीतले काही मुद्देच फक्त मांडण्याचा हेतू आहे. फार सविस्तर असे काही नाही.

**१. संवादफेक**

पं. सत्यदेव दुबे म्हणतात की आपल्याकडे ९५% अभिनय म्हणजे बोलणे. म्हणजे संवादफेक हा अभिनयाचा एक अतिमहत्वाचा भाग आहे. याबाबतीत परिस्थिती काय आहे ? मराठी भाषा मरत चालल्याची काळजी आपण दर साहित्य – संमेलनात ऐकतो. भाषा मरत जाण्याच्या प्रक्रियेत काय घडते ? भाषा हळूहळू बोथट होत जाते. सुक्ष्म अर्थ आणि अर्थच्छटा व्यक्त करण्याची तिची क्षमता कमी कमी होत जाते. मराठीच्या बाबतीत हे वारंवार जाणवू लागले आहे. भाषेच्या अशा मृत्युला जबाबदार असणाऱ्या घटकांमध्ये अभिनय क्षेत्रातल्या व्यक्ती आणि टीव्हीवरचे निवेदक यांचा सिंहाचा वाटा असल्याचे दिसते. उच्चारित भाषेत सुक्ष्म, स्पष्ट आणि कमीजास्त वजनाच्या आघातांचे संगीत आणि त्यामुळे अर्थातच अभिव्यक्तीत येणारी संपन्नता यांच्याकडे दुर्लक्ष होत असून ते वाढत असल्याचे जाणवत आहे. अमुकच अर्थ किंवा अर्थवलये पोचावी या उच्चारित भाषेच्या मुख्य वैशिष्टाकडेच दुर्लक्ष होत आहे. यात योग्य त्या सुधारणा कशा होऊ शकतील. हे एखादा भाषातज्ज्ञ अधिक सविस्तरपणे सांगून शकेल. त्याची खूपच गरज आहे. पण सध्या, ताबडतोबीचा उपाय म्हणून, लक्षात आलेली एक गोष्ट इथे सांगायची आहे. उच्चारीत भाषेत होत असलेल्या बहुसंख्य चूका पाहता, त्यातल्या ५०% हून जास्त चुका या एकाच कारणाने होत असल्याचे दिसून येते. एवढ्या एका गोष्टीची सगळ्यांनी काळजी घेतली तरी उच्चारीत भाषेचा दर्जा एकदम बराच सुधारेल असे वाटल्याने हा उद्योग करत आहे.

लक्षात घेण्याची गोष्ट अशी की सामान्यत: विशेषणांवर आणि क्रियाविशेषणांवर सुक्ष्म आघात येतात असे आघात विशेष्यांवर येत नाहीत. त्याचप्रमाणे काही वेळा वाक्यांत एक क्वालिफाईंग पोरशन किंवा विशेष माहित सांगणार भाग असतो तो नेहमी योग्य शब्दावरील आघाताने वेगळा स्पष्ट केला जातो. ज्याच्याबद्दल ही विशेष माहिती सांगितली जाते त्या शब्दावर वा शब्दसमुच्चयावर आघात येत नाही. विशेष्यांची वा वस्तुंची तुलना व्यक्त होणे वगैरे अशा अपवादात्मक परिस्थितीतच फक्त वरील आघाताच्या जागा बदलतात. या बाबतीतली काही उदाहरणे पाहू. एका अगदी छोट्या शब्दावरील चुकीच्या आघाताने एखादी पूर्ण कलाकृती कशी मातीत जाऊ शकते याचे एक उदाहरण सांगता येईल. माझ्या साक्ष मावळत्या सूर्याची या एकांकिकेच्या तालमीत झालेली ही चूक होती. लैला–मजनू, शिरी–फरिहाद, हीर–रांझा आणि हिंदी चित्रपटांमधले अनेक प्रेमिक कोणत्याही परिस्थितीत आपले प्रेम तडीला नेणयाचा कार्यक्रम नेहमीच राबवत आलेले आहेत. सर्व विरोध, सर्व परिस्थिती यांच्यावर मात करत शेवटी फारच झाले तर त्यांच्या प्रेतांचे का असेना हात एकमेकांत गुंफले गेलेले दिसतात. ही एकांकिका एक वेगळी शक्यता हाताळते. एवढा विरोध, हिंसा, नाश होणार असेल तर त्यापेक्षा आपणच बाजूला होऊ या, आपली मीलनाची इच्छा सोडून देऊ या अशा विचाराचे हे प्रियकर – प्रेयसी आहेत. आणि आत ही त्यांची शेवटची भेट आहे. या शेवटच्या भेटीत काय काय घडते, बोलले जाते त्याची ही एकांकिका आहे. त्यात प्रेयसीचे एक वाक्य असे आहे तुझ्या घरच्यांना माहिती आहे. तू मला भेटायला आलायस ते ? या वाक्यात काय माहिती आहे का ते विचारले आहे तर तू मला भेटायला आलायस ते हे सगळं हे पूर्ण युनिट. म्हणजे वर किंचित आघात येईल. पण तालमीत चूक झाली की, मला या शब्दावर आघात दिला गेला. त्या पध्दतीने वाक्य उच्चारून पाहा. त्याचा अर्थ असा होईल की हा सदर प्रियकर रोज एकाएका मुलीला भेटत असतो प्रश्न फक्त एकच आहे की आज तू मला भेटायला आलायस ते माहिती आहे का! आत एकांकिकेचा विषय पुन्हा आठवा. मला या फक्त दोन अक्षरी शब्दावर चुकीचा आघात दिल्याने पूर्ण एकांकिका जाईल की नाही गाळात !

आता आणखी उदाहरणे पाहा :–

१. सगळ्यांचं भलं व्हायला पाहिजे असं मानणारा मी एक माणूस आहे.
२. तो एक दुष्ट माणूस आहे.
३. तो जोरात पळत गेला.
४. माझ्या घड्याळाबरोबर तुमचं घड्याळ जुळवून घ्या.
५. पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती तयार झाली आहे.

वरील वाक्यांमध्ये योग्य आघातांसाठी ठळक अक्षरे व निम्नरेखा आणि चुकीच्या आघातांसाठी फक्त ठळक अक्षरे असे दाखवलेले आहे. दोन्ही प्रकारांनी वाक्ये उच्चारून पाहा म्हणजे फरक लक्षात येईल. अपवादात्मक उदाहरण असे :–

मला लाल टीशर्ट पेक्षा लाल बुशशर्ट आवडतो.

इथे विशेषण एकच असून विशेष्यांची तुलना आहे. त्यामुळे इथे विशेष्यांवर आघात आहेत.

प्रथितयशांपासून ते अगदी नवोदितांपर्यंत सगळ्या नटनट्यांनी तसेच निवेदक – निवेदकांनी सध्या फक्त एवढ्या एकाच गोष्टीकडे लक्ष दिले तरी भाषेचे आयष्य बऱ्यापैकी वाढेल असे वाटते. प्रथितयशांना अधिक प्रथितयश होण्याची आणि नवोदितांना प्रथितयश होण्याची प्रचंड घाई असलयाने हे एवढेही पाहिलं जाणे जरा अवघडच दिसते आहे. शेवटी आपण सगळे एका मृत भाषेतले सम्राट आणि सम्राज्ञी होऊ न बसणार की काय –– ह एक अतिप्रस्तुत प्रश्न आहे हे मात्र खरे !

## २. ख–या गोष्टींची दाद

विविध भारतीवर कार्यक्रम सादर करताना एका मोठ्या नटाने, अभिनय चांगला होण्यासाठी आपण किती प्रयत्नशील असतो त्याचे उदाहरण म्हणून एक घडलेली गोष्ट सांगितली होती. तो आजारी असून त्याच आवाज घोगरा झालेला आहे असा एक शॉट त्याला द्यायचा होता. तर ते सगळे उत्तमवठावे म्हणून त्याने बर्फ खायचा, त्यावर गरम कॉफि प्यायची, त्यावर पुन्हा बर्फ खायचा असे आलटून पालटून केले. घशाचे लौकरच बारा वाजले आणि मग त्याने तो शॉट दिला. त्याची फार वाखाणणी झाली वगैरे त्याने सांगितले. पुढे चारसहा दिवसांचे दुखणे झाले म्हणाला, पण हरकत नाही, अभिनय तर उत्तम झाला ! आता हा सीन पिक्चरमधील होता म्हणून ठीक, नाटकातला असता तर काय करणार होता ? नाटकात हा आजारपणाचा सीन झाल्यावर पुढे लगेच एक महिन्यानंतरचा तो बरा असलेला सीन असतो तो कसा करणार ? आणि या प्रकाराचे दिवसाला तीनतीन प्रयोग कसे करणार?

हे प्रश्न तर आहेतच, पण मुळात हा अभिनय कसला ? हे तर ख–या गोष्टींची दाद मागणे झाले. ही जर अभिनयाची पध्दत स्वीकारली तर मग दारू प्यायला मिळतीय म्हणून सगळे दारुड्याचाच रोल मागतील ! हीरोचाही रोल नको म्हणतील !

अशा या पार्श्वभूमीवर आता एक महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. अतीव दु:खाचा असा प्रसंग सादर करायचा असेल त्यात रडायचे असेल तर स्वत:च्या व्यक्तिगत जीवनातला एखाद तत्सम अनुभव आठवून रडावे का? यावर कुणी असेही म्हणेल की एखादा नट तंत्र कसेही का वापरेना, त्याचा अभिनय कसा होतोय तेवढेच आपण पाहावे. ते पाहू, पण यात कायकाय घडेल ते पाहायचे टाळायचेही कारण नाही. याचा अर्थ असा होतो की एखाद्या नटाची आई वारलेली असेल आणि त्यावेळी त्याला खूप रडण्याइतक्या दु:खाचा अनुभव आला असेल तर तो अनूभव, हा नट, अभिनय चांगला होण्यासाठी वारंवार वापरत राहील. आणि हा त्याचा अभिनय समजून प्रेक्षक त्याला दाद देत राहतील. द:ख विस्मीत जावे या निसर्गक्रमाच्या विरुध्द तर हे होईलच पण शिवाय ही प्रेक्षकांची घोर फसवणूक होईल. आपण याच्या ख–या द:खाला वाह म्हणालो हे प्रेक्षकांना कळाले तर ?

हाच प्रश्न जरा वेगळ्या प्रकारे पाहू. अमिताभ बच्चन सुपरस्टार होण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्वाचे कारण हे आहे की त्याने अतिशय हाय– व्हेल्टेज अभिनय केला. गरज पडेल तेंव्हा भावनिक तीव्रता तो फारच प्रचंड वाढवू शकला जे दुस–या कुठल्या नटाला जमले नाही. मग, असे सीन्स करताना तो कुठल्या आठवणी काढत असेल? त्याच्या लहानपणी तो असा वागला असेल ? असे असते तर त्याच्या वडिलांना एवढ्या कविता लिहिता आल्या असत्या ?

दु:खाचेच उदाहरण पुढे चालवायचे झाले तर पात्रापात्रागणिक दु:खाच्या त–हा वेगवेगळ्या असतात. एखाद्या वैयक्तिक दु:खाच्या त्याच त्या आठवणीवर विसंबून असे हे अनेक बारकावे सुक्ष्म छटा दाखवणे शक्य होईल ?

लेखक जेंव्हा असे प्रसंग लिहितो तेंव्हा तो काय करतो ? पात्रांचे वेगळेपण तो स्वत:च्या वैयक्तिक अनुभवाच्या चाकोरीत फिट करून टाकतो? तसे असले तर मग नटाच्या अनुभवाच्या वैयक्तिक चाकोरीतून ते कसे व्यक्त होऊ शकणार ? असाध्य ते साध्य असा हा प्रकार आहे ?

याचे उत्तर अर्थातच नाही हेच असणार आहे. लेखक असो, नट असो, जगण्याच्या ओघात आलेली अनुभवाची समज वापरत असतात. प्रत्यक्ष वैयक्तिक अनुभव नव्हे! आणि ज्याअर्थी एका सीनमधले दु:ख व्यक्त करण्यासाठी कुठले तरी वैयक्तिक दु:ख वापरता येते याचा अर्थच सगळे दु:ख एकच असते. कोणत्याही दु:खाची समज आली असेल ते इतर कुठलेही दु:ख समजू शकते. दु:ख ही एक निरनिराळ्या करणांनी निर्माण होणारी मन:स्थिती असते असे म्हणता येईल. अपमानाचे दु:ख आणि आई करणयाचे दु:ख ही मूलत: वेगळी नसतात. ही समज असल्यावर वेगवेगळ्या प्रकारचे दु:खही व्यक्त होऊ शकेल. लेखकाचे आत्मचरित्रात्मक नाटक असले तरी नटाच्या बाबतीत हेच खरे असेल. एका एका प्रसंगाला एका एका प्रसंगाची आठवण हा अभिनयाचा

खोटा, अकलात्मक, विकृत प्रकार असून समज व्यक्त होणे हेच अपेक्षित आहे. ख–याखोट्यात सतत हेलकावत ––फाटत राहण्याची काहीही आवश्यकता नाही. असल्या तंत्रामुळे अभिनय कसदार होणार नाही. त्यातील सहजता, उत्स्फूर्तता हरवून जाईल. आणि याहूनही सगळ्यात महत्वाचे म्हणजे नटाव्या स्वत:च्या जगण्याला ही पध्दत हानिकारक ठरेल. ज्या गोष्टी सतत ताज्या ठेवल्या जातील. जखमा भरून येणार नाहीत.

### ३. अभिनयाचा दर्जा

तेच हावभाव, त्याच हालचाली, तीच संवादफेक –– असे असूनही अभिनयाचया दर्जात फरक का पडतो? उंचपुरा, गोरागोमटा देह, चांगला भांग पाडणे, तंत्रशिक्षण –– या गोष्टी पुरेशा आहेत ? काही ठिकाणी देखणेपणाची गरजही असेल, पण अभिनयाचा दर्जा त्याच्यावर अवलंबून आहे ? अर्थातच नाही. यात खालील मुद्दे महत्वाचे ठरतात.

अ) नटाची चिंतनशीलता.

ब) प्रत्येकवेळी नव्यानं शोध घेणं –– जिवंतपणा.

अ) नटाची चिंतनशीलता :– यासाठी विव्दतेची गरज नसते. वाचन, जगण्यातली अनूभवाची प्रक्रिया समजून घेण्यातली सावधानता, माणसांच्या एकत्रित जगण्यातल्या प्रश्नांची जाण, वेगवेगळ्या प्रश्नांचे जगण्यावर होणारे परिणाम आणि त्यांची समज –– अशा सगळ्या गोष्टींवर ही चिंतनशीलता अवलंबून असते. या चिंतनशीलतेमुळेच अभिनयाला दर्जा प्राप्त होतो, अर्थपूर्णता प्राप्त होते, खोली प्राप्त होते. त्यातूनच अभिनयाला साधेपणा आणि सहजता प्राप्त होतात. हा साधेपणा, प्रेक्षकाला आपला संकुचितपणा टाकायला उद्युक्त करू शकतो. प्रेक्षकाच्या दृष्टीने ही एक अतिशय रिलॅक्स होण्याची अत्यंत समाधानकारक घटना ठरते. त्याच्या नुसत्या उपस्थितीनेही रंगमंच आणि पूर्ण रंगभूमीवर अशा नटाचे नुसते उपस्थित असणेही महत्वाचे ठरते. त्याच्या नुसत्या उपस्थितीनेही रंगमंच आणि पूर्ण रंगंदिरही अर्थपूर्णतेने भारले जाउ शकते. पण तो नट कोणत्या भूमिकेत आहे –– किती वेळाचे काम आहे –– अशा गोष्टी गौण ठरतात. अशा नटांना हॅम्लेट, मॅक्बेथ किंवा नटसम्राट हेच रोल्स करावे लागतात असे नाही. म्हणूनच आणि याच अर्थाने अभिनय ही एक स्वतंत्र कलाही ठरते.

• • •

# निमंत्रण रंगकर्मींना



# इतिहास संशोधक शीघ्र कवी प्रसिद्ध नाटककार

कै. वासुदेवशास्त्री वामनशास्त्री खरे

स्वातंत्र्यपूर्व काळ हा वैभवशाली नाटकांचा काळ होता. अनेक प्रसिद्ध नाटककार होऊन गेले. ह्यात नाव घेण्यासारखे अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नाट्याचार्य खाडिलकर, देवल, रा.ग.गडकरी वगैरे अनेक दिग्गज नाटककार होऊन गेले. यामध्ये इतिहास संशोधक शिघ्र कवि, नाटककार कै. वासुदेवशास्त्री खरे यांचे नाव ही वेगळेपणाने गुहागर हे गांव यांचे घराने वेदशास्त्रसंपन्न होते. वडिल वामनशास्त्री, आई गंगाबाई यांचे पोटी ५ ऑगस्ट १८५८ साली जन्म झाला. बालपणापासून अलौकिक बुद्धीमत्ता व तीव्र स्मरणशक्ती याचे वरदान मिळाले होते. यांचे अभ्यासात मन लागत नसे. शिघ्रकवी असल्याने काव्यकरून त्यात पौराणिक कथा गुंफून नाटके रचीत असे. यात मोठी माणसे ही सामिल होत. कोकणात खेळे प्रकार चालत असे तेथे ही मुले नाटके सादर करीत.

बालपणापासून हा हूड होता. अभ्यास करीत नसे तेव्हा वडिल विशेषत: आजोबा महादेवशास्त्री रागे भरीत तेव्हा हा वासुदेव रागाने घरातून निघून जाई. अनेक मोठ्या लोकांच्याकडून शिक्षणाच्या संधी आलेल्या त्याने त्या नाकारल्या. स्वावलंबनानेच शिकायचे हे पक्के मनाशी होते. असाच एकदा रागावून मलकापूर दरबारी राहिला. सरकारानी वासुदेवानी केलेल्या कविता ऐकून सरकार खुश झाले त्यांना सालजोडी, धोतरजोडी, दक्षिणा देऊन त्यांचा सन्मान केला. वय अवघे १४ वर्षांचे. १५ व्या वर्षी वडदचे सोमण यांच्या मुलीशी लग्न झाले. १७ वय लागताच ठरवून सातारला आर्चा गजेंद्र गडक यांच्याकडे अडीच वर्षात कौमुदी, तर्कशास्त्र, व्यायशास्त्र, व्याकरण शिकून शास्त्री पदवी मिळाली. नंतर पुणे येथे नोकरीत राहिला. त्या वास्तव्यात लो. टिळक, आगरकर, पितापुत्र चिपळूणकर, सुधाकरकाका जोशी यांच्याशी स्नेह जमला. टिळकांनी चालू केलेल्या पेपरला केसरी नाव खरे शास्त्री यांनीच सुचविले. न्यू इंग्लिश स्कूल स्थापनेतही खरे शास्त्री यांचे योगदान मोठे आहे. याच न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ११ महिने नोकरी केली. पुढे यशवंत केळकर मिरजेचे यांच्या सांगण्यावरून टिळकांनी सुचविल्यामुळे खरेशास्त्री मिरज हायस्कूल संपूर्ण इंग्रजी शाळा तेथे फक्त संस्कृतशास्त्रीची नेमणूक झाली. कै. वासुदेवशास्त्री व्यासंग, विद्वत्ता संस्कृत वरील प्रभुत्व तीव्र बुद्धीमत्ता यामुळे टिळकांनी पगार चांगला आहे. सरकारी शाळा आहे, पेन्शन मिळेल. माझ्या मते जायला काही हरकत नाही असे सांगितले. शास्त्रीबुवा मिरजेला गेले.

नोकरी चालू झाली. मिरज हीच त्यांची कर्मभूमी झाली. १८८४ साली समुद्रकाव्य व १८८५ साली यशवंतराय महाकाव्य लिहीले. शाहु महाराज दत्त विधान कोल्हापूर सोहळा पार पडला त्यानिमित्त बक्षिस लावून नाटके मागविली होती. खरेशास्त्री यांनी पाठविलेले गुणोत्कर्ष नाटकास बक्षिस मिळाले व तो प्रयोग राजाराम कॉलेजमधील मुलांनी बसविला. शिवाजी व संभाजी या विषयांवर हे नाटक होते. त्याच्या ३ आवृत्या निघाल्या. नंतर मेणवत्ती दप्तरांतील पत्रावरून नानासाहेब फडणवीसांचे चरित्र लिहिले. व नानांच्या चांगल्या गुणांवर प्रकाश पडला. पुढे मिरज मळा दप्तर संस्थान येथे अखंड हिंदुस्थानातून पत्रव्यवहार होत असे तो ३५० रूमाल गठ्ठे व ५ लाख पत्रे होते. ते पाहून त्यांचे मन इतके रमले. बुद्धीबळे, खेळ, कविता सर्व सोडून इतिहास संशोधनाचाच ध्यास घेतला. पानिपत पराभवानंतरची ४० वर्षांचा पत्राचा साठा नोकरी करत जाता-येता १४ मैलपायी उन्ह, तहान, भूक पाऊस सारं विसरून हाडाची काड केली. जीवाच रानं पैसा घातला. अनेक पत्राच्या नकला. ऊर्दू, पोतृगीज, कन्नड भाषा पत्रे त्याचा अभ्यास संशोधन सतत चालू होते. नकाशे त्यांना पाठ झाले. त्यांचे वाचन, लेखन रात्रीच चाले ते समईच्या प्रकाशात चाले. माहेरी मंडळी गेली असता वाती संपल्या तेव्हा बैठकीची सतरंजी तीळ सुते काढून वाती म्हणून वापरल्या. त्यासाठी २ हात सतरंजी संपविली. हा उद्योग ५-७ वर्षेचालला. मग ऐतिहासिक लेख, संग्रह, खंड प्रसिद्ध केले. अनेक साहित्य त्यामध्ये १) मालोजी, शहाजी २) इचलकरंजी घराबांचा इतिहास, ३) ग्रॅड ड कच्च्या चुकांचे हसे, ४) अधिकार योग ५) हरिवंशाची बखर ६) हैदरअलीवर तिसरी खारी. केळकरांनी लिहिले. इंग्रज मराठे याला प्रस्तावना मराठ्यांच्या पराभवाची कारणे त्यांनी जन्मभर संशोधन केलेल्या मराठी इतिहासाने सार आहे. हे करत असता ते नाटकांकडे वळले कसे वळले? तर आवड होतीच. महाराष्ट्र नाटक मंडळीचे मालक कारखानीस यानी खरेशास्त्री यांच्याकडे नाटक लिहून मागीतले हो ना करता करता त्यांनी नाटक लिहून द्यायचे कबूल केले व पुढील प्रमाणे नाटके लिहून दिली. १) तारामंडळ, २) संगीत चित्रवंचना, ३) संगीत कृष्णकांचन, ४) शिवसंभव ५) देशकंटक पूर्वीचे गुणोत्कर्ष ही ६ नाटके ६) संगीत उग्रमंगल ही सर्व नाटके गाजली.

त्याच्या नाटकांचा अभ्यास करता त्यातील स्वाभाविकता शास्त्रीबुवांनी काव्याप्रमाणे आपल्या नाटकांतही राष्ट्रीय उन्मतीला पोषक आशाच कोणत्या ना कोणत्या एक वा अनेक गुणांचा उत्कर्ष दाखविला आहे. शक्य तितकी व्यावहारिक प्रसंगाची चित्रे प्रेक्षकांपुढे ठेवलेली आहेत.

प्रभावशाली नाटककार -

लहानपणी हा उद्योग त्यांचा चाले हा गुण त्यांचे ठायी होता. काव्य आणि नाटक यांचा संबंध निकटचा आहे. किंबहुना नाटक हाच काव्याचा प्रकार आहे. तो 'रम्य प्रकार काव्येषु नाटकं रम्यं' हे सुभाषित प्रसिद्ध आहे. काव्य श्राव्य चित्र तसेच नाटक हे दृश्य काव्यच होय. त्यांनी आपल्या नाटकांमधून

सांप्रतकाळी आपल्या देशात चाललेल्या राजकिरणविषयक विचारांच्या मंथनातून निघणारे स्थूल व सत्य सिद्धांत मांडिले आहेत. तारामंडळातील इतबाररावांची धीरोदत्त भूमिका ही लो. टिळकांची प्रतिमाच आहे. नाटकातल्या पत्रालाही शास्त्रीबुवांनी लोकमान्य हीच पदवी दिली होती.

कृष्णकांचन मधील कृष्णराजाच्या कारस्थानाचे सर्व नाटकभर प्रदर्शित केलेले थैमान तर त्या उलट उज्वलेने स्वदेश बांधवाच्या दुःख विमोचनासाठी केलेला उज्वल स्वार्थशास्त्र इत्यादी प्रकारची स्वभाव चित्रे रंगविण्यात आली आहेत. नाटकात पात्रांच्या तोंडी, गावंढळ अशुद्धभाषा कोठे घातलेली नाही. नोकर चाकर, दासदासी इत्यादी पात्रांची भरती केली नाही.

शिवसंभव सोडून व गुणोत्कर्ष सोडून सर्व नाटकांची नावे गुढार्थक असल्यामुळे नाव ऐकल्यापासून हे काय असावे अशी जिज्ञासा उत्पन्न होते. पुस्तके पूर्ण वाचल्याशिवाय किंवा नाटक पाहिल्याशिवाय पूर्ण होत नाही. सर्वच नाटकात, देशप्रेम, देशभक्ती, राज्यनिष्ठा, राज्यसेवा वगैरे गोष्टी प्रामुख्याने दाखविल्या आहेत. गुणोत्कर्ष वगळून त्यांच्या बाकीच्या नाटकांची नावे पंचाक्षरयुक्त आहेत. त्यातील मध्यमाअक्षरांवर अनुस्वार आहे.

श्रेष्ठ इतिहासकार असण्याबरोबरच मराठी रंगभूमीच्या वैभवाचेही मानकरी ठरलेल्या वासुदेवशास्त्री खरे यांनी उग्रमंगल नाटकाद्वारे नृत्यनिपुण नायिका रंगमंचावर प्रथमच आणण्याचा मान मा. दिनानाथ मंगेशकर आणि त्यांच्या बलवंत संगीत मंडळींना मिळवून दिला. लोकमान्याचे परमस्नेही असणाऱ्या केसरीला केसरी नाव हे सुचविणाऱ्या शास्त्रीबुवांनी इतिहास संशोधन, काव्य नाटक इत्यादी क्षेत्रात लिलया लेखन केले. त्यांचा आंतरिक लोक ऐतिहासिक लेख संग्रहावरच अखेरच्या आजारात सुद्धा इतिहासाचेच बोलत मृत्यूपूर्व त्यांनी स्वहस्ते १० तास लेखन केले. मृत्यू ११ जून १९२४.

प्र.के.अत्रे यांनी म्हटले आहे, ''शास्त्रीबुवांचे शिवसंभव नाटक हे तर स्वातंत्र्याचे उपनिषदच आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामधला एक अत्यंत उर्जस्वल आणि रोमहर्षक कालखंड त्यांनी मराठी रंगभूमीवर आणून उभा केला आणि ऐतिहासिक नाटकाचा सुवर्ण आदर्श निर्माण केला. मराठी रंगभूमीवर आलेली ऐतिहासिक नाटके-दोनच एक तोतयाचे बंड आणि दुसरे शिवसंभव बाकीच्या लोकप्रिय ऐतिहासिक नाटकात इतिहासापेक्षा नाटकच जास्त होते.''

अलौकिक सामर्थ्याच्या या महान कवीला नाटककाराला आणि इतिहास संशोधकाला त्यांच्या गुणांच्या आणि कर्तृत्वाच्या मानाने महाराष्ट्रामध्ये सन्मान मिळाला नाही. ह्या गोष्टींचा माझ्या मनाला नेहमीच विषाद वाटतो.

लेखिका
सौ. सुमन आत्माराम प्रभुमिराशी
गजराज अपार्टमेंट, युनिट क्र.४
गणंजय हौसिंग सोसायटी, कोथरूड, पुणे ३८
संपर्क : ०२०, २५३८१२४०, भ्रमणध्वनी : ०९६२३०२७४०३

• • •

# हौशी नाट्याला मरगळ

- विश्वास कामत

हौशी-समांतर-प्रायोगिक-नाट्य-चळवळीला मरगळ आली आहे हे सत्य नाकारुन चालणार नाही! टी.व्ही.मुळे झटपट प्रसिध्दी आणि झटपट पैसा (?), शोधकांना हा शोध लागला आहे. अभ्यासकही पटकन सुचलेल्या या तर्काला मान्यता देतात हे तर हौशी नाट्य-चळवळीचं दुर्दैव आहे. मुंबई-पुण्यासारख्या मोठया शहरा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी ही चळवळ जोरात आहे. पण त्यांना प्रसिध्दी नाही आणि कुणी वलयांकित व्यक्तीही त्यांच्या मागे नाहीत. पुण्याच्या थिएटर ॲकॅडमीचा हात धरल्यामुळे कणकवलीच्या आचरेकर प्रतिष्ठानला प्रसिध्दी मिळते.

अगदी शहरापुरता विचार केला, तर गेल्या पन्नास वर्षात अशी मरगळ पाच-सहा वेळा तरी ठराविक अंतराने आली आहे, हा माझा अनुभव आहे.

प्रत्येक वेळी वरवरची कारणं शोधली गेली आणि हौशी मंडळी समाधानी झाली. (तरीही नकळत ही चळवळ पुन्हा एकदा नव्यानं फोफावू लागली.) कधी पैशांची तर कधी जागेची तर कधी थिएटरची अडचण सांगण्यात आली. मराठी रंगभूमीच्या मुख्य प्रवाहाला गेल्या दीडशे वर्षात काय कमी धक्के बसले! अगदी 'मराठी रंगभूमी मृतवत् झाली', ही धुगधुगी किती दिवस टिकणार? असे आर्त उद्‌गार त्या वेळी निघाले आहेत. रुबाबात फिरणारे मराठी नट अगदी अर्ध्या चडडीत आले होते. पण नाट्यसृष्टीला संजीवनी देणारा एक डॉक्टर मुंबईत उभा राहिला. पुन्हा एकदा मराठी रंगभूमीचा मुख्य प्रवाह खळाळून वाहू लागला!

आधीच म्हटल्याप्रमाणे नकळत ही चळवळ नव्यानं तरतरी घेऊन दिमाखानं उभी राहिली. सध्या नकळत काही घडेल या विश्वासावर अवलंबून राहता येणार नाही. मुळात या मरगळीचं कारण शोधायला हवं! माहीमच्या म्युनिसिपल शाळेत सातत्याने कार्यरत असलेली आविष्कार संस्था ही खरं तर आशेचा किरण आहे.

हे असं का व्हावं, याचा कुणी गांभीर्यानं विचार करतं का? केवळ प्रसिध्दी आणि पैसा यांच्या मागे लागल्यामुळे तरुण मंडळी या चळवळीकडे वळत नाहीत असं सांगून स्वतःची सुटका करुन घेतली जाते. प्रायोगिक व हौशी ही एक नाट्य-चळवळ आहे हे कितीजण मानतात? आजची तरुण मंडळी सोडा. पण या अगोदरच्या पिढीमधल्या तरी किती लोकांनी चळवळ म्हणून याकडे पाहिले आहे? त्याअगोदरच्या म्हणजे आमच्या पिढीतली नाटकवेडी मंडळी प्रायोगिक ही नाट्य - चळवळ आहे हे मानत होती. त्यावेळी ताई-माईची, पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांची चलती होती. तेचतेच विषय अगदी त्याच पध्दतीने सादर व्हायचे. नेपथ्य, प्रकाशयोजना या संकल्पनाच नव्हत्या.

नाटक ही अभ्यासपूर्ण कला आहे, याची जाणीव त्या वेळच्या हौशी मंडळींना होती. नाटकावरची पुस्तकं अभ्यासली जात होती. अनेक पाश्चिमात्य नाटकं वाचली जात होती, त्यांचा अभ्यास केला जात होता. माधव, मनोहर, केशवराव दाते या अभ्यासकांचं मार्गदर्शन ती मंडळी घेत होती. व्यावसायिक नाटकांकडे न वळता मंडळी प्रायोगिक नाटकं करण्यासाठी स्वतःला झोकून देत होती. झपाटल्याशिवाय नाटक करता येत नाही, याची जाणीव त्यांना होती. यातली काही मंडळी काही काळानंतर व्यावसायिक नाटकांकडे वळली. (व्यवसाय केल्याशिवाय रंगभूमीचा विस्तार होणार नाही, तिला बाळसं येणार नाही, हा विचार ते मानत होते.) पण तेथेही त्या मंडळींनी तडजोडी केल्या नाहीत. नेपथ्य-प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत इत्यादी तांत्रिक अंगांनाही निराळं वळण दिलं. किंबहूना या अंगांना नसलेलं वळण दिलं.

नवनाटकाकडे प्रेक्षक वळवला पाहिजे हा ध्यास त्यांनी घेतला होता. त्यासाठी आपल्या नाटकांचे प्रयोग लोकांच्या सोयीच्या ठिकाणी अत्यंत अल्प दरात दाखवले जात होते. वर्तमानपत्रवाले मात्र या मंडळींवर तुटून पडत होते. व्यावसायिकांकडे झुकतं काम होतं. आपल्या टीकेमुळे व्यावसायिकांचं नुकसान होऊ नये (खरं तर त्यांच्या टीकेला व्यावसायिक मंडळी भीक घालत नव्हती, नाटकाची स्तुती आली म्हणून नाटकाचे प्रयोग हाऊस फुल्ल चालत होते, अशी या टीकाकारांची खुळी कल्पना) म्हणून त्यांच्या बाबतीत सौम्य लिखाण असायचं. जणू व्यावसायिक रुपये खर्च करत होते आणि हौशी चिंचोके वापरत होते.

मुंबईतल्या कलाकार आणि आएनटी ने प्रायोगिक नाटकांची जणू ध्वजाच खांदयावर घेतली होती. मुंबईबरोबर पुण्याच्या पी.डी.ए.नेही हा वसा घेतला होता. नाटकावर करमणूक कर होता आणि पोलीस खात्यातून परवाणगी घ्यावी लागत होती. त्यांच्या जाचक नियमांमुळे सर्वच नाटक मंडळी तोट्यात जात होती. तोटा झाल्यामुळे संस्था कर्जबाजारी होत होत्या. हौशींना पैशांची आवक नव्हती. खिशातले पैसा घालून ते नाटकं करत होते. प्रायोगिक नाटकं करणं ही स्वतःची जबाबदारीच आहे अशी त्यांची धारणा होती. नाटक इतक्या गंभीरपणे कुणी घेतयं का? केवळ आजच्या तरुणांना दोष देण्यात काय अर्थ आहे. ज्यांना नाटकाचं प्रेम आहे, ज्यांना सध्याच्या परिस्थितीबददल खरंच काही वाटत असेल तर केवळ दोषारोप करुन त्यांचं समाधान होतं? यावर उपाय काय? तरुणांना पुन्हा एकदा या चळवळीकडे कसं आणायचं, याचा विचार करायला नको? राज्य नाट्यस्पर्धेनं सुरुवातीचा काही काळ या चळवळीला चालना दिली होती. पण गेल्या काही वर्षात त्याचं स्वरुपच बदललं आहे. बक्षिसं मिळविण्याचे आडाखे तयार व्हायला लागले आहेत. बक्षीस मिळालं की आपलं नाटक व्यावसायिकाकडे कसं जाईल याबद्दल लेखक चिंतातुर! स्पर्धेतल्या यशाची पायरी चढून व्यवसायात कसं पदार्पण करायला मिळेल,

याकरिता नटमंडळी आणि तंत्रज्ञ आतुर!
वास्तविक राज्य नाट्यस्पर्धेनं ३५ वर्षांपूर्वी केलेल्या नियमांचा पुन्हा विचार करुन या माध्यमाचा वापर करुन नवं वळण दयायला हवं लाखो रुपये खर्च करुन दरवर्षी शासनातर्फे प्रशिक्षण शिबिरं घेतली जातात. त्यांच्याद्वारे सुध्दा ही गोष्ट साध्य होऊ शकेल. येणारा काळ आणखी कठीण असणार आहे. जुनी परिमाणं बदलणं आवश्यक आहे. आजची पिढी बहुश्रृत आहे. स्वतःविषयी आत्मविश्वास आहे, विचार करु शकणारी आहे. का? हा प्रश्न त्यांच्या डोक्यात सतत घोळत असतो. माती सुपीक आहे, त्यातुन कोणतं आणि कसं पीक घ्यायचं याचा विचार व्हायला हवा. त्याकरिता हौशी चळवळीकरिता काही करावं असं वाटतं, मरगळ कशी घालवावी याबद्दल ज्यांना चिंता वाटते त्यांनी एकत्र यायला हवं. उपदेश आणि भाषणं न देता ठोस कार्यक्रम घेऊन या तरुणांपुढे यावं; माझी खात्री आहे या प्रामाणिक धडपडीला निश्चितच यश मिळेल.

जागतिकीकरणाची टांगती तलवार सर्वच क्षेत्रात भेडसावीत आहे. मग नाटक त्यातून कसं सुटेल? आपणच या पार्श्वभूमीवर नाट्य – चळवळीला जोम देण्याच्या कामाला लागलं पाहिजे. टी.व्ही.मुळे  मुलं वाहवत चालली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. पण हताश होण्याचं कारण नाही. पूर्वी एखादी संस्था स्वतः मार्ग शोधून स्वतः कामाला लागायची. आता हे एकट्या – दुकट्यांच काम राहिलं नाही. सरकारकडून काही मदत होईल याची अपेक्षा करणं मूर्खपणाचं आहे. राजकारण आणि खुर्च्या यात अडकलेले पुढारी यांना इथं पाहायला वेळ नाही आणि इच्छाही नाही. सरकारी खाती आम्ही तुमच्यावर मेहेरबानी करतो अशा वृत्तीची. तेंव्हा मार्ग आपला–आपणच शोधला पाहिजे. पण त्यासाठी, आपले कंपू सोडून बाहेर यायला हवं. केवळ मुंबई–पुणे शहरांपुरता विचार करुन चालणार नाही. नाहीतर आज उत्साहात असलेली गावाकडची तरुण मंडळी शहरी तरुणांसारखी मरगळतील.

बारामतीमधील तरुण मंडळी उत्साही आहेत. त्यांना मार्गदर्शनही चांगले मिळतेय, तेंव्हा त्यांनी याबाबत पुढाकार घ्यावा.

माझ्या लहानपणातला सुटीचा बराच काळ वसईतल्या किरवली गावी गेलेला आहे. किरवली गावातली मंडळी देवळाच्या जत्रेच्या दिवशी एक नाटक निश्चितच करत होती. वसईची ही परंपरा आहे.

प्रायोगिक रंगभूमीची मरगळ घालविण्याचा ध्यास घेतल्याशिवाय हे होणार नाही.

• • •

# निमंत्रण रंगकर्मींना



# बालरंगभूमी : कालची , आजची, उद्याची

– राजू तुलालवार

गेली २० वर्षे बालरंगभूमीसाठी कार्यरत आहे. आजवर ३३ बालनाटिका व ६ दोन अंकी बालनाट्यांचे लेखन–दिग्दर्शन, चिल्ड्रेन्स थिएटर ही स्वतःची बालनाट्य संस्था व त्यामार्फत व्यावसायिक बालरंगभूमीवर ७००हून अधिक प्रयोग सादर. सन १९९७ साली नाट्य परिषदेकडून खास सन्मान.

बालरंगभूमीची संकल्पना आपल्याकडे सातासमुद्रापलीकडून आली. पूर्वी आपल्या देशात अशी समजूत होती की लहान मुलांचे मनोरंजन म्हणजे फक्त खेळ, गोष्टींची पुस्तके आणि सिनेमा. मुलांसाठी आज जसे विविध कार्यक्रम सादर केले जातात तसे ५० वर्षापूर्वी काही नव्हते. नाही म्हणायला मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या शहरांमध्ये जत्रा किंवा उत्सवांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी मेळे भरविले जात. या मेळ्यांमध्ये लहान मुलांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम केले जात होते; परंतु त्या कार्यक्रमांचा मुख्य हेतू राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम असल्यामुळे ते फारसे लोकप्रिय न होता कालांतराने नाहीसे झालेत. महाराष्ट्रात बालरंगभूमीला जन्म दिला तो सुधा करमरकर यांनी. अमेरिकेतील बालरंगभूमीच्या संकल्पनेचा अभ्यास करुन १९५९ साली मुंबईत त्यांनी 'लिटल थिएटर' या संस्थेची स्थापना केली आणि बालरंगभूमीच्या रुपाने मनोरंजनाचे एक नवे दालन लहान मुलांना उघडून दिले. ज्या रंगमंचावरुन लहान मुलांचे मनोरंजन करणारे कार्यक्रम सादर होतात त्याला बालरंगभूमी म्हणतात. बालरंगभूमीची ही साधी सुटसुटीत व्याख्या आहे. मनोरंजनाबरोबर सुसंस्कार करणे या बालरंगभूमीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### बालरंगभूमी कालची (१९६० ते १९८०)

बालरंगभूमीचा शुभारंभ सन१९५९ साली 'लिटल थिएटरच्या' मधुमंजिरी या बालनाट्याने झाला. हे बालनाट्य रत्नाकर मतकरी यांनी लिहले होते. सुधाताईंनी दिग्दर्शित केले. बालरंगभूमीची स्थापना करुन तिचा पाया मजबूत करण्यात या दोघांचाही वाटा आहे. बालरंगभूमीचे कार्य पुण्यात सई परांजपे, श्रीधर राजगुरु या मंडळींनी सुरु केले आणि जयंत तारी, माधव वझे यांनी ते पुढे नेले. नागपुरात थोर बालसाहित्यकार गोपीनाथ तळवळकर आणि दिनकर देशपांडे यांनी बालरंगभूमीची पाळेमुळे घट्ट रुजवली. बालरंगभूमी हळूहळू आकार घेऊ लागली आणि या रंगभूमीकडे जुने–जाणते लेखक आकृष्ट होऊ लागलेत. या काळात 'नवे गोकुळ',' वयम् मोठम् खोटम्', 'विठ्ठल तो आला आला'(पु.ल.देशपांडे), 'बाल गोविंद' (वसंत बापट), 'चिमणा बांधतो बंगला', 'चांभार चौकशा', 'पाटलाच्या पोरीचं लगीन' (विजय तेंडुलकर), 'राजू हरला', 'घरभेद्या', 'राजा नव्हे गुलाम' (शाम फडके), 'कावळे' (चि.त्र्यं.खानोलकर), 'शेवटीचा शाप', 'जादूचा शंख', 'झाली काय गंमत' (सई परांजपे) इत्यादी नामवंतांनी बालनाट्य–लेखन केले. व्यावसायिक बालरंभूमीवर सुधाताईंची 'अल्लादीन' व 'जादूचा दिवा', 'अलीबाबा चाळीस चोर', 'एका फटाक्यात सात', 'हं हं आणि हं हं हं' तर रत्नाकर मतकरींची 'कळ लाव्या कांद्याची' कहाणी, 'अचाट गावची अफाट मावशी','अलबत्त्या–गलबत्त्या' ही बालनाट्ये खूप गाजली. बालरंगभूमीची लोकप्रियता वाढीस लागली त्याबरोबर बालनाट्य लिहिणारे व बसविणा–यांची संख्याही वाढू लागली. अनंत काणेकर, भारा भागवत, पुरषोत्तम दारव्हेकर, वसुधा पाटील, वंदना विटणकर, राजा मंगळवेढेकर, आत्माराम सावंत, कमलाकर नाडकर्णी यांनीही त्या काळात उत्साहाने बालनाट्य–लेखन केले तर विजया मेहता, अरुण जोगळेकर, सई परांजपे इत्यादींनी बालनाट्य–दिग्दर्शन केले. अशोक पावसकर, कुमार शाहू यांनीही याच काळात बालनाट्याचा वसा घेतला व पुढेही तो जोपासला. या काळात आलेल्या बालनाट्यांचा ओढा अद्भुततेकडे जास्त होता. अधिकांश बालनाट्ये फॅण्टसी वर आधारित होती. राजा–राणी–परी–चेटकीण–राक्षस–जादू इत्यादी व्यक्तिरेखा वापरुन चमत्कारांचा आधार घेऊन विनोदी पध्दतीने नाटक सादर करण्याचा प्रयत्न बहुतेकांनी केला. गंभीर विषय, शोकांतिका यांना बालनाट्यात स्थान नव्हते. रॉबिनहूड, सिंड्रेला, स्नोव्हाईट इत्यादी परिकथांवर तर अनेकांनी नाटके लिहिलीत व सादर केलीत. ह्या काळातील बालनाट्याचे स्वरुप दीर्घांकिका म्हणता येईल असे असायचे. १९७० पर्यंत बालरंगभूमीला चांगली प्रतिष्ठा अन् लोकप्रियता मिळाली. बालनाट्याप्रमाणे वारणा बालवाद्यवृंद, रामदास पाध्येंचा बोलक बाहुला, जादूगारांचे जादूचे प्रयोग बालरंगभूमीवर होऊ लागले आणि यशस्वी झालेत. बालरंगभूमीचा पसार वाढू लागल्यावर १८ फेब्रुवारी १९६८ रोजी मुंबईत मराठी बालनाट्य परिषदेची स्थापना करण्यात आली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात झालेल्या पहिल्या बालनाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते – विजय तेंडुलकर. परिषदेने बालनाट्य चळवळीला वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांना बांधण्याचा प्रयत्न केला पण तीन वर्षांतच परिषदेचे कार्य थंडावले. हा काळ व्यावसायिक बालनाट्य संस्थासाठी अतिशय उत्तम गेला. भत्की बर्वे, दिलीप प्रभावळकर, लक्ष्मीकांत बर्डे, निवेदिता जोशी अशा अनेक कलाकारांनी बालरंगभूमीवरुन पुढे व्यावसायिक प्रौढ रंगभूमीवर प्रवेश केला व पुढे तेही क्षेत्र गाजवले.

### बालरंगभूमी आजची (१९८० ते २०००)

गेली दोन दशके ही शालेय बालरंगभूमीचीच म्हटली पाहिजेत. लिटल थिएटरची कला अकादमी व अरविंद वैद्य यांच्या कुमार कला केंद्राने आंतरशालेय एकांकिका स्पर्धा सुरु केल्यात आणि बालरंगभूमीवर एक नवीन क्रांती होऊन नवीन शिक्षक, लेखक व दिग्दर्शकाचा उदय झाला. माझी स्वतःची वाटचाल

याच शालेय रंगभूमीवरुन सुरु झाली. टीव्हीच्या आगमनाने व्यावसायिक बालरंगभूमीसमोर नवे आव्हान उभे राहिले खरे. पण याच टीव्हीच्या किलबिल आणि आकाशवाणीच्या बालदरबारच्या कार्यक्रमांद्वारे नव्या दमाच्या बालकलाकारांना संधी मिळाली. जुन्याजाणत्या लेखकांनी बालरंभूमीकडे पाठ फिरवली पण शालेय रंगभूमीच्या आगमनामुळे मुलांच्या सतत संपर्कात असणारे शिक्षक बालनाट्य लिहून बसवू लागले. माधव साखरदांडे, ज्योतीराम कदम, विजया वाड, विलास जोशी, विद्या पटवर्धन, विश्वास धुमाळ ही नावे या संदर्भात घेता येतील. शालेय रंगभूमीच्या प्रभावामुळे फॅण्टसी जाऊन वास्तवता आली. परीकथेऐवजी मुलांच्या विश्वाशी जवळीक साधणारे शाळा, अभ्यास, घर, मैत्री इत्यादी विषय बालनाट्यात येऊ लागलेत. राजा-राणी-परी-चेटकीणीची पात्रे जाऊन त्यांची जागा आत आई-बाबा-शिक्षक-रोबो-डॉक्टर यांसारख्या वास्तविक पात्रांनी घेतली. आंतरशालेय स्पर्धांमुळे वेगवेगळे विषय हाताळले जाऊ लागले. नाटकांऐवजी एकांकिका मुलांना आवडू लागल्या. 'मिनी मंगळावर' (परग्रह प्रवासावर), 'माझं पाखरु' (भूतदयेवर), 'कुंपणाबाहेरची फुले' (सुधारगृहातील मुलांवर), 'शाळा एके शाळा' (वाढलेल्या अभ्यासक्रमावर), 'केल्याने होत आहे रे' (शाळेतील विषयांवर), 'मर्कटकथा' (भूतदयेवर), 'गोष्ट एका पप्पीची' (मंद बुध्दीच्या मुलांवर) अशा वेगवेगळ्या विषयांवर आधारित एकांकिका मुलांना आवडल्या आणि या एकांकिकांनी बालरंगभूमी अधिक समृध्द केली. एकांकिका मुलांना आवडते असं समजल्यावर व्यावसायिक बालरंगभूमीवरसुध्दा त्याचे प्रयोग झालेत आणि ते यशस्वी ठरलेत. एकाच विषयावर दोन-तीन तास चालणारं नाटक बघण्यापेक्षा वेगवेगळ्या विषयांवर आधारित बालनाटिका मुलांना अधिक भावतात, आवडतात. पूर्वीच्या बालनाट्यात पात्रांची संख्या मोजकीच असायची. शालेय रंगभूमीच्या प्रभावामुळे हल्लीच्या बालनाट्यात ही संख्या वाढल्याचे दिसून येते. बालरंगभूमी ही ख-या अर्थाने मुलांची. म्हणूनच जास्तीत जास्त बालकलाकारांना वाव मिळावा म्हणून बालरंगभूमी प्रयत्न करु लागी. ग्रिप्स थिएटरची संकल्पना (मोठ्यांनी छोट्यांसाठी केलेले नाटक) म्हणूनच इथे रुजू शकली नाही. मुलांना नाटक बघायला आवडते. तेवढेच ते करायलाही आवडते. शालेय रंगभूमीमुळे मुलांच्या दोन्ही इच्छा पूर्ण झाल्यात. या काळात बालरंगभूमीवर अनेकांनी नवनवीन प्रयोग केलेत. चंद्रशालेच्या 'दुर्गा झाली गौरी' या नृत्यनाट्याने बालरंगभूमीला एक वेगळीच दिशा दिली. ग्रिप्स संकल्पनेवर आधारित पुण्याच्या 'वाईट मोठे छान छोटे' या नाटकानेही वाहवा मिळवली. रत्नाकर मतकरींनी बालनाट्य बागेत, ट्रकवर सादर करण्याची कल्पना प्रत्यक्ष कृतीत आणली. व्यावसायिक बालनाट्यवाल्यांनी एकाच तिकिटात तीन बालनाट्यांची योजना अमलात आणली. छोट्या पडद्याने (टीव्हीने) उभे केलेले प्रचंड आव्हान बालरंगभूमीने लीलया पेलले. विविध मालिका, कार्टून्स, सिनेमा, डिस्कव्हरी चॅनेल अशा कार्यक्रमांनी टीव्हीने बालप्रेक्षक गिळंकृत करायला सुरुवात केली होती पण तरीही याच काळात बालनाट्यांची, ते सादर करणा-या संस्थांची, बालप्रेक्षकांची, प्रयोगांची संख्या दुपटीने वाढली. बदलत्या काळानुसार व्यावसायिक बालरंगभूमीनेही आपली जुनी वस्त्रे फेकून नवीन वस्त्रं परिधान करायला सुरुवात केली आणि त्यातूनच 'आईबाबा हरले', 'वेडा वाघोबा', 'जादूचे घर', 'देवाची रंगपेटी', 'मिकीमाऊस हरवला' (चिल्ड्रेन्स थिएटर निर्मित), 'गोल्डन गँग', 'बुटबैंगण', 'ढग ढगोजीचा पाणी प्रताप' (बालनाट्य निर्मित),' जुळ्या राक्षसांची धमाल',' शाबास लकड्या' (समूह निर्मित), 'ब्रुस ली माझा दोस्त', 'चिंगु चिंगम-बबली बबलगम', 'आम्ही शाळेत जाणार नाही' (आकांक्षा निर्मित) इत्यादी आकर्षक नावांची, वेगवेगळ्या विषयांवरील बालनाट्ये आलीत. व्यावसायिक बालनाट्यांमध्ये स्पर्धा आली आणि बालनाट्यांचा दर्जा खालावला.

बालरंगभूमीला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या कार्यामध्ये शालेय रंगभूमीप्रमाणेच बालनाट्य शिबिरांचा देखील महत्त्वाचा वाटा आहे. या शिबिरांमुळे बालरंगभूमीचा प्रसार तर झालाच शिवाय अनेक नवीन कलाकार बालरंगभूमीमार्फत प्रौढ रंगभूमीला मिळालेत. बालनाट्य शिबिराच्या कार्यात सुधा करमरकर, सुलभा देशपांडे, विनोद हडप, रामनाथ थरवळ, विद्या पटवर्धन, श्रीराम बडे यांनी मोलाची कामगिरी बजावलेली आहे. कांचन सोनटक्के यांनी तर अपंग मुलांना बालरंगभूमीवर आणून त्यांनाही बालरंगभूमीवर आपले कर्तृत्त्व सिध्द करण्याची संधी दिली आहे. आजचा पालक सुजाण आहे. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासात बालनाट्य शिबिराला असणारे स्थान हा पालक ओळखून आहे. म्हणूनच हा पालक वर्ग आपल्या पाल्यांना उत्साहाने तो मुलांना बालनाट्यही दाखवतो. चांगलं आणि वाईट यांच्यातला फरक या पालकांना ठाऊक आहे. हा पालक वाईट बालनाट्यांना डब्यात टाकतो तर धंदेवाईक शिबिरांना पुन्हा जाणे टाळतो. आजच्या बालरंगभूमीला हा पालकच अप्रत्यक्षपणे नियंत्रित करतो आहे असं म्हटल्यास वावगं ठरु नये.

शिक्षणातील जीवघेणी स्पर्धा, वाढता अभ्यास, क्लासेस यांच्यामुळे मुलांना वेळ मिळेनासा झाला आहे. पूर्वी वर्षभर बालनाट्ये चालायची; परंतु बदलत्या परिस्थितीमुळे आज फक्त सुट्टीतच बालनाट्यांचे प्रयोग होताना दिसतात. इंग्रजी माध्यमाच्या वाढत्या प्रसारामुळे आज बालकराकारांना नाटकाचे स्क्रीप्ट वाचता येईनासे झाले आहे; परंतु त्यांचा उत्साह प्रचंड आहे. त्या उत्साहामुळेच बालनाट्य आजही अखंडपणे चालूच आहे. शाळांना सुट्ट्या पडल्या की नवनवी बालनाट्ये आणि त्याचबरोबर नव्या बालनाट्य संस्था प्रकाशात येतात. पण यामध्ये नवविचारांचे, निष्ठावान तरुण कमीच असतात. बालनाट्याला वाहून घेतलेले रंगकर्मी आज औषधालासुध्दा मिळणे कठीण होऊन बसले आहे. बालनाट्याला कार्यक्षेत्र मानणारे जेवढे या क्षेत्रात पदार्पण करतील तेवढ्या प्रमाणात हे क्षेत्र अधिक सजीव व सळसळते राहू शकेल. असे घडले तरच प्रौढ नाटक अधिक प्रगल्भ होण्यास व प्रेक्षकांच्या जाणकारीत भर पडण्यास बालनाट्य सहाय्यभूत ठरेल. आजचे बालप्रेक्षक हेच उद्याच्या प्रौढ रंगभूमीचे तारणहार ठरणार आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

**बालरंगभूमी उद्याची**

पुर्वी जाणकार लेखक बालनाट्य लिहीत होते. नंतर शिक्षक लिहायला लागले. मला असे वाटते की यापुढे बालनाट्य हे मुलांनीच लिहिले पाहिजे. बसविले

पाहिजे. मुलं कविता लिहितात मग नाटक का नाही लिहू शकणार ? नाट्यकलेचे शिक्षण शाळेमधून दिले तर हे सहजसाध्य आहे. लेखन, दिग्दर्शन, सादरीकरणात लहान मुलांचा सहभाग ही बालरंगभूमीची गरज आहे. आजपर्यंत बालरंगभूमीवर काय सादर करायचे हे मोठ्यांनी ठरविले आहे, ते आता लहानांनी ठरविले पाहिजे. मुलांना मुक्तपणे अविष्कार करु दिला पाहिजे. विषय निवडण्याचे आणि तो त्यांच्याच आवडीने सादर करु देण्याचे स्वातंत्र्य लहान मुलांना दिले पाहिजे. उद्याच्या बालरंगभूमीवर मोठे जे काही करतील ते छोट्यांच्या सल्ल्याने आणि सहकार्यानेच. उद्याच्या बालरंगभूमीची माझी ही कल्पना काही जणांना बालिश वाटली तरीही बालरंगभूमीच्या विकासासाठी ती प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे. मी स्वत: यासाठी वेगवेगळे प्रयोग करीत आहे. त्याचे उत्तम रिझल्ट मिळालेले आहेत.

बालरंगभूमीमुळे मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळून त्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो ही गोष्ट आता सिध्द झालेली आहे. बालनाट्य म्हणजे घटकाभरची करमणूक नव्हे तर मुलांचे अनुभवविश्व समृध्द करणारी एक चळवळ आहे. या चळवळीक डे आता उपेक्षेने पाहाणं थांबवलं पाहिजे. 'बालनाट्यात काम करतोस' हे वाक्य कुचेष्टेने नव्हे तर आदरभाव व सन्मानानं उच्चारले गेले पाहिजे.

● ● ●

# मी पूर्णपणे आशावादी!

– वंदना गुप्ते

मराठी रंगभूमीच्या भविष्याविषयी मी निश्चिंत आहे. मी आज ४० ते ४५ वर्षेमराठी रंगभूमीवर कार्यरत आहे. गेल्या ४० वर्षात मराठी रंगभूमीवरील संहितात, दिग्दर्शनात, तांत्रिक पातळीवर जे बदल होत गेले ते मी फार जवळून पाहिलेले आहेत. पुढच्या ३० ते ५० वर्षात व त्यापुढेही ते होतच राहतील.पाश्चात्य नाटकांचा प्रभाव मराठी नाट्यघडणीवर होतच राहील. काळानुरूप त्याची आवश्यकता वाढत राहील. बदल प्रेक्षकांना कायम अपेक्षित असतीलच. कारण बदलांमुळे रंगभूमी विकसित होत जाते. बदल चांगला असेल तर प्रेक्षक त्याच मनापासून स्वागत करतात.

मी पूर्णपणे मराठी रंगभूमीच्या भविष्याविषयी आशावादी आहे. विविध चनेल्स्वरून सिरीयल्स् किंवा इतर कार्यक्रमांच्या माध्यमनातून होणऱ्या अतिक्रमणाचा नाटकांवर परिणाम होणार नाही असे मला वाटते. कारण मराठी नाटक चिरकाल टिकणारं आहे.

सध्याचे तरूण नाट्यकर्मी गुणवान आहेत, चांगल्या संहिता घेऊन नविन नाटकं रंगभूमीवर येताहेत. त्यामुळे या सर्व स्पर्धेला तोंड देऊन नाटक तग धरून राहील यात शंका नसावी.

मराठी नाट्य रसिकांचे मराठी नाटकावर एवढे अभिजात प्रेम आहे की, जेंव्हा जेंव्हा मराठी प्रेक्षक ठामपणे मराठी नाटकांच्या पाठीशी उभा राहिला आहे. मराठी प्रेक्षकांनीच मराठी रंगभूमी वेळोवेळी सावरली आहे. असे नाट्यसृष्टीवर प्रेम करणारे प्रेक्षक जोपर्यंत आपल्याकडे आहेत तोपर्यत मराठी नाटके होतच राहतील.

सध्या काही नवीन निर्मात्यांचे नाटकांचे आर्थिक गणित कोलमडते आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे जाहिरातींवर होणारा अफाट खर्च. नाट्यपरिषदेच्या माध्यमातून याव काहीतरी मार्ग काढण्याचे प्रयत्न चालू आहेत; ते नाटक धंद्याला परवडणारे नाहीत, उलट ते मारक ठरत आहेत. मला वाअतं वृत्तपत्रचालक याचा गंभीरपणे विचार करतील आणि परिषद निश्चितच काहीतरी चांगला मार्ग शोधून काढील.

नाट्यपरिषदेची एखादी स्वतंत्र वेबसाईट निर्माण करून त्यामार्फत नाटकांच्या जाहिराती करण्याची सुद्धा एक योजना विचाराधीन आहे. व्यावसायिक नाट्य निर्मात्यांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. ऑनलाईन बुकींग, घरपोच नाट्य तिकिटे अशा सुविधा दिल्या गेल्या तर नक्कीच जास्त मराइी प्रेक्षक नाटकासाइी खेचता यंईल.

महाराष्ट्रभर नाट्यगृहांची संख्या वाएयला हवी, महाराष्ट्रात मुंबईबाहेर काही शहरांमध्ये चांगली भव्य अशी नाट्यगृहे आहेत, परंतु त्याची देखभाल (मेंटेनन्स) व्यवस्थित केली जात नाही. तेथील स्वच्छतागृहांची, मेकअप रूम्सची तांत्रिक व्यवस्था तितकीशी चांगला नाही. त्या त्या ठिकाणची नाट्य परिषदेची शाखा अशा प्रकारच्या देखभलीची जबाबदारी घेऊ शकेल का, यासंबंधी शाखांशी विचारविनिमय सुरू आहे.

नाट्यसृष्टीस पूरक अशा बऱ्याच चांगल्या योजना नाट्यपरिषदेमार्फत राबविल्या जात आहेत. सारांशात्मक बोलायचे झाल्यास, मराठी रंगभूमीला कधीच मरण नाही. मराठी रंगभूमीवर आज जे गुणी कलावंत आहेत, ते रंगभूमीस बरेच काही देऊ शकतात. अशा गुणी कलावंतांचे फार मोठे योगदान मराठी रंगभूमी कायम कार्यरत राहणार आहे.

स्पर्धामधून, शिबिरांमधून नवीन नवीन टॅलेंट , नवीन विषय, नवीन तंत्र पुढे येत राहिल. नाटके पुढे येतच राहतील. म्हणूनच सुरूवातीलाच म्हटले नाटक अमर आहे!

# मराठी रंगभूमीचा बदलता चेहरा - मोहरा

- राजीव जोशी

दीडशेहून अधिक वर्षे सक्रिय असलेली आपली मराठी रंगभूमी. तिने काळाच्या ओघात अनेकविध स्थित्यंतरे पाहिलेली आहेत. सुरुवातीच्या काळातील जंगलच्या पडद्यापासून ते आजच्या काळा पडदा व ठोकळे – प्लॅटफॉर्मपर्यंतचे बदल इथल्या प्रेक्षकांनी अनुभवले आहेत. संपूर्णपणे तौलानिक अभ्यास करणे हा एखाद्या ग्रंथाचा विषय होऊ शकतो. परंतु या संमेलनाच्या निमित्ताने रंगमंचाचे बदलते स्वरूप संक्षिप्त रुपात मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे.

रंगमंचावर झालेल्या नाटकात केवळ नेपथ्यच नव्हे तर तंत्र – मंत्राबाबत जे बदल झाले, आशयातील बदल दिसले त्याची नोंद घेण्यासाठी काही ठळक टप्पे व त्यांचा परामर्श घेतला जाईल. अर्थात विषयाचा आवाका प्रचंड असल्याने काही उल्लेख न आढळल्यास दोषारोप होऊ नयेत कारण अनवधानाने तसे होण्याची शक्यता आहे.

**विष्णुदासांचा रंगमंच**

अगदी पूर्वी मेळे, चित्रकथी, पिंगुळी असे लोककलांचे प्रकार होते. सांगलीचे विष्णुदास ऊर्फ विष्णू अमृत भावे ह्यांनी इ.स. १८४३ साली 'सीता स्वयंवर' हे नाटक सादर करुन मराठी रंगभूमीचा पाया रोवला. विष्णुदासी पौराणिक नाटकामुळे आपल्या रंगभूमीवर पौराणिक नाटके होऊ लागली. आख्यान स्वरुपातल्या या नाट्यप्रकारावर कर्नाटकातील भागवत नाटकाचा प्रभाव होता. फक्त नृत्याऐवजी शब्द आणि क्रियात्मक भाग जास्त होता. रामयणादी पौराणिक कथा विष्णूदासी नाट्याद्वारे मांडल्या गेल्या. काष्ठ पुतळ्यांमार्फत कवी, देव, राक्षस ह्यांची सोंगे असत. स्थळकाळ, प्रसंगाचा बोध सूत्रधारांच्या आख्यानातून म्हणजेच शब्दांतून प्रगट व्हायचा.

१९ जानेवारी १८५६ रोजी मुंबईच्या अमरचंद वाडीकर नाटक मंडळींनी पौराणिक आख्यानाच्या जोडीला एक फार्स करून दाखविला. मुंबईत असलेल्या इंग्रजी समाजाच्या सान्निध्याने आपल्या रंगमंचावर देशी फार्स अवतरला. नंतरच्या काळात पौराणिक नाटकांच्या बरोबरीने अपौराणिक नाट्यप्रयोग म्हणून फार्स सादर व्हायचे. पौराणिक नाटकांत सुरुवातीला दर्शनी भागात पडदा नव्हता.

बुकिश नाटकांचे साम्राज्य

पुस्तकरुपाने प्रसिध्द होऊन रंगभूमीवर आलेल्या नाटकांना बुकीश नाटक म्हणत. १८६१ साली विनायक जनार्दन कीर्तने लिखित थोरले माधवराव पेशवे यांचे नाटक प्रसिध्द झाले. हे मराठीतील पहिले छापीलरुप स्वतंत्र नाटक. त्याचा पुढे १९८२ मध्ये इचलकर मंडळींनी प्रयोग केला होता. साधारण १८ वर्षेही बुकीश नाटके होत राहिली. काल्पनिक, ऐतिहासिक विषयांच्या बरोबरीने अ‍ॅथेल्लो किंवा सिंबेलाईन – तारा ही इंग्रजीतून तर वेणीसंहार, शाकुंतल ही संस्कृत नाटके मराठीत आली. बुकिश नाटकांमुळे दर्शनी पडदा आला. तसेच वस्तू – मांडणीला महत्व आले. १८७० पर्यंत रंगीबेरंगी पडदे होते. त्यानंतर साधा पडदा आला.

**किर्लोस्कर संगीत नाटकांचा उदय**

संगीत रंगभूमीची ख–या अर्थाने पहाट झाली ती १८ नोव्हेंबर १८८२ रोजी, ज्या दिवशी पुण्यात अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'संगीत सौभद्रचा' पहिलावहिला प्रयोग झाला. विष्णुदासी किंवा बुकीश नाटकांना मागे टाकणारा गंधर्वयुग अवतरले, त्याची नांदीच किर्लोस्करांच्या नाटकांनी झाली. नाटकाच्या सुशिक्षित वर्गाला आपला वाटणारा हा नाट्यप्रकार अधिक बंदिस्त स्वरुपाचा होता. अण्णांप्रमाणे कार्य पुढे नेले. नाटक म्हणजे केवळ करमणूकी नव्हे तर समाज प्रबोदनाचे साधन हेच जणू महात्मा फुलेंच्या 'तृतीय नेत्र' व देवलांच्या 'शारदा' नाटकाने त्या काळी दाखवून दिले. आणि आज शे – सव्वाशे वर्षेउलटली तरी 'सौभद्र' व 'शारदाची 'गोडी काही कमी झालेली नाही.

केवळ जंगलाचे, प्रासादाचे रंगीत पडदे पार्श्वभूमी सोडून त्यासमोर नाटके सादर करण्याचे तंत्र त्या वेळी होते. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व राम गणेश गडकरी ह्यांनी शब्दप्रधान नाटकांतून सामाजिक आशयाची नाटके लिहिली. 'एकच प्याला', 'भावबंधन',' स्वयंवर', 'मानापमान',' वधूपरीक्षा', 'विद्याहरण' ही नाटके आजही प्रभावी वाटत आहेत. निव्वळ पौराणिक नव्हे तर ऐतिहासिक, सामाजिक विषयांची नाटके अतिशय लोकप्रिय ठरली.

अनेक नाटक कंपन्यांनी वेगवेगळी संगीत नाटके करून तत्कालीन समाजावर जणू सुरांची बरसात केली. बालगंधर्वांचे युग त्या काळातलेच. पण केशवराव भोसले, मा. दीनानाथ, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर यांसारखे दिग्गज नट रंगभूमीला मिळाले. पुढे गाण्यांचा अतिरेक झाल्याने संगीत नाटकांची लाट ओसरत गेली.

**गद्य नाटकांचा जमाना**

१८९२ साली 'राजा भीमदेव' हे नाटक रंगभूमीवार आले व पुढची काही वर्षे ह्याच थाटाची नाटके येत राहिली. त्यावरूनच पुढे 'राजा भीमदेवी' पध्दत

असा वाक्यप्रचार गाजत राहिला. १९८० नंतर सुशिक्षत वर्ग नाट्यकलेकडे वळला. शारदासारख्या समस्याप्रधान नाटकांची श्रृंखला ह्याच कालखंडात सुरु झाली. गडक-यांच्या एकच प्याल्याने दारूच्या समस्येला नाट्यरुप दिले. स्वातंत्र्यपूर्व काळात खाडीलकरांनी किचकवध, भाऊबंदकी अशा नाटकांद्वारे जनजागृती केली. गडक-यांच्या नाटकांमुळे गद्य नाटकांना एक वेगळं स्थान प्राप्त झाल. संगीत मागे पडत गेल पण त्याची जागा विनोदी प्रकारांनी घेतली. दिनकर ढेरे सारखे विनोदी नट ह्याच काळात नावाजले गेले. पुढे संगीताप्रमाणे विनोदाचाही अतिरेक होत गेला. त्याचा परिणाम नाटक धंद्यावर झाला. मंदीचे सावट आले.

इ.स. १९२७ नंतर नाटक कंपन्यांची स्थिती बिकट झाली. फाटाफुटीमुळे मंडळ्या फुटल्या. तशी फाटाफुट इ.स. १९१३ पासूनच सुरु झाली होती, जेंव्हा बालगंधर्व, टेंभे व बोडस किर्लोस्कर मंडळीतून फुटून बाहेर पडली होती. मंदीच्या पाठोपाठ बोलपटाच्या आगमनाने रंगमंचाची जादू विरळ होत गेली. पडद्यावरील चित्रांचे, अभिनयाचे आकर्षण रंगभुमीच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले.

त्याकाळातही मामा वरेकरांचे हुंडा प्रश्नावरील नाटक - 'हाच मुलाचा बाप' (१९१८) मध्ये ललीत कलेने आणले. सत्तेचे गुलाम, भूमी कन्या सीता, सोन्याचा कळस अशी आगळीवेगळी नाटके मामांनी लिहली. मोलीएर इप्सेन युगाचा प्रारंभ तेंव्हाच झाला.

**सादरीकरणातला बदल**

केवळ देखाव्यांचे पडदे दाखवून नाटके सादर करण्याच्या परंपरेला छेद दिला तो मामा व केशवराव भोसले यांनीच. पु.श्री. काळे यांनी नवीन प्रकारचे वास्तदर्शी देखावे उभे करून ह्या पुर्वीच्या नेपथ्य - परंपरेला नवेच वळण दिले. नाट्यप्रसंगाला अनुरुप असे व वास्तव वाटतील असे देखावे आणण्याची नवी प्रथा सत्तेचे गुलाम, 'संन्याशाचा संसार', या मामा वरेरकरांच्या नाटकांपासून सुरू झाली आणि पुढे अगदी आजतागायत त्यात कल्पकतेने प्रयोग होत गेले. सत्तेचे गुलाम नाटकात मुंबईच्या प्रिन्सेस स्ट्रीटचा देखावा हुबेहुब रंगवलेला होता. पुर्वी असणारे जंगल रस्ता व राज्य प्रसादाचे ठराविक छापाचे पडद्यांचे नेपथ्य मागे पडले. पुढे १९२२ मध्ये तर शहाशिवाजी नाटकात तर चक्क फ्लॅट सीन्सचा वापर केला गेला. केशवराव भोसले व बापुराव पेंढारकरांनी आनंदराव पेंटर व पु. श्री. काळे यांच्यासारख्या कुशल चित्रकारांच्या मदतीने नेपथ्यात क्रांतीकारी असे बदल केले व ते नाट्य रसिकांनी नाविन्यतेच्या हौसेपायी व वास्तवदर्शी असल्याने सहजपणे स्वीकारले. आर्थिक मंदी, बोलपटांचे आक्रमण ही जरी ठोस कारणे असली तरी नाटक कंपन्याच्या अदुरदर्शी कार्यपध्दतीमुळे आपली रंगभूमी मागे पडली.

**अत्रे - रांगणेकरांनी सावरले.**

नाट्यमन्वतरांच्या 'आंधळ्यांची शाळा' व बालमोहन संगीत मंडळींच्या आचार्य अत्रे लिखीत 'साष्टांग नमस्कार' या नाटकांनी रंगभूमीवरची मरगळ झापाट्याने दुर केली. जोत्स्ना भोळेंची मधुर भावगीते पुर्वीप्रमाणे तानावाली नाट्यपदे नव्हेत, शिवाय केशवराव दाते, पार्श्वनाथ आळतेकर, के. नारायण काळेंची अभिनय साथ हे सर्व आधुनिक शैलीत मांडल्याने लोकप्रिय झाले. अत्रेंनी लिहलेल्या लग्नाची बेडी, मोरुची मावशी, घराबाहेर अशा भिन्न पठडीच्या नाटकांनी सुशिक्षित प्रेक्षकवर्गाला आकृष्ट केले पुढे खुद्द अत्रेसाहेबच सिनेमा क्षेत्रात गेले व सिनेमाचे आकर्षण कमालीचे वाढत गेले आणि त्या पाठोपाठ १९३९ च्या सुमारास दुसऱ्या महायुध्दाने तर सर्वांनाच ग्रासले.

स्वातंत्र्यापुर्वी कालखंडात मो.ग.रांगणेकरांनी नाट्यनिकेतनच्या माध्यमातून 'कुलवधू', 'वहिनी', 'एक होता म्हातारा', ते 'अगदी भटाला दिली ओसरी' नाटकांपर्यंत नाट्यप्रेक्षकांना आपलेसे केले. मध्यम वर्गाचे नाटक निर्माण करण्यात रांगणेकरांचा मोलाचा वाटा आहे. तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब दिसणारी नाटके यायला सुरवात रांगणेकरांमुळे झाली.

**कौटुंबिक नाटकांची बाहूगर्दी**

एकीकडे मराठी-हिंदी सिनेमाचा प्रभाव वाढत असताना रंगभूमीवर गर्दी झाली ती कौटुंबिक नाटकांची. दीर्घ चालणा-या, ताना घेणा-या संगीत नाटकांऐवजी घरगूती समस्या, सुभाषित वजा संवाद, घराघरात घडणा-या घटना, अती परिचित वाटतील अशी पात्रे आणि कृष्णधवल रंगांच्या गडद छटांचे मिश्रण असलेले कौटुंबिक नाटक लोकांना आवडू लागले. १९६४ साली रंगभूमीवर आलेल्या 'वाहतो ही दुर्वांची जुडी' नाटकाने ताई-भाऊंच्या नाटकांचे नव्हे तर मध्यमवर्गीय पांढरपेशा नाटकांचे युग आणले. तोच फॉर्म पुढे मधुसुदन कालेलकर, हिराकांत कलगुटकर सारख्या नाटककारांनी यशस्वीपणे हाताळला. कोल्हटकरांनी पुढे 'सीमेवरून परत जा', 'उघडले स्वर्गाचे दार', 'लहानपण देगा देवा', अशी नाटके लिहली. पण त्यांची ख्याती कौटुंबिक नाटककार म्हणुन अधिक राहीली. दिवा जळू दे सारी रात लिहणाऱ्या कलाकारांनी 'नाथ हा माझा', 'डार्लिंग डार्लिंग', 'पेइंगगेस्ट', आणि 'अपराध मीच केला' हे नानावटी खुन खटल्यावरील नाटक लिहले.

मराठी नाटक हे मध्यम वर्गाचे झाले. पार्श्वभागी असलेले रंगवलेले पडदे जाऊन त्याऐवजी घराचा दिवाणखाना दर्शनी भागात आला. या दिवाणखानी नाटकांनी अगदी आज २१ व्या शतकातही आपल्या प्रेक्षकांची पाठ (की डोळे ?) सोडलेली नाहीत. 'मिशी नाही तर नाटक नाही' या शैलीने दिवाणखाना हे जर स्थळ नसेल तर नाटकच होऊ शकणार नाही अशी नाटककार -निर्मात्यांची धारणा झाल्याचे यावरून जाणवते.

याच दरम्यान नाटकातील इतर तंत्रांचे महत्व जाणून त्याप्रमाणे बदल होऊ लागले होते ही स्वागतार्ह बाब होती. तरी घर म्हटलं की

घरातल्यासारख्या चार गोष्टी दिसाव्यात इतकी ढोबळता नेपथ्यात होती. कलात्मकता तशी दूरच होती. सादरीकरणात सदर धोपटपणा होता. नाटकातल्या गोष्टीला व त्यामुळे होणा–या क्लायमेक्सला विशेष महत्व होते. भिडणारी वाक्ये मग ती कुत्रिम शब्द फुलो–याची असली तरी टाळीची वाक्य म्हणून खपली जात होती. मराठी सिनेमा तमाशापट, ग्रामीणवर्गाच्या जवळ जात होता, तर नाटक मात्र शहरी, सुशिक्षित समाजाचे चित्रण करत होता. मध्यम वर्गीय समस्यांनाच नाटयरुप दिले जात होते. वेगळे प्रश्न, वेगळी हाताळणी करण्याऐवजी जे खपते आहे, तेच खपवण्याचा आग्रह चालू होता. जमेची बाजू हीच होती की मराठी सिनेमापेक्षा नाटकाचा प्रेक्षकवर्ग वाढत होता.

**कामगार रंगभूमी** – जिला गिरणगावी रंगभूमी म्हटले जाते तिने कर्नाटकटिकवण्याला मदत केली. पांढरपेशी समाज जेंव्हा नाटकांना आश्रय देत नव्हता, तेंव्हा गणेशोत्सव, महोत्सव अशा माध्यमातून नाटक जिवंत राहिले गिरगावी रंगभुमीला अनेक नाटककार, रंगकर्मी मिळवुन देण्याचे काम या कामगार लोकांच्या श्रमजीवी रंगभूमीने केले.

**कानेटकर – शिरवाडकर राज्यस्पर्धेचे फलित**

हौशी स्तरावर नवे नाटक उभे राहत होते. महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या हौशी नाट्यस्पर्धांमुळे मुंबई व संपूर्ण महाराष्ट्रात एक नवी नाट्य – चळवळ उभी राहत होती. वसंत कानेटकर, शं.ना.नवरे,चि.त्र्यं खानोलकर, सुरेश खरे, रत्नाकर मतकरी, मधुकर तोरडमल, सतिश आळेकर यांच्यासारखे नाटककार तर विजया मेहता, दामु केंकरे, भालबा केळकर, जब्बार पटेल, रमेश चौधरी, विजय बोंद्रे, ही दिग्दर्शक पिढी उदयास आली. पुढच्या काळात हाच वारसा विनय आपटे, अच्युत वझे, रेखा सबनीस, अमोल पालेकर, इ. मंडळींनी जोपासला. तंत्रज्ञ, नट, नट्या, किती निर्माण झाल्या हे आपण गेल्या २०–२५ वर्षात पाहिलेच आहे. आजचे रत्नाकर मतकरी, विजय केंकरे, प्रकाश बुद्दीसागर, विहंग नायक, स्वाती चिटणीस, दिलीप कुलकर्णी, निना कुलकर्णी, मंगेश कुलकर्णी, सुबोध गाडगीळ अशा अनेकांनी पहिली उमेदवारी राज्य नाट्य स्पर्धेतच केली होती.

वेड्याचे घर उन्हातङ्क सारखं मनोविश्लेषणात्मक नाटक लिहून दादाची मध्यवर्ती भूमिका जबरदस्त लेखणीने रंगविणा–या वसंत कानेटकरांनी पुढे २५–३० वर्षात असंख्य प्रकारची नाटके लिहली. व घरात रमलेल्या व्यावसायिक नाटकांना घरंदाज – अभिजात श्रीमंती दिली. रायगड सारख्या नाटकातून शिवाजी – संभाजी या पित –पुत्राच्या नात्याला कौटूंबिकतेचे नवे परिणाम देले. आशयाची विविधता किती असावी? मदन बांधा, गाठ आहे माझ्याशी, बेईमान, माणसाला डंक मातीचा, (प्रायोगिक वाद्यांसाठी), हिमालयाची सावली, संगीतमय लेकुरे उदंड जाहली. अशा नाटकांनी व्यवसायिक रंगभुमीच्या प्रेक्षकांना एक सजग दृष्टी दिली. बाजारु नाटके व चोखंदळ नाटकातील फरक दाखवून दिला.पुढे तात्यासाहेब शिरवाडकरांच्या बेकेट, कौंत्येय, विदुषक, महंत व सर्वोच्च मुल्य असलेल्या नटसम्राट नाटकाने मराठी रंगभूमीवर कळस चढवला.

**विजय तेंडुलकरांची नवी वास्तवता**

महाराष्ट्र राज्य नाटयस्पर्धेत सादर झालेल्या अरविंद देशपांडे दिग्दर्शित व तेंडुलकरी लेखणीचा नवा अविष्कार शांतता कोर्ट चालू आहे नाटकाने रंजक नाट्यपरंपरेवर परखड आसूड ओढला. मानवी नातेसंबंधातील दाहक वास्तवता उलगडून दाखवली. इब्सेनच्या नोराने युरोप हादरवले तर सुलभा देशपांडेंच्या बेजारेबाईंनी नाट्यसारस्वतांना हादरा दिला. गिधाडे, सखाराम बाईंडर, कन्यादान, कमला, बेबी व घाशीराम कोतवाल या नाटकांनी प्रगत रंगभूमीची नवी वाट चोखाळली. पुढे त्याच वाटेने गो.पु.देशपांडे, दिलीप चित्रे, महेश एल्कुंचवार, सतीश आळेकर, अच्युत वझे, प्रा. अजित दळवी, प्रेमानंद गज्वी अशी नाटककारांची पिढी पुढे सरकली.

**हौशी–आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे योगदान**

भारतीय विद्या भवनच्या स्पर्धांतून तेंडूलकर, देशपांडे, केंकरे, वाटवे ही पिढी उगवली. दामू झव्हेरींच्या आयएनटी स्पर्धेने व नंतरच्या उन्मेष, मृगजळ स्पर्धेने प्रायोगिक रंगभूमी उभी केली व व्यावसायिक रंगभूमीला रंगकर्मीचा ताफाच पुरवला. बॉम्ब–ए–मेरी–जान, ऑल दि बेस्ट, यदाकदाचित अशा नाटकांच्या मूळ एकांकिका ह्याच स्पर्धात केल्या गेल्या. व्यावसायिक नाटकांमध्ये प्रेक्षकांच्या अभिरुचीमध्ये, विनोदी नाटकांच्या शैलीमध्ये बदल करण्याची क्षमता इथल्याच एकांकिकामध्ये होती. १९७५ च्या आसपास लेखक, दिग्दर्शक असलेल्या प्रदीप राजे, डॉ. आनंद नाडकर्णी, विनय आपटे, प्रकाश बुध्दिसागर ह्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर नव्या उन्मेषाने प्रवेश केला. कौटुंबिक साच्यातील नाटकांपेक्षा ध्यानीमनी, छिन्न, शांतेचं कार्टं चालू आहे, दुसरा सामना इत्यादी नाटकांनी व्यावसायिकतेची समीकरणे बदलली. चारचौघी, वाडा चिरेबंदी, चाहूल, अधांतर, डॉ. तुम्हीसुध्दा, शोभायात्रा या नाटकांनी आशय– विषयाचे वैविध्य दृश्यस्वरुपार उभे केले. आजदेखील प्रासंगिक करारसारखे एकांकिवरचे नाटक एक नवा, वेगळा प्रयोग म्हणून उभे राहाते आहे. हे सारे हौशी स्पर्धेचे, आंतर महाविद्यालयीन स्पर्धांप्रमाणे बँक व इतर स्पर्धांचे योगदान आहे.

**प्रायोगिक रंगभूमी**

गोची, 'चल रे भोपळ्या टुणुक टुणूक', 'जुलूस' या प्रायोगित नाटकांनी छबिलदास चळवळ उभी राहिली. वेगळे विषय, वेगळे सादरीकरण यासाठी वेगळ्या त–हेने विचार करणारी रंगकर्मीयांची पिढी उभी राहिली. कै. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या 'प्रतिमा' व 'एक शून्य बाजीराव' या अस्सल देशी प्रायोगिक नाटकाने विदेशस्थ प्रायोगिक नाटकांपेक्षा आपली जातकुळी सिध्द केली. सतीश आळेकर, अच्युत वझेनंतरची शफाअत खान, मकरंद साठे, श्याम मनोहर,

चं.प्र.देशपांडे, डॉ. राजीव नाईक, चेतन दातार या नाटककारांनी आजपर्यंत प्रायोगिकत्वाची मूल्ये जपली. पंडित सत्यदेव दुबेंसारखा प्रायोगिक महर्षी आजही नव्या ढंगात, नव्या उत्साहात आजचे प्रायोगिक नाटक करतो आहे. कालचे ढोलताशे, आजचे बुध्दिबळ – झब्बू किंवा साठेचं काय करायचं ? उजळल्या दिशा या नाटकांचे वेगळेपणा जोपासून व्यावसायिकतेच्या बाजारपेठेत आपले स्वतंत्र अस्तित्व जपलेले आहे. एकांकिकांचे प्रमाण वाढलेले आहे. कदाचित उद्या दोन अंकी नाटकांऐवजी एकांकिकाच केल्या जातील.

**बालरंगभूमी**

सुधा करमरकर– रत्नाकर मतकरींनी मोठी केलेली बालरंगभूमी नंतरच्या काळात संख्येने वाढली. राक्षस, पऱ्या, चेटकिणीऐवजी माकड, अवकाशयान, ढगांचे उपयोग असे विषय येऊ लागले. चिनी बदाम, निम्मा शिम्मा राक्षस, अचाट गावची अफाट मावशी अशा नाटकानंतर दुर्गा झाली गौरी या वेगळ्या नृत्यनाट्याने बालकलावंत व प्रेक्षकांना घडवले. चंदेशाळेचे उपक्रम तसेच कांचन सोनटक्केच्या नाटकशाळेने अपंग, मतिमंद व मुक–बधिर मुलांना व्यक्तिमत्व विकासासाठी नाट्यमाध्यमाचा उपयोग करायला शिकवले. सध्या पूर्ण दोन अंकी नाटके दुर्मिळ झाली असून तीन छोट्या नाटिका (त्यादेखील शिबिरार्थीच्या) करण्याची फॅशन वाढलेली आहे. प्रयोगखर्च वाढल्याने, उपनगरातील बालप्रेक्षकांना नाटकाला आणण्यासाठी पालकांकडे वेळ नाही आणि टीव्हीची घरबसल्या मिळणारी कार्टुन नेटवर्कची करमणूक ह्यामुळे आजची बालरंगभूमी पूर्वीइतकी समृध्द नाही. एके काळी ह्याच बालनाटकांनी डॉ. काशिनाथ घाणेकर, भक्ती बर्वे, दिलीप प्रभावळकर, अजय वढावकर, प्रदीप भिडे असे समर्थ कलाकार दिले आहेत. आता मात्र टीव्ही सीरियल्स व सिनेमात जाण्याचे एक साधन म्हणून बालनाट्य व शिबिरांकडे पाहिले जात आहे. तीच स्थिती सध्या हौशी व स्पर्धात्मक रंगमंचाची झालेली आहे. व्यापारीकरणामुळे रंगभूमीवर नवे काही करण्याची प्रक्रिया थंडावलेली आहे. शिवाय प्रयोगखर्चात ब–याच प्रमाणात वाढ झाल्याने प्रयोग लावणे पूर्वीइतकी सोपे राहिलेले नाही. कार्टून नेटवर्क, ॲनिमेशन व मोठ्यांच्या मालिका चवीने बघणा–यांना बालनाट्याकडे आणण्याचे आव्हान आहे एवढे खरे. शिवाय अभ्यासाचे ओझे, करिअरचा बोजा त्यांना करमणूक व खेळापासून दूर ठेवू पाहतोय. त्याचे काय?

**हौशी, प्रायोगिकवरची सध्याची उदासी**

सीरियल्सच्या प्रादुर्भावामुळे हौशी रंगभूमीवरील उलाढाली मर्यादित झाल्या आहेत. त्याच स्पर्धा व काही नव्या संस्था भाग घेताहेत असे चित्र आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी हौशी कलाकार मिळणे दुरापास्त झालेय, कारण आता सीरियल्समध्ये जाण्यासाठी या स्टेपिंग स्टोनची गरज उरलेली नाही. आविष्कार, रंगवर्धनसारखे उपक्रम चालू आहेत. अपवादाने प्रायोगिक नाटके केली जात आहेत. वेगळे काही करण्याची व्यावसायिक कलावंतांची इच्छाच ही रंगभूमी जगवू शकेल असे वाटते.

**व्यावसायिकवरील वेगवेगळे प्रवाह**

कानेटकरांची नाटके चालू असताना तेंडुलकरांमुळे वास्तववादी, समस्याप्रधान नाटके आली. कौटुंबिक नाटकांची लाट ओसरली. दारव्हेकर, रावतेंसारखे दिग्दर्शक चाकोरीपेक्षा वेगळे देत होते. तोवर त्यांची नाटके आली. दामू केंकरे, पुरुषोत्तम दारव्हेकर, स्त्री नाटककारांमध्ये सई परांजपे आघाडीवर राहिल्या. त्यापाठोपाठ डॉ. विजया वाड, शांता गोखले, मंगला गोडबोले ह्यांची नाटके आली तर दिग्दर्शिका, म्हणून प्रतिभा कुळकर्णीने नाव कमावले. विजया मेहता, रत्नाक र मतकरी, जयवंत दळवी, कमलाकर सारंग ह्यांच्यामुळे व्यावसायिक नाटकांना वेगळे परिमाण लाभले. शब्दप्रधान नाटके मागे पडून दृश्य परिणामांची, पर्यायाने दिग्दर्शकीय पकड असणारी नाटके वाढू लागली. नेपथ्य, प्रकाश, रंगभूषा, वेशभूषा या खात्यांकडे स्वतंत्र कारभार सोपवला जाऊ लागला. तालीमास्तर हे पद जाऊन संकल्पनाकार, दिग्दर्शक – संपूर्ण नाटकाचा कॅप्टन अशी स्थिती निर्माण झाली. दामू केंकरे, अमोल पालेकर, विजया मेहता, सतीश आळेकर, पं.सत्यदेव दुबे, डॉ. जब्बार पटेलसारख्यांनी रंगमंचीय परिभाषा बदलली. बडबडणारे, शब्दबंबाळ नाटक आता पॉजेस् संयत अभिनय, दृश्य परिणामाची तीव्रता ह्याची वाट चोखाळू लागले होते. आघाती संवाद, कृत्रिम डायलॉगबाजी, अनिर्बंध हातवारे, भडक – उथळ सादरीकरण या पठडीला सजग प्रेक्षकांनी नाकारले. त्यामुळेच 'बॅरिस्टर', 'संध्याछाया', 'जास्वंदी', 'महासागर', 'गुंतता हृदय हे', 'सूर राहू दे', 'कन्यादान', 'अश्वमेघ', 'मला काही सागायचंय', 'पंखांना ओढ पावलांची', 'अभिज्ञान', 'शाकुंतलम्' या प्रकारच्या नाटकांची निर्मिती होऊ शकली. गद्य नाटकाने उच्च अभिनय व निर्मितीमूल्यांची सवयच नाट्यप्रेक्षकांना लावली. दुसरीकडे मराठी सिनेमा प्रभात परंपरेपासून दूर जाऊन व्ही. शांताराम, राजा परांजपे, राजा ठाक ूर ह्यांच्या चित्रपटात रमला होता. पुढे मराठी सिनेमाला तमाशा व ग्रामीणपटांचे वेड लागले व तो शहरी प्रेक्षकांपासून दूर गेला. माहेरच्या साडीनेही ह्याच पार्श्वभूमीवर घवघवीत यश (पैसा) कमावला.नाटकाने मात्र कौटुंबिकपणाचा ट्रॅक माफक प्रमाणात ठेवून सामाजिक व कलात्मक नाटकांची वाट चोखाळली. भडक मांडणीने प्रेक्षकांवर प्रभाव टाकण्याऐवजी संयत अभिनय व कलात्मक सादरीकरणाने नाटकांचा दर्जा उंचावला गेला. विधवांचा प्रश्न हाताळणारे बॅरिस्टर, मध्यमवर्गीयांचे महासागर, राजकारण्यांवरील पुरुष, 'एक झुंज वाऱ्याशी', 'उजळल्या दिशा', 'सूर्य पाहिलेला माणूस' या वेगळ्या जातकुळीच्या नाटकांची निर्मिती रंगभुमीची प्रगल्भता दर्शविते. 'सखाराम बाईंडर', 'गिधाडे', 'बेबी ' या नाटकांमुळे वैयक्तिक व कौटूंबिक पातळीवरील हिंसा, वासनांचा वैचारिक व भावनिक स्तरावर आलेख मांडला गेला होता. नव्या पिढीतील वामन तावडेंनी छिन्ननाटकात, प्रशांत दळवींनी ध्यानीमनी मध्ये माणसातील नातेसंबंधांचे पृथ्थकरण केले. 'चारचौघीसारखे' बोल्ड विषय लोकांना आवडले. त्यातील वीस मिनिटांचे स्वगत वंदना गुप्तेंच्या उत्कट अभिनयामुळे व

प्रभावी सादरीकरणाने स्वीकारले गेले. भक्ती बर्वेंची 'रातराणी ' वेगळ्या पठडीची होती. आजचे नाटक हे नाटककारापेक्षा दिग्दर्शकाचे व तंत्राचे झालेले आहे. नाटकातील शब्द व साहित्यमूल्यांपेक्षा शाब्दिक कोट्या व पटकथेचे स्वरुप आले आहे. इम्प्रोवायझेशनमुळे पुढे – मागे लिखित संहिता दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. विनोदी नाटकांमध्ये 'मोरुची मावशीसारखी ' गुणी नाटके चालूच राहिली. त्याबरोबरीने 'वस्त्रहरण', 'पांडगो इलो रे इलो', 'घरात हसरे तारे', 'शांतेचं कार्ट चालू आहे'. या कौटुंबिक कॉमेड्या चालू राहिल्या. 'ऑल दि बेस्ट ' नाटकाने वेगळ्या विनोदाची सुरुवात केली. यदाकदाचितने नव्या कलावंतांच्या पीजेमिश्रित फॅण्टसीचा जमाना सुरु केला. रंगभुमीवर जशी काही काळापुरती हिट ॲण्ड हॉट नाटकाची लाट आली तशी सध्या पीजेबाज नाटकांची लाट आलेली आहे. त्याहीपेक्षा वेगळा विनोद –'हीच तर प्रेमाची गंमत आहे', 'प्रेमा तुझा रंग कसा ' नाटकांमुळे टिकून आहे व मुकुटवाल्या नाटकांपेक्षा प्रसन्न विनोद म्हणून प्रेक्षकांना आवडतो आहे.

**नेपथ्यातील संक्रमणे**

सुरुवातीला नेपथ्य करताना रंगीत कागद, कागदाचा लगदा, हलके लाकूड, माती, शाडू ह्यांचा वापर केला जायचा. कौटूंबिक नाटकात नगासाठी नग म्हणून सोफा व टीपॉय वगैरे वापरले जायचे. ह्यातही रघुवीर तळाशीलकरसारख्यांनी नवे प्रयोग केले. एके काळी पांडुरंग कोठारे, श्याम आडारकर, दत्ता चोडाणकर, बापू लिमये, सखाराम भावे ह्यांनी व्यावसायिक रंगभूमीवरील नेपथ्याची बाजू सांभाळली होती. त्याहीपेक्षा वेगळया नजरेने नेपथ्यविचार करणारे दामू केंकरे (तुघलक), द. ग. गोडसे (अभिज्ञान शांकुतलम,बॅरिस्टर) असे ठळक वेगळे प्रयोग उभे राहिले. आरासी सजावटीने प्रेक्षकांना संमोहित करणारे होते तसेच रंगमंचीय अवकाश अर्थपूर्ण करणारे नव – नवे नेपथ्यकार पुढच्या काळात उभे राहिले. दीपस्तंभ, रमले मी अशा नाटकांपेक्षा ध्यानीमनी, चाहूलमध्ये त्यांनी वास्तवतेचा तपशीलवार आविष्कार दाखविला. घाशीराम कोतवालमध्ये दिग्दर्शक जब्बार पटेलांनी हलत्या मानवी भिंतीचा वापर नेपथ्यासारखा केला. रामदास पाध्येंनी या चिमण्यांनो या या व्यावसायिक नाटकात बोलक्या बाहुल्या वापरल्या व अलीकडेच विष्णुदासांच्या काष्ठपुतलिकांचे यशस्वी पुनरुज्जीवन केले होते. प्रदीप मुळ्येसारख्या तरुण कल्पक नेपथ्यकाराने 'डॅडी आय लव्ह यू', 'प्रकरण दुसरे', 'जावई माझा भला', 'शोभायात्रा', 'तू तर चाफेकळी', 'चूकभूल द्यावी – घ्यावी'. 'चार दिवस प्रेमाचे ' या नाटकांत आशयपूरक नेपथ्य केले व आपल्या क्रिएटिव्हिटीचा ठसा उमटला. 'वाडा चिरेबंदी' या पहिल्या त्रिनाट्यधारेचे नेपथ्य हा अर्थपूर्ण सेटडिझायनिंगचा नमुनाच मानायला हवा. तरुण पिढीतील सुनील देवळेकरने स्पर्धा व एकांकिका करता करता यदाकदाचित, जाणूनबुजून, पुन्हा कदाचित अशी अनेक नाटके केली आहेत. गोलपीठामुळे त्याचे नेपथ्यकर्तृत्व अधिक लक्षणीय ठरले. नितीन नेरुरकरांनी ज्याचा त्याचा प्रश्न, आमच्यासारखे आम्ही, झालं मोकळं आभाळद्वारे आपले कर्तृत्व सिध्द केलेय. मोजके नेपथ्य करणारा राजन भिसे नेपथ्यकार म्हणून तू तू मी मी नाटकाच्या यशाचा शिल्पकार ठरला.

नाटकाचे बजेट वाढले असले व नेपथ्याबद्दल सजगता वाढली असली तरी गुजराथी किंवा इंग्रजी रंगभूमीप्रमाणे भपका करण्याची आपल्याकडे पध्दत नाही. कारण प्रेक्षक केवळ सेट पाहाण्यासाठी येत नाही. दीपक पडते सारख्या तरुण नेपथ्यकाराने अशा नाटकांद्वारे आपली कल्पकता प्रेक्षकांसमोर आणली. पुरू बेर्डेंचे स्वत:च्या नाटकांबरोबरीने इतर नाटककारांच्या नेपथ्याची डिझाईन्स केलेल्या. नाट्यसंपदाने सुरुवात केलेल्या जॅक नाईफमुळे रंगमंचीय नेपथ्यात नवी क्रांती झाली. तोच वारसा फिरत्या रंगमंचावरील रानभूल ने अधिक प्रकर्षाने केला. रंगमंचावरून धडधडत जाणारी गाडी – फुलाला सुगंध मातीचा, नानासाहेब शिरगोपीकरांची ट्रीक सीन्स असलेली नाटके त्या त्या कालावधीत गाजली. तेंव्हाच ठरले होते! यासारख्या नाटकातून भुताटकीचा भास निर्माण करण्यासाठी उडती व्हीलचेअर वगैरे दाखवण्याचा प्रयत्न केला गेला होता. मराठी नाटकाचा प्रेक्षक हा सदैव परिपक्व असल्याने तो अशा चलाखीला कधीच भुलला नाही. दिलीप कोल्हटकरांनी 'हमिदाबाईची कोठी', 'वटवट सावित्री', 'उघडले स्वर्गाचे दार' इत्यादी नाटकांची प्रकाशयोजना केली. सुरेश मगरकरांनी स्पर्धेच्या बरोबरीने 'आईचे घर उन्हाचे',' रज्जू' या नाटकांचे आशयघन नेपथ्य केले. पुरू बेर्डेंचे 'जाऊबाई जोरात'चे सिनेमॅटिक नेपथ्य व 'सर आले धावून'चे श्रीमंती थाटाचे नेपथ्य, बटाट्याची चाळ उभी करणारे नेत्रदीपक नेपथ्य मोहन वाघांच्या कल्पकतेची व निर्माता म्हणून सुजाणतेची 'रणांगण'सारख्या नाटकामुळे कल्पना येते. आजचे नाटक 'तंत्र' वापरते आहे पण तंत्राच्या आहारी गेलेले नाही. परदेशात नेपथ्य प्रकाशाबाबत भन्नाट कल्पनाच वास्तवात आणल्या जात आहेत. ती शक्यता आपल्याकडील मर्यादित बजेटमुळे अजून काही काळ तरी येणे शक्य दिसत नाही. दुबई – अमेरिकेला जाणारी गुजराथी नाटके किंवा इथे होणारी इंग्रजी नाटके याबाबत अतिश्रीमंत असतात. त्यामानाने आपले नेपथ्य सोबरच मानायला हवे. आशयाशी सुसंगत व निर्मात्याला परवडेल अशी नेपथ्यकारीचा कल आहे. प्रदीप मुळ्येसारखा तरुण रंगकर्मी एकाच वेळी तुमचा मुलगा करतो काय? नथुराम गोडसे, राजा सिंह आणि सध्या अरुणा शानबागवरील नाटकाचे नेपथ्य वेगवेगळ्या पातळ्यांवर उभे करतो आहे. प्रदीप पाटील या उगवत्या रंगकर्मीने सुखाने नांदा व प्रासंगिक करारद्वारे आपली कल्पकता दाखवली आहे. मोजके डिझाईन करणा–या रघुवीर कुलनी तुंबारामध्ये नेपथ्य वेगळ्या धाटणीचे होते. पुरु बेर्डे, संतोष पवारसारखे नाटककार दिग्दर्शन करता करता नेपथ्य व संगीताची जबाबदारी सांभाळत आहेत. नाटकाची संकल्पना उभी राहाताना नाटककाराच्या मनातील नाटक उभे करण्याची कल्पनाशक्ती त्यांच्यात आहे. पण यामुळे कालांतराने निर्मात्यांच्या किंवा बजेटच्या सोयीसाठी नेपथ्यकार पदाचा संकोच मात्र होऊ नये.

**एकांकिकामधील नेपथ्यविचार**

सुरुवातीला शब्दप्रधान व कथाप्रधान असलेल्या एकांकिकांमध्ये १९७२-७४ नंतर आमूलाग्र बदल झाले. वास्तवता, अमूर्तता, ॲब्स्ट्रॅक्टनेस दर्शविण्यासाठी दृश्यमय, चित्रमय नेपथ्य येऊ लागले. ठोकळ्यांचा लेव्हल्सचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. नाट्यदर्पणच्या 'कल्पना एक आविष्कार अनेक, सारख्या वेगळ्या स्पर्धेत तरुण नेपथ्यकार अजित पडतेंनी दिलेल्या नेपथ्याच्या आराखड्यावर सुमारे १२५हून अधिक नव्या एकांकिका लिहिल्या गेल्या होत्या. सुचवलेल्या विषयापेक्षा सुचवलेल्या नेपथ्याचे लेखन करणे अधिक अवघड व आव्हानात्मक होते.'

अनंत काणेकरांच्या 'काळोख', 'जनावर'सारख्या एकांकिका, पु. ल. देशपांडेंची 'सारं कसं शांत शांत' या जुन्या लेखकांच्या पाठोपाठ विजय तेंडुलकर व रत्नाकर मतकरींच्या एकांकिकंनी आशय, सादरीकरणात विविधता आणली. सतीश आळेकर (झुलता पूल), वामन तावडे (पिदी व रायाची रापी, द कन्स्ट्रक्शन्स्), प्रदीप राणे (ॲश इज बर्निंग, चिऊताई चिऊताई दार उघड, बुधवार वजा सॉलोमन व स्वगत स्वगते), पुरु बेर्डे (श्री मनाचे श्लोक, शरीर संस्था, टूरटूर), रघुवीर कुल (कोलिष्टक, चूहे), मधुकर गोलामडे (उभे घर, आडवे दार), दिग्दर्शक दिलीप कोल्हटकरांचे बूटपॉलिश, भाऊसाहेब पाटणकरांच्या गझलांवरील एकांकिका त्याचप्रमाणे अण्णा कर्पे, प्रकाश बुध्दीसार, भालचंद्र झा, विनायक पडवळ, चेतन दातार अशा तरूण रंगकर्मींनी एकांकिका करताना चाकोरीपेक्षा वेगळा नेपथ्यविचार केला व त्याचा पुढे उपयोग प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीच्या नाटकांनाही झाला.

**एकपात्री**

एकपात्री नाट्यप्रकार सदानंद जोशी, प्रा. लक्ष्मणराव देशपांडे, सुमन धर्माधिकारी, कै. सुहासिनी मुळगांवकर यांनी विकसित केला. सुषमा देशपांडे, रोहिणी हट्टंगडींनी वेगळे प्रयत्न केले. लालन सारंग, भक्ती बर्वेनी आपले अनुभवकथन सादर केले. शिरीष कणेकरांनी टॉकशो रुजवला. पण लोकप्रियतेची आघाडी मारलीय ती राशिचक्रकार शरद उपाध्येंनी.

संगीत नाटकांची पिछेहाट मंदारमाला, सुवर्णतुला नाटकानंतर चालूच राहिली. पारंपारिक नाट्यगीते प्रेक्षकांना आवडत नाही म्हणून निर्माते अशा प्रकारची नवी नाटके काढत नाहीत. मात्र सौभद्र, स्वयंवर नाटकांचे आजही नव्या गायक - नट संचात प्रयोग चालू आहेत. कट्यारची गोडी अजूनही अवीट आहे. मात्र लेकुरे उदंड जाहलीसारखी गाणी असलेली आजच्या प्रेक्षकांना आपलीशी वाटणारी संगीत नाटके येत नाहीत. काही नाटकातून विडंबन गीते वापरली जात आहे इतकेच. दुस-या बाजूने संतोष पवार सारखा दिग्दर्शक नाव नसलेल्या कॉलेजीयन्सना घेऊन नाटके करतो आहे. शेवटी चांगली नाटकेच टिकणार आहे.

आजचे मराठी नाटक गंभीर विषयापासून दूर चालले आहे. इंग्रजी माध्यामामुळे शुध्द, स्पष्ट मराठी बोलू शकणा-या नव्या तरुण नट-नट्या मिळवणं व सीरियलमुळे नामांकित तारे-तारका मिळवणे कठीण होत चालले आहे. ह्याचा नाटकावार परिणाम झाला आहे. टाईमपास व पीजेवाल्या नाटकांमध्ये टाचणीएवढा आशय व बाकीची कसरत असल्याने नेपथ्यविचाराला वावच उरलेला नाही. अनेक रंगकर्मी सीरियलच्या घाऊक बाजारपेठेत रमलेले आहेत. प्रेक्षकांना टीव्ही चॅनेल्समधून वेळ मिळाल्यावर फक्त टेन्शन घालवणारी नाटकेच हवी आहेत. या परिस्थितीत एकुणच क्रिएटिव्हिटीला सांचलेपणा आलेला दिसतो आहे. अर्थात अशा फेजेस येत राहणारच तोपर्यंत तरी 'शो मस्ट गो ऑन' हे पथ्य सांभालायला हवे!

• • •

# उद्याचं नाटक सकस, टिकाऊ आणि स्वतंत्र ठसा उमटवणारं असेल. !

– जयंत पवार

मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरीक वर्षात अमृत नारायण भालेराव यांनी एक नाटयमहोत्सव भरवून निस्तेज झालेल्या रंगभूमिला नवसंजीवनी दिली. आज नाट्य परिषदेच्या शतसांवत्सरीक वर्षात पुन्हा एकदा व्यावसायिक रंगभूमीची जवळपास तशीच स्थिती झालीय आणि आजही एका भालेरावांची गरज निर्माण झालीय. दुर्देवाने तसा दुसरा अमृत नारायण भालेराव निर्माण होणार नाही. निर्माण होणं कठिणही आहे.

१९४४ साली भलेरावांनी शतसांवत्सरिक नाटयमहोत्सव भरवला, त्याच्या आधीची परिस्थिती अतिशय वाईट होती. रंगभूमी जवळपास मृतप्राय झाली होती. कारण बोलपटाचं जबरदस्त आक्रमण झालं होत. लोक मनोरंजनाच्या या नव्या माध्यमाकडे आकृष्ट झाले. पण हे एक उघड सांगण्याचं कारण झालं. दुसरं खरं आणि आतलं कारण असं होतं की, संगीत रंगभूमीच्या ओझयाखली रंगभूमीचं अर्थकारण दबून गेल होतं. नवे विषय आणि अभिव्यक्ती होत नव्हती. संगीत रंगभूमी कात टकायला तयार नव्हती. तिच्यावर काम करणारे नामवंत नट तोवर थकले होते. रंगमंच्यावर पाहवत नव्हते. त्यामुळे प्रेक्षक नाटकांकडे फिरकेनासे झाले दुसऱ्या बाजूला नाटकातला भपका कमी करायला नाटक मंडळींचे मालक तयार नव्हते. परिणमी ते कर्जबाजारी झाले.

अ. ना. भालेरावांच्या पुढाकाराने भरलेल्या नाट्यमहोत्सवाने नाटकवाल्यांमध्ये नवी ईर्षा निर्माण केली आणि मरगळ झटकून सगळे एकत्र आले. या महोत्सवामुळे रंगभूमीने कात टाकली असे नव्हे, मोठा बदल या महोत्सवाने झाला नाही, पण बदल होण्यासाठी जे पोषक सांस्कृतिक वातावरण व्हावं लागतं ते तयार केलं.

आजची परिस्थिती ही जवळजवळ ४४ सालची आहे. वरकरणी पाहिलं तर दूरचित्रवाणीच्या वाहिण्यांनी केलेल्या आक्रमणात नाटकांचा प्रेक्षक दूर गेला आहे. असंख्य नट दूरचित्रवणी माध्यमाने अडकवून टाकले आहेत. लोकांना घरबसल्या स्वस्त करमणूक देण्याची सवय लावून त्यांची चांगल्या करमणूकीच्या शोधात निघण्याची आच निकामी केली आहे. बरीच आर्थिक पिळवणूक केली असली तरी पैसाही सोडलाय. त्यामुळे केलेल्या कामाच्या तुलनेत खूप कमी असला तरी, आज पैसा नटनटयांच्या हातात खेळतोय. पैसा प्रसिध्दिचा थोडाफार वारा लागून दुय्यम नटही सुखावले आहेत आणि त्यांना आत्मतृप्तीची डुलकी लागली आहे. पैसा ही केमोडिटी केंव्हाच झाली होती पण आता पैसा हेच एकमेव ध्येय झाल्यासारखे सगळे झापडबंद होऊन काम करू लागले आहेत. अशात इव्हेण्टसची एक नवीन संस्कृती उदयाला आली आहे. कालपरवापर्यंत सांस्कृतिक महोत्सव राष्ट्रीय, राज्यीय वा जिल्हा पातळीवर व्हायचे. आता गल्लोगल्ली होणारे सांस्कृतिक उत्सव आणि मोठमोठया इव्हेण्ट कंपण्यांचे शोज हाही एक उत्पन्नाचा स्वस्त मार्ग कलाकारांना उपलब्ध झाला आहे.

याचा एकत्रित परिणाम असा आहे की,नाटकाच्या खाजेपोटी एकत्र जमून, चार गोष्टींवर चर्चा करून,संहिता मिळवून अथवा लिहून त्यावर सतत काम करून आणि दोन महिने तालीम करून एक सलग, सघन आणि संपूर्ण नाटयानुभव घेण्याची निकड कोणालाही वाटत नाही. त्यामुळे मजतचवइंन्स्टंट फूड सारखी नाटके होताहेत. एक थोडा वेगळा विषय डोक्यात आला की, तो रूजविण्याची, अंकुरण्याची वाट न पाहताच त्यावर झटपट संहिता सिध्द होताहेत. नटनटया जशा अ‍ॅव्हेलेबल असतील तशा हयांच्या तालमी होताहेत आणि अशी अर्धकच्ची नाटके तेच ते आकृतीबंध बांधून नाटक बसवतात. वेगवेगळया प्रकारची नाटके करून आपल्यातला कस वाढवण्याची, अपयश पचवण्याची, वाटेल त्या पातळीवर स्ट्रगल करण्याची त्यांची हिंमत आणि क्षमता नष्ट होते. आज ही स्थितीअसल्यामुळे दर्जाच्या बाबतीत मराठी नाटकाने वर तोंड करून बोलावे, अशी परिस्थिती राहिलेली नाही

अशावेळी उद्याच्या नाटकांचा काय अंदाज बांधावा? तो बांधण्याइतके आशादायक चित्र उद्या खरोखरच दिसेल का? आजची राजकिय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती उद्या लगेच बदलेल अशी बिलकुल चिन्हे नाहीत. मग मराठी नाटकांची आजची हालत उद्या सुधारेल असे कोणत्या भरंवशावर म्हणावं?

ठाऊक नाही,पण मला वाटते उद्याचे चित्र नक्कीच चांगले असेल! मराठी नाटक उद्या नक्कीच एक चाांगला चेहरा घेऊन उभा राहिल. तो एकच एक चेहरा असेल असेही नाही,पण नाटकाला त्याचे म्हणून एक सापडलेले असेल. आजचा काळ हा एका अर्थाने संक्रमणाचा काळ आहे. मराठी नाटकांचा प्रेक्षक बदलतोय. आज जुना प्रेक्षक आणि नवा तरूण प्रेक्षक यांची रसमिसळ झाल्याने नाटक करणाऱ्यांना त्यांच्या खर्चाचा अंदाज येत नाही आणि अदांज न येताच लोकानुनय करण्याचा आंधळा प्रयत्न त्यांच्या अंगाशी येतोय. येत्या काळात तो बराचसा स्थिर होईल. त्याची अभिरूची एक नसली तरी त्याची सेन्सॅबिलिटी जवळपास सारखी असेल. या प्रेक्षकाला सामोरे जात त्याला रूचेल असे नाटक गंभीरपणे सादर करावे लागेल, कधीकधी त्याला न पचणारे देण्याची जोखीमही स्वीकारावी लागेल. नवे रंगकर्मी ती स्वीकारतील, असा विश्वास वाटतो.

हा विश्वास वाटण्याचे प्रमुख कारण म्हणजे येत्या काळात रंगभूमी तरूणांच्या हातात असली तरी हा तरूण आताच्या सारखा कुठल्यातरी फुटकळ यशावर नाटकात आलेला नसेल, तो नाट्य माध्यमाचे शास्त्रशुध्द शिक्षण घेऊन आलेला प्रशिक्षित तरूण असेल. त्याला जागतिक रंगभूमीचा

इतिहास, जगभर झालेले प्रयोग,रंगभूमीचे अनेक प्रवाह याचे भान असेल आणि त्यातले अनेक प्रयोग त्याने शिक्षणक्रमात करून पाहिलेले असतील. पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातून पदवी मिळवून आलेले अनेक रंगकर्मी आज नाट्य व्यवसायात स्ट्रगल करताहेत. गतवर्षी मुंबई विद्यापीठानेही थिएटर आर्टचा पदव्युत्तर पदविकेचा अअभ्यासक्रम सुरू केलाय. मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशाळा विभाग नवी मुले घडवित आहे. यातून येणारे विद्यार्थी उद्याची रंगभूमी ताब्यात घेतील.

मराठी रंगभूमीचे आजचे चित्र जरी निराशाजनक भासले तरी दहा वर्षापूर्वीचे चित्र असे नव्हते. १९९० ते २००० हे दशक मराठी रंगभूमीवर वेगवेगळया विषयांची, आशयांची शैली आणि घाटांची नाटके घेऊन आले. ही नाटके लिहिणारे नाटककार आणि ती दिग्दर्शित करणारे दिग्दर्शक हे आजही कार्यरत आहेतच. त्यांची अधूनमधून येणारी चार नाटके गेल्या चारपाच वर्षातही पुरेसा दिलासा देऊन गेली आहेत. ही मंडळी मधल्या काळात थांबली, थांबल्यासारखी वाटली ती परिस्थितीच्या गुंत्यामुळेच. सभोवताली प्रचंड वेगाने घडणाऱ्या घटना धड कोणताच परिणाम पूर्णपणे होऊ देत नव्हत्या. एकाचवेळी अनेक विषय खुणावणे आणि लिहिलेले लगेच शिळे वाटण्याची एक विचित्र स्थिती सर्वत्र अनुभवास येत होते आणि सलग काही कागदावर उतरू न शकण्याचा अनुभव घेत होते. सांगायचे खूप आहे, एकाच विषयात अनेक विषय दडलेले दिसताहेत पण ते मांडण्याची नाटकाची रूढ चौकट अपुरी पडतेय, याचे भान त्यांना येत होते आणि ती रंगभाषा शोधण्याची निकड त्यांना जाणवत होती. दिग्दर्शकांसाठीही मधला काळ चिंतनाचा ठरला आहे. हे लेखन दिग्दर्शक आपले अनुभव संचित घेऊन नाटकाचा वेगळा अविष्कार घडवतील असे मानायला जागा आहे.

साहजिकच येत्या काळातले मराठी नाटक हे अधिक सकस,टिकाऊ पुर्वीपेक्षा संपूर्णतः वेगळे आणि स्वतःचा ठसा उमटवणारे असेल. हे नाटक पेलायला नवीन निर्मातेही तयार होतीलच आणि प्रेक्षकही नव्याचे स्वागत करायला आतुर असतिलच !

• • •

# निमंत्रण रंगकर्मींना



# नाटयकर्मींच्या प्रयत्नाने नाटयसृष्टिला अढळपद मिळेल!

– शं. न. नवरे

मराठी नाटकाच्या पुढील १०० वर्षाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास मला वाटते, जी गोष्ट चिरंतरन आहे ती शंभरच काय हजार वर्षेही टिकून राहिल. सूर्य उगवायचा कधी थांबला आहे का? काळानुरूप प्रवाहात बदल होऊ शकतो. तो कमी जास्त होऊ शकतो इतकेच. नाटकाचेही तसेच आहे.

परिवर्तन हा काळाचा नियम आहे. नाटकातून परिवर्तन होतच राहिल. पूर्वी इडली, डोस्यासारख्या दाक्षिणात्य पदार्थ आपण फक्त हॉटेलातच खात असू. आता हे पदार्थ आपण सर्रास घरीही बनवतो. माझ्यामते हे आपल्या स्वयंपाकघरातले परिवर्तनच आहे. तसेच नाटकाचे आणि सिनेमाचेही आहे.

सिनेमातील बदल आपण आज अगदी सहज स्विकारतो. मला वाटते, नाटकातही काळानुरूप बदल होत आहे, ते आवश्यकच आहेत. आजकालच्या नाटकात पात्रांचा वावर खूप मोकळेपणाने होत असतो. आपल्या घरीदारी ,आपल्या नात्यांमध्ये होणारे बदल त्या त्या काळातील नाटके आपल्यात सामावून घेत असत. काळ, काम आणि वेळेचे गणित जमवताना नाटक लहान होत गेले.पण नाटक येणे कायम चालूच राहिले.

छोटया ओढयाचे पुढे मोठया नदीत रूपांतर होते. ती नदी प्रवाह बदलते तर कधी पायऱ्यांवरून खळखळत जाते. पण वाहणे कधी थंबवत नाही. नाटकात पुर्वी मोठी पल्लोदर वाक्ये असत. एका दमात म्हटली जाणारी मोठी मोठी स्वागते असत. ते प्रेक्षकांनांही एक आकर्षणच असे. नंतर कदाचित हळूहळू लोकांच्या लक्षात येऊ लागले. असावे की,इतकी मोठी पल्लेदार वाक्ये आपल्या रोजच्या आयष्यात वापरली जात नाहीत. प्रेक्षकांना मग नाटकात बोलली जाणारी भाषा नाटकी वाटली असेल. हळूहळू अशा प्रकारची वाक्यं नाटकातून कालबाहय होत गेली.

परिस्थितीनुरूप प्रवाह बदलतो त्याप्रमाणे नाटकाचे विषयही बदलतात.कालबाहय गोष्टींची जागा त्या – त्या परिस्थितीनूरूप नवीन बाजाची नाटके घेत असतात.प्रत्येक क्षेत्रात नवीन बदल होत असतात तसे नाटकातही अपेक्षित असतात.

सध्याच्या काळात नाटकांचा सर्वांगाने विचार कायचा झाला तर पाश्चात्य नाटके उत्ताणपणाकडे झुकणारी आहेत. बऱ्याच नात संहिता नावालाही नाही. पण अभिजात मराठी नाटक मात्र जातीवंत चाफ्याच्या फुलासारखे असावे. चाफ्याच्या फुलाला जशी चाफ्याचीच फुले येतात, त्याप्रमाणे मराठी नाटक असावे.

भारतीय नाटयसृष्टीत संस्कृत नाटककारांनी बीज रूजवले. गडकरी, खाडिलकऱ्यांसारख्यांनी खत– पाणी घातले. विलायती म्हणजे नाटकाबाबत त्यांनी केलेले प्रयोग. आज त्याचे वृक्षात रूपांतर झाले आहे. प्रेक्षक त्यांची साक्ष आहेत. असेच पुएच्या काळात वेगवेगळे खतपाणी घातले जाईल. नाअक चांगले फुलत जाईल.पुढची १०० वर्षेव त्यापुढेही नाटक टिकविण्याची जबाबदारी कोणा एका व्यक्तिची किंवा घटकाची नक्की नाही. कारण वर म्हटल्याप्रमाणे परिवर्तन हा सृष्टिचा नियम आहे. भविष्यात येणारी मराठी नाटके मराठी प्रेक्षकांसाठी आर्दश असतील रंगकर्मींनी प्रामाणिकपणाने आणि मनःपूर्वक केली असतील तर ती नक्कीच यशस्वी होत जातील .

ज्याप्रमाणे युद्धावर जाणारा सैनिक युद्धातील जयशिवाय इतर कुठल्याही गोष्टीचा विचार करत नाही त्याप्रमाणे निर्मात्यांनी – रंगकर्मींनी कधही व्यावसायिक दृष्टिने नाटे चालणं न चालणं यापुरता विचार मर्यादित ठेवू नये. म्हणजे मग त्याला नाटके न चालल्याचे दुःख थोडेसेच होऊ शकेल पण केलेल्या प्रयत्नाबद्दल पश्चाताप मात्र होणार नाही.

नाटक मला कायम इसापाच्या गोष्टिमधल्या आक्रोडाच्या झाडासारखं वाटतं. इसापाच्या या गोष्टीत माणूस आक्रोडाचे झाडलावणाऱ्याला विचारतो, अरे वर्षानंतर फळे येणारे झाड तू आज का लावत आहेस? तुला थोडीच त्याची फळ खाता येणार आहेत? यावर झाड लाणारा उत्तरतो, मला नाही मिळाली तरी उद्या कोणाला तरी खायला मिळावीत म्हणून मी हे झाड लावलयं! झाडच लावले नाही तर कधीच कुणला फळं मिळणार नहीत! नाटक हे देखी असेच कधीतरी कुठेतरी कोणीतरी लावलेले बीज आहे, ज्याची फळ आज आपण खात आहोत.हा वृक्ष असाच पुढे सुंदर फळाफुलांना बहरत राहिल.

नाटकाचा आत्मा सांभाळण्यासाठी तांत्रिक बाबी असाव्यात. त्या अंगांचं आत्मा हरवेल इतकं अवडंबर मात्र माजवू नये. कथेत जीव नसेल तर नाटक चांगलं आणि आर्दश बनू शकत नाही, याची जाणीव नव्या पिढीनं ठेवणं आवश्यक आहे.

आज शासनाने सुरु केलेल्या नाटयस्पर्धेला उत्कृष्ट प्रतिसाद मिळवते आहे, कारण तरूण वर्गात नाटकाविषयी असलेली ऊर्मी! नाटक रंमंचावर आणणारी कंपनी असते. तिचे फायद्यातोटयाचे गणित असते. या ताळेबंदात बसणारी नाटके रंगभूमीवर येतात. मग एखादे नाटक गाजल की, त्याच पठडीची अनेक नाटके होतात. ही पठडीतील नाटके नीरस वाटू लागली की प्रेक्षक त्यापासून दूर जातो. अशावेळी एखादा रंगकर्मी अक्रोडाचे नवीन झाड लावण्याचा प्रयत्न करतो. असा प्रयत्न कायम होतच राहणार! आपापल्या परीने अक्रोडाची झाडे लावणारी वेडी माणसे आपल्या दुनियेत आहेत, म्हणूनच आपले जीवन सुखावह होते. मराठी रंगभूमीवरही नाटयवेडया कलावंतांकडून अधिक अक्रोडाची झाडे पुढच्या १०० वर्षात लावली जातील. त्यावर फळे येतच राहतील. शेवटी एक नाटककार म्हणून इतकेच वाटते, माणसाने सतत मनःपूर्वक प्रयत्न करत रहावा. प्रयत्नांच्या फळापासून समाधान, सार्थक आणि विश्वास या गोष्टि नक्कीच मिळतात. नाटक होत राहील आणि रंगकर्मीचे प्रमाणिक आणि मनःपूर्वक प्रयत्न नाटयसृष्टिला जगात अढळपद प्राप्त करून देतील.

● ● ●

# रंगभूमी टिकण्याची जबाबदारी सर्वांवरच!

- सुधीर भट

पुढील १०० वर्षेरंगभूमी नक्कीच टिकेल. पण तिला अधेमधे थोडी मरगळ आलेली असेल. असे आजपर्यंत होत आलेले आहे. सध्याची मराठी नाटकधंद्याची परिस्थिती पाहता आजचे चित्र फारसे आशादायक आहे असे वाटत नाही.

रंगभमीसाठी प्रत्येक काळात कलाकारांची एक फळी तयार व्हावी लागते. पहिल्या दोन फळयांइतकी तिसरी फळ तोलामोलाची तयार झालेली नाही असे मला वाटते. जुन्या नाटकातील जुन्या कलाकारांची कामे या नवीन लोकांनी पहायला हवीत. त्यांचा त्यांनी अभ्यास करावा. वसंत कानेटकर, पु.ल देशपांडे लेखकांच्या नाटकांसारख्या सशक्त स्क्रिप्ट यापुढेही तयार होणे आवश्यक आहे. त्या होत आहेत असे मला वाटत नाही.

पुढील १०० वर्षेनाटक टिकावे असे वाटत असेल तर ही जबाबदारी निर्मात्यांची, कलाकारांची, नाटककारांची, प्रेक्षकांची सुद्धा आहे असे मला वाटते.

सध्याच्या नाटकात धांगडधिंगा संगीतच जास्त आहे. रेकॉर्डेड संगीताचा वापर जास्त होतो आहे. त्यात बदल होणे आवश्यक आहे. नेपथ्यात काळरनुसार बदल होत जातील वहे बदल होणे आवश्यक आहे. इतर तांत्रिक बाबतीत फारसे बदल प्रेक्षक किती प्रमाणात स्वीकारतात यावरही यावरही नाटकाचे भवितव्य अवलंबून राहील.

मराठी नाटक पुढे कसयमसाठी  टिकविण्याविषयीची प्रेक्षकांची जबाबदारी तर नक्कीच मोठी राहील. जुन्या काळी दूरदर्शन नव्हते. दूरदर्शन मालिका नव्हत्या. आता दूरदर्शन आल्यामुळे चांगल्या नाटकांतून चांगली कामे करणारे नट ज्यावेळी दूरदर्शन मालकिंमधून अत्यंत निकृष्ट दर्जाची भूमिका निभावताना प्रेक्षक पहातात, त्यावेळी प्रेक्षकांमध्ये नक्कीच संभ्रम निर्माण होतो. व त्यांची मते बदलतात.

बरेचदा असेही होते की प्रेक्षक चांगल्या नाटकांकडे फिरकत नाहीत. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. असे वाटते. चांगल्या नाटकांची कदर प्रेक्षकांनी करत राहणे आवश्यक आहे. त्यामुळे निर्मात्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

